# व्यक्ती अभ्यास पध्दती – एक शैक्षणिक दृष्टीकोन

**प्रा.डॉ. अमितकुमार शंकरराव गागरे**
सहायक प्राध्यापक
आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors www.vidyawarta.com

# व्यक्ती अभ्यास पध्दती — एक शैक्षणिक दृष्टीकोन

© प्रा.डॉ. अमितकुमार शंकरराव गागरे

❖ **Publisher :**

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
Limbaganesh, Dist. Beed (Maharashtra)
Pin-431126, vidyawarta@gmail.com

❖ **Printed by :**
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
**www.vidyawarta.com**

❖ **Page design & Cover :**
Shaikh Jahuroddin, Parli-V

❖ **Edition: Jan. 2021**

**ISBN** 978-93-90618-26-2

All Rights Reserved, No part of this publication may be reproduced, or transmitted, in any form or by any means, electronic mechanical, recording, scanning or otherwise, without the prior written permission of the copyright owner. Responsibility for the facts stated, opinions expressed. Conclusions reached and plagiarism, If any, in this volume is entirely that of the Author. The Publisher bears no responsibility for them. What so ever.Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)

## — प्रस्तावना —

मानवाचा विकास हा संशोधनामुळेच झालेला आहे. संशोधनवृतीमुळे मानवाच्या ज्ञानात भर पडत गेली. संशोधन हे दोन प्रकारचे असते संख्यात्मक व गुणात्मक. आतापर्यत संख्यात्मक संशोधनाचे युग होते. परंतु आता गुणात्मक संशोधनाला महत्व प्राप्त झाले आहे. संख्यात्मक संशोधनात किती या प्रश्नाच्या उत्तराला महत्व आहे. तर गुणात्मक संशोधनात कसे या प्रश्नाच्या उत्तराला. गुणात्मक संशोधन पध्दतीमध्ये व्यक्ती अभ्यास पध्दती याचा प्रामुख्याने वापर केला जातो.

सर्व प्रकारच्या विद्याशाखामधील संशोधनामध्ये व्यक्ती अभ्यास पध्दतीला महत्व प्राप्त झालेले आहे. व्यक्ती अभ्यास पध्दतीला संशोधन क्षेत्रात वेगळे स्थान आहे. संशोधनातील गुणात्मक संशोधनात व्यक्ती अभ्यास पध्दतीचा समावेश होतो.

व्यक्ती अभ्यास पध्दतीवरील हे पुस्तक संशोधन अभ्यासकांच्या हाती देताना आंनद वाटत आहे. शैक्षणिक अंगाने एखादया व्यक्तीचा, संस्थेचा व विद्यापीठाचा समग्र अभ्यास करण्यासाठी या पुस्तकाचा निश्चितच उपयोग होईल. शिक्षणातील विविध पैलूंचा अभ्यास गुणात्मक पध्दतीने करण्यासाठी हे पुस्तक संशोधकांना उपयुक्त ठरेल.

प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशनाचा जबाबदारी **विद्यावार्ता** प्रकाशनाचे डॉ.बापू घोलप यांनी उत्तम प्रकारे पार पाडलेली आहे. त्याबददल त्यांचा मी ऋणी आहे. तसेच माझे संशोधनातील मार्गदर्शक डॉ.संजीव सोनवणे, डॉ.मेघा उपलाने, डॉ. स्नेहल तावडे, डॉ.गीता कांबळे, डॉ.वैभव जाधव यांचाही मी ऋणी आहे. या पुस्तकाची

प्रेरणा रयत शिक्षण संस्थेचे माजी चेअरमन कै.ॲड.रावसाहेब शिंदे, सध्याचे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांचे ऋण मानणे हे माझे मी कर्तव्य समजतो.

हे पुस्तक लिहिण्यासाठी अनेकांनी प्रोत्साहन व वेळोवेळी मार्गदर्शन केले, त्यामध्ये वडील डॉ.शंकरराव गागरे, आई सौ. नंदाबाई गागरे, माझी पत्नी डॉ.प्राची गागरे, बंधू डॉ. अजित गागरे, माइया आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन साताराच्या महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक या सर्वाच्या ऋणात राहणेच मी पंसत करील

पुस्तकात काही त्रुटी असल्यास त्या दूर करण्याचे प्रयत्न आवश्य करु. आपल्या अनमोल सूचनांचे स्वागत आहे.

# अनुक्रमणिका ....


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | ०७ |
| २. | संदर्भ साहित्याचा आढावा | ५६ |
| ३. | संशोधन पध्दती | ७३ |
| ४. | विश्लेषण व अर्थनिर्वचन | ९१ |
| ५. | सारांश, निष्कर्ष व शिफारशी | १६२ |
| | संदर्भ सूची | १९५ |

# 01

# संशोधन समस्येची ओळख

**१.० प्रस्तावना—**

मराठी साहित्यसृष्टीत काही लेखक आपल्या वाङमयामुळे अजरामर झालेले आहेत. काळाच्या ओघात त्यांचे वाङमय नष्ट झालेले नाही. पिढयानपिढया ते वाङमय टिकून आहे. लोकांच्या अभिरूचीला ते मान्य झाले आहे. अशा काही लेखकांचा वानगीदाखल उल्लेख करता येईल. रससिद्ध कवीश्वरांचा अग्रणी म्हणून संत ज्ञानदेवांची किर्ती महशूर आहे. संत एकनाथ यांनी तर विविध व विपुल वाङमय निर्मिती केली. पंडीतांच्या पसंतीलाही त्याचे वाङमय उतरले तसेच जनसामान्यांच्या अंत:करणालाही स्पर्श करण्याचे सामर्थ्य त्यांच्या वाङमयात होते. प्रापंचिकांचे परमार्थी झालेले संतश्रेष्ठ तुकाराम भोळयाभाबडया प्रापंचिकांना परमार्थाचे अधिकारी करू शकले. राष्ट्रगुरू म्हणून ज्यांना संबोधले जाते ते राष्ट्रसंत समर्थ रामदास यांनी जनसामान्यांचे थोर प्रबोधन केले.(सानेगुरूजीच्या साहित्याची शैक्षणिक चिकित्सा — डॉ.प्रभुणे रा.गो. १९९१, सन्मित्र प्रकाशन)

वर उल्लेखलेले तसेच त्यांच्यासारखे इतर संत व त्यांचे वाङमय श्रेष्ठ होते. परंतु जनसामान्यांच्या अंत:करणाला केवळ वाङमयीन गुणांनी ते स्पर्श करू शकले असे म्हणणे योग्य ठरणार नाही. ते त्यांच्या कार्याचे योग्य असे मूल्यमापन होणार नाही. हे सर्व संत श्रेष्ठ साहित्यिक तर होतेच, परंतु त्याचबरोबर ते थोर लोकशिक्षक होते ते महाराष्ट्राचे थोर प्रबोधनकार होते. समाज जीवनावर संस्कार करण्याचे सामर्थ्य त्यांच्या वाङमयामध्ये होते. समाज जीवनाचे प्रबोधन करणे, व्यक्तीच्या मनाचे उन्नयन करणे हे त्यांच्या वाङमयाचे कार्य होते. ज्ञानदेवांनी तर परमार्थ सुगम करून

जनसामान्यांपर्यंत पोचविला. एकनाथांनी अजोड अशी लोकशिक्षकाची भूमिका बजावली. संत रामदासांनी लोकांचे प्रबोधन करून त्यांची मने चैतन्याने भारून टाकली. यावरून एक गोष्ट स्पष्ट दिसते की या संतांच्या वाङमयामागे त्यांची मुलभूत अशी लोकशिक्षकाची भूमिका होती. लोकजीवन शुद्‌ध व समृद्‌ध करण्याचे सामर्थ्य त्यांच्या वाङमयात होते.

प्राचीन काळातील या संतांनी लोकजीवनाला आकार दिला. अर्वाचीन काळात सुद्‌धा असे काही थोर लेखक होऊन गेले की त्यांनी लोकजीवनाला आकार दिला. राष्ट्रपिता महात्मा गांधी पूज्य संत विनोबा भावे हे एक थोर लोकशिक्षकच होते. ज्ञानोबा ते विनोबापर्यन्त वाङमयाचा शोध घेतला तर असे दिसते की या सर्वाची भूमिका थोर प्रबोधनकाराची, लोकशिक्षकाची होती. या सर्वाच्या वाङमयामध्ये एक सर्वसाधारण गुणधर्म होता. तो गुणधर्म म्हणजे या सर्वाच्या विचारामध्ये शैक्षणिक मूल्ये होती. एक विशिष्ट प्रकारचा शैक्षणिक दृष्टीकोन होता. या शैक्षणिक मूल्यांखेरीज व शैक्षणिक दृष्टिकोनाखेरीज त्यांच्या वाङमयाचा शोध घेतला तर त्यांच्या वाङमयाला योग्य न्याय दिला असे होणार नाही. (सानेगुरूजीच्या साहित्याची शैक्षणिक चिकित्सा — डॉ.प्रभुणे रा.गो. १९९१, सन्मित्र प्रकाशन)

विचारवंत, संत हे मूलत: शिक्षकच असतात औपचारिक चौकटीच्या बाहेर ते लोकशिक्षण करतात. व्यक्तीची व समाजाची जडण—घडण करण्यात त्यांचे योगदान मोठे आहे. प्राथमिक शाळेतील विद्यार्थी आपल्या गुरूजनांकडे श्रद्‌धेने बघतात. निष्ठावान समाजघटक त्याच दृष्टीने संत, विचारवंत यांच्याकडे बघतात. त्यांचा आचार—विचार आदर्शवत मानला जातो म्हणून लोकशिक्षक या नात्याने संतांना जनजीवनात असाधारण महत्व आहे. औपचारिक स्वरूपाची विद्यार्थीदशा कालमर्यादित असते. अनौपचारिक शिक्षणाची क्षितिजे व्यापक व विशाल असतात त्याला स्थल, काल, वय इत्यादींच्या मर्यादा नसतात.

आज शिक्षण आणि साक्षरता यासंबंधी समाजात विविध चळवळींना गती येत आहे. शिक्षणाचे महत्व ज्याला कळले नाही, अशी संख्या तुलनेने फार कमी आहे. ज्ञानाचा प्रस्फोट, विवेकवादाचा अभाव आणि चंगळवादाचे प्रचंड समर्थन अशा विविध भोवऱ्यांमध्ये समाजजीवन अडकून पडले आहे. त्या भोवऱ्यातून बाहेर पडण्यासाठी या विविध भोवऱ्यांच्या तळाशी गेले पाहिजे आणि मग संत साहित्य, विचारवंतांचे विचार व्यक्तीच्या मदतीस येईल. (शिक्षणतज्ज्ञ—समर्थ रामदास—डॉ.गोगटे बा.बा. १९९३)

समाज शहाणा झाल्याशिवाय या समस्या सुटणार नाहीत. केवळ भौतिक प्रगतीने समाज शहाणा होतो हे प्रमेय सिद्ध झालेले नाही. समाजाची नैतिक पातळी विकसित करणे हा ही विचार महत्वाचा आहे म्हणूनच महात्मा गांधीजींची साधन—सुचिता महत्वाची, अंतरबाहय माणूस स्वच्छच पाहिजे. तो चारित्र्यशीलच असला पाहिजे हे गांधीजींचे विचारच जगाला तारू शकतील. त्या मार्गानेच विश्वमानवाचे कल्याण होईल त्यासाठी व्हायला पाहिजे समाजप्रबोधन जागवायला पाहिजे विचारशक्ती! सगळयाच क्रांत्या आणि परिवर्तने ही विचार जागृतीतूनच घडून आल्या. या विचारजागृतीला 'प्रबोधन' हाच एकमेव मार्ग. (प्रश्न आहे मूल्यांचा ॲड.रावसाहेब शिंदे, अमेय प्रकाशन २००९)

व्यक्तींनी समाज बनतो पण प्रत्येक व्यक्ती समाज घडवितेच असे नाही. त्यातील एखादीच व्यक्ती सामाजिक, शैक्षणिक कार्याचा, विचारांचा आदर्श निर्माण करते. आपल्या उक्तीकृतीतून मानवी जीवनमूल्यांचा आविष्कार करते त्यासाठी आपले जीवन समार्पित करते. समाजाची विचारजागृती करते, प्रबोधनाची मशाल बनते. (रावसाहेब शिंदे प्रेरणापर्व — प्रा.डॉ.बाबुराव उपाध्ये — अमेय प्रकाशन २००८)

आपल्या विचारांनी व जीवनकार्याने समाजाची विचारजागृती करणारे व प्रबोधन करणारे व्यक्तिमत्व म्हणजे थोर स्वातंत्र्यसैनिक ॲड.रावसाहेब पाडुरंग शिंदे.

## १.१ समस्येची पार्श्वभूमी

समस्येची पार्श्वभूमी :—

व्यक्तिमत्त्व ही एक व्यापक संकल्पना आहे. मानसशास्त्रज्ञांनी विविध प्रकारच्या वैचारिक दृष्टिकोनानुसार व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. मानसशास्त्रज्ञांनी व्यक्तिमत्त्वामध ये दिसणाऱ्या ठळक गुणांच्या आधारे व्यक्तिमत्त्वाचे विश्लेषण केले असल्याचे आढळून येते, यामध्ये ऑलपोर्ट व ऑडबर्ट (१९३६) यांची गुणतत्त्व सिद्धांताची उपपत्ती महत्त्वाची आहे.

ऑलपोर्ट व ऑडबर्ट यांनी इंग्रजी शब्दकोषातून व्यक्तिमत्त्व गुणदर्शक १८,००० विशषणे शोधली. त्यांनी घटक विश्लेषणानंतर ४५०० व्यक्तिमत्त्व वैशिष्टये दर्शविणारे ठळक गुण शोधले. प्रत्येक व्यक्तिमध्ये अशाप्रकारे विविध गुणांचे वैशिष्टयपूर्ण संघटन झालेले दिसते. साधारणत: ३ ते १६ ठळक गुणवैशिष्टये व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व व्यक्त करण्यासाठी ठळकपणे सांगता येतात. ऑलपोर्ट व ऑडबर्ट यांनी व्यक्तीच्या गुणवैशिष्टये वर्गीकरण ३ गटात केले.

१. प्रधान गुणवैशिष्टये
२. केंद्रिय गुणवैशिष्टये
३. दुय्यम गुणवैशिष्टये

ऑलपोर्ट व ऑडबर्टच्या मते प्रधान गुण हा त्या व्यक्तीच्या अभिन्न भाग असतो. अशा एखादया दुसऱ्या गुणांवरून व्यक्तीचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व प्रभावित झालेले दिसते. अशा अद्वितीय गुणांना 'प्रधान गुण' असे म्हणतात. या गुणांवरूनच ती व्यक्ती ओळखली जाते. व्यक्तीचे संपूर्ण जीवन त्या गुणांच्या अभिव्यक्तीत व्यतीत होते.

उदा. मदर तेरेसा यांची दीन—दुबळयांची सेवा, बाबा आमटे यांची कुष्ठरोग्यांची सेवा, म. गांधी यांची सत्य व अहिंसा यावरची निष्ठा.परंतु सर्वच व्यक्तींमध्ये प्रधान गुण विकसित होतीलच असे नाही. फारच थोडया लोकांमध्ये अद्वितीय प्रधान गुण विकसित

झालेले दिसतात. (बडगुजर, सी., बच्छाव, ए., व शिंदे, व्ही. सामान्य मानसशास्त्र. १९९९, स्वयंभू प्रकाशन, नाशिक.)
ॲड्. रावसाहेब शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये ऑलपोर्टच्या उपपत्तीनुसार संशोधकाला प्रधान गुण आढळले. ॲड्. शिंदे संपूर्ण जीवन राष्ट्रवाद, साम्यवाद, शिक्षण, सहकार, शेती कायदयांचा अभ्यास व अंमलबजावणी तसेच मूल्यसंवर्धनासाठी केलेले जाणीवपूर्वक प्रयत्न यांच्यात व्यतीत झाले.

सदर संशोधनात ॲड्. रावसाहेब शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्व गुणवैशिष्टयांचे व त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक विचारांचा अभ्यास केला आहे.कोणत्याही विचारवंताने, राष्ट्रपुरूषाने देशाला,समाजाला किंवा विशिष्ट क्षेत्राला आपल्या कार्यकर्तृत्वाने जे काही योगदान दिले असेल त्याचे कालांतराने मुल्यमापन होतच असते.त्यासाठी त्यांनी व्यक्त केलेले विचार आणि कृतीत आणलेले आचार यांचे परिक्षण व विश्लेषण करण्यासाठी शोध कार्य हाती घेतले जाते. विश्लेषणात्मक संशोधनामध्ये एखादया जुन्या काव्याचा किंवा विचाराचा नव्याने विचार करून त्याकडे वेगळया विश्लेषण दृष्टीने पाहण्याचा प्रयत्न केला जातो. तशाच प्रकारे एखादया व्यक्तिने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शिक्षणव्यवस्थेसंदर्भात नव्याने काही विचारांचे प्रगटीकरण केले असेल तर त्याचा शैक्षणिक शोध घेणे अगत्याचे ठरते.मानवी भावना विश्व समृध्द करणे हे साहित्याचे महत्वाचे कार्य असते. ब—याचदा त्यात वैचारिकतेचा भाग अधिक असतो. कित्येकदा भावना अथवा संस्काराची कलात्मक जाणीव प्रभावी असते. अनेकवेळा समाजाला संदेश देण्याची, त्याला मार्गदर्शन करण्याची तळमळ ही अधिक असते. ‘सर्वच संशोधनाचा उदद्देश फक्त ज्ञानप्राप्ती करणे एवढाच नसतो तर संशोधित ज्ञानाला व्यावहारिक जीवनात दिसून येणाऱ्या सामाजिक समस्यांच्या निराकरणासाठी उपयोगात आणणे हे सुध्दा संशोधनाचे महत्वाचे उदिदष्ट असते. अर्थातच साहित्यातील संशोधनही त्याला उपवाद नाही.

परीक्षेतील अपयशाने खचून जाण्याचे प्रमाण देशात इतके वाढले याचे कारण आयुष्यातील अपयशाला सामोरे जाण्याचे शिक्षण देण्याचीच आपल्या व्यवस्थेला गरज वाटत नाही. देशात रोज सात विद्यार्थी आत्महत्या करतात. ही गोष्ट शिक्षणाचा विपरीत परिणाम दर्शविणारी आहे. आठवीपर्यंत अनुत्तीर्ण न करण्याच्या ध ाोरणामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षक शिक्षणाविषयी बेफिकीर झाले आहेत. (लोकसत्ता १६ जुलै २०१४)

शिक्षण क्षेत्रात समर्पित भावना विकलांग होत आहे. विशेषत: शिक्षक, प्राध्यापक यांच्या संघटनात्मक प्रवृत्ती या केवळ बोकाळलेल्या अर्थवादाच्या सापळयात पूर्णपणे अडकल्या असून त्यात त्यांना आनंद वाटतो आहे. सामाजिक बांधीलकी आणि सर्वसामान्य गरीब दुबळयांचे शिक्षण याबद्दल या प्रवृत्तींना काहीही देणे घेणे नाही अशी अवस्था आहे. शिक्षक आणि प्राध्यापक यांचा बौद्धिक विकासदेखील यामुळे थोपल्यागत झाला आहे. ग्रंथांच्या जगाशी यांचा संपर्क तुटला आहे. श्रमाशी शिक्षणाचा संबंध राहिलेला नाही. श्रमाने आत्मोन्नती आणि आत्मशुद्धी होते या थोर विचारवंतांच्या श्रद्धांना आजच्या शिक्षण क्षेत्रात थारा नाही. चांगला माणूस तयार करण्याच्या कामापासून शिक्षण क्षेत्र दूर गेलेले आहे. देशाच्या उन्नतीचे काम यातून साधणे नाही हे तर उघडच आहे. (शिक्षण आणि समाज, शिंदे रावसाहेब, अमेय प्रकाशन २००१)

अनिष्ट प्रवृत्तींनी धुमाकूळ घातल्याने समाजाचा ऱ्हास होत आहे. गर्दीच्या प्रवृत्ती मोकाट बोकाळत आहेत. त्यांना प्रोत्साहित करणारे मोठमोठया पुढाऱ्यांच्या रूपात वावरत आहेत. परिणामी अर्निबंध जमावाकडून होणारी मोडतोड, दगडफेक, आगी लावणे, लुटालुट, हाणामाऱ्या अशा सामाजिक विध्वंसाच्या कृत्यांत खूपच भर पडत आहे. समाजहीत, देशहिताचे यांना सोयरसुतक नाही.

सर्व प्रकारच्या प्रदुषणाने मर्यादा ओलांडली आहे. वेळेच्या अपव्ययाचे आणि घाणींचे कोणालाच काही वाटेनासे झाले आहे. भ्रष्टाचार तर आकाशाला पोचला आहे. शिक्षणासारखी पवित्र क्षेत्रेही

यापासून मुक्त नाही. व्देषभावना, वैमनस्य, दंगेधोपे, अत्याचार, लाचारी, ढोंग, बुवाबाजी, अंधश्रध्दा अशा बाबी जणू समाजजीवनाचा स्थायीभाव होऊ पाहत आहेत. चंगळवादाने कळस गाठला आहे. जातीभेद, धर्मभेद, भाषाभेद, दंगली रक्तपात हेही कमी नाही. सगळीकडे अंधार! या अवस्थेतही काही प्रकाशाची बेटे आहे.( प्रश्न आहे मुल्यांचा — शिंदे रावसाहेब, अमेय प्रकाशन २००९)

समाज शहाणा झाल्याशिवाय या समस्या सुटणार नाहीत. समाजाची नैतिक पातळी विकसित करणे हाही विचार महत्वाचा आहे. त्यासाठी व्हायला पाहिजे समाजप्रबोधन. जागवायला पाहिजे विचारशक्ती! सगळयाच क्रांत्या आणि परिवर्तने ही विचार जागृतीतूनच घडून आल्या. शिक्षणातच मुलभूत बदल करणे आवश्यक आहे. (लोकसत्ता — अन्वयार्थ शिक्षणात संतुलनाची दिशा हवी—१६/०७/१४)

ॲड.रावसाहेब शिंदे यांनी आपल्या लेखनातून, लेखातून, व्याख्यानातून समाजप्रबोधनाची ज्योत सतत प्रज्वलित ठेवलेली आहे. त्यांचे जीवनकार्य आणि विचार प्रेरणादायी असून, ही एका समर्पित सेवेचीच वाटचाल आहे. त्यांनी केलेले जीवन समर्पण आणि त्यातून निर्माण झालेला सामाजिक जिव्हाळा प्रेरणादायक आहे. एक लढवय्ये क्रांतीकारक आणि समाजसेवक म्हणून त्यांची प्रतिमा जनमानसात रूजली आहे. शिक्षण, सहकार, न्याय, कृषी, उदयोग, साहित्य इ. क्षेत्रातील त्यांचे योगदान मौलिक आहे.

रावसाहेबांसारखी माणसे गढूळलेल्या पाण्यात तुरटीच्या खडयासारखी आसमंत स्वच्छ करीत राहतात. त्यांच्यामुळे सारा प्रवाह स्वच्छ होतो, असे नाही पण प्रवाह स्वच्छ होवू शकतो याचे भान येते, आपल्या जीवनाला उभारी येते आणि मूल्याविषयीचा विश्वास बळावतो. आणि म्हणूनच ॲड.रावसाहेब पांडूरंग शिंदे यांचे जीवनकार्य मौलिक आहे. त्यासाठीच संशोधकाने त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक विचार व कार्याचा अभ्यास हाती घेतला आहे.

**१.२ ॲड.रावसाहेब शिंदे वेगळेपण —**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने ॲड.रावसाहेब शिंदे यांच्या शैक्षणिक, सामाजिक विचारांचा व कार्याचा अभ्यास हाती घेतलेला आहे.झुंजार स्वातंत्र्यसैनिक, निष्णात कायदे पंडीत, तत्वनिष्ठ शिक्षणप्रेमी, विधायक वृत्तीचे कार्यकर्ते, नानाविध संस्थांचे संगोपक, समाजचिंतक, निबंधकार आणि प्रभावी वक्ते अशा अनेक नात्यांनी ॲड.रावसाहेब पांडुरंग शिंदे ओळखले जातात. (ध्येयासक्त—मंचरकर र.बा.अमेय प्रकाशन २००८)

ॲड.रावसाहेब शिंदे यांचे व्यक्तिमत्व बहुआयामी आहे. सत्तयांऐशी वर्षाच्या वाटचालीत त्यांनी अनेक स्तरीय कार्य केले. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील सक्रिय सहभाग, स्वातंत्र्यानंतर श्रमजीवी, आदिवासी, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, उपेक्षित घटकांसाठी उभारलेले लढे, या चळवळीमुळे त्यांना फार कष्ट भोगावे लागले.

पोलिसांचा ससेमिरा चुकविण्यासाठी त्यांना प्रसंगी भूमिगत राहावे लागले. देशसेवेसाठी त्यांनी सत्तेच्या खुर्चीपेक्षा सेवेची वृत्ती स्वीकारली. शिक्षण, सहकार, कृषी, उदयोग, कायदा, वाङमय, समाजसेवा, संस्कृती इत्यादी क्षेत्रात समर्पित भावनेने कार्य केले. त्यांचे लेखन, ग्रंथ, प्रबोधक व्याख्याने यामुळे हजारो माणसे प्रभावित झाली. (प्रेरणापर्व — उपाध्ये बाबुराव, अमेय प्रकाशन २००८)

सेवाभाव हा ॲड.रावसाहेब शिंदे यांचा स्थायीभाव आहे. विद्यार्थी अवस्थेतच त्यांनी संगमनेर येथे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शिंदे बोर्डिंगची स्थापना केली. जेथे सेवाकार्य असेल तेथे धावून जावे हा त्यांचा सद्‌गुण आहे. महामानव बाबा आमटे यांचे कार्य असो, गीताचार्य तुकाराम दादा, शिवशंकर पाटील भाऊ यांच्या मानवतावादी कार्याला त्यांनी वाहून घेतले त्यांच्या समर्पणामुळे अशा सेवाकार्याला भरीव आर्थिक मदत झाली. या कार्याकडे सेवाभावी चळवळीकडे अनेकांचा सहभाग वाढला. सभोवतालच्या व्यक्तींवर या सेवाकार्याचा ॲड. शिंदे यांच्या प्रबोधनवाणीचा

परिणामकारक ठसा उमटला. (ध्येयासक्त —मंचरकर र.बा.—अमेय प्रकाशन २००८)

शिक्षण हा ॲड. शिंदे यांच्या अत्यंत जिव्हाळयाचा विषय. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा त्यांना प्रत्यक्ष सहवास लाभला त्यातूनच त्यांनी रयत शिक्षण संस्थेला वाहून घेतले. तीस वर्ष संस्थेचे व्हाईस चेअरमन तर गेल्या ६ वर्षापासून ते संस्थेचे चेअरमन म्हणून निरपेक्षपणे कार्य करीत होते. संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकर्ते, पदाधिकारी, सेवक वर्ग यांच्या मनावर त्यांनी आपल्या नीतीशील शैक्षणिक कार्य, विचारांचा ठसा उमटवला. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी त्यांनी दिशादर्शक प्रकल्प, संस्कारकेंद्र, शैक्षणिक गुणवत्ता प्रकल्प, ग्रामसमृद्धीच्या योजना, रयत—टाटा समूह कॉल सेंटर प्रकल्प इत्यादींची मुहुर्तमेढ रोवली. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून अनेक निराधार, गरीब, दीनदलितांना आधार देऊन जगण्याची शिदोरी दिली. (प्रश्न आहे मूल्यांचा, शिंदे रावसाहेब, अमेय प्रकाशन २००९)

एक निष्णात वकील म्हणून ॲड.रावसाहेब शिंदे यांची ख्याती आहे. ते अनेक पक्षकारांचे दैवत झाले. या क्षेत्रासाठी त्यांनी निर्माण केलेले आदर्श आणि केलेले योगदान महत्वपूर्ण आहेत. कृषी, सहकार, उदयोग, साहित्य अशा अनेक क्षेत्रातील व्यक्तींवर त्यांनी प्रभाव निर्माण केला.

रावसाहेबांच्या आयुष्याचा आरंभ कायदे मोडण्यापासून झाला आणि त्यांचे सारे आयुष्य कायदे पाळण्यात गेले. अभिजनांसाठी पब्लिक स्कूल काढण्यात त्यांनी पुढाकार घेतला आणि बहुजनांच्या रयत शिक्षण संस्थेचा व्याप सांभाळण्यात ते आघाडीवर राहिले. सहकारातल्या अपप्रवृत्तीं विरूद्ध त्यांनी लढा दिला आणि सहकाराचा एक छोटा नमुनाही उभा करून दाखविला. नम्रता, कृतज्ञता, वक्तशीरपणा, टापटीप, शिस्त, सौजन्य, कल्पकता, उपक्रमशीलता आणि सहकार्यशील वृत्ती ही संस्थात्मक जीवनासाठी आवश्यक

अशी जीवन वैशिष्टयै ही त्यांच्या ठिकाणी आहेत. (प्रेरणापर्व, उपाध्ये बाबुराव, अमेय प्रकाशन २००८)

वैयक्तिक कामासाठी कोणी गळ घालणे त्यांना आवडत नाही. नियम आणि संकेत यांना धरून सारे व्यवहार एका मूल्यनिष्ठेने व्हावेत असे त्यांना वाटते. माणसे व तत्व यात निवड करायची पाळी आली, तर तत्वाची करावी अशी त्यांची मन:प्रवृत्ती आहे. वक्तशीरपणा, शिष्टाचार, औचित्य यावर त्यांचा कटाक्ष असतो. या गोष्टी ते स्वत: पाळतात आणि दुसऱ्यांनी पाळाव्यात अशी अपेक्षा करतात. योग्य असेल ते बोलणार आणि इष्ट असेल ते करणार, हा त्यांचा बाणा आहे. त्यामुळे कधी त्यांच्या स्पष्टवक्तेपणाला कठोरपणाचे रूप येते.

आपले विचार कृतिरूप व्हायला हवेत असे त्यांना वाटते. विचारशून्य कृती आणि कृतिशून्य विचार दोन्हीही त्यांना त्याज्य वाटतात. आपल्या जीवनाला, वागण्याला नीतीचे अधिष्ठान असावे, माणसाच्या वागण्यात आत आणि बाहेर एकरूपता असावी असे त्यांना वाटते. चारित्र्याबाबत त्यांनी कधी तडजोड केली नाही. चालायचंच, ही वृत्ती खपवून घेतली नाही, निरपेक्ष, निर्लोभी वृत्तीने वकीली व्यवसाय केला, चालून आलेल्या उच्चपदांकडे शांतपणे पाठ फिरविली. जीवनात साधेपणा आणि त्याग ही मूल्य महत्वाची मानली. या मूल्यांशिवाय जीवनाला अर्थ नाही या विचारानेच जीवन व्यतीत केले. (सिध्दांन्त आणि व्यवहार, कसबेकर विजय, अमेय प्रकाशन १९८९)

सत्व पाळणाऱ्या अशा व्यक्तीच समाज व्यवहाराला नीतीचा अंकुश लावू शकतात. अंधार उजळता येतो असा विश्वास जागवतात. रावसाहेबांचे लेखन त्यांचे वेळोवेळी व्यक्त केलेले विचार आज शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रासाठी दिशादर्शक आहेत. त्यांचे तारूण्य राजकिय, सामाजिक, शैक्षणिक व्यथा वेदनांना प्रतिसाद देण्यात गेले. श्रीरामपूरचे विधिक्षेत्र त्यांनी आपल्या कर्तृत्वाने गाजविले. सहकारी आणि समाजसेवी संस्थांच्या विकासासाठी त्यांनी आपली

शक्ती वापरली साहित्य—कलांना उत्तेजन दिले. सकस ज्ञान देणाऱ्या शिक्षण संस्थांची उभारणी केली. सकस साहित्यनिर्मिती करून मराठी समाजाला समृद्ध केले. आपल्या परिसरात संस्कृतीची पाळेमुळे खोलवर रूजविण्यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. (ध्येयासक्त, मंचरकर र.बा.)

वेधक वत्कृत्व, सुसंगत आचरण, पर्यटनप्रियता, निसर्ग रसिकता, साहित्य—संगीत—नाटय यांचा आस्वाद घेणारी रसिकता, सचोटी, साधेपणा, न्यायबुद्धी बहुजनांना शहाणे करण्याची तळमळ, रोखठोक परखड मतप्रदर्शन यासारखी गुणवैशिष्टये हे रावसाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे वेगळेपण आहे. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील विविध समस्यांविषयी त्यांनी मांडलेले विचार त्यावरील उपाय शासनाच्या डोळयात अंजन घालणारे आहेत. या क्षेत्रांमध्ये त्यांनी राबविलेले विविध उपक्रम, प्रकल्प निश्चितच पथदर्शक आणि वेगळे आहेत. हे वेगळेपण शोधण्यासाठीच संशोधकाने ॲड.रावसाहेब शिंदे यांच्या शैक्षणिक, सामाजिक विचारांचा अभ्यास हाती घेतला आहे.

## १.३ ॲड. रावसाहेब पांडूरंग शिंदे यांचा जीवनपट —

### १.३.१ बालपण (१९२८—१९३३)

प्रवाह आकृती क्र १.१



रावसाहेबांचा जन्म १० जून १९२८ चा नाशिक जिल्हातील सिन्नर तालुक्यातील ठाणगाव—पाडळी या छोटयाशा खेडेगावातला.

रावसाहेबांचे आजोबा विठोबाबाबा शिंदे. विठोबाबाबा आणी भागुजीबाबा या दोन भावांनी मोठया कष्टाने शेती नावारूपास आणली. वाटणी झाल्यावर मात्र कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीत फरक पडत गेला.

आजोबा विठोबाबाबा शेलाटया अंगकाठीचे. धोतर, बाराबंदी, पांढऱ्या मंदीलाची पगडी आणि पायात जोडा, असा त्यांचा भारदस्त पोशाख असे. त्यांच्या निर्मळ व स्वच्छ राहणीचा खोल ठसा रावसाहेबांच्या मनावर आहे. या आजोबांनी रावसाहेबांना नदीवर आंघोळ करायला आणि घोडयावर बसायला शिकविले.

आजोबांचा भागवतधर्म रावसाहेबांच्या वडीलांनीही तशाच निष्ठेने चालविला होता. शेतात घाम गाळीत. जमेल तेव्हा वारीला जात. तुकारामांच्या गाथेची पारायणे करीत. महाभारतातील गोष्टी मुलांना वाचून दाखवीत. गावच्या सार्वजनिक कामात ते पुढे असतं. गावात येणारा तलाठी, सरकारी अधिकारी, शिक्षक अशा बाहेरगावच्या लोकांची व्यवस्था शिंदयाच्या घरीच असे. अशा सुशिक्षित लोकांच्या बरोबर नागर विचारांचा वाटा शिंदयांच्या घरी वाहत येई. शिक्षणाविषयीची आस्था आणखी वाढे. त्याचा परिणाम म्हणून पांडुरंगरावांनी आपल्या मुलांना तर शिकविलेच पण मुलींनाही शिकविले.

रावसाहेबांच्या आई आनंदीबाई अतिशय सोशिक आणि मित भाषी. त्या साध्या आणि कष्टाळू होत्या. त्यांच्या हृदयात अपार माया होती. जावा, लेकी, सुना, शेजारणी सर्वांवर त्यांच्या प्रेमाची पाखर असे. साधेपणा परिश्रमशीलता, नम्रता आणि मायाळूपणा हे गुण रावसाहेबांच्या स्वभावात उतरले ते आईच्या दुधातून.अशा वातावरणात वाढताना रावसाहेबांना बालपणीच संत वाङमयाची आवड निर्माण झाली,शिक्षणाविषयी आस्था वाढली. माणसांबद्दलचे प्रेम निसर्गाची ओढ वाढीस लागली. अशा सगळयाग्रामीण वातावरणात

रावसाहेब लहानाचे मोठे झाले.(ध्यासपर्व;आत्मकथन अॅड. रावसाहेब शिंदे,अमेयप्रकाशनपुणे—२००६)

### १.३.२ प्राथमिक शिक्षण(१९३३—१९३८)

ठाणगाव पाडळीतच रावसाहेबांच्या शिक्षणाचा श्रीगणेशा झाला. लहान बिगारी ते चौथी पर्यंत शाळा गावातल्या मारूतीच्या देवळात भरे. दलित मुले बाहेरच्या पटांगणात बसत असत. घरी आल्यावर पायाच्या अंगठयाला शेण किंवा चिखल लावून शिंतोज घ्यावा लागे, त्यामुळे शिवाशिवाचा दोष गेला असे समजले जाई. शाळा करूनही मुले शेता—रानात, नदी—नाल्यात, डोंगर—झाडीत हुंदडत राहत.

### १.३.३ माध्यमिक शिक्षण व स्वातंत्र्यचळचळ सेवा दल (१९३८—१९४२)

पाडळीला चौथी पास झाल्यावर रावसाहेब पाचवीसाठी देवगणच्या आत्याकडे राहू लागले. आत्याचे पती गणपत पाटील शहाणे यांची शेतीवाडी गुरेढोरे होती. सुटीच्या दिवशी रावसाहेब शेतीची कामे करीत. अभ्यासाकडेही त्यांचे चांगले लक्ष असे. तोडकर मास्तरांच्या आग्रहाने नगरला जाऊन त्यांनी स्कॉलरशीपची परीक्षाही दिली. पाडुरंगदादांनी त्यांच्या यशाबद्दल खात्री नव्हती, पण ही स्कॉलरशिपची परीक्षा रावसाहेब जिल्हयात दुसऱ्या क्रमाकांने उत्तीर्ण झाले.

इंग्रजी शाळेत प्रवेश ही स्कॉलरशिपची अट होती. त्यामुळे रावसाहेबांनी सहावीसाठी सिन्नरच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये प्रवेश घ्यावा लागला. रावसाहेबांच्या वडिलांचे दुसरे स्नेही श्री.नलवडेबाबा हे सिन्नरला रहात असत. रावसाहेबांच्या वडिलांनी रावसाहेबांना नलवडे बाबाकडे ठेवले व त्यांच्याकडे इंग्रजी पहिलीसाठी शाळेत नाव घातले. शाळा जूनमध्येच सुरू झालेल्या होत्या आणि रावसाहेब तर ऑगस्टमध्ये सिन्नरला आलेले. एज्युकेशन इन्स्पेक्टरच्या परवानगीने त्यांना शाळेत प्रवेश मिळाला पण अभ्यासक्रम बराच पुढे गेला असल्यामुळे त्यांना इंग्रजी काही जमेना वर्गातले इंग्रजीचे शिक्षक

त्यांना हिणवायला लागले. सुरूवातीला काही दिवस रावसाहेबांनी हे सारे सोसले पण पुढे ते जिद्दीने पेटून उठले. बाजारातून त्यांनी तर्खडकर पाठमाला विकत आणली. शाळा सुटली की गावाबाहेरच्या गोंदेश्वराच्या मंदिरात जाऊन ते इंग्रजी पाठ करू लागले. ज्या शिक्षकाच्या जाचापायी रावसाहेब अनेकदा रडले त्याच शिक्षकाच्या विषयात तिमाही परीक्षेत ते पहिले आले. शाळेचे मुख्याध्यापक श्री. कर्डीले यांनी तर सर्व शिक्षकांदेखत रावसाहेबांचा गौरव केला.

इंग्रजी पहिली नंतर इंग्रजी दुसरीसाठी रावसाहेब यांच्या वडिलांनी त्यांना नाशिकला तांबे या त्यांच्या नातेवाईकांकडे ठेवले. सिन्नरच्या मुख्याध्यापकांनी रावसाहेबांना प्रशस्तीपत्र दिलेले होतेच त्याच्या आधारावर रावासाहेबांना रूंगठा हायस्कूलमध्ये प्रवेश मिळाला. तो काळ १९४० च्या दरम्यानचा होता. वेगवेगळे नातेवाईक व वडिलांचे मित्र यांच्या घरी रावसाहेबांना शिक्षणानिमित्त वेगवेगळया गावांमध्ये राहावे लागले. त्यामुळे शालेय शिक्षणाबरोबर रावसाहेबांचे जीवनशिक्षणही झाले.

याच काळात रावसाहेब नाशिकच्या पंचवटी शाखेच्या राष्ट्र सेवादलात जाऊ लागले आणि ती राष्ट्रभक्तीची ज्योत रावसाहेबांच्या मनात अधिक तेवली. अधूनमधून सानेगुरूजीही नाशिकमध्ये यायचे, बौद्धीक घ्यायचे. गुरूजींचा ध्यास, देशप्रेम यांनी रावसाहेबही भारावून गेले. त्यांनी प्रभातफेऱ्यात भाग घ्यायला सुरूवात केली क्रांतीच्या जयजयकारात आपलाही सूर रावसाहेब मिसळू लागले.त्या काळात रावसाहेबांनी सार्वजनिक वाचनालयात आपले नाव नोंदवले आणि गुरूजींची सगळी पुस्तके वाचून काढली. खांडेकर, सावरकर वाचले. सानेगुरूजी, कुसुमाग्रजांची गीते पाठ केली. रावसाहेब गावी आले की शेतात, आवारात क्रांतीची गाणी पाठ करू लागले, गाऊ लागले.

शाळेबाहेरचे जग समजून घेत असतानाच शाळेच्या चार भिंतीतला अभ्यासही रावसाहेबांनी मन लावून केला. इंग्रजी दुसरीच्या वर्गात रावसाहेब नेहमीप्रमाणे पहिले आले. पुढे मात्र राष्ट्र सेवा

दलाचे काम आणि स्वातंत्र्यचळचळीकडे ओढा यामुळे तिसरीच्या वर्गात त्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊ लागले. इंग्रजी चौथीत गाडी पुन्हा रूळावर आली. पण वर्गात आता ते दुसरे—तिसरे येऊ लागले. दरवर्षी पास होत इंग्रजी ४थी पर्यंतचे शिक्षण त्यांनी नाशिकमध्येच घेतले (१९४०—४२) इंग्रजी ४थीत असताना ते हायस्कूल स्कॉलरशीपच्या परीक्षेस बसले व नाशिक जिल्हयात दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

**१.३.४ उच्च माध्यमिक शिक्षण (१९४३—१९४६) कम्युनिस्ट चळवळ, शिंदे बोर्डिग**

नाशिकहून रावसाहेबांचा मुक्काम हलला तो संगमनेरच्या जवळ असलेल्या कोल्हेवाडीला. संगमनेरला श्री.के.बी.देशमुख यांच्या घरात एक खोली भाडयाने घेऊन रावसाहेब राहू लागले. जेवण मात्र ते कोल्हेवाडीहून आणत असत. कोल्हेवाडीला जाऊन सकाळी जेवण घेऊन यायचे. भाकरी बांधून आणायच्या आणि सकाळचे जेवण करून त्यातला शिल्लक भाकरी संध्याकाळी खायच्या. एकदा एका संध्याकाळी श्री.के.बी.देशमुखांनी रावसाहेबांना बोर्डिगमध्ये प्रवेश घेण्याचे सुचविले. रावसाहेबांना ते पटले व दुसऱ्या टर्मला त्यांनी बोर्डिगला प्रवेश घेतला. चळवळीतील कामामुळे रावसाहेब या बोर्डिगमध्ये एक वर्षच राहिले.

तो काळ १९४४ चा होता. कॉंग्रेस पक्ष गोरगरीब शेतकरी मजुरांचे हित साधण्याऐवजी भांडवलदारांचे हित जोपासतो की काय अशी शंका अनेक कार्यकर्त्यांच्या मनात बळावली होती. या गोष्टीचा परिणाम असा झाला की स्वातंत्र्य लढयात भाग घेऊन तुरूंगवास भोगलेले कार्यकर्ते तुरूंगातून बाहेर पडतानाच डावी विचारसरणी घेऊन बाहेर पडले. अहमदनगर जिल्हयात कम्युनिस्ट विचारसरणीचा प्रभाव वाढू लागला. हळूहळू रावसाहेब या विचारसरणीकडे ओढले गेले.

१९४४ रावसाहेब इंग्रजी सहाव्या इयत्तेत शिकत होते. चळचळीच्या कामामुळे रावसाहेबांनी श्री.के.बी.देशमुखांचे ‘शेतकरी

बोर्डिग' सोडले, व स्वतःच नगर रस्त्यावर ठाकुरांच्या मळयात स्वतंत्र वसतिगृह सुरू केले. विद्यार्थ्यानी काढलेले व विद्यार्थ्यांनी चालवलेले हे एक अभिनव वैशिष्टयपूर्ण बोर्डिग होते. बोर्डिगला 'शिंदे बोर्डिग' म्हणून संबोधले जावू लागले. कुणी कुणी त्याला 'लाल बोर्डिंग' म्हणू लागले. बोर्डिंगमध्ये स्वयंशिस्त होती. रहाणे, जेवणे, सारवणे, धान्य जमा करणे, भाजी आणणे, पाणी भरणे, वाढणे, लाकडे तोडणे अशी सर्व कामे विद्यार्थीच करीत. दर रविवारी वेगवेगळया विषयांवर चर्चा होत. अभ्यास वत्कृत्व, लेखन, खेळ, चळवळ या सर्वामध्येच शिंदे बोर्डिगचा विद्यार्थी आघाडीवर राहत असे. हे 'शिंदे बोर्डिग' सगळया तरूण मुलांचे कुटूंबच बनले होते.जवळपासच्या खेडयात प्रचारासाठी, जनजागृतीसाठी व पक्ष बांधणीसाठी येणारे शाहीर अमरशेख कॉ.आण्णाभाऊ साठे, शाहीर गव्हाणकर त्यांच्या कलापथाकातील मंडळी बोर्डिंगवर उतरायची. या सर्वांबरोबर रावसाहेबांची मैत्री झाली.

कम्युनिस्ट पक्षाने शेतकरी आणि विडी कामगार यांच्या प्रश्नावर त्यावेळी आपले लक्ष केंद्रीत केले होते. विडी कामगार, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी यांच्यामध्ये प्रचारकार्य सुरू झाले. मुंबईजवळ टिटवाळा येथे कम्युनिस्ट पार्टीने 'किसान सभा' भरविली होती. भाऊसाहेब थोरात, धर्मा पोखरकर यांच्यासह रावसाहेब संगमनेरहून टिटवाळयाला गेले. हा प्रवास त्यांनी सायकलवरून केला. जाऊन येऊन अडीचशे मैलांची रपेट होती. वाटेत विठा, भंडारदरा, बोरी, कसारा असे मोठमोठे घाट होते. मुक्कामाची खाण्यापिण्याची सोय नव्हती. अशा स्थितीत मोठया प्रयासाने पण तितक्याच उत्साहाने हा प्रवास त्यांनी पार पाडला. वाटेवरच्या गावागावात सभा घेऊन प्रचार केला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची चर्चा केली सावकाराविरूद्ध चेतावणी दिली. सभा उधळण्याच्या प्रयत्नांना खंबीरपणे तोंड दिले. देवळात मुक्काम केले. मिळेल ते खाल्ले. येथेच त्यांचा कॉ.श्यामराम परूळेकर आणि गोदावरी परूळेकर यांचा पहिला परिचय झाला.

पाथर्डी तालुकातल्या करंजी येथे 'किसान सभेची' दुसरी परिषद होती. परिषदेला लोकांनी मोठया प्रमाणावर यावे म्हणून रावसाहेबांनी आपल्या साऱ्या सुट्टया खेडोपाडी जाऊन प्रचारासाठी घालविल्या. पाथर्डी तालुक्यातील गाव न् गावं त्यांनी पिंजून काढले. संगमनेर, अकोला, शेवगाव आणि नेवासे तालुक्यातही ठिकठिकाणी गेले, कित्येक ठिकाणी पायी फिरले. गावात गेल्यावर स्वत:च दवंडी देवून आपल्या व्याख्यानाची प्रसिध्दी करायचे. शेतकऱ्यांच्या दु:खाला वाचा फोडून किसान सभेचा मार्ग समजून सांगत, आणि सहभागी होण्याचे आवाहन करीत. करंजीच्या किसानसभेत बंगालच्या शेतकरी चळवळीचे नेते बंकिम मुखर्जी यांचे अध्यक्षीय भाषण झाले. अमर शेखांच्या कार्यक्रमाला तर चाळीस हजारांची गर्दी होती. परिषद पुरेपुर यशस्वी झाली. या सगळया शिबीरामुळे आणि परिषदांमुळे रावसाहेबांची साम्यवादावरील निष्ठा अधिक बळकट झाली.(ध्यासपर्व;आत्मकथन ॲड. रावसाहेब शिंदे,अमेय प्रकाशनपुणे—२००६)

**१.३.५ महाविद्यालयीन शिक्षण (१९४६—१९४८)**

आण्णासाहेबांच्या मनात रावसाहेबांना डॉक्टर करायचे होते, पण परीक्षेचा निकाल लागण्याच्या आसपास जीवघेण्या आजाराने रावसाहेब आजारी पडले. डॉ.बी.जी.गाडगीळांच्या अथक प्रयत्नाने ते मरता मरता वाचले. त्यामुळे सायन्सला प्रवेश मिळाला नाही आर्टस्ला प्रवेश घ्यावा लागला.महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये दाखल झाले. मैदानी वत्कृत्वाचा त्यांचा अनुभव इतका दांडगा होता की पहिल्याच पदापर्णात रानडे पारितोषिक मिळाले. गांधीजींच्या पुण्यातील सायंप्रार्थनेला ते उपस्थित राहत. महात्मा गांधीच्या चरित्राचा आणि चारित्र्याचा ठसा त्यांच्या मन: पटलावर या काळात उमटला.रावसाहेब पुण्यात कम्युनिस्टांच्या कम्यूनमध्ये राहून फर्ग्युसनला शिकू लागले. इथेही त्यांची चळचळ चालूच राहिली. पुण्यात रहात असताना त्यांचा कॉ.पी.बी.कडू पाटील यांच्याशी परिचय झाला. पुण्यात रावसाहेबांनी पक्षाच्या रेल्वे युनियनच्या सभासद नोंदणीचे काम केले. पक्षाचे लिटरेचर विक्रीचे काम केले.

पहिली टर्म संपली आणि सुट्टीत रावसाहेब पाडळीला आले. पुण्यात असताना ते रहायचे कम्युनमध्ये पण जेवायचे मात्र इतरत्र: पुस्तके, कपडे, फी, जेवण यांचा पुण्यातला खर्च आपल्याला पेलवणार नाही म्हणून रावसाहेब यांनी संस्थानात शिकायला जायचे ठरवले. श्री.आण्णासाहेब बडोदयाला शिकले होते. बडोदा फार दूर त्यामानाने कोल्हापूरजवळ म्हणून त्यांनी कोल्हापूरातील प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगात प्रवेश घ्यायचे ठरविले.

या काळात वडिलांच्या शेतीच्या वाटण्या झाल्या. शेतीला मनुष्यबळ कमी पडू लागले. खर्च जास्त, उत्पन्न कमी, तशात मंदीची लाट आली. जमेची आणि खर्चाची तोंड मिळवणी करणे अवघड झाले. रावसाहेब कोल्हापूरला निघाले, वडिलांनी आठ दिवस पैसे जमविण्याची धडपड केली. पण अवघे तेहतीस रूपये जमा होऊ शकले. त्या वेळी असहाय्यतेने पांडुरंगरावांचे डोळे भरून आले. वडिलांच्या त्या अश्रूंचा रावसाहेबांच्या मनावर खूपच परिणाम झाला.

रावसाहेब पाडळीहून बैलगाडीने संगमनेरला, संगमनेरहून सर्व्हिस मोटारीने पुण्याला व पुण्याहून रेल्वेने कोल्हापूरला आले. त्यांना उशीर झाला होता. पण प्राचार्य डॉ.आप्पासाहेब पवार यांना रावसाहेब भेटले. प्राचार्यांनी सुरूवातीला फ्री शिप दयायचे नाकारले. रावसाहेबांनी स्वत:ची परिस्थिती त्यांना सांगितली. नाशिक जिल्हयातून आल्याचे सांगितले. शेवटी प्रवेश फी भरून रावसाहेबांनी दुसऱ्या टर्मसाठी राजाराम कॉलेजात प्रवेश घेतला. दरम्यान रावसाहेबांना आण्णासाहेबांच्या ओळखीने प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगमध्ये प्रवेश मिळाला. श्री.दादा चव्हाण हे बोर्डिंगचे सेक्रेटरी होते. बोर्डिंगमधील वातावरण डाव्या विचारसरणीला पोषकच होते. रावसाहेबांनी येथेही आपला ग्रुप तयार केला.

पुढे कोल्हापुरात सोय झाली, तरी इंटर आर्टस्साठी रावसाहेबांनी प्रवेश घेतला तो अहमदनगर कॉलेजमध्ये (१९४७) प्राचार्य डॉ.भा. पा.हिवाळे देवमाणूस होते. एका ध्येयवादाने आणि जिद्दीने त्यांनी

नगरसारख्या गावात कॉलेज सुरू केले होते. त्यांनी स्वत:हून रावसाहेबांच्या राहण्या—जेवण्याची सोय केली. ते तर्कशास्त्र शिकवित. त्यांच्या विषयात रावसाहेब पहिले आले. या मुलाला आपण अमेरिकेत पाठवणार आहोत असे ते वारंवार म्हणत.अहमदनगर कॉलेजात रावसाहेबांनी प्रवेश घेतला आणि विद्यार्थी चळवळीत ते सक्रिय सहभाग घेवू लागले. विविध राष्ट्रीय, आंतराष्ट्रीय प्रश्नावर जाहीर सभातून बोलू लागले, पण सुरूवातीला 'हा विद्यार्थी चळवळया आहे' हा सुगावा प्राचार्यांना लागला नाही.

रावसाहेबांसारख्या सळसळत्या रक्ताच्या तरूणांना साम्यवादाचा लाल रंग आकर्षित करीत होता. डी.बी.कुलकर्णी, भय्यासाहेब कुलकर्णी, कऱ्हाडकर, चंद्रभान आठरे पाटील, आण्णासाहेब शिंदे अशा ज्येष्ठांशी सतत विचार चर्चा चालूच असे. त्यातून मग पार्टीच्या ।सस प्दकप ै जनकमदजे थ्मकमतंजपवद ;ष्ि्द्ध च्या कामास वाहून घेण्याचे त्यांनी ठरविले. स्वतंत्र सरकारने वाढविलेल्या शिक्षण फीच्या विरोधी आंदोलन करावयाचे ठरले. नगर जिल्हयातील विद्यालये, वसतिगृहे यात जाऊन रावसाहेबांनी विद्यार्थी संघटनेच्या शाखांचे जाळे निर्माण केले. मुंबई येथील बैठकीस पाचशे विद्यार्थी घेऊन रावसाहेब उपस्थित राहिले. रावसाहेबांच्या विचारप्रेरक भाषणांची वाहवा झाली. संघटनेच्या खुल्या अधिवेशनावरील बंदी हुकूम मोडून सभा घेण्यात आली. लाठीमार, अश्रूधूर आणि गोळीबार यांनी हे अधिवेशन चांगलेच गाजले.यानिमित्ताने वदूद खान पठाण आणि सुशीला मडिमन या विद्यार्थी कार्यकर्त्यांशी रावसाहेबांचा चांगला परिचय झाला. प्रांतिकच्या कार्यकारिणीवर त्यांना घेण्यात आले तेलंगणातील विद्यार्थ्यांवर रझाकार अत्याचार करीत होते. तेथील परिस्थिती पाहून वृत्तांत देण्यासाठी रावसाहेब जाऊन आले. ठिकठिकाणच्या प्रदेशातील विद्यार्थी जीवनाची पाहणी करण्यासाठी रावसाहेबांनी बरीच भटकंती केली. सातारला कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेतही ते जाऊन आले.

अहमदनगरच्या सार्वजनिक जीवनात रावसाहेब कामे करू लागले. गांधी मैदानात वेळप्रसंगी त्यांची भाषणे होऊ लागली. त्यांच्या वत्कृत्वाची कीर्ती कॉंग्रेसच्या रावसाहेब पटवर्धनांपर्यंत पोचली. त्यांनी कॉंग्रेसमध्ये येण्याचे निमंत्रण दिले,परंतु रावसाहेबांनी ते नाकारले. अशा धामधुमित रावसाहेब सेकंड क्लासमध्ये पुणे सेंटर घेऊन, फर्ग्युसन होस्टेलमध्ये राहून इंटर आर्टस्‌ची परिक्षा पास झाले. (१९४८)(ध्यासपर्व;आत्मकथन ॲड. रावसाहेब शिंदे,अमेय प्रकाशनपुणे—२००६)

**१.३.६ भूमिगत जीवन (१९४८—१९५१)**

परीक्षा देऊन रावसाहेब नगरला आले. लगेचच नगरच्या कलेक्टर ऑफिसमधले सोनवळे नावाचे एक स्नेही रावसाहेबांना शोधत आले. त्यांनी सांगितले की तुमच्यावर पकड वॉरंट आहे. सरकारने कम्युनिस्ट पक्षावर बंदी घातली होती. पुढाऱ्यांची धरपकड सुरू झाली. शक्य त्यांनी भूमिगत व्हावे असा पार्टीचा आदेश होता. तो शिरोधार्य मानून रावसाहेब भूमिगत झाले.भूमिगत अवस्थेतील रावसाहेबांचे जिणे क्रांतीच्या वादळवाऱ्यातील रोमहर्षक जगणं होत. त्यात रोमांचकारी अनुभव होते, साहस होत, नियतीच नाटय होत. मानवी परस्परसंबंधाचे चक्रावून सोडणारे दर्शन होते.भूमिगत अवस्थेत रावसाहेबांना निरनिराळया ठिकाणी आश्रय मिळाला. कोपरगावचे सखारामदादा आढाव वाडीवऱ्हयाचे राजाराम पाटील, जोर्व्याचे भाऊसाहेब थोरात अशी कितीतरी घरे धोका पत्करत आश्रय देत. संगमनेरचे लाल बोर्डिग तर हक्काचा निवारा. रावसाहेब दिवस बोर्डिगमध्ये काढीत आणि रात्री बोर्डिगच्या मागे भरलेल्या शेतात झोपायला जात

लपतछपत रावसाहेब फिरत होते. जमेल तेथे सभा घेत होते. कार्यकर्त्यांशी चर्चा करीत होते. नगर जिल्हयाचा पश्चिम भाग त्यांनी अक्षरक्ष: पिंजून काढला. अशातच प्रांतिक कम्युनिस्ट पक्षाच्या बैठकीत चळवळीला अधिक जहाल रंग दिला पाहिजे ही भूमिका आग्रहाने मांडली गेली. खिरविरे गावातील सावकारांच्या दस्तऐवजांची

होळी करण्यात आली. भुकेलेल्या कोळी—ठाकर लोकांचे मोर्चे सरकारी धान्याच्या कोठारावर नेवून धान्य ताब्यात घेण्याचे प्रयत्न झाले. राजापूर, एरंडगाव इत्यादी ठिकाणी गोळीबार झाले. पोलिस ठाण्यांवर हल्ला करण्याचे कार्यक्रम आखले गेले. चळवळ अति जहाल वळण घेऊ लागली.अशी चळवळ आपल्या गतीने चालली होती. भूमिगत कार्यकर्त्यासाठी पैसे जमविणे, त्यांचे निरोप घेऊन ठेवणे असे संपर्क माध्यमाचे काम काही युनिट करीत. पुण्याला विख्यात समीक्षक दि.के.बेडकर आणि चिकित्सक विचारवंत प्रा.अ. रा.कामत हे भूमिगतांना असा आधार देत. एकदा रावसाहेब त्यांना भेटून पैसे, निरोप आणि औषधे घेऊन कल्याणमार्गे नाशिकला यायला निघाले. कल्याण स्टेशनवर आपला पाठलाग होतो आहे हे ध्यानात येताच लगेच स्टेशनवर उतरून वाट फुटेल तिकडे झपाझप चालू लागले. जवळच एका शाळेत रेवगडे नावाच्या मित्राकडे आश्रय घेऊन सकाळी बसमध्ये बसले तर योगायोगाने तोच पोलिस त्याच गाडीत होता. तो गडबडीत भिवंडी स्टॅन्डवर उतरला आणि पोलिसांकडे गेला. रावसाहेबही बसमधून उतरून दिसेल त्या रस्त्याने निघाले. रस्ता थांबला तो कल्याणच्या खाडीजवळ. दूरवर येणारे पोलिस दिसायला लागले. रावसाहेबांनी झटपट निर्णय घेतला आणि खाडीत बेधडक उडी मारली. पाण्याचा अंदाज नसताना अर्धा पाऊण कि.मी. पोहत जाऊन पैलतीर गाठला.कितीतरी जीवावरचे प्रसंग आले पण सर्वांमधून रावसाहेब तावून सुलाखून बाहेर पडले. अग्निदिव्यातून उजळून निघाले.

पुढे चळवळीने सरकारी गोडावून लुटण्याचे, पोलिस चौक्यावर हल्ले करायचे आदेश दिले. सरकारने दिसताक्षणी गोळया घालण्याचे आदेश दिले. एरंडगाव, राजापूर येथे गोळीबार झाला. माणसं मेली, विद्यार्थी गेले. चळवळ चुकीच्या मार्गाने गेलीआणि एके दिवशी चळवळ मागे घेण्याचे आदेश आले. कार्यकर्ते निराश झाले. ज्या समग्र क्रांतीसाठी एवढे केले. पायपीट झाली, बेघर झालो, सुखाला आचवलो, जिवावर खेळलो, त्यातून निष्पन्न काय झाले? जबरदस्त

धक्का बसला. रावसाहेब निराश होऊन वाडी वऱ्हयाला निघून गेले. इ.स.१९५१ मध्ये जळजळीत पत्र लिहून रावसाहेबांनी पार्टीचा राजीनामा दिला. दोन वर्षे नऊ महिने रावसाहेब भूमिगत अवस्थेत वावरत होते. जिवापाड जपलेले ध्येय सोडून दिल्याने आयुष्यात एक पोकळी आली. वैफल्याने मन उदास होऊन गेले.पुन्हा एकदा आयुष्याची कोरी पाटी घेऊन रावसाहेबांनी जगायला आरंभ केला.

(ध्यासपर्व;आत्मकथन ॲड. रावसाहेब शिंदे,अमेय प्रकाशनपुणे—२००६)

### १.३.७ लॉ कॉलेज पुणे (१९५१—१९५४)

इ.स.१९५१ मध्ये रावसाहेबांनी पुण्याच्या लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. आण्णाभाऊंनी सगळया खर्चाची जबाबदारी घेतली होती. कम्युनिस्ट पार्टीचा संबंध तोडलेला होता. पक्षीय राजकारणाशी संबंध तोडून व्यक्तीगत आणि सामाजिक जीवनात जे काम करता येईल ते करावे, असा मनाचा निश्चय झाला होता.

पुण्यातही रावसाहेब स्वस्थ बसले नाहीत. आपला अभ्यास सांभाळून त्यांनी मित्रांचा एक ग्रुप तयार केला. सविता भावे, डॉ. सत्यरंजन साठे, ॲड.विजयराव मोहिते, बॅ.राजा भोसले, गायिका डॉ.प्रभा आगे यांच्यासारखे मित्र मिळाले. चर्चा, गप्पा, अभ्यासमंडळे, विद्यार्थी मित्रमंडळ नेतृत्व असा कार्यक्रम पुण्यातही चालला. पुण्यात रावसाहेबांनी अभ्यासाला खूप वेळ दिला. वाचन आणि वत्कृत्व यावर आपले लक्ष केंद्रीत केले. संगीत आणि नाटक याविषयीची त्यांची रसिकता अधिक जाणती झाली. १९५४ मध्ये रावसाहेब बी. ए.एल.एल.बी. झाले. विद्यार्थीदशा संपली. आता समोर होते ते रखरखीत वास्तव.

### १.३.८ वकिली व्यवसाय — श्रीरामपूर

रावसाहेब वकील झाले आणि नाशिकला जून १९५४ च्या दरम्यान वकिली सुरू केली. परंतु सप्टेंबर १९५४ च्या सुमारास आण्णासाहेबांनी त्यांना श्रीरामपूरला बोलावून घेतले. श्रीरामपूरला दिवाणी कोर्ट सुरू होणार होते. काम वाढणार होते त्यासाठी त्यांनी

रावसाहेबांना श्रीरामपूरात आणले.डिसेंबर १९५४ ला रावसाहेबांना नगर जिल्हयाची सनद मिळाली व त्यांनी स्वतंत्रपणे केसेस चालवायला सुरूवात केली.

सखोल व्यासंग, पट्टीचे युक्तीवाद कौशल्य आणि उसळते वत्कृत्व यामुळे व्यवसायात त्यांनी उदंड यश मिळविले. सुरूवातीच्या तीन—चार वर्षातच त्यांनी आघाडी मारली. पुष्कळदा कोर्टात दिवसातून जेवढया केसेस चालविल्या जात त्यांची एक बाजू रावसाहेब सांभाळीत आणि जिंकतही. एखादया दिवशी ते अनुपस्थित असेल तर कोर्टाचे काम खोळंबून राहण्याचेही प्रसंग घडले आहेत.या यशामागे रावसाहेबांचे कठोर परिश्रम होते. आपला व्यासंग त्यांनी सतत जागता ठेवला. बहुमोल संदर्भग्रंथ जमविले. नवनव्या केसेस आणि कायदयाचे अर्थानुवाद स्पष्ट करणारे निवाडे यांचे अदययावत वाचन ठेवले. कोणतीही केस हातात घेतल्यानंतर ते संबंधित कागदपत्रांची बारकाईने तपासणी करीत. हकीगत आणि कायदा यांच्या चौकटीत दाव्याची मांडणी करीत. पूरक आधार देत. संदर्भ शोधून काढीत. ज्याला वकिली करायचीत्याने प्रथम कारकुनी केली पाहिजे असे त्यांना वाटे. अर्ज, नोटीस, फिर्याद, दरखास्त, करार, कैफियत कौशल्याने लिहीत. साधार आणि युक्तिवादाला पक्के मसुदे तयार करण्यात त्यांचा हातखंडा असे. अवघड केसमधल्या दुबळया जागा हेरीत असा सगळा अभ्यास त्यांचा तयार असे.

त्यामुळे त्यांच्या कार्यालयात पक्षकारांची सदैव झुंबड उडालेली असे. जागा मोठी असूनही अपुरी पडे. सकाळपासून पक्षकारांची वर्दळ सुरू होई. प्रत्येकाशी बोलणे, त्याच्या कामाची माहिती घेणे, कागदपत्रे पाहणे होईपर्यंत कोर्टात जाण्याची वेळ होई. संध्याकाळी परत आल्यावर सुरूवातीची काही वर्षे रावसाहेब भोकरच्या शेतीवर जात नंतर नंतर मात्र संध्याकाळीही पक्षकारांच्या गराडयातून त्यांची सुटका होत नसे. पुन्हा दुसऱ्या दिवसाच्या कामाची पूर्वतयारी करण्यास ते बैठक मारीत ते रात्री ११—१२ पर्यंत.

कायदयाचे दीर्घसूत्री काम बहुसंख्यांना न परवडणारे आहे हे जाणून त्यांनी अवास्तव फीची कधी अपेक्षा केली नाही. स्नेही—संबंधी मंडळींची कामे त्यांनी विनामूल्य केली. एका वकिलांची मुले कायदयाच्या अडचणीत होती. त्यांचे वडील वारलेले होते. रावसाहेबांनी खूप वेळ देऊन आणि जातीने लक्ष घालून त्यांचे कायदयाचे सर्व प्रश्न मार्गी लावले. आनंदलेली ती मुले फी देण्यासाठी आली तेव्हा रावसाहेबांनी फी न घेऊन त्यांना आणखी एक सुखद धक्का दिला. समव्यावसायिकांशी वागण्याची अलिखित नीतिमूल्ये त्यांनी नेहमीच जपली.

गोरगरीब पक्षकाराला त्यांनी पैशाकरिता कधी अडविले नाही. पैसे नाहीत म्हणून कोणी पक्षकार त्यांच्या दारातून परत गेला नाही अशा गरीब पक्षकाराचा खर्च अडल्यावेळी ते स्वत:च करीत. एखादा अगदीच अडलेला असला तर स्वत:च्या खिशातून त्याला वाटखर्चालाही पैसे देत. गोरगरीब पक्षकाराविषयी त्यांच्या हृदयात नेहमीच जिव्हाळा आणि आपुलकी असे. कोणत्याही पक्षकारला ते कामाच्या आधी फी कधीच मागत नसत. निरनिराळया कामांची सबब सांगून पक्षकारांकडून वेळोवेळी पैसे उकळवण्याची त्यांची पद्धत नसे. पक्षकाराला त्याच्या कामाचे समाधान आणि योग्य न्याय मिळालाच पाहिजे याबद्दल त्यांची सदैव धडपड असे. ते जीव ओतून अभ्यासपूर्वक काम करीत. अंगात ताप भरला असतानाही पक्षकाराचे नुकसान होऊ नये म्हणून वाचन करून, टिपणे काढून ज्युनियर्सना यथास्थित सूचना देत. कामाविषयीची निष्ठा आणि पैशाविषयीची अनाग्रही वृत्ती या दोन्हींचा पक्षकारावर विलक्षण परिणाम होई, पैशाचा विचार न करता रावसाहेबांनी कामाचा विचार केला. त्यामुळे कधी त्यांना अपेक्षेपेक्षाही अधिक पैसा मिळाला. हा पैसा त्यांच्या कष्टाचा आणि चाकोरीबाहेर जावून दाखविलेल्या आपुलकीचा होता.

अशा निर्मळ वागण्याने रावसाहेबांनी आपल्या पक्षकारांची मने अगदी जिंकून घेतली. पक्षकाराबरोबरचे त्यांचे संबंध केवळ

कोर्टाच्या आवारपुरते मर्यादित राहिले नाहीत. ते घरगुती स्नेहाचे बनले. आपल्या पक्षकारांच्या वैयक्तिक जीवनातही रावसाहेब त्यांचे मित्र आणि मार्गदर्शक बनले. भावाभावांच्या वाटण्या, लेकीबाळीचे विवाह अशा घरगुती बाबतीतही त्यांचा सल्ला घ्यावा असे पक्षकारांना वाटे, कोणी एखादयाच्या हक्काचे छिनावून घेत असेल, कोणी एखादयावर अन्याय करीत असेल तर त्याचे त्याला मिळवून देणे हे रावसाहेबांनी आपले कर्तव्य मानले. पक्षकाराच्या सुखदु:खाशी, त्याच्या भावभावनांची ते एकरूप होत. पक्षकाराची कामे जशी स्वत:चीच आहेत. अशा तद्रुपतेने करीत त्यामुळे पक्षकारांच्या उदंड प्रेमाचे ते वाटेकरी झाले.

रावसाहेबांचे वकिली जीवन अनेक संपन्न आणि विविधांगी अनुभवांनी भरलेले आहे. आपली वकिली सामाजिक बांधिलकीची जाणीव जागती ठेवून त्यांनी केली. १९५७ चा कूळकायदा, १९६२ चा कमाल जमीनधारणा कायदा, १९७५ मध्ये त्यात करण्यात आलेल्या नव्या तरतूदी या प्रत्येक वेळी त्यांनी भरपूर परिश्रम केले. अशावेळी त्यांच्या कार्यालयात शेतकऱ्यांची जत्रा भरे. विश्वासू वकील या भावनेने लोक तीन तीन दिवस रांगा लावून बसले. कोणाच्याही अडचणीचा फायदा रावसाहेबांनी कधीही घेतला नाही. याचवेळी सिलींग दुरूस्ती कायदयाच्या भरून घ्यावयाच्या फॉर्ममधील दोष दाखविणारा अभ्यासपूर्ण लेख रावसाहेबांनी लिहीला. तो 'सकाळ' मध्ये प्रसिद्धही झाला. शासनानेही रावसाहेबांशी चर्चा करून फॉर्म बदलला. या कामासाठी जिल्हयातल्या व जिल्हयाबाहेरच्या अनेक वकिलांनी आपल्या पक्षकारांना रावसाहेबांकडे पाठविले व रावसाहेबांचा अधिकार मान्य केला. रावसाहेबांनी 'एक सामाजिक चळवळ' या दृष्टीनेच वकिली केली.

(ध्यासपर्व;आत्मकथन ॲड. रावसाहेब शिंदे,अमेय प्रकाशनपुणे—२००६)

**१.३.९ रावसाहेबांचे कुटूंब**

रावसाहेबांचा संसार पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण केला तो रावसाहेबांच्या पत्नी सौ.शशिताईंनी.कोयना प्रकल्पावर इलेक्ट्रिक इंजिनिअर म्हणून काम करणाऱ्या शेकदारांच्या कन्येशी २५ मे १९५७ मध्ये कोल्हापुरातच त्यांचा विवाह झाला.

रावसाहेबांच्या संसारवेलीवर चार गोंडस फुले उमलली. शुभांगी १९५८, सुजाता १९६२, राजीव १९६३ व संजीव १९६६ ही त्यांची अपत्ये. यापैकी संजीव या इंजिनिअरिंगला असलेल्या मुलाचे निधन झाले. रावसाहेब व शशिताई यांनी मोठया कष्टाने दु:ख आवरून पुत्रप्रेमाला व्यापक रूप दिले.

**प्रवाह आकृती क्र १.२**




## १.३.१० शेती आणि गोपालन —

प्रयोगशील शेतकरी हे रावसाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे आणखी एक ठसठशीत अंग. शेतकरी कुटूंबात जन्म झालेला असल्याने शेतारानातच कष्ट करीत ते वाढले.

श्रीरामपुरात वकिली सुरू झाल्यावर, स्थिर उत्पन्नाची जोड असावी या विचाराने रावसाहेबांनी भोकर, ता.श्रीरामपूर येथे १४ एकर जमीन खंडाने घेतली. ही जमीन उफाळयाची होती. यात

रावसाहेबांनी ऊस लावला, पण पीक आले नाही. निराश होऊन ही शेती त्यांनी बंद केली. काही दिवसानंतर जवळच पुन्हा १० एकर जमिन खंडाने घेतली. ही जमीन चांगली लाभली. भोकरच्या या शेतीवर रावसाहेबांनी अतोनात मेहनत घेतली. दिवसभराचे वकीलीचे काम संपवून ते संध्याकाळी सुरूवातीला सायकलवर नंतर जीपने शेतीवर जात असत. अशा कष्टाने रावसाहेबांनी ही शेती ४०—५० एकरापर्यंत नेली. त्यात काही खंडाची काही खरेदीची होती. याचदरम्यान कुळकायदा आला. कायदयाने खंडाच्या जमिनी रावसाहेबांच्या होवू शकत हात्या पण तसा किंचितसा लोभही रावसाहेबांच्या मनाला शिवला नाही. आपण होवून त्यांनी जमिनी मूळ मालकाला परत केल्या.

भोकरच्या जमिनी सोडल्यावर रावसाहेबांनी बेलापूर आणि गोवा येथे जमिनी खरेदी केल्या, या सर्व ठिकाणी प्रयोगशील शेती केली. पाडेगाव या फलटणच्या जवळच्या ऊस संशोधन केंद्राशी त्यांनी संपर्क ठेवला. राहुरी कृषि विद्यापीठात नवनवे काय चालले आहे ते आर्वजून पाहिले. खराब जमिनींचे 'लेव्हलिंग' करून घेतले. उपळट व खारवट जमिनी सुधारून लागवडीखाली आणल्या. आरे कॉलनीतून खत आणून टाकले. विहीरी खोदल्या, इंजिन्स बसविली. शेतात पाईपलाइन्स टाकल्या. पाण्याच्या निचरा व्हावा म्हणून चर खोदले, नवी बियाणे आणली. स्वत: ऊस, गहू, चवळी यांच्या बियाणांचे उत्तम प्लॉट तयार केले. एकरी ९०टन ऊसाचे विक्रमी पीक घेतले. कपाशी, भुईमूग, कोबी, भेंडी, चाऱ्याची अशी वेगवेगळी पीके घेतली. गोवातल्या शेतीत ऊस नीट येईना म्हणून नारळ, सुपारी, काजू, रबर, मिरी, अननस अशी वेगवेगळी पीके घेतली.

१९५९ मध्ये एक गीर गाय घरच्या दुधासाठी रावसाहेबांनी घेतली. त्यातूनच पुढे होस्टन, जर्सी अशा लहान—मोठया सुमारे ५० गायींचा उत्कृष्ट कळप सिद्ध झाला. दररोज २०० लिटर्सपर्यंत दूध ा मिळण्याची त्यांची क्षमता होती. शास्त्रोक्त पद्धतीने गोपालन

केले. चांगल्या वळूंची विक्री केली. पुढे जाऊन सहकारी तत्वावर एक नमुनेदार अशी दुग्धव्यावसायिकांची सोसायटी चालविली.

**१.३.११ सहकारी चळचळी**

रावसाहेब श्रीरामपुरात स्थिरावले त्याकाळात प्रवरा परीसरात सहकारयुगाची पहाट होत होती. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यांच्या प्रगल्भ शासकीय धोरणांनी सहकार चळवळ विकसित होत गेली. या सहकारी चळवळीमुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा कायापालट झाला. सहकारी साखर कारखाने, दुग्धव्यवसाय, कुकुक्टपालन, कागदनिर्मिती, मदयार्कनिर्मिती यासारखे व्यवसाय सुरू झाले. परंतु याचबरोबर सहकार आणि राजकारण यांच्या युतीमुळे सहकार चळचळी भष्ट्राचाराचे कुरण बनल्या.

अशा काही प्रवृत्तींचा विकास त्याळेच्या सहकारी साखर कारखान्यांच्या परिसरात होवू लागला. कोणाला कितीही रक्कम ॲडव्हान्स देणे, कारखान्याच्या आधारावर खाजगी व्यवसाय चालविणे, वाहने आणि गेस्टहाऊस यांचा मनाला वाटेल जसा वापर करणे नोकरभरतीत भष्ट्राचार,शैक्षणिक,शेती आणि औदयोगिक योजनांकडे खिसे भरण्याचे मार्ग म्हणून पाहणे असे प्रकार सुरू झाले. अशा काही प्रवृत्ती अशोक सहकारी साखर कारखान्यानाही दिसू लागल्या. त्यांची झळ रावसाहेबांच्या अनेक पक्षकारांना लागली. रावसाहेबांनी कारखान्याच्या बलाढय आणि एकहाती सत्तेला एकाकी आव्हान दिले. त्यांचा लढा कोणा व्यक्तीविरूध्द नव्हता. तर सहकार क्षेत्रातील अपप्रवृत्तीच्या विरोधातील तो लढा होता. समाज आणि शासन यांना सावधगिरीचा इशारा देणारी ती चळवळ होती.

प्रथम रावसाहेबांनी कारखान्याच्या कायदा सल्लागारपदाचा राजीनामा दिला. कारखान्याच्या परिसरातील चोवीस गावे विंचरून काढली. परिसरातील गावापासून मुंबई — दिल्लीच्या वाऱ्यापर्यत पदरमोड करून प्रवास केला. गावागावात प्रचाराची राळ उडवून दिली अनेक निवेदनपत्रे काढली. डायरेक्टर ऑफ शुगर,राज्य सहकारी बॅंक,सहकार मंत्री,मुख्यमंत्री यांचे दरवाजे ठोठावले. या चळवळीचा

परिणाम म्हणून डायरेक्टर ऑफ शुगरने संचालक मंडळ रद्द केले. नंतरच्या निवडणुकीत जुने संचालक मंडळ पराभूत झाले. नवे लोक निवडून आले. नव्या संचालकानी रावसाहेबांनी कारखान्याचे चेअरमन व्हावे म्हणून गळ घातली. रावसाहेबांना त्यांना नम्र नकार दिला. सहकारी चळवळीला नैतिक अधिष्ठान पाहिजे. चारित्र्याचा पाया हवा. हा इशारा देणारी ही चळवळ होती.आपल्या धारणेप्रमाणे सहकारी संस्था कशी चालवता येते हे रावसाहेबांनी सहकारी दुग्ध व्यावसायिक सोसायटीच्या रूपाने दाखवून दिले.

भारतीय शेती — उदयोग प्रतिष्ठान ;ठ।प्थ्द्ध ही उरूळी कांचनची मणिभाई देसाई यांची संस्था यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, आण्णासाहेब शिंदे हे तिचे विश्वस्त. श्रीरामपूरच्या परिसरात दुग्धव्यवसाय रूजावा ही आण्णासाहेबांची इच्छा. मणिभाई ‘कृत्रिम रेतन केंद्राची’ माहिती देण्यासाठी श्रीरामपूर परिसरात आले होते. रावसाहेबांच्या पुढाकाराने १९७२ मध्ये अशोक सहकारी साखर कारखान्यात ‘कृत्रिम रेतन केंद्र’ सुरू झाले. दुग्धव्यावसायिकांना हे पुष्कळ उपयोगी ठरले.रावसाहेबाच्यांच प्रयत्नाने ‘शासकीय दूध संकलन केंद्र’ श्रीरामपूर येथे सुरू झाले. १९७६ मध्ये रावसाहेबांनी पुढाकार घेऊन ‘श्रीरामपूर सहकारी दुग्ध व्यावसायिक सोसायटी’ स्थापन केली. त्याचे प्रवर्तक आणि चेअरमन रावसाहेब होत आणि आजही आहेत.

सोसायटीसाठी जागा घेऊन सर्व सोयींनी युक्त अशी सुनियोजित इमारत पाच लाख रूपये खर्चून कोणतेही कर्ज न घेता बांधण्यात आली. या परिसरातील ही पहिल्या — दुसऱ्या क्रमांकाची सोसायटी आहे. माणिभाईंनी ‘रोगनिदान आणि उपचार केंद्र’ अग्रक्रमाने या सोसायटीला दिले. जनावरांच्या रोगांची माहिती, प्रतिबंधक लस यामध्ये मिळते. पशुवैद्यकीय सेवा दूध उत्पादकांना गोठयात मिळण्याची सोय या केंद्रात करून दिली.सोसायटीच्या सभासदांत एकोपा आणि जिव्हाळा आहे. सहकारी दुग्धव्यावसायिकांच्या या सोसायटीच्या

रूपाने रावसाहेबांनी सहकार क्षेत्रातील एक छोटा पण अनुकरणीय असा आदर्श नमुना उभा केला आहे.

**१.३.१२ राजकीय सीमारेषा :—**

१९६२ पासून आण्णासाहेबांच्या निवडणुकीत रावसाहेब सहभागी होत आले. प्रचाराची धुरा त्यांच्याच खांदयावर होती. आण्णासाहेबांच्या अनुपस्थितीत १९३७ च्या निवडणुकीची प्रचारमोहीम त्यांनी सांभाळली. बंधूंसाठी किंवा कार्यकर्त्यासाठी रावसाहेब निवडणूकीच्या प्रचाराकार्यात सहभागी झाले खरे पण ती निवडणूक आपण स्वत: लढवावी असं त्यांना मात्र कधी वाटलं नाही. १९७२ मध्ये वसंतदादा पाटील आणि वसंतराव नाईक या मातब्बारांनी त्यांना उभे राहण्यासाठी गळ घातली. रावसाहेबांना ते प्रशस्त वाटेना. भावाने भावाला सत्तास्थानी घेतले, असे आरोप लोकांकडून होण्याची शक्यता होती. शिवाय एकाच घरातील दोन व्यक्ती एकाच वेळेस सक्रिय राजकारणात व मंत्रिपदावर असणे त्यांना नैतिकदृष्टया योग्य वाटले नाही. यशवंतराव चव्हाणांच्या पुरोगामी व्यापक आणि बहुमुखी धोरणामुळे रावसाहेब कॉंग्रेसमध्ये जरी गेले नाहीत तरी कॉंग्रेसचे सहप्रवासी बनले होते. पण इंदिरा गांधी यांच्या उदयानंतर ते कॉंग्रेसपासून हळूहळू दूर गेले. कॉंग्रेसच्या राजकरणाचे नैतिक अधिष्ठान हरवल्यासारखे झाले होते. अशा गोष्टी रावसाहेबांच्या पिंडप्रवृत्तीला मानवण्यासारख्या नव्हत्या. त्यामुळे ते सत्तेपासून अलिप्त राहिले.

**१.३.१३शैक्षणिक चळवळ व 'रयत शिक्षण संस्था सातारा' :—**

काले ता. कराड जि.सातारा येथे भरलेल्या सत्यशोधक समाजाच्या परिषदेत ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेची घोषणा केली. शिक्षणाची चळवळ अहमदनगर जिल्हयात उभारण्यासाठी १९४५ च्या सुमारास त्यांचे आगमन झाले. कर्जतचे दादा पाटील, कोपरगावचे शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, श्रीरामपूर येथील आण्णासाहेब शिंदे, रावबहादूर नारायणराव बोरावके, चंद्रभान डाकलेशेटजी, कोल्हारचे शंकरराव ६ ुमाळ, सात्रळचे पी.बी.कडू पाटील, लोणीचे पद्मश्री विखे पाटील

यांच्याकडे त्यांचे जाणे—येणे असे यातूनच रावसाहेबांशी त्यांचा परिचय वाढला. १९५४—५५ मध्ये कर्मवीरांबरोबर फिरून त्यांनी संस्थेच्या अनेक शाळा, कारखाना, गावकरी यांच्या सहाय्याने त्या त्या गावामध्ये सुरू केल्या. या प्रयत्नामुळे नगर जिल्हयात श्रीरामपूर, कर्जत, जामगाव, कोपरगाव, प्रवरानगर, टाकळीभान, श्रीगोंदा, वडाळा—महादेव याठिकाणी रयत शिक्षण संस्थेची संकुले उभी राहिली.

कर्मवीरांच्या नंतर, कर्मवीरांचे चिरंजीव कै. आप्पासाहेब पाटील यांनी १९७६ मध्ये रावसाहेबांना जनरल बॉडीचे सदस्य करून घेतले. त्याच वर्षी ते संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्यही झाले. ९ मे १९७८ रोजी त्यांची संस्थेच्या व्हाईस चेअरमन पदी निवड झाली. सतत ३३ वर्षे त्यांनी संस्थेचा व्हा. चेअरमन म्हणून काम पाहिले. ९ मे २००८ पासून तर आतापर्यंत २६ जानेवारी २०१४, ते संस्थेचे चेअरमन म्हणून काम पाहत होते.

अशा तऱ्हेने काम करताना रावसाहेब कार्यकर्त्याची म्हणून एक लक्ष्मणरेषा पाळतात. शिक्षणकार्याचे धोरण ठरविणे, संस्थेच्या शाखांच्या इमारतींसाठी, शैक्षणिक साहित्यासाठी आर्थिक साहय मिळवून देणे, संस्था आणि समाज यात सांमजस्य व जिव्हाळा निर्माण करणे. अशी कामे ते अवश्य करतात. पण त्यापलीकडे जाऊन नेमणुका, बदल्या अशा प्रशासनाच्या अंतर्गत बाबीत हस्तक्षेप करण्याचे ते टाळतात. या बाबतीत शिक्षण संस्थेला स्वायततता मिळाली पाहिजे असे त्यांना वाटते. शिक्षणविषयक कार्यकर्त्याची ही लक्ष्मणरेषा रावसाहेबांनी नेहमी पाळली.शिक्षण हा रावसाहेबांच्या एकूणच जिव्हाळयाचा विषय आहे. श्रीरामपूर परिसरात त्यांनी स्वंतत्रपणे काही काम केले आहे. श्रीरामपूर एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेत (१९७०) त्यांनी पुढाकार घेतला. या संस्थेचे चेअरमन म्हणूनही त्यांनी काम पाहिले. अशोकनगर येथील ' इंग्लिश मिडीअम स्कूल' पुढे अशोक एज्युकेशन सोसायटीकडे सोपविण्यात आले. तरी त्याचे चेअरमन म्हणून आंरभीची तीन वर्षे रावसाहेबांनीच काम

पाहिले. श्रीरामपूरचे 'न्यू इंग्लिश स्कूल' नावारूपाला आले. ते रावसाहेबामुळेच. प्राथामिक विद्यामंदीर व संस्कारकेंद्र (१९९५) याची रयत संकुलातील निर्मिती, हाही रावसाहेबांचा शैक्षणिक धोरणांचा एक भाग.या सर्वच शिक्षणसंस्थाच्या माध्यमातून रावसाहेब शिक्षणप्रक्रियेमध्ये कृतीशील आहेत. परिसरातल्या साऱ्याच शिक्षण संस्थाना त्यांचा आधार वाटतो. विधायक कामात रावसाहेबांची साथ लाभणारच असा शिक्षणप्रेमी मंडळींना विश्वास वाटतो. ग्रामीण भागातील शैक्षणिक प्रश्न, शिक्षणसंस्थांच्या अडीअडचणी, साक्षरता प्रसार, स्त्रीशिक्षण, बालसंस्कार केंद्र याविषयी काही भूमिका घेऊन ते प्रयत्नशील आहेत. रावसाहेब व्यावसायिक शिक्षणतज्ज्ञ नाहीत. जीवनाच्या जिव्हाळयाने केलेल्या विचारांतून त्यांचा शिक्षणविचार स्फुरलेला आहे. आजच्या शैक्षणिक वास्तवाचे अवलोकन, अनुभव आणि मननचिंतन यातून त्यांचे शिक्षणविषयक चिंतन आकाराला आलेले आहे.

**१.३.१४ साहित्यजीवन :—**

रसिक साहित्यप्रेमी आणि सर्जनशील साहित्यिक ही रावसाहेबांची आणखी एक ओळख. साहित्याच्या आवडीमुळे ते आपोआप साहित्यिकांकडे ओढले गेले. नाशिकच्या वास्तव्यात सानेगुरूजींची ज्वाला आणि फुले माळणारी उद्दिपक व्याख्याने त्यांनी मन भरून ऐकली. कुसुमाग्रजांना तेथे पाहता आले. मोठेपणी त्यांना कुसुमाग्रजांच्या स्नेहाचा लाभ झाला. शाहीर अमर शेख, आण्णासाहेब साठे, शाहीर गवाणकर यांचा त्यांना सहवास लाभला. त्यामुळे विद्यार्थी दशेतच रावसाहेब दर्जेदार साहित्याचे अभ्यासक बनले.पु.ल. देशपांडे आणि सुनीताताई महादेव मळयात वेळोवेळी येऊन गेले. याचबरोबर ग.दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, द.मा. मिरासदार, शंकर पाटील, राजा मंगळवेढेकर हेही श्रीरामपूरला येऊन गेले. त्यांचे कितीतरी कार्यक्रम रावसाहेबांनी श्रीरामपूर परिसरात घडवून आणले. वसंत बापट आणि ना.धो.महानोर यांच्या कवितांच्या मैफिली, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे आणि सेतुमाधवराव पगडी

यांची शिवचरित्रावरील व्याख्यानेही श्रीरामपूरात परिसरात केवळ रावसाहेबांच्या या मंडळीबरोबर असलेल्या स्नेहामुळेच घडून आली. अंगभूत आवडीमुळे साहित्यविषयक उपक्रमात ते अग्रभागी असतात. याच्यातूनच श्रीरामपूरच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेची त्यांनी स्थापना केली. ग्रंथ प्रकाशन, साहित्य परिषद, मेळावे, कथाकथने, काव्यसंमेलने, लेखकांशी चर्चा हे सर्व या परिसरातील नागरिकांना अनुभवायला मिळाले ते केवळ त्यांच्यामुळे. वाचनाच्या या ओढीने अनेक लेखकांशी त्यांचे जिव्हाळयाचे, घरगुती संबंध जुळले आहेत.साहित्य आणि संस्कृती यांचा जवळचा संबंध रावसाहेब मानतात. साहित्य आणि साहित्यीक यांच्यावर प्रेम करता करता एक दिवस रावसाहेब स्वत:च साहित्यिक बनले. शिक्षण, वैचारिक लेख, वैचारिक निंबध, चरित्रे, आत्मचरित्र, समाजातील विविध रूढी, परंपरा, सामाजिक स्थिती अशा विविध विषयांवर रावसाहेबानी लेखन केलेले आहे. त्यांच्या काही पुस्तकांच्या चार—चार आवृत्त्या निघाल्या. त्यांनी महाराष्ट्र शासनाचे राज्यपुरस्कार खेचून आणले.

**१.३.१५ पर्यटन— प्रवास :—**

आपल्या कार्यमग्न जीवनातून सवड काढून पत्नी आणि मुले यांच्याबरोबर पर्यटन करणे हा त्यांचा एक आवडता छंद आहे. सारा महाराष्ट्र तर त्यांनी पाहिलाच पण भारतभरही भ्रमण केले. दक्षिणेच्या उटीपासून श्रीनगरपर्यत आणि पश्चिमेच्या सुरतपासून पूर्वेच्या कोलकात्यापर्यत अशी सर्वंकष भ्रमंती त्यांनी केली. भव्य वास्तू आणि कोरीव शिल्पे, निसर्गाची लावण्य उधळणारी स्थळे आणि अभयारण्ये, ऐतिहासिक आणि पौराणिक स्मृती जागविणाऱ्या वास्तू, आधुनिक भारताची तीर्थक्षेत्रे, धरणे आणि भव्य औदयोगिक प्रकल्प असे सारे त्यांनी पाहिले आहे. मुलांना आवर्जून दाखवले आहे. याच ओढीने त्यांनी परदेशपर्यटनही केले आहे. इ.स. १९९२ मध्ये रावसाहेब आणि शशीकलाताई अमेरिकेचा अभ्यास दौऱ्यावर दोन महिन्यांसाठी गेले. अमेरिकेची उदयमशीलता, कार्यमग्नता त्यांनी अनुभविली, तेथील कुंटुंब व्यवस्था आणि समाजव्यवस्था यांचे

निरिक्षण केले. अमेरिकन संस्कृती आणि भारतीय संस्कृती यांचा तौलनिक अभ्यास केला. अमेरिकतील डेमव्हर, बफेलो, फेसनो येथील चर्चासत्रात सहभाग घेतला.इ.स. २००१ मध्ये शिंदे दांपत्य पुन्हा दोन महिन्यांसाठी युरोपच्या अभ्यासदौऱ्यावर गेले. व्हॅटीकन सिटीत रावसाहेबांचे व्याख्यान झाले. रोस्टरडॅम आणि ॲमस्टरडॅम येथील चर्चासत्रांतही त्यांचा सहभाग होता. एका स्कॉटिश चर्चमध्ये त्यांचे व्याख्यान आयोजित केले गेले. ' इंडो— ब्रिटीश फेंडशिप सोसायटी' मध्ये शिक्षण महात्मा फुले ते कर्मवीर : विचार या विषयावर त्यांनी शैक्षणिक प्रबोधन केले.

या व्यवस्थेमुळे परदेशी घरांमध्ये राहण्याची त्यांना संधी मिळाली. तेथील कुंटुंबजीवनाचा अनुभव घेता आला. समाजातील वेगवेगळया थरांत मिसळता आले. त्यांच्याशी अनौपचारिक चर्चा करता आली. त्यामुळे परदेशातील शेती, शिक्षण आणि संस्कृती यांचा अभ्यास करता आला. तेथील सुप्रतिष्ठित संस्थांमध्ये भारतीय संस्कृतीवर व्याख्याने देता आली. त्याचप्रमाणे या पाहणीतून जाणवलेले निष्कर्ष भारतीय समाज आणि विशेषत: महाविद्यालयीन युवकांच्यापर्यंत पोहचविता आले. तौलनिक संस्कृतीअभ्यासक म्हणून रावसाहेबांनी जवळ—जवळ शंभराहून अधिक व्याख्याने भारतातील निरनिराळया महाविदयालयांमधून आणि मान्यवर संस्थामधून दिली.

**१.३.१६ मान—सन्मान :—**

समाजाचेही उदंड प्रेम रावसाहेबांना लाभले आहे ज्यांनी स्वत: ऊन सोसून समाजाला सावली दिली त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करणे आपल्या सामाजिक संवेदनशीलतेचा भाग आहे. अमृतमहोत्सव आणि सहस्त्रचंद्रदर्शन असे सारे सोहळे जनसमुदायाच्या उदंड प्रेमाने साजरे झाले. त्यांच्या ग्रंथांची प्रकाशने दृष्ट लागावी अशा पदधतीने संपन्न झाली. अनेक सेवाभावी संस्थांची उच्च पदे त्यांना भूषविता आली.जीवनगौरव पुरस्कारापासून राज्य पुरस्कारापर्यंत अनेक पारितोषिकांनी त्यांना सन्मानित करण्यात आले. देशात त्याचप्रमाणे परदेशातही सामाजिक संस्थांनी त्यांचा सन्मान केला.

पण या साऱ्यापेक्षा रावसाहेबांना अप्रुप वाटते ते कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणासाठी परदेशी जावे म्हणून जे प्रयत्न केले त्याचे. सेवामूर्ती मदर तेरेसा यांनी तोंड भरुन दिलेल्या आशीर्वादांचे आाणि बाबा आमटे व साधनाताई यांनी स्वत:च्या गळयातले हार काढून शिंदे दांपत्याच्या गळयात घालून केलेल्या अनोख्या सत्काराचे. समाजातल्या या उदंड प्रेमाने रावसाहेबांचे मन भारावून जाते. समाजासाठी त्यांनी जे केले ते मनापासून केले सर्वस्व झोकून केले त्याविषयी अंहकार न बाळगता केले. जननी जन्मभूमी आणि जनता यांचे ऋण फेडण्याचा कोणी कितीही प्रयत्न केला तरी न 'ऋण फिटे' अशीच रावसाहेबांची मनोधारणा आहे. या ऋणात राहून ते कार्यमग्न जीवन व्यतीत करीत आहेत.

प्रवाह आकृती क १.३




### १.३.१७ ॲड रावसाहेब शिंदे यांनी केलेले लेखन :—

### १.३.१७.१ पुस्तके:—

१) शिक्षण आणि समाज;वैचारिक लेखसंग्रह, अमेय प्रकाशन पुणे —२००१महाराष्ट्र शासनाचा यंशवतराव चव्हाण राज्य पुरस्कार २००२

२) चरित्र आणि चारित्र्य;चारित्र्यांचा संग्रह, डॉ र.बा.मंचरकर;संपादक अमेय प्रकाशन पुणे—२००१

३) एज्युकेशन अॅन्ड सोसायटी;प्रा. व्ही.डी. तुळजापूरकर अमेय प्रकाशन पुणे—२००१

४) ध्यासपर्व;आत्मकथन—२००५, श्री. संत नरहरी महाराज पुरस्कार, श्रीरामपूर २००५ ना. ह. आपटे पुरस्कार श्री. दादासाहेब साखवलकर पतसंस्था कोरेगावसातारा—२००६

५) भावलेली माणसं;व्यक्तिचित्रांचा संग्रह, अमेय प्रकाशनपुणे—२००७

६) प्रश्न आहे मूल्यांचा;वैचारिक लेख, अमेय प्रकाशनपुणे—२००९

७) संवादपर्व;पत्रव्यवहार खंड १, अमेय प्रकाशनपुणे—२०११

८) संवादपर्व;पत्रव्यवहार खंड २, अमेय प्रकाशनपुणे—२०११

९) संवादपर्व;पत्रव्यवहार खंड ३, अमेय प्रकाशनपुणे—२०११

१०) संवादपर्व;पत्रव्यवहार खंड ४, अमेय प्रकाशनपुणे—२०११

११) संवादपर्व;पत्रव्यवहार खंड ५, अमेय प्रकाशनपुणे—२०११

१२) भावलेल्या प्रस्तावना — अमेय प्रकाशन — ५ सप्टेबर २०१३

१३) विचारवेध — अमेय प्रकाशन —५ सप्टेबर २०१३

**१.३.१७.२ परिसंवादातील शोधनिबंधः—**

❖ इ.स. १९९७ 'लिगल पर्स्पेक्टिव्ह ऑफ हिंदू मॅरजेस' या विषयावर 'इंटरफेथ सेमिनार ऑन मॅरेजइन एशिया' या परिसंवादात सादर केलेला शोधनिंबध. हा परिसंवाद इंडियन स्कूल ऑफइक्युमेनिकल थिऑलॉजी या संस्थेने इक्युमेनिकल ख्रिश्चन सेंटर, व्हाइटफिल्ड, बंगलोरचा कार्यक्रम म्हणून आयोजित केला होता. १६ ते १९ ऑक्टोबर १९९७.

❖ इ.स. १९९९ पर्सेप्शन ऑफ सेजॉरिटी कम्युनिटी (हिन्दू) ऑन मायनॉरिटीज इन इंडिया, वरीलसंस्थांनी आयोजित केलेल्या परीसंवादात प्रस्तुत शोधनिबंध बंगलोर येथे सादर केला.

❖ इ.स. २००१ इनॉगरल स्पीच (उदघाटनपर बीजभाषण), द फर्स्ट नॅशनल ऑर्ग्यानिक कॉन्फरन्स, ही परिषद इन्स्टिटयुट फॉर इंटग्रेटेड रुरल डेव्हलपमेंट (एच.आर.डी) या संस्थेनेकांचननगर, औरंगाबाद येथे आयोजित केली होती. दि.२६ जानेवारी २००१

❖ इ.स.२००२ महात्मा गांधी आणि तंत्रज्ञान— महाराष्ट्र—गोवा इंजिनिअरिंग मीटमध्ये समारोपाचे भाषणकॉलेज, शेगाव, दि.२२ डिसेंबर २००२.

| अ.न | लेखाचे शीर्षक | नियतकालिक | कालावधी | संपादक | पृष्ठे |
|---|---|---|---|---|---|
| १ | अकोले तालुकयाचे सुपुत्र कै. बुवासाहेब नवले | स्मरणिका | १९८३ | प्रा.बी.एम. महाले | १ते ५ |
| २<br><br>३ | श्रीरामपुरची बाजारपेठ<br><br>चारित्र्यहीन शिक्षण : एक सामाजिक पाप | सुवर्णमहोत्सव स्मरणिका<br>शिक्षण : दशा आणि दिशा | १९९०<br><br>१९९०—९१ | सुमनभाई शाह<br><br>मधुकर कऱ्हाडकर | १४ते १७<br><br>३२ ते ३७ |
| ४ | कमलपत्र | चंद्रमा | १९९१ | अनिल आठरे | ७० ते ७३ |
| ५ | श्वेतक्रांतीचे दोन पाईक | श्वेतक्रांती | १९९४ | भाऊकाका आगाशे | ५ ते ९ |
| ६ | चंदनाचे खोड | स्मृतिगंधसंगमनेर | १९९४ | डॉ.सचिन आंबेरे | २९ ते ३० |
| ७ | क्रांतिशिरोमणी धर्मा पोखरकर | ७१ वा पूर्ती संमारभ | १९९५ | ——— | १ ते १६ |
| ८ | अजातशत्रू | बाबासाहेब : एक नायगारा | १९९६ | बाबासाहेब भोसले सत्कार समिती | १२३ ते १२६ |
| ९ | शिक्षणाने चारित्र्यसंपन्न माणूस कसा घडेल? | साप्ता. सकाळ | १९९७ | सदा डुंबरे | २७ ते २९ |
| १० | Legal Perespective of Hindu Marriage | Research Journal, Satara. | 1997 | Dr.V.K. Ghate | ५ ते २४ |
| ११ | जीवन त्यांना कळले हो! | स्वातंत्र्यसैनिक कॉ. पी. बी. कडू पाटील | १९९७ | प्राचार्य विजयराव कसबेकर | १ ते ९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५ | मराठीजातीच्या कर्तृत्वाचा आलेख | मराठी जात — कर्तुत्व आणि मर्यादा | १९९८ | भास्कर कोल्हे अर्जुन कोकाटे येवला | ३३ते ४२ |
| १६ | सहकारी क्षेत्रातील एक कळकळीचे व दूरदृष्टीचे व्यक्तिमत्व : भाऊसाहेब थोरात | 'बळिराजा' | १९९९ | प्र. बा. भोसले | २५ ते ३६ |
| १७ | नवनीत चंद्र | 'चंद्रमा'— मा. चंद्रभान दादा घोगरे | १९९९ | रावसाहेब म्हस्के | ८ ते ११ |
| १८ | रयत शिक्षण संस्था कर्मवीर भाऊराव पाटलांच्या हयातीत आणि नंतर | 'उत्तरंग' पुणे | दिवाळी १९९९ | सविता भावे | २४ ते ३२ |
| १९ | Perecptions of the Majaority Community (Hindus) of the Minorities | Thoelogy for our times | 2002 | Dr.M.J. Josheph | ८१ ते ९५ |
| २० | देवकीनंदन गोपाळा | 'उत्तरंग' पुणे | वासंतिक २००० | सविता भावे | १६ ते २६ |
| २१ | आंनदवनातले बाबा | 'उत्तरंग' पुणे | वासंतिक शतकारंभ विशेषांक २००१ | सविता भावे | ७२ ते ८२ |
| २२ | पितृसेवेच्या पुण्याईची श्रीमंती | 'जगन्मित्र कर्मयोगी' | २००१ | शरद कोलते | ४४ ते ४५ |
| २३ | संतलुक हॉस्पिटल सुवर्ण महोत्सव निमित्ताने | GoldenJubilee | २००३ | | ४९ ते ५३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २४ | ४२ चे दिवस | 'उत्तरंग' पुणे | दिवाळी २००३ | सविता भावे | ९० ते ९७ |
| २५ | लक्ष्मणराव : एक कर्तुत्वशाली व्यक्तिमत्व | एक समर्पित जीवन | २००३ | सौ. उज्जवला भावे | ४४ ते ५२ |
| २६ | सकारात्मक जीवनाचे मूर्त भव्य रुप ;अडयाळ टेकडीचे ग्रामस्वराज आणि तेथील गीताचार्य तुकारामदादा | 'उत्तरंग' पुणे | दिवाळी एप्रिल २००४ | सविता भावे | ४४ ते ५२ |
| २७ | सुदृढ लोकशाहीसाठी शिवासारखेच शिव शिवशंकरभाऊ! एक चमत्कार | 'सांजतारा' पुणे | दिवाळी २००४ | सविता भावे | ३५ ते ५३ |
| २८ | आमची अस्मिता! आमची आशा | 'शरदाचं चांदण' | स्मरणिका २००५ | डॉ. विश्वास मेहेंदळे | ७ ते ९ |
| २९ | शुभेच्छा (कर्मयोगी की. बा. काका) | कर्मयोगी की. बा. काका | २००५ | सुभाष म्हस्के | १४७ |
| ३० | शुभेच्छा | तपश्चर्या डुबेरे (सिन्नर) | २००५ | नारायण वाजे | ६ |
| ३१ | राजकारणातील राजहंस | स्वप्नपूर्ती गौरवग्रंथ | २००५ | शिवाजी बोंद्रे | ३० ते ३९ |
| ३२ | मला भावलेली अमेरिका | 'अथश्री' दिवाळी विशेषांक | २०० ६ | सविता भावे | १४५ ते १४७ |
| ३३ | शेती शेतकरी आणि आत्महत्या | मा. भास्करराव बोरावके अमृतमहोत्सव गौरवग्रंथ | २००६ | भास्करराव जोशी व इतर | १२ ते १८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३४ | फिनिक्सची झेप | 'जाणीव' प्रा. डॉ. रावसाहेब कसबे गौरव विशेषांक | २००६ | पोपट सातपुते | २० ते २४ |
| ३५ | कंटूर सरीवाले चौगुलेसाहेब | कृतज्ञ भुमिपुत्र | डिसेंबर २००६ | श्री. बी. पी. कोगनळे | २३ ते २५ |
| ३६ | या अमानुष गुन्हयाचा जाब दयावा लागेल | 'बळिराजा' (पूर्वार्ध) | जानेवारी २००७ | प्र. बा. भोसले | ६४ ते ६८ |
| ३७ | या अमानुष गुन्हयाचा जाब दयावा लागेल | 'बळिराजा' (उत्तरार्ध) | फेब्रुवारी २००७ | प्र. बा. भोसले | २९ ते ३३ |
| ३८ | ओंगळ सुबत्तेमागचे भयानक वास्तव | ज्येष्ठ पर्व (त्रैमासिक) मुंबई. | २००७ | आबासाहेब पटवर्धन | ४०,४१ |
| ३९ | परिसस्पर्शाने झाले जीवनाचे सोने | सारथी | २००७ | शिवाजी बोंद्रे | ३२ ते ४३ |

## १.३.१७.४ दैनिकांतील लेखन:—

### तक्ता क्र १.२

| अ.नं. | लेखाचे शीर्षक | दैनिक | काल |
|---|---|---|---|
| १ | कमाल जमीन धारणेच्या नेमक्या तरतुदी काय? | दै.सकाळ | २८ऑक्टो. १९७५ |
| २ | बदललेला फॉर्मही सुटसुटीत नाही | दै.सकाळ | ४ नोव्हेंबर १९७५ |
| ३ | माणुसकीचा गाभा ओळखला पाहिजे | दै. सार्वमत | ३० एप्रिल १९८२ |
| ४ | मंतरलेले दिवस | दै. लोकमत | १५ ऑगस्ट १९९८ |
| ५ | नाताळ : प्रकाशाचा सण | दै. सार्वमत | २५ डिसेंबर २००० |
| ६ | कहाणी श्रीरामपूरच्या जन्माची | दै. सार्वमत | २०जानेवारी २००३ |
| ७ | उमेदवारीचा मोह असा टाळला | दै. लोकमत | नोव्हेंबर २००३ |
| ८ | मानवता जागविण्यासाठी येशूचे बलिदान | दै. सार्वमत | २५ डिसेंबर २००३ |
| ९ | विश्वात शांतता नांदावी, हीच नाताळनिमित्त प्रार्थना | दै. सार्वमत | २५ डिसेंबर २००४ |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | चारित्र्यशील शिक्षण हाच सुदृढ लोकशाहीचा पाया | दै. सार्वमत | ४ मार्च २००५ |
| ११ | आजचे शिक्षण : दिशा आणि दशा | दै.लोकसत्ता | १ मे २००५ |
| १२ | दिवस तेव्हाचे आणि आन्ताचे | दै.सकाळ | २८ एप्रिल २००६ |
| १३ | शेती—शेतकरी—आत्महत्या | दै. सार्वमत | ऑक्टोबर २००६ |
| १४ | नगर जिल्हयातील शिक्षणाची स्थिती | दै. गावकरी | २६जानेवारी २००७ |
| १५ | अशा खासदारांपासून देश वाचवा हो | दै. सार्वमत | २९ एप्रिल २००७ |

❖ इ.स. २००६ महात्मा गांधीची अर्थविषयक भूमिका—अखिल भारतीय मराठी अर्थशास्त्र परिषदेचेतिसावे अधिवेशन, रा.ब.ना.बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर२६ फेब्रुवारी २००६.

**१.३.१७.३ ग्रंथ व नियतकालिके यातील लेखन :—**

**तक्ता क्र १.१**

**१.३.१८ ॲड. रावसाहेब शिंदे यांच्यावर इतरांकडून लेखन:—**

१) राजकीय तत्वप्रणाली सिदंधात आणि व्यवहार (१९८९)प्रा. विजय कसबेकर (संपादक) अमेय प्रकाशन, पुणे.
२) ॲड. रावसाहेब शिंदे षष्ठयब्दीपूर्ती गौरविका (१९८९)
३) प्रतिध्यास(२००६) प्रा.डॉ.एस.बी.गागरे(लेखक)
४) ध्येयासक्त (२००८) प्रा. डॉ.र.बा.मंचरकर (लेखक)
५) प्रेरणापर्व (२००८) प्रा.डॉ.बाबुराव उपाध्ये(संपादक)
६) पत्रसंवाद (२००८) प्रा.डॉ.एकनाथढोणे (संपादक)
७) पत्रप्रेरणा(२००८) प्रा.डॉ. एस.बी.गागरे (लेखक)
८) आमचे दैवत आणि आम्ही (२००९) श्री. सुकदेव सुकळे (लेखक)
९) अमृतकुंभ(२०१०) श्री. बाबुराव झिने (लेखक)
१०) झेप आशावादाची — कर्मसिदध (२०१२) प्रा.डॉ.एस.बी. गागरे (लेखक)

**१.३.१९ ॲड. रावसाहेब शिंदे यांनी भूषविलेली पदे:—**

**१.३.१९.१ संस्थापक अध्यक्ष—**

१ श्रीरामपूर एज्युकेशन सोसायटी, श्रीरामपूर
२ श्रीरामपूर दूध सोसायटी, श्रीरामपूर
३ महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा — श्रीरामपूर

**१.३.१९.२ अध्यक्ष—**

१ श्रीरामपूर बार असोसिशन(सलग १५ वर्षे)
२ इंडियन लॉ सोसायटी, पुणे
३ स्थानिक व्यवस्थापन समिती (रयत शिक्षण संस्थेच्या श्रीरामपूर मधील सर्व शाखा )
४ मदर तेरेसा स्वागत समिती

**१.३.१९.३ उपाध्यक्ष—**

१ लीगल एड कमिटी
२ इंडियन लॉ सोसायटी, पुणे
३ कॅन्सर सोसायटी, श्रीरामपूर

**१.३.१९.४ सदस्य —**

१) महाराष्ट्र राज्य सहकार कायदा दुरूस्ती
२) मॅनेजिंग कौन्सिल रयत शिक्षण संस्था, सातारा
३) सिनेट मेंबर, पुणे विद्यापीठ पुणे (सलग चार वेळा)
४) कार्यकारी मंडळ (महात्मा गांधी कृषी विद्यापीठ, राहूरी)
५) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक शुल्क निर्धारण समिती
७) सल्लागार मंडळ, कुसूमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक

**१.३.१९.५ विश्वस्त —**

१) बाईफ मित्रमंडळ, उरळी कांचन
२) विनोबा भावे ग्रामीण विकास प्रतिष्ठान

**१.३.१९.६ व्हाईस चेअरमन— रयत शिक्षण संस्था सातारा. (९ मे १९७८ ते २००८)**

**१.३.१९.७ चेअरमन—रयत शिक्षण संस्था सातारा.** (९मे २००८ पासून ते२६जानेवारी २०१५)

**१.३.२० पुरस्कार**

१) गोदूताई परूळेकर ‘जीन पियाओ’पुरस्कार

२) स्वांतत्र्य सैनिक (शासन)—१९९१पुरस्कार

३) षष्ठयब्दिपूर्तीपुरस्कार

४) ‘जीवन साधना गौरव पुरस्कार’ पुणे विद्यापीठ २००१

५) ‘यशवंतराव चव्हाण राज्य पुरस्कार’ (महाराष्ट्र शासन) २००२

६) ‘समाजरत्न पुरस्कार’ (शेती व ग्रामीण प्रतिष्ठान पाथर्डी) २००३

७) ‘श्री संत नरहरी महाराज पुरस्कार’ श्रीरामपूर २००४

८) ‘ना.ह.आपटे पुरस्कार’(दादासाहेब साखोलकर पतसंस्था) २००५

९) ‘राजश्री शाहू महाराज पुरस्कार’ (राजे मल्हारराव होळकर प्रतिष्ठान)२००६

१०) ‘इंदिरा गांधी राष्ट्रीय पुरस्कार’ (भारत कृषी पत्रकार संघ, दिल्ली) २००७

११) डॉ. गीबाब समाज संशोधक पुरस्कार’ (आधार प्रतिष्ठान) २००८

१२) ‘रानडे शैक्षणिक पुरस्कार’ (गोखले एज्युकेशन,नाशिक )२००८

१३) ‘इस्माईल मुल्ला—आदर्श सेवक पुरस्कार’(इस्माईल मुल्ला लॉ कॉलेज,सातारा)२००८

१४) ‘जीवन गौरव पुरस्कार’ (भारती विद्यापीठ, पुणे) २००९

१५) ‘श्रीमंत मालोजीराजे स्मृती पुरस्कार’ (फलटण) २००९

१६) ‘वाङमय सेवा पुरस्कार’ (नाशिक) २००९

१७) ‘न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे, सामाजिक पुरस्कार’ सातारा२०१०

१८)‘आबासाहेब वीर सामाजिक पुरस्कार’ (भुईज,सातारा)२०१०

१९) ‘मारूतराव घुले पाटील स्मृती पुरस्कार’(भेंडा ता.नेवासा) २०१०

२०) ‘डॉ.पंजाबराव जाधव समाजमित्र पुरस्कार’(पूणे) २०११

२१) ‘गदिमा स्नेहबंध पुरस्कार, गदिमा प्रतिष्ठान पुणे २०१२

२२) ‘राष्ट्रीय बंधुता पुरस्कार राष्ट्रीय बंधुता प्रतिष्ठान पुणे २०१२

२३) ‘लायन्स जीवन गौरव लायन्स इंटरनॅशनल अहमदनगर २०१३

२४) ‘मा.पंतप्रधान यांचे हस्ते देशातील उत्कृष्ट विधी महाविद्यालय अध्यक्षाचा सत्कार.

**१.४ समस्येचे शीर्षक:—**

ॲड्. रावसाहेब शिंदे यांचे शैक्षणिक विचार— एक अभ्यास.

**१.५समस्या विधान :—**

ज्येष्ठ विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, रयत शिक्षण संस्था, साताराचे चेअरमन ॲड्. रावसाहेब शिंदे यांच्या साहित्यातून व्यक्त होणाऱ्या शैक्षणिक व सामाजिक विचारांच्या संदर्भात शैक्षणिक तत्त्वज्ञान म्हणजेच शिक्षणाचा अर्थ, महत्त्व, कार्य, प्रकार, शिक्षणाचे पैलू, समस्या, उपाय, शिक्षक, शाळा, विद्यार्थी, संस्थाचालक, शालेय अभ्यासक्रम, शिस्त, जागतिकीकरणाचे परिणाम याविषयीचे विचार,तसेच शैक्षणिक समाजशास्त्र म्हणजेच समाज, शैक्षणिक समाजशास्त्राचा अर्थ, महत्त्व, कार्य, सामाजिक, रूढी, परंपरा, संस्कृती, सामाजिक संबंध व सामाजिक आंतरक्रिया, कुटुंब, सामाजिक नियंत्रण, सामाजिक परिवर्तन, समूहसंपर्क माध्यमे, शैक्षणिक समाजशास्त्राचे विविध पैलू, स्त्री शिक्षण, पर्यावरण शिक्षण, वंचितांचे शिक्षण याविषयीचे विचार,व शैक्षणिक मानसशास्त्र म्हणजेच शैक्षणिक मानसशास्त्राचा अर्थ, महत्त्व, कार्य, बालकाचे मानसशास्त्र, वाढ व विकास, अध्ययन, अध्यापन, बुद्धिमत्ता व सर्जनशीलता, व्यक्तिमत्त्व विकास, व्यक्तीभेद, अनुवंश आणि परिस्थिती याविषयीचे विचार, आणि १९८६ च्या नवीन शैक्षणिक धोरणातील १० मूल्ये याविषयीचे ॲड्. शिंदे यांचे विचार व या विचारांची सद्यस्थितीतील उपयुक्तता यांचा अभ्यास करणे.

**१.६कार्यात्मक व्याख्या —**

१. **शैक्षणिक विचार** :—सदर संशोधनात ॲड्. रावसाहेब शिंदे यांची शिक्षणाबद्‌दलची भूमिका, शैक्षणिक तत्त्वज्ञान, शैक्षणिक समाजशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र, मूल्ये याविषयी त्यांच्या साहित्यातून, भाषणातून वेळोवेळी व्यक्त झालेले विचार म्हणजे शैक्षणिक विचार होय.

२. **एक अभ्यास—** सदर संशोधनात ॲड्. रावसाहेब शिंदे यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान, शैक्षणिक समाजशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र व

मूल्येविषयक विचारांचे केलेले पृथकरण, यावरून काढलेले निष्कर्ष व त्यांची सद्यस्थितीतील उपयुक्तता पाहणे म्हणजेच एक अभ्यास होय.

३. **शैक्षणिक तत्त्वज्ञान**—शैक्षणिक तत्त्वज्ञान म्हणजेच शिक्षणाचा अर्थ, महत्त्व, कार्य, प्रकार, शिक्षणाचे पैलू, समस्या, उपाय, शिक्षक, शाळा, विद्यार्थी, संस्थाचालक, शालेय अभ्यासक्रम, शिस्त, जागतिकीकरणाचे परिणाम याविषयीचे विचार होय.

४. **शैक्षणिक मानसशास्त्र**—शैक्षणिक मानसशास्त्र म्हणजेच शैक्षणिक मानसशास्त्राचा अर्थ, महत्त्व, कार्य, बालकाचे मानसशास्त्र, वाढ व विकास, अध्ययन, अध्यापन, बुद्धिमत्ता व सर्जनशीलता, व्यक्तिमत्त्व विकास, व्यक्तीभेद, अनुवंश आणि परिस्थिती याविषयीचे विचार होय.

**संकल्पनात्मक व्याख्या :—**

१ **शैक्षणिक विचार :—** शिक्षणक्षेत्राचा विचार करून शिक्षणातील आधुनिक, विचारप्रवाह, नवीन, तत्त्वे, नवीन प्रयोग करणारी व्यक्ती म्हणजे शिक्षणतज्ज्ञ होय. त्याने अनुभव व प्रयोग या आधारे वरील मुद्दयांनुसार मांडलेले विचार म्हणजे शैक्षणिक विचार होय. (सिद्धातांचा कोश २००७, शिक्षणशास्त्र पान नं. १६४)

२ **एक अभ्यास—** सुक्ष्म व काळजीपूर्वक केलेल्या सर्वेक्षणाद्वारे मिळविलेल्या माहितीचे सुयोग्य पृथ:करण करणे, निष्कर्ष काढणे म्हणजे अभ्यास होय. (मराठी विश्वकोश, पान नं. ४५)

३ **शैक्षणिक तत्त्वज्ञान**—तत्त्वज्ञान व शिक्षणाचे तत्त्वज्ञान यांचा अगदी निकटचा संबंध आहे. तत्त्वज्ञान दिशा दाखविते व शिक्षण ते साध्य करून घेण्यास मदत करते. तत्त्वज्ञानातून जी वैचारिक बाजू वा तत्त्वे शिक्षण ग्रहण करते. त्यास शैक्षणिक तत्त्वज्ञान असे म्हणतात. (नवीन काळाचे शिक्षण – तत्त्वज्ञान – डॉ. के. के. जाधव, मन प्रकाशन, २०११)

४ **शैक्षणिक मानसशास्त्र**—जे शास्त्र मान्यता पावलेल्या मानसशास्त्रीय तत्त्वांचा उपयोग, शैक्षणिक समस्यांचा उलगडा

करण्यासाठी करते ते शास्त्र म्हणजे शैक्षणिक मानसशास्त्र होय. — ग्रुंथी व पॉवर्स ( शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, वा. ना. दांडेकर, श्रीविद्या प्रकाशन, सप्टेंबर २००७, पान नं. ९)

**१.७ संशोधनाची गरज—**

समाज शहाणा झाल्याशिवाय समाजातील प्रश्न, समस्या सुटणार नाहीत. केवळ भौतिक प्रगतीने समाज शहाणा होत नाही. त्यासाठी समाजाची नैतिक पातळी विकसित करावी लागेल. सगळयाच क्रांत्या आणि परिवर्तने ही विचार जागृतीतूनच घडून आल्या. या विचारजागृतीला प्रबोधन हाच एकमेव मार्ग आहे.ॲड्. शिंदे यांचे लेखन हे विचारजागृतीचे लेखन आहे. जीवनमूल्यांच्या संरक्षणासाठी आणि संगोपनासाठी आपल्या लेखणीची, कृतीची आणि वाणीची शक्ती ॲड्. शिंदे यांनी पणाला लावली आहे. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या पार्श्वभूमीवर उदयोन्मुख भारतीय समाजातील पुढील समस्या वाढल्या आहेत.

१. विद्यार्थ्यांच्या शिस्त व अभ्यासाच्या समस्या.
२. पालकांच्या अपेक्षांचा प्रस्फोट
३. शिक्षणातील भ्रष्टाचार, बेकारी समस्या
४. साहित्य आणि प्रसार माध्यमांतील ढासळती नीतिमत्ता.
५. कुटुंब संस्था, धर्म संस्था, शिक्षण संस्था यातील ढासळती मूल्ये.

या समस्यांची उत्तरे आपल्याला विचारजागृतीतून आणि कृतीतून मिळतील यासाठी ॲड्. शिंदे यांच्या मार्गदर्शक व उद्बोधक अशा शैक्षणिक व सामाजिक विचारांच्या अभ्यासाची गरज आहे.

**१.८ संशोधनाचे महत्त्व :—**

१. ॲड्. रावसाहेब शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे गुण व त्यांचे उपयुक्त शैक्षणिक व सामाजिक योगदान याद्वारे शिक्षण प्रणालीत कार्यरत असणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक,

प्राचार्य, पालक, संस्थाचालक या जबाबदार घटकांना योग्य मार्गदर्शन मिळेल.

२. या संशोधनातून व साहित्यातून जाणवलेले शैक्षणिक विचार अभ्यासाचा विषय म्हणून संशोधकांना उपयुक्त ठरतील.

३. ॲड्. शिंदे यांच्या साहित्यातून व्यक्त झालेल्या विचारांमुळे शिक्षण व्यावसायाशी संबंधित घटकांना, शिक्षक व संस्थाचालकांना नाविण्यपूर्ण उपक्रम, प्रयोग राबविण्याची प्रेरणा मिळेल.

४. या संशोधनातून मूल्यांवर विश्वास असणारा, श्रमाला महत्त्व देणारा विद्यार्थी कसा घडवावा, याबाबतचे ज्ञान शिक्षकांना प्राप्त होईल.

५. विविध अभ्यासक्रमातील आशय ठरवितांना पुरक वाचनासाठीचे वाङ्.मय निवडतांना अभ्यासक्रम तज्ज्ञांना सदर संशोधनाचा उपयोग होईल.

६. सदर संशोधनामुळे शासनकर्त्याला शिक्षणाची धोरणे ठरवितांना कोणती काळजी घ्यावी याविषयीचे मार्गदर्शन मिळेल.

७. प्रस्तुत संशोधनामुळे ॲड. रावसाहेब शिंदे यांचे शिक्षणविषयक विचार जाणून घेता आले.

८. प्रस्तुत संशोधनामुळे ॲड. रावसाहेब शिंदे यांचे शैक्षणिक कार्य जाणून घेता आले.

९. प्रस्तुत संशोधनामुळे ॲड. रावसाहेब शिंदे लिखित साहित्याचा परिचय झाला.

१०. प्रस्तुत संशोधनातून पदमभूषण डॉ. कर्मवीर या पाटील यांना अपेक्षित असणाऱ्या शैक्षणिक उद्दिष्टांचा पूर्ततेसाठी दिलेल्या योगदानातून ॲड. रावसाहेब शिंदे यांचे शैक्षणिक कार्य समोर येईल व सर्वासाठी मार्गदर्शक ठरेल.

११. ॲड. रावसाहेब शिंदे यांनी केलेल्या शैक्षणिक कार्यामागील मुख्य प्रेरणा समजावून घेता येतील.

१२. हे संशोधन शिक्षकांना ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या वाङमयाकडे पाहण्याची एक विशिष्ट दृष्टी देईल की, जी दृष्टी अध्ययन व अध्यापनास उपयुक्त ठरेल.

१३. ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या वाङमयाप्रमाणे अन्य काही लेखकांच्या वाङमयाचे शैक्षणिक मूल्यमापन करण्याचा दृष्टीने अभ्यासाची एक विशिष्ट दिशा यामुळे उपलब्ध होईल.

१४. शैक्षणिक क्षेत्रात वाङमयाचे अध्यापन करताना शिक्षकांना शैक्षणिक मूल्यमापन करण्यासाठी काही निकष सापडतील.

१५. शैक्षणिक दृष्टीकोनातून एखादया लेखकाच्या वाङमयाचा निश्चित स्वरूपात अभ्यास कसा करावा या दृष्टीने हे संशोधन उपयुक्त ठरेल.

**१.९संशोधन प्रश्न—**

१. ॲड. रावसाहेब शिंदे यांचे शैक्षणिक विचार कोणते?

२. ॲड शिंदे यांच्या विचारांची व कार्याची सदयस्थितीतील उपयुक्तता काय आहे?

३. ॲड्. शिंदे यांच्या शैक्षणिक योगदानातील प्रभावी ठरलेले घटक कोणते आहेत ?

**१.१०संशोधनाची उद्दिष्टे —**

१. ॲड्. रावसाहेब शिंदे यांच्या साहित्यातून व्यक्त होणाऱ्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाविषयक विचारांचा शोध घेणे.

२. ॲड्. शिंदे यांच्या साहित्यातून व्यक्त होणाऱ्या शैक्षणिक मानसशास्त्रविषयक विचारांचा शोध घेणे.

३. ॲड्. शिंदे यांच्या विचारांची सद्यस्थितीतील उपयुक्तता अभ्यासणे.

**१.११संशोधन गृहीतके—**

१. ॲड. रावसाहेब शिंदे यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये केलेले कार्य अभ्यास करण्याच्या योग्यतेचे आहे.

२. ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या समकालीन सर्व सहकाऱ्यांनी दिलेली माहिती आणि ॲड रावसाहेब शिंदे यांच्या शैक्षणिक विचारांचा आढावा घेण्यासाठी दस्तऐवज उपलब्ध आहेत.

३. ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या शैक्षणिक विचारांचा समाजावर प्रभाव पडलेला आहे.

**१.१२संशोधनाची व्याप्ती—**

ॲड. रावसाहेब शिंदे यांचे शैक्षणिक विचार हे मार्गदर्शक, दिशादर्शक, प्रेरक, शाश्वत विकास सक्षमीकरण यासारख्या व्यापक स्वरूपाचे आहे.

सदर संशोधन हे ॲड रावसाहेब शिंदे यांचे स्वांतन्त्र्य व कम्युनिस्ट चळवळीतील योगदान, कायदेतज्ज्ञ, विविध शैक्षणिक व सामाजिक संस्था, संघटना यातील भूमिका,लेखन, व्याख्याने व त्यामागील असणारे प्रेरक घटक यांच्याशी संबंधित आहे.

**१.१३संशोधनाची मर्यादा व परिमर्यादा —**

**मर्यादा—**

१. ॲड. रावसाहेब शिंदे यांचे शैक्षणिक विचार, शिक्षणविषयक कार्य योगदान अभ्यासण्यासाठी संशोधकाने माहितीचे स्त्रोत वापरले आहेत त्यावरच सदर संशोधन आधारलेले आहे.
२. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष माहितीच्या विविध स्त्रोतांकडून मिळालेल्या माहितीवर आधारित आहेत.
३. प्रस्तुत संशोधनातील प्रतिसादकांच्या भावभावना, मनस्थिती, आवड, सत्य—असत्य यावर संशोधकाचे नियंत्रण असणार नाही.

**परिमर्यादा—**

१. स्वांतन्त्र्यपूर्व काळ १९४० पासून ते ऑगस्ट २०१४ पर्यतच रावसाहेब शिंदे यांनी मांडलेले शैक्षणिक विचार तसेच शैक्षणिक क्षेत्रातील योगदान यांच्याशी संबधित आहे.
२. शिक्षण, शिक्षण पदधती, शिक्षण संस्था, अभ्यासक्रम, शिक्षक, विदयार्थी, औपचारिक व अनौपचारिक शिक्षण, स्त्री शिक्षण, मूल्य शिक्षण, वंचितांचे शिक्षण, आदीवासींचे शिक्षण, विविध् ाशैक्षणिक विचार प्रवाह याविषयी ॲड रावसाहेब शिंदे यांनी मांडलेले विचार व दिलेले योगदान यांच्याशीच संबंधित आहे.

**१.१४ संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनाचे विषय आणि त्यासाठी लागणाऱ्या सामुग्रीचे स्वरूप लक्षात घेऊन ॲड्. रावसाहेब शिंदे यांचे शैक्षणिक विचार समजून घेण्यासाठी संशोधन कार्यात प्रामुख्याने वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील व्यक्ति अभ्यास पध्दती अंतर्गत दस्तऐवज विश्लेषण पद्धती या संशोधन पध्दतीचा उपयोग केला आहे.

१.१५गुणात्मक माहिती संकलन साधने व तंत्रे

**१.१५.१ प्रकाशित साहित्य :—**

१. ॲड्. रावसाहेब शिंदे लिखित सर्व पुस्तके— १२

२. नियतकालिके व वृत्तपत्रे यातील ॲड्. शिंदे यांचे लेखन.

**१.१५.२ माहिती संकलनाची तंत्रे :—**

१. ॲड्. रावसाहेब शिंदे यांची मुक्त व संरचित मुलाखत.

२. ॲड्. शिंदे यांच्या साहित्याचे अभ्यासक — एकूण ५ यांच्या मुक्त व संरचित मुलाखती.

**१.१६गुणात्मक माहितीचे विश्लेषण :—**

प्रस्तुत संशोधन हे गुणात्मक संशोधन असल्याने माहितीचे विश्लेषण करण्यासाठी, वाङ्मय विश्लेषण नोंदपत्रिकेचा उपयोग संशोधकाने केलेला आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी दस्तऐवज विश्लेषण पद्धती ही संशोधन पद्धती वापरली आहे त्यासाठी आवश्यक असलेल्या माहिती संकलनासाठी व विश्लेषणासाठी आवश्यक असलेले तक्ते/कोष्टके हे संशोधन साधन म्हणून उपयोगात आणले आहे. त्यासाठी संशोधकाने स्वयंनिर्मित कोष्टके/तक्ते तयार केली आहेत.

❑❑❑

**02**

# संदर्भ साहित्याचा आढावा

**२.० प्रास्ताविक :—**

संशोधनासाठी उपयुक्त माहिती व संदर्भ, पूर्वी झालेल्या संशोधनातून घ्यावा लागतो. ही माहिती संशोधनाच्या सुरूवातीला किंवा प्रक्रिया चालू असताना विविध ग्रंथ, नियतकालिके, शब्दकोष, ज्ञानकोष, वर्तमानपत्रे, संशोधन अहवाल, इंटरनेट इत्यादी माध्यमातून मिळवावी लागते. सर्व सामान्य वाचकापेक्षा संशोधकाचे वाचन हे हेतूनिष्ठ असते. प्राथमिक वाचन, सूक्ष्मवाचन व टिपणे घेणे या स्वरूपात हे वाचन करावे लागते. त्याव्दारे मिळालेल्या माहितीच्या आधारे संशोधनाचे कार्य योग्य दिशेने नेता येते.

**२.१ संदर्भ साहित्याचा आढावा घेण्याची गरज :—**

''संशोधनात आपल्या अध्ययनविषयाची उपयोगिता कोणती? आपण निवडलेल्या विषयावर यापूर्वी अभ्यास झाला असल्यास तो पर्याप्त नाही किंवा एखादया विशिष्ट दृष्टीकोनातून, विशिष्ट कारणांमुळे त्याचा अधिक अभ्यास करणे गरजेचे आहे हे संशोधकाला आधार सांगता आले पाहिजे. त्यासाठी त्याने संबंधित संदर्भ साहित्याचे पुरेसे वाचन केले पाहिजे. मानवाचे भावनाविश्व समृध्द करणे हे साहित्याचे महत्वाचे कार्य आहे. ते लेखकाच्या व्यक्तिगत अनुभवातून साकार होत असते. त्यात वैचारिकतेचा, भावना संस्काराचा किंवा कलात्मक जाणीव अथवा समाज मार्गदर्शनाचा भाग असू शकतो. साहित्याचा अशा विविध पैलूपैकी आपण कोणत्या पैलूंवर संशोधनात भर देणार आहोत हे स्पष्ट करावे लागते.''

ज्या पैलूवर संशोधन कार्य केले जाणार आहे त्या संदर्भातील प्रस्तुत प्रमेयांची तर्क संगतता तपासून आधारतत्वांचे स्पष्टीकरण

करणे ही संशोधकाची जबाबदारी असते. त्यादृष्टीने पूर्वी झालेल्या संशोधनाचा अभ्यास करताना समावेशकता परिपूर्णता, नेमकेपणा, समर्पकता आणि झालेल्या संशोधनाचे सुयोग्य विश्लेषण यावर संशोधकाला प्रामुख्याने लक्ष केंद्रित करावे लागते. ''शिक्षणात झालेल्या संशोधनांचे मूळ अहवाल या प्रकारच्या संशोधनातील प्राथमिक स्त्रोत होत. मिमांसा प्रक्रियेत मूळ संशोधन कार्याची निष्ठा, पात्रता, अचूकता इत्यादी बाबींची तपासणी केली जाते व संबंधित संशोधनाची तत्सम, अन्य संशोधन कार्याशी तुलना केली जाते. माहितीचे संयोजन व अर्थ निर्वचन या करिता विशेष कौशल्य व अंतर्दृष्टी लागते.

**२.२ संदर्भ साहित्याचा आढावा घेण्याचे महत्व :—**

मुळे व उमाठे (१९८९) यांच्या मते, संशोधनापूर्वी झालेल्या संशोधनाचा योग्य पध्दतीने अभ्यास केला तर संशोधकाला दुसऱ्या संशोधकाने समस्या कशी हाताळलेली आहे हे समजते. समस्या कशी सोडवावी? कोणत्या पध्दतीचा वापर करावा याची माहिती मिळते नवीन आधारसामग्री उपलब्ध होते. संशोधकास पूर्वी ज्ञात नसलेल्या संकल्पना, प्रणालीचे ज्ञान होते संख्या शास्त्रीय आध ाराची माहिती मिळते. संशोधकास स्वत:च्या संशोधन प्रयत्नाचे मूल्यमापन करणे व इतरांच्या कार्याशी त्याची तुलना करता येते. संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा घेतल्याने संशोधनाची पुनरावृत्ती टाळली जाते. आधारसामुग्री व निष्कर्ष या विषयी तुलनात्मक माहिती मिळते व समर्पक सांख्यिकी तंत्रे व त्याचा उपयोग अर्थनिर्वचनासाठी होतो. संदर्भ साहित्याचा अभ्यास करून स्व:ताची ज्ञानमिमांसा वाढवली जाते.''आवश्यक ती सर्व संशोधन सामुग्री संकलित करून महत्वपूर्ण मुद्‌दे डोळयासमोर आले, उलट सुलट मतांचा विचार झाला मार्गदर्शकांशी साधक बाधक चर्चा झाली व त्यातून महत्वाच्या निष्कर्षा पर्यंत येऊ लागले की अहवाल लेखनास सुरूवात केली जाते.''

यावरून अहवाल लेखन हा संशोधन प्रक्रियेतील अंतिम

टप्पा मानला तर संदर्भ साहित्याचा आढावा हा प्रारंभ ठरतो. त्या दृष्टीने संशोधन कार्याचा प्रारंभ काळजीपूर्वक व अभ्यासपूर्ण घडणे महत्वाचे असते.

## २.३ संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यासाठी भेट दिलेली स्थळे व ग्रंथालये

मुळे व उमाठे (१९८९) यांच्या मते, ग्रंथालयात विविध प्रकारचे साहित्य उपलब्ध असते. निवडलेल्या विषयासंबंधी उपयुक्त माहिती मिळविण्याकरीता ग्रंथालयाचा उपयोग कसा करावा हे माहित असणे आवश्यक आहे. संशोधनासाठी विषयाचे क्षेत्र निवडल्यानंतर संदर्भ साहित्याचा अभ्यास केल्याने समस्येची निवड, व्याख्या, संशोधन पद्धती, माहिती संकलन, विश्लेषण इ. विषयी स्पष्ट कल्पना येते. संशोधकाने खालील ग्रंथालयांचा वापर करून संशोधन विषयास उपयुक्त माहिती प्राप्त केली आहे.

१. शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे — ७
२. शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
३. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे —७
४. आझाद शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सातारा
५. छ.शिवाजी महाविदयालय, सातारा
६. एस.जी.एम. कॉलेज, कराड.
७. एस.एस.बी. शिक्षणशास्त्र महाविदयालय, श्रीरामपूर.
८. रा. ब.ना.बोरावकेमहाविदयालय, श्रीरामपूर.

## २.४ शिक्षणशास्त्र व संशोधन विषयातील अभ्यासलेली पुस्तके

प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेण्यापूर्वी संशोधकाने शिक्षणशास्त्र व संशोधन विषयाशी संबंधित पुस्तके अभ्यासली. तसेच प्रस्तुत संशोधनातील उद्‌दिष्टांच्या पूर्ततेसाठी संशोधकाने शैक्षणिक तत्त्वज्ञान, शै. समाजशास्त्र, शै. मानसशास्त्रव मूल्येयांच्याशी संबंधित पुस्तके अभ्यासली त्याचा तपशील पुढीलप्रमाणे

### २.४.१ शिक्षणशास्त्र व संशोधन विषयाशी संबंधित अभ्यासलेली पुस्तके

तक्ता क्र २.१

| अ.नं | पुस्तकाचे नाव | लेखक | प्रकाशन संस्था | प्रकाशन वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | शिक्षणातील संशोधन | बन्सीबिहारी पंडित | नूतन प्रकाशन पुणे | १९९७ |
| २. | संशोधनाची मूलतत्वे | मुळे रा.श./उमाठे वि.तु. | विदया बुक्स औरंगाबाद | १९९८ |
| ३. | शास्त्रीय संशोधन पद्धती | डॉ.कऱ्हाडे बी.एम. | पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर | २००८ |
| ४. | संशोधन पद्धतीशास्त्र | डॉ.रा.रा.बोरूडे | पुणे विदयार्थी गृह प्रकाशन पुणे | २००५ |
| ५. | शैक्षणिक संशोधन पद्धती | वि.रा.भिंताडे | वि.रा.भिंताडे | १९९९ |
| ६ | शैक्षणिक तत्त्वज्ञानवशै. समाजशास्त्र | मच्छाच्छुंडले | नूतन प्रकाशन पुणे | १९८० |
| ७ | शैक्षणिक तत्त्वज्ञान | डॉ.अरविंद दुनाखे | विदया बुक्स औरंगाबाद | १९९० |
| ८ | शै. मानसशास्त्र | वाघ्माध्दांडेकर | नूतन प्रकाशन पुणे | १९९२ |
| ९ | Research in Education | Chandra S. S., Sharma R. K. | Altantic Publication New Delhi | १९९७ |
| १० | Research Methodology Methods& Techniques | Kothari, C. R | Wishwa Publication. | १९९७ |
| ११ | Qualitative Research | Patton, M. Q. | Sage Publication. | २००१ |
| १२ | Educational Research | Chaxles, C. M., Mextiex, C. A. | Custom Publication | २००२ |
| १३ | Research in Education | Best, J. W., Khan. J. V. | Pearson Education New Delhi | २००६ |

## २.५ नियतकालिके व वृत्तपत्रे :–

## २.६ पूर्व संशोधनांचा आढावा

संशोधकाच्या संशोधन विषयांशी तंतोतंत मिळतेजुळते संशोधन एम्.फिल्. स्तरावर झालेले नाही. व्यक्तिअभ्यास किंवा एखादया लेखकाचे वाङ्मयीन योगदान हे विषय व्यापक असल्याने एम्.फिल्. स्तरावर असे संशोधन केले गेलेले नाही. पीएच्.डी. स्तरावर जी पूर्वसंशोधने संशोधनाशी विषय, उद्दिष्टे आणि कार्यपध्दती या संदर्भात साधर्म्य दर्शवणारी होती त्या निवडक संशोधनांचा संदर्भ व आधार येथे घेतलेला आहे.

त्याचबरोबर प्रस्तुत व संबंधितसंशोधन कार्यातील साम्य व

भेद, संदर्भ साहित्याचा प्रस्तुत संशोधनासाठी झालेला उपयोग, वेगळेपण या मुद्दयांचे सविस्तर विवेचन केले आहे. या सर्व कार्यासाठी अभ्यासलेल्या एकूण पी.एच्.डी. प्रबंधांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

## अभ्यास केलेले पी.एच्.डी. प्रबंध

### तक्ता क्र २.२

| अ.न | संशोधकाचे नांव | संशोधन विषय | विदयापीठाचे नांव | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभुणे, रामचंद्र गोविंद | साने गुरूजीच्या वाड्:मयाचा शैक्षणिक दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास | शिवाजी विदयापीठ | १९९० |
| २ | गोगटे, वामन वासुदेव | समर्थ रामदासांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा चिकित्सक अभ्यास | शिवाजी विदयापीठ | १९९१ |
| ३ | गागरे,शं.बा. | पांडूरंग शास्त्री आठवले यांच्या शैक्षणिक विचारांचा समाजावर झालेल्या प्रभावांचा अभ्यास | पुणे विदयापीठ | २००० |
| ४ | राईरीकर, अर्पणा देवीदास | गोविंद उर्फ आण्णासाहेब विजापूरकर यांचे शैक्षणिक कार्य व शैक्षणिक विचार यांचा चिकित्सक अभ्यास | पुणे विदयापीठ | २००३ |
| ५ | आबणे, रामदास दशरथ | लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील शिक्षण विचारांचा चिकित्सक विचार | पुणे विदयापीठ | २००४ |
| ६ | पंडितराव, वसुदा वासुदेव | संत कबीराच्या दोहयातून प्रतिबिंबीत होणाऱ्या मुल्यधिष्ठित अनौपचारिक शिक्षणाचा अभ्यास | पुणे विदयापीठ | २००५ |
| ७ | मगर, दादासाहेब पांडूरंग | संत तुकारामांच्या अभंगातील अनौपचारिक मूल्यशिक्षणाचा अभ्यास | पुणे विदयापीठ | २००५ |
| ८ | पवार चंदन विकास | महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक विचार व योगदान आणि आजच्या शिक्षणासाठी त्यांची उपयुक्तता तपासणे. | पुणे विदयापीठ | २०१० |
| ९ | कांबळे गीता | शांताबाई दाणी यांच्या कार्याचा अभ्यास करणे. | पुणे विदयापीठ | २०११ |
| १० | चव्हाण राजेंद्र | प्रवीण दवणे यांच्या वाड्.मयाचे शैक्षणिक योगदान, | पुणे विदयापीठ | २०१२ |
| ११ | श्रीमती वाजे विद्या पांडुरंग | ‘‘प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था अभ्यास’’ | पुणे विदयापीठ | २०१२ |
| १२ | सौ. सुनंदा शाम पालकर | ‘‘एकल विद्यालय’’ अनौपचारिक शिक्षणाची विशेष शाळा — एक अभ्यास | पुणे विदयापीठ | २०११ |
| १३ | श्री अविनाश हरिश्चंद्र वाळुंज | महात्मा फुले शिक्षण हमी योजना | पुणे विदयापीठ | २०१५ |

## २.७ प्रस्तुत व संबंधित संशोधन कार्यातील साम्य व भेद

### २.७.१ पी.एच्.डी.

१. प्रभुणे, रामकृष्ण गोविंद : साने गुरूजींच्या वाङ्‌मयाचा शैक्षणिक दृष्टीकोनातून चिकित्सक अभ्यास.

**साम्य :** प्रस्तुत व संबंधित संशोधनामध्ये संशोधकाने ऐतिहासिक, वर्णनात्मक, सर्वेक्षणात्मक संशोधन पध्दती आणि व्यक्ति—अभ्यास पध्दतीचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत व संबंधित संशोधनामध्ये संशोधकाने शैक्षणिक मानसशास्त्र, शैक्षणिक समाजशास्त्र व शैक्षणिक तत्वज्ञान या दृष्टीने संदर्भीय लेखकाच्या साहित्यकृतींचा अभ्यास केला आहे. तसेच लेखकाच्या वाङ्‌मयीन अविष्काराचा ही अभ्यास केला आहे. प्रस्तुत व संबंधित संशोधनामध्ये संशोधकाने संशोध नाची साधने म्हणून संदर्भीय लेखकाच्या वाङ्‌मयाचा आधार घेतला आहे. अंतिम निष्कर्षासाठी कोणतेही संख्याशास्त्रीय साधन वापरले नाही. प्रस्तुत व संबंधितसंशोधनामध्ये प्रमुख उद्दिष्ट मूल्यशिक्षणाची आवश्यकता व कार्यवाही हे आहे.

**भेद :** संबंधित संशोधनामध्ये नमुना पाहणीचा आधार घेतला आहे. तसेच तज्ञ अभ्यासकांची मतावली देखील संशोधनाचे साधन म्हणून वापरली आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने नमुना पाहणी, तज्ञ अभ्यासकांची मतावली याऐवजी तज्ञ अभ्यासकांचा मुलाखतीव्दारे संशोधन विषयाबाबतचे अभिप्राय गोळा केले आहेत. संबंधित संशोधनामध्ये संशोधकाने साने गुरूजींचे जे शैक्षणिक विचार चिंतन प्रकट केले आहे ते सदयस्थितीत अपुरे वाटतात. कारण साने गुरूजींच्या कालखंडातील समाजजीवन, शिक्षणव्यवस्था, विद्यार्थीदशा या संकल्पना वेगळया स्वरूपात होत्या. साने गुरूजींनी शिक्षण आदर्श कसे असावे याबद्दलचा विचार मांडला होता. प्रस्तुत संशोधनातून संशोधकाने बदलत्या परिस्थितीत उदा.जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, विभक्त कुटुंबपध्दती, संगणकीकरण इ. शिक्षणाच्या दुरावस्थेला व शैक्षणिक समस्यांना स्पर्श करतानाच

त्यांची भविष्यकालीन उत्तरे ॲड्. शिंदेयांच्या साहित्यातून शोधली आहेत. म्हणजेच साने गुरूजींच्या विचारानंतरचा अथवा तोच विचार पुढे नेणारा विचारप्रवाह या भूमिकेतून प्रस्तुत संशोधन विषयतील संशोधनकार्य संशोधकाने हाती घेतले.

**२.गोगटे, रमन वासूदेव :** समर्थ रामदासांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा चिकित्सक अभ्यास.

साम्य : प्रस्तुत व संबंधित संशोधनामध्ये ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. प्रस्तुत व संबधित संशोधनाची ,साहित्यातून व्यक्त झालेल्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे वशैक्षणिक विचारांच्या सदयस्थितीतील उपयुक्ततेचे मूल्यमापन करणे हे दोन्ही उद्‌दिष्टे समान आहेत. तसेच या दोन्ही ही संशोधनकार्यासाठी वापरलेलीसंशोधनाची साधने,ग्रंथसंपदा, तज्ञ अभ्यासकांच्या मुलाखती एकसारखेच आहेत. प्रस्तुत व संबंधीत कार्यात अंतिम निष्कर्षासाठी कोणतेही संख्याशास्त्रीय साधन वापरलेले नाही.

**भेद** : संबंधीत संशोधनामध्ये संशोधकाने प्रामुख्याने शैक्षणिक तत्वज्ञानाच्या दृष्टीकोनातून संदर्भीय साहित्यकृतीचा अभ्यास केलेला आहे. मात्र प्रस्तुत संशोधनात संशोधकाने शैक्षणिक तत्वज्ञानाबरोबरच शैक्षणिक मानसशास्त्र, शैक्षणिक समाजशास्त्र, साहित्यातून प्रगट होणारे वाङ्‌मयीन सौंदर्य ही टिपण्याचा प्रयत्न केला आहे. रामदासांच्या कालखंडाचा विचार केला तर सुमारे तीनशे वर्षापूर्वीच्या तत्कालीन वातावरणाच्या दृष्टीकोनातून ‘आदर्शवाद’ सांगीतलेला त्यांच्या वाङ्‌मयातून जाणवतो व त्यावरच संबंधित संशोधकाने लक्ष केंद्रित करून आज समस्या बनलेल्या जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, संगणकीकरण इत्यादींचा अभ्यास केला आहे.

**३. गागरे, शं.बा.** : पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या शैक्षणिक विचारांचा समाजावर झालेल्या प्रभावांचा अभ्यास.

साम्य : प्रस्तुत व संबंधित संशोधनाची खालील उद्‌दिष्टे एकसारखी आहेत.

१. व्यक्तिंचे जीवनविषयक आणि शिक्षणविषयक विचारांचा अभ्यास

करणे.

२. शिक्षण विषयक प्रयोगांचा अभ्यासक्रम, प्रवेशपध्दती, शिक्षक, परीक्षा, अभ्यासक्रम कालावधी खर्च यांचा अभ्यास करणे.

३. व्यक्तिजीवनातील परिवर्तनाचा अभ्यास करणे ही बहुतांशी समान आहेत.

प्रस्तुत व संबंधित संशोधनात संशोधनाच्या साधनापैकी 'मुलाखती' हे साधन वापरले गेलेले आहे.

भेद : संबंधित संशोधनात परिकल्पना मांडून सर्वेक्षण पध्दत वापरली आहे. तर प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक वाङ्:मय विश्लेषण पध्दती आणि व्यक्तिअभ्यास या पध्दती वापरल्या आहेत. संबंधित संशोधनात १. प्रश्नावली २. मतावली मनोमापनवृत्ती ३. नोंदी ही साधने वापरलेली आहेत. ती संशोधनाची साधने प्रस्तुत संशोधनात वापरलेली नाहीत. संशोधनात जमा झालेल्या माहितीचे विश्लेषण करून अर्थ निर्वचनासाठी १. शेकडेवारी २. मध्यमान ३. मध्यगा ४. 'ज' परीक्षिका ही संख्याशास्त्रीय परिणामे वापरली आहे. प्रस्तुत संशोधनात निष्कर्ष काढण्यासाठी कोणतेही संख्याशास्त्रीय परिमाण संशोधकाने वापरलेले नाही.

४. अपर्णा देवीदास राईरीकर : कै.गुरूवर्य विष्णू गोविंद उर्फ अण्णासाहेब विजापूरकर यांचा चिकित्सक अभ्यास.

साम्य : प्रस्तुत व संबंधित संशोधनाच्या खालील उद्दिष्टांमध्ये एकसमानता आहे.

१. संशोधनकार्यासाठी निवडलेल्या व्यक्तिरेखेच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे.

२. शिक्षणतज्ञ म्हणून त्या व्यक्तिच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.

३. शिक्षणतज्ञ म्हणून त्या व्यक्तिच्या शैक्षणिक समाजशास्त्र विषयक विचारांचा अभ्यास करणे.

४. शिक्षणतज्ञ म्हणून त्या व्यक्तिच्या शैक्षणिक मानसशास्त्र विषयक विचारांचा अभ्यास करणे.

प्रस्तुत व संबंधित संशोधन कार्यात ऐतिहासिक संशोधन पध्दती वापरण्यात आली आहे. तसेच संशोधनकार्य पध्दती आणि संशोधान साधने ग्रंथ अभ्यास, मुलाखती यांचा दोन्हीकडे समान पध्दतीने वापर केलेला आहे. तसेच या दोन्हीही संशोधन कार्यात कोणते ही संख्याशास्त्रीय परिमाण वापरलेले नाही.

भेद : संबंधित संशोधकार्यात संशोधकाने परिकल्पना मांडली आहे तथापि तिची तपासणी केली नाही म्हणजेच पडताळा घेतलेला नाही. प्रस्तुत संशोधनकार्यात परिकल्पनेचा अभाव आहे. तसेच संबंधित संशोधन कार्यातील उद्दिष्टांनुसार

**१. व्यक्तिरेखेचे शैक्षणिक कार्य**

२. व्यक्तिरेखेचे शिक्षणसंस्था चालक, प्रकाशक या नात्याने घडलेले कार्य यांचा अभ्यास केलेला आहे तर प्रस्तुत संशोधकार्यात संशोधकाने ॲड्. शिंदेयांच्या वाङ्:मयातून प्रकटणारे शैक्षणिक योगदान अभ्यासले आहे.

५ लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्यातील शिक्षण विचारांचा चिकित्सक अभ्यास.

साम्य : प्रस्तुत व संबंधित संशोधन कार्यात पुढील उद्दिष्टांसंदर्भात एकसमानता आहे.

१. संशोधन कार्यासाठी निवडलेल्या व्यक्तिरेखेच्या साहित्यातील शिक्षण विषयक तत्वज्ञानाचा चिकित्सक अभ्यास.

२. मूल्यशिक्षणाच्या संदर्भात त्या व्यक्तिरेखेच्या साहित्याचा अभ्यास करणे.

प्रस्तुत व संबंधित संशोधनकार्यात संशोधन साधने म्हणून संबंधित व्यक्तिरेखेच्या उपलब्ध वाङ्:मय संपदेचा प्राथमिक स्त्रोत म्हणून वापर केला आहे व उपलब्ध असणारी संबंधित लेखकांच्या पुस्तकातील आशयाचा संशोधन कार्यात उपयोग करून कोणतेही संख्याशास्त्रीय परिमाण न वापरता गुणात्मक दृष्टीने विचार करून अंतिम निष्कर्ष काढलेले आहेत.

भेद : संबंधित संशोधनातील पुढील उद्दिष्टे प्रस्तुत

संशोधन कार्यापेक्षा वेगळी आहेत. ती म्हणजे

१. गाभा घटकांच्या संदर्भात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा अभ्यास.

२. पर्यावरण शिक्षणाच्या संदर्भात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा अभ्यास.

मात्र प्रस्तुत संशोधन कार्यात संशोधकाने शैक्षणिक तत्वज्ञान, शैक्षणिक समाजशास्त्राबरोबरच शैक्षणिक मानसशास्त्राचा दृष्टीने ही ॲड्. शिंदेयांचे वाङ्:मय अभ्यासले आहे.

६. पंडीतराव, वसुधा वासुदेव : संत कबिरांच्या दोहयातून प्रतिबिंबीत होणाऱ्या मुल्याधिष्ठित अनौपचारिक शिक्षणाचा अभ्यास.

साम्य : प्रस्तुत व संबंधित संशोधनामध्ये संशोधकाने वर्णनात्मक कार्यपध्तीचा वापर केला आहे. प्रस्तुत व संबंधित संशोधनामध्ये संशोधकाने संशोधनाची साधने म्हणून संशोधन विषयाशी संबंधित उपलब्ध प्रकाशित पुस्तके वापरली असून त्याव्दारे संदर्भीय लेखकांच्या वाङ्:मयाचा राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ च्या निध ारित गाभाघटकानुसार मूल्यशिक्षणाच्या अनुषंगाने अभ्यास केला आहे. प्रस्तुत व संबंधित संशोधनामध्ये उपलब्ध पुस्तकांमधील आशयातून गाभाघटकांचे असणारे प्रमाण शोधण्याचा प्रयत्न केला आहे. या शोधकार्यातून आजच्या शिक्षण प्रणालीला आवश्यक असणारे मूल्यशिक्षण विषयक संदर्भ प्राप्त झालेले आहेत.

भेद : संबंधित संशोधनामध्ये संशोधनकार्यात संत कबीरांच्या प्राप्त दोहयांचे पदयरचना मूल्यांप्रमाणे व गाभा घटकाप्रमाणे सांख्यिकी विश्लेषण केले. त्याकरिता संख्याशास्त्रीय साधन म्हणून शेकडेवारी हे परिमाण वापरले आहे. मात्र प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने ॲड्. शिंदेयांच्या गदय—पदय वाङ्:मयांचा मूल्यशिक्षणाचा दृष्टीकोनातून अभ्यास केला असला तरी सांख्यिकी विश्लेषण केले नाही व कोणते ही संख्याशास्त्रीय परिमाणवापरले नाही. प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने शैक्षणिक तत्वज्ञान, शैक्षणिक

मानसशास्त्र, शैक्षणिक समाजशास्त्र या क्षेत्रांच्या अनुषंगाने विद्यार्थी समस्यांचा शोध घेताना औपचारिक शिक्षण प्रणालीचा प्रामुख्याने विचार केलेला आहे तथापि संबंधित संशोधनकार्याचे शीर्षक अनौपचारिक शिक्षणातील 'मूल्यशिक्षणास' प्राधान्य दर्शविते.

७. मगर दादासाहेब पांडुरंग : संत तुकारामांच्या अभंगातील अनौपचारिक मूल्यशिक्षणाचा अभ्यास.

साम्य : प्रस्तुत व संबंधित संशोधनामध्ये संशोधकाने सर्वेक्षण व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. संबंधित संशोधनामध्ये संशोधकाने ज्या प्रमाणे संत तुकारामांच्या अभंगाचा पदकाव्यरचनेचा मूल्यशिक्षणाच्या दृष्टीने अभ्यास केलेला आहे. त्याचप्रमाणे प्रस्तुत संशोधन कार्यात ही संशोधकाने ॲड्. शिंदेयांच्या साहित्यातून जाणवणारे मूल्यशिक्षण अभ्यासले आहे. प्रस्तुत व संबधित संशोधन कार्यात तज्ञ अभ्यासकांच्या मुलाखतींचा समावेश आहे. प्रस्तुत व संबधित संशोधन कार्यात संशोधकाने अंतिम निष्कर्षासाठी कोणते ही संख्याशास्त्रीय साधन वापरलेले नाही.

भेद : संबंधित संशोधनामध्ये संशोधकने संत तुकारामांच्या अभंग वाङ्‌मयाचा अभ्यास करताना अनौपचारिक शिक्षणांच्या बाबतचे मूल्यशिक्षण हा मर्यादित स्विकारला होता व प्रामुख्याने संत तुकारामांच्या अभंगातील धार्मिक व अध्यात्मिक मूल्यांचा शोधा व विश्लेषण करण्याचे कार्य केले आहे. मात्र प्रस्तुत संशोधन कार्यात संशोधकाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात १९८६ नमुद असलेली व एन.सी.ई.आर.टी.ने निर्देश केलेली 'मूल्ये आणि त्यांचे शिक्षण हा व्यापक दृष्टीकोन स्विकारला व ॲड्. शिंदेयांच्या वाङ्‌मयातील मूल्यशिक्षणाबरोबरच त्याच्या अभावाने निर्माण झालेल्या शैक्षणिक समस्यांचे विश्लेषण केले आहे. प्रस्तुत संशोधन कार्याशी निगडीत असलेले साहित्यिक ॲड्. शिंदे हे हयात असतांना त्यांची घेतलेली प्रत्यक्ष मुलाखत हे संशोधन साधन विषयक वेगळेपण आहे.

८. कांबळे गीता : शांताबाई दाणी यांच्या कार्याचा अभ्यास करणे.

साम्य : प्रस्तुत व संबंधित संशोधनामध्ये संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दती अंतर्गत व्यक्ती अभ्यास पध्दतीचा वापर केला आहे. दोन्हीही संशोधनात संशोधन साधने प्रश्नावली व मुलाखत सूचीचा उपयोग केला आहे. प्रस्तुत संशोधनात ॲड्. शिंदेतर संबंधित संशोधनात शांताबाई दाणी यांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास करून संबंधिताचे शैक्षणिक योगदान व सद्यस्थितीतील महत्व शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

भेद : प्रस्तुत संशोधनात संकलित माहितीच्या विश्लेषणासाठी संशोधकाने कोणतेही संख्याशास्त्रीय परिमाण वापरलेले नाही. संबंधित संशोधनात संख्यात्मक माहिती विश्लेषणासाठी शेकडेवारी या संख्याशास्त्रीय परिणामाचा वापर केल आहे. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने केवळ पाचच साहित्य तज्ञांच्या मुलाखती घेतल्या आहेत. संबंधित संशोधनामध्ये संशोधकाने बहुसंख्य प्रतिसादकांच्या मुलाखतींचा समावेश केलेला आहे.

९.पवार चंदन किसन महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक विचार व योगदान आणि आजच्या शिक्षणासाठी त्याची उपयुक्तता तपासणे.

साम्य : प्रस्तुत संशोधनामधी व संबंधित संशोधनातील सर्वच उद्दिष्टे ही मिळती जुळती आहेत. या दोन्हीही संशोधनांमध्ये अनुक्रमे ॲड्. शिंदेव फुले दांपत्य यांच्या शैक्षणिक विचार, कार्याची उपयुक्तता ही शैक्षणिक तत्वज्ञानाच्या मुद्दयानुसार अभ्यासली आहे. संशोधन कार्यपध्दती, संशोधन साधने याबाबतही प्रस्तुत व संबंधित संशोधनात समानता आहे.

भेद : संबंधित संशोधनात फुले दांपत्याच्या शैक्षणिक विचार कार्याचा केवळ शैक्षणिक तत्वज्ञानाच्या दृष्टीने अभ्यास केलेला आहे तर प्रस्तुत संशोधनाचा ॲड्. शिंदेयांच्या शैक्षणिक योगदानाच्या निश्चितीसाठी शैक्षणिक तत्वज्ञानाबरोबरच शैक्षणिक समाजशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र यातील घटकांचा, मूल्यशिक्षणयांचा अभ्यास

करण्यात आलेला आहे.

१०. चव्हाण राजेंद्र : प्रवीण दवणेयांच्या वाङ्.मयाचे शैक्षणिक योगदान

साम्य : प्रस्तुत संशोधनातील व संशोधकाच्या संशोधनातील उद्दिष्टे मिळतीजुळती आहेत. शै.

तत्त्वज्ञान, शै. मानसशास्त्र, शै. समाजशास्त्र व मूल्ये यांच्या शोधातील व वाङ्.मय विश्लेषणातील

पद्धतीत साधर्म्य आहे. दोन्ही संशोधनात व्यक्ती अभ्यासपद्धती अंतर्गत दस्तऐवज विश्लेषण पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. संशोधन कार्यपद्धती संशोधन साधने याबाबत प्रस्तुत व संबंधित संशोधनात समानता आहे.

भेद : संबंधित संशोधनात लेखक प्रवीण दवणे यांच्या वाङ्.मयातील विचारांचे शैक्षणिक

योगदानाच्या दृष्टिने अभ्यास केलेला आहे. तर प्रस्तुत संशोधनात ॲड्. रावसाहेब शिंदे यांच्या

साहित्याचा शैक्षणिक व सामाजिक विचार या दृष्टिकोनातून अभ्यास केलेला आहे.

**२.८ संबंधित साहित्य व संशोधनाचा प्रस्तुत संशोधनासाठी झालेला उपयोग :—**

संबंधित साहित्याचा व संशोधनाचा अभ्यास केल्यामुळे संशोधकाला प्रस्तुत संशोधनाची समस्या निवडताना, त्या समस्येतील विविध घटक ठरवतांना, त्यावर किंवा त्या सदृश्य विषयांवर, समस्येवर कोणी यापूर्वी संशोधन केले आहे काय याविषयी मार्गदर्शन मिळाले. प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे, माहिती संकलनाची साधने व तंत्रे, संशोधन पद्धती ठरविण्यासाठी पूर्वी झालेल्या संशोधनांचा उपयोग झाला.

**तक्ता क्रमांक २.३**

**पूर्व संशोधनाच्या आढाव्याचा प्रस्तुत संशोधन कार्यात झालेला उपयोग**

| पूर्व संशोधनाचे शीर्षक | प्रस्तुत संशोधन कार्यात झालेला उपयोग |
|---|---|
| लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील शिक्षण विचारांचा अभ्यास | या पूर्व संशोधनाची उदिद्ष्टे क्रमांक १ व २ ही प्रस्तुत संशोधनाच्या उदिदष्ट क्रमांक १ अनुसार ॲड्. शिंदे यांच्या वाड्मयाचा अभ्यास करण्यासाठी व उदिदष्ट क्रमांक २ ॲड्. शिंदे यांच्या वाड्मयाचे विश्लेषण करून शैक्षणिक विचारांशी पध्दतशीर मांडणी करण्यासाठी उपयुक्त ठरली. |
| पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या शैक्षणिक विचारांचा समाजावर झालेल्या प्रभावांचा अभ्यास. | या पूर्व संशोधनाची उदिद्ष्टे क्रमांक १प्रस्तुत संशोधन कार्यात उदिदष्ट क्रमाक १ अनुसार ॲड्. शिंदे यांच्या वाड्मयाचा अभ्यास करण्यासाठी व निष्कर्ष काढण्यासाठी उपयुक्त ठरले. |
| समर्थ रामदासांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा चिकित्सक अभ्यास | या पूर्व संशोधनाचे निष्कर्ष प्रस्तुत संशोधनात उदिदष्टानुरूप निष्कर्ष काढण्यासाठी उपयुक्त ठरले. |
| साने गुरूजींच्या वाड्मयाचा शैक्षणिक दृष्टीकोनातून चिकित्सक अभ्यास. | या पूर्व संशोधनातील वाड्मय विश्लेषण या कार्यपध्दतीचा वापर प्रस्तुत संशोधन कार्यासाठी मार्गदर्शक ठरला. |
| संत कबीराच्या दोहयातून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्याधिष्ठित अनौपचारीक शिक्षणाचा अभ्यास. | या पूर्व संशोधनातील उदिदष्टे क्रमांक ४ च्या विश्लेषण व निष्कर्षाचा आधार घेवून प्रस्तुत संशोधन कार्यातील उदिदष्ट क्रमांक ३ अनुसार ॲड्. शिंदे यांच्या वाड्मयातील मूल्ये व आशय अभिव्यक्ती सौदर्याचा अभ्यास केला व निष्कर्ष काढले गेले. |
| संत तुकारामांच्या अभंगातील अनौपचारिक मूल्य शिक्षणाचा अभ्यास. | या पूर्व संशोधनातील संशोधन साधने व तंत्रे (पुस्तके व मुलाखती) यांचा ज्याप्रकारे वापर केला गेला आहे त्याच पध्दतीचा प्रस्तुत संशोधन कार्यात संशोधकाने केलेला वापर उपयोगी ठरला. |
| गोविंद उर्फ आण्णासाहेब विजापूरकर यांचे शैक्षणिक कार्य व शैक्षणिक विचार यांचा चिकित्सक अभ्यास. | या पूर्व संशोधनातील उदिदष्ट क्रमांक ३,४,५ ही उदिदष्टे प्रस्तुत संशोधन कार्यात (उदिदष्ट क्रमांक २) अनुसार ॲड्. शिंदे यांच्या वाड्मयाचे विश्लेषण व शैक्षणिक विचारांची मांडणी करण्यासाठी उपयुक्त ठरली. |
| शांताबाई दाणी यांच्या कार्याचा अभ्यास करणे. | या पूर्व संशोधनातील व्यक्ति अभ्यास पध्दती संशोधन कार्यात उपयुक्त ठरली. त्याचा आधार घेवून प्रस्तुत संशोधन कार्याचे (उदिदष्ट क्रमांक ५) ॲड्. शिंदे यांच्या शैक्षणिक योगदानाची उपयुक्तता अभ्यासली आहे. |
| महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक विचार व योगदान आणि आजच्या शिक्षणासाठी त्याची उपयुक्तता तपासणे. | या पूर्व संशोधनातील वाड्मय विश्लेषण पध्दती व मुलाखत तंत्राचा वापर प्रस्तुत संशोधन कार्यासाठी उपयोगी ठरला. |

| | |
|---|---|
| प्रवीण दवणेयांच्या वाङ्मयाचे शैक्षणिक योगदान | या पूर्व संशोधनातील उदिदष्ट क्रमांक ३,४,५ ही उदिदष्टे प्रस्तुत संशोधन कार्यात (उदिदष्ट क्रमांक २) अनुसार ॲड्. शिंदे यांच्या वाङ्मयाचे विश्लेषण व शैक्षणिक विचारांची मांडणी करण्यासाठी उपयुक्त ठरली. |
| ''एकल विद्यालय'' अनौपचारिक शिक्षणाची विशेष शाळा — एक अभ्यास, पुणे विद्यापीठ, जून २०११ | या पूर्व संशोधनातील वाङ्मय विश्लेषण पध्दती व मुलाखत तंत्राचा वापर प्रस्तुत संशोधन कार्यासाठी उपयोगी ठरला. |
| महात्मा फुले शिक्षण हमी योजना, पुणे विद्यापीठ, २०१५ | या संशोधनातील उदिदष्ट क्रमांक ३ हे प्रस्तुत संशोधन कार्यात (उदिदष्ट क्रमांक २) अनुसार ॲड्. शिंदे यांच्या वाङ्मयाचे विश्लेषण व शैक्षणिक विचारांची मांडणी करण्यासाठी उपयुक्त ठरले. |
| ''प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था अभ्यास'' पुणे विद्यापीठ, (२०१२) | या पूर्व संशोधनाचे निष्कर्ष प्रस्तुत संशोधनात उदिदष्टानुरूप निष्कर्ष काढण्यासाठी उपयुक्त ठरले. |

## २.९ प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण

उपलब्ध संबंधित साहित्याच्या माध्यमातून संशोधकाला आतापर्यंत ज्या महान विचारवंतांबद्दल संशोधन झाल्याचे दिसून आले त्यामध्ये पीएच. डी. स्तरावर झालेल्या संशोधनाचा आढावा घेतला आहे. या शैक्षणिक विचारवंतांमध्ये सानेगुरूजी, कर्मवीर भाऊराव पाटील, संत रामदास, पांडुरंगशास्त्री आठवले, महात्मा जोतिबा फुले, ॲड्. रावसाहेब शिंदे यांचा समावेश आहे.

ॲड्. शिंदे हे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत होते. भारतीय स्वातंत्र्यचळवळ, कम्युनिष्ठ चळवळ, यातील सहभाग, निष्णांत वकील व कायदेपंडीत म्हणून केलेले काम, रयत शिक्षण संस्थेतील योगदान, विविध संस्था, सोसायटया यांचे विश्वस्त व सल्लागार यातील वैविध्यपूर्ण कामामुळे ॲड्. शिंदे यांचे व्यक्तिमत्त्व सर्व बाजुंनी विकसित झालेले आहे. समाजामध्ये त्यांच्याविषयी आदराचे स्थान आहे. त्यांचा शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील

व्यासंग प्रचंड आहे. त्यांच्या विचारांवर शिक्षणशास्त्रीय दृष्टिकोनातून संशोधन झालेले नाही. ॲड्. शिंदे यांनी केलेले शिक्षणाचे काम, त्यातून आकाराला आलेले चिंतन सर्वांना मार्गदर्शक ठरेल या विचारातून संशोधकाने ॲड्. शिंदे यांच्या शैक्षणिक व सामाजिक विचारांचा अभ्यास केला आहे.

१. प्रस्तुत संशोधन कार्याशी निगडीत असलेले शिक्षणतज्ज्ञ ॲड. रावसाहेब शिंदे यांची घेतलेली प्रत्यक्ष मुलाखत हे संशोधन साधनविषयक वेगळेपण आहे.
२. प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक वाङ्‌मय विश्लेषण पद्धत आणि व्यक्तीअभ्यास या संशोधन पध्दती वापरल्या असून 'मूल्य शिक्षण'शी संबंधित आशय शोध घेतला आहे.
३. प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने शैक्षणिक तत्वज्ञान, शैक्षणिक समाजशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र या क्षेत्रांच्या अनुषंगाने शैक्षणिक समस्या व सामाजिक समस्या यांचा शोध घेताना औपचारिक शिक्षण, अनौपचारिक शिक्षण व सहज शिक्षणविषयक नव विचार प्रवाहांना या संशोधनात आवर्जून स्थान दिलेले आहे.
४. प्रस्तुत संशोधनातून संशोधकाने बदलत्या सदयस्थितीत शिक्षणाच्या दूरावस्थेला व शैक्षणिक समस्यांना स्पर्श करतानांच त्यांची भविष्यकालीन उत्तरे ॲड.रावसाहेब शिंदे यांच्या साहित्यातून शोधली आहेत.
५. प्रस्तुत संशोधन कार्यात अंतिम निष्कर्षासाठी कोणतेही संख्याशास्त्रीय परिमाण वापरलेले नाही अथवा संशोधन परिकल्पना मांडलेली नसल्याने तिचा स्विकार किंवा त्याग असा निष्कर्ष काढण्याचा प्रश्न येत नाही.

❑❑❑

# 03

# संशोधन पध्दती

## ३.० प्रास्ताविक

प्रस्तुत संशोधनातील प्रकरण २ मध्ये संशोधनाशी संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्यामुळे संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त होण्यास मदत झाली. या प्रकरणामध्ये संशोधन करताना उपयोगात आणलेली संशोधन पद्धती, माहिती संकलनाची साधने, माहिती विश्लेषणाची साधने याविषयी विस्तृत विवेचन केले आहे.

प्रस्तुतप्रकरणात या संशोधनासाठी लागणारी माहिती कोणाकडून कशी गोळा केली हे सांगितले आहे.या सर्वांची संशोधनाची दिशा निश्चित होण्यास मदत झाली.

## ३.१ संशोधन पध्दती

प्रवाह आकृती क्र ३.१



**व्यक्तीअभ्यास पध्दती**

प्रस्तुत संशोधनाचे विषय आणि त्यासाठी लागणाऱ्या सामुग्रीचे स्वरूप लक्षात घेऊन संशोधन कार्यात प्रामुख्याने वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील व्यक्ति अभ्यास पध्दती अंतर्गत दस्तऐवज पृथ:करणया संशोधन पध्दतीचा उपयोग केला आहे.

**३.१.१ वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा प्रस्तुत संशोधनात केलेला उपयोग : कारण मिमांसा**

आजच्या शिक्षण व्यवस्थेसमोर जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या स्वीकारामुळे निर्माण झालेल्या समस्यांचे आव्हान आहे. 'आजच्या शिक्षण प्रणालीत निर्माण झालेल्या समस्यांना उत्तरे शोधण्यासाठी शैक्षणिक विचारवंत, अभ्यासक्रम निर्मिती तज्ञ, शिक्षक या सर्वांना विविध शैक्षणिक समस्या मुळापासून जाणून घ्याव्या लागतील. शिक्षणातून चारित्र्य संवर्धनाची अपेक्षा पूर्ती होत नसल्याने चारित्र्यनिर्मितीच्या दृष्टीने प्रचलित शिक्षण पध्दतीला अपशय आले आहे. हे यापूर्वीच भारत सरकारच्या शैक्षणिक धोरणात (१९८६) मान्य केले आहे. 'समाजाचे विशिष्ट प्रश्न विविध घटकांची सामान्य प्रवृत्ती शिक्षणविषयक प्रक्रियेचे परिणाम, शैक्षणिक घटकातील प्रगती यासारख्या समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दती व्यतिरिक्त अन्य मार्ग नसतो. ॲड.रावसाहेब शिंदे यांच्या वाड्:मयातून अनेक शैक्षणिक समस्यांवर प्रकाश टाकला गेलेला आहे. त्यांचा परिपूर्ण व समग्रतेने विचार करता यावा यासाठी या संशोधन कार्यात वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील व्यक्तिअभ्यास पध्दती अंतर्गत वाड्:मय विश्लेषण या पध्दतीचा अवलंब केलेला आहे. त्याव्दारे ॲड.रावसाहेब शिंदे यांची घेतलेली प्रत्यक्ष मुलाखत हे संशोधन साधनविषयक वेगळेपण आहे. ॲड. शिंदेयांच्या निवडक १२ पुस्तकांचे वाड्मय विश्लेषण व ॲड.शिंदे यांच्या संदर्भातील वृत्तपत्रातील लेख, इंटरनेटवरील माहितीचे पृथ्थकरण केले आहे.

**३.२व्यक्ति अभ्यास पध्दती :—**

सामाजिक संशोधनाच्या ज्या विभिन्न पद्धती आहेत. त्यापैकीच

एक महत्त्वाची पद्धती म्हणजेच व्यक्ती अभ्यास पद्धती होय. साध ारणत: व्यक्ती अभ्यास पद्धतींना संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन विभागात विभाजित केले जाते. ज्या अध्ययनात संख्यात्मक तथ्ये प्रस्तुत करता येतात, त्या अध्ययनात सांख्यिकीय पद्धतीचा उपयोग केला जातो. परंतु तथ्ये संख्येत प्रस्तुत करता येत नाहीत त्यांचे गुणात्मक पद्धतीद्वारे अध्ययन केले जाते. व्यक्ती अभ्यास पद्धती ही गुणात्मक पद्धती आहे. सामाजिक संशोधनातील अध ययन एकक (Unit to study) म्हणून एखादी व्यक्ती, गट, सामाजिक संख्या किंवा एखादा समुह यांचे संपूर्ण अभ्यास करण्याच्या पद्धतीलाच 'व्यक्ती अभ्यास पद्धती' असे संबोधले जाते.

**३.२.१ व्यक्ति अभ्यास पध्दती व्याख्या :—**

१) पॉलिन यंत्र : व्यक्ती अभ्यास पद्धती कोणत्या तरी सामाजिक एककाचे मग मी एक व्यक्ती, कुटुंब, संस्था, सांस्कृतिक वर्ग किंवा जाती असो, त्यांच्या जीवनाचे संशोधन आणि विवेचन करण्याची एक पद्धत आहे.

२) अल्फ्रेड मार्शल :— काळजीपूर्वक निवडलेल्या कुटुंबाच्या घरगुती जीवनाच्या संपूर्ण पैलूचे हे सखोल अध्ययन आहे. आपल्या सर्वोत्तम रूपात ही सर्वश्रेष्ठ पद्धती आहे. परंतु ही अधिक विश्वसनिय व सामान्य निष्कर्ष सुचविण्याचे कार्य करते.

३) बिसेंज आणि व्हिसेंज :— यांच्या मते, व्यक्ती अध ययन गुणात्मक विश्लेषणाचे एक रूप आहे, ज्यामध्ये कोणतीही व्यक्ती, परिस्थिती किंवा संस्थेचे अत्यंत काळजीपूर्वक आणि संपूर्ण निरीक्षण केले जाते.

**३.२.२ व्यक्ती अभ्यास पद्धतीची वैशिष्टये :—**

१ एक किंवा अधिक सामाजिक एककांचा अभ्यास

२ समस्यांचा सुक्ष्म अभ्यास

३ एककाचे समग्र अध्ययन

४ व्यक्तिगत अध्ययन

५ ऐतिहासिक अध्ययन

६ गुणात्मक अध्ययन

७ मानवी व्यवहाराच्या कारणांचा शोध

**३.२.३ व्यक्ति अभ्यास पद्धतीच्या पाय—या :**

१ **संशोधन समस्येचे स्पष्टीकरण** (Explanation of Researeh Problem)

व्यक्ति अध्ययन पद्धतीनुसार अध्ययन करण्यासाठी सर्वप्रथम अध्ययन करण्यात येणा—या संशोधन समस्येच्या स्वरूपाचे स्पष्टीकरण करणे अतिशय महत्वाचे असते.सदर संशोधनात संशोधकाने ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या साहित्यातून, कार्यातून व्यक्त होणा—या शैक्षणिक व सामाजिक विचारांचा अभ्यास करणे ही समस्या निश्चित केलेली आहे. या समस्येच्या स्पष्टीकरणाकरिता पुढील गोष्टी लक्षात घ्याव्या लागतील.

**अ. व्यक्तिविषयाची निवड (Selection of Case)** सर्वप्रथम संशोधकाला हे निश्चित करावे लागते, की त्याला कोणकोणत्या सामाजिक एककाचे अध्ययन करायचे आहे. येथे संशोधकाने ॲड . रावसाहेब शिंदे हे एकक निश्चित केले आहे.

**ब. एककाच्या प्रकारचे निर्धारण (Determination of Types of Units)**शैक्षणिक व सामाजिक विचार तसेच शैक्षणिक व सामाजिक कार्य हे एकक संशोधकाने निर्धारित केलेले आहे.

**क. एककाच्या संख्येचे निर्धारण (Determination of the Number of Cases)**शैक्षणिक विचारातील नेमके कोणते शैक्षणिक विचार, सामाजिक विचारातील नेमके कोणते सामाजिक विचार हे संशोधकाने निश्चित केलेले आहेत.

**ड. विश्लेषण व्याप्ती (Scope of Analysis)**विचार व कार्याची सखोल माहिती मिळविण्यासाठी संशोधकाने विश्लेषणाच्या व्याप्तीच्या पैलूंचाविचार केलेला आहे.

२ घटनाच्या अनुक्रमाचे वर्णन **(Description of the Course of**

**Exents)**या पायरीमध्ये समस्येला काळाच्या संदर्भात समजून घेणे आवश्यक आहे. संशोधकाने साहित्य व कार्याच्या अभ्यासातून घटनांच्या अनुक्रमांचे वर्णन केले आहे.

**३ निर्धारक/प्रेरक घटक (Description)** बजवते घटनाचे कोणते निर्धारक किंवा तिला प्रेरित करणारे घटक आहेत. हे शोधावे लागते. संशोधकाने विचार व कार्यामागील प्रेरणा शोधल्या आहेत.

**४ विश्लेषण व निष्कर्ष(Analysis & Conclusion)**माहिती व तथ्यांचे गुणात्मक विश्लेषण करून सामान्य निष्कर्ष संशोधकानेकाढले आहेत.

**३.३.४व्यक्ती अभ्यास पद्धतीचे प्रकार :—**

**१. व्यक्तीचे व्यक्ती अभ्यास :—** या प्रकारात एखादया व्यक्तीचे अथवा त्याच्या जीवनातील घटनांचे अध्ययन केले जाते. एखादया व्यक्तीचे किंवा तिच्या जीवनातील विशिष्ट घटनांचे सर्वांगीण अध्ययन करणे ‘व्यक्तिनिष्ठ व्यक्ती अभ्यास’ होय. व्यक्तीचे व्यक्ती अध्ययन करताना ती व्यक्ती, त्यांच्या कुटुंबातील सदस्य, त्या व्यक्तीशी संबंधीत असलेल्या व्यक्ती, त्यांचे मित्र, त्या व्यक्तीचे स्वत:चे अनुभव व त्या व्यक्तीची माहिती असणाऱ्या अनेक लोकांकडून माहिती प्राप्त केली जावू शकते. हा अभ्यास संबंधित व्यक्तीची मुलाखत घेऊन केला जावू शकतो. तसेच त्याची वैयक्तिक पत्रे, लेख, दैनंदिनी आत्मकथा, चरित्र इ. लिखित साहित्यांचा उपयोग केला जातो व त्याद्वारे संबंधित व्यक्तीच्या सर्वांगाचा सर्वांगीण अभ्यास केला जातो. सदर संशोधनात ॲड्. रावसाहेब शिंदे यांनी मांडलेल्या शैक्षणिक व सामाजिक विचारांचा अभ्यास केलेला आहे.

२ समुदायाचे व्यक्ती अभ्यास

३ तौलनिक कार्यकारण

४ दस्तऐवज / आशय विश्लेषण

५ अनुधावन अभ्यास / पाठपुरावा अभ्यास

६ प्रवृत्ती अभ्यास

७ कृतीयुक्त विश्लेषण

व्यक्ति अभ्यासाचे वरील प्रकार आहेत. त्यापैकी प्रवृत्ती अभ्यास आणि दस्तऐवज विश्लेषण या दोन्ही प्रकारांचा संशोधनासाठी संशोधकाने अवलंब केला आहे.

**३.२.५व्यक्तिअभ्यास पध्दतीचा प्रस्तुत संशोधनात केलेला उपयोग : कारण मिमांसा**

''व्यक्तिअभ्यासात संबंधित असलेली व्यक्ती (Case)म्हणजे एक बालक स्त्री किंवा पुरूष असतो असे नाही त्यामध्ये एखादी घटना असू शकते. राष्ट्र, समाज, शाळा, गावसुध्दा असू शकेल. सामाजिक शास्त्रात व्यक्ती, कुंटुंब, परिसर, शाळा, समाज या सर्वांचा समावेश व्यक्ती (Case) या संज्ञेत होतो. पॉलिग यंग यांच्या मते, व्यष्टी अध्ययन पध्दती कोणत्या तरी सामाजिक एककाचे मग ती व्यक्ती कुंटुंब, संस्था, सांस्कृतिकवर्ग किंवा जाती असो त्यांच्या जीवनाचे संशोधन आणि त्याचे विवेचन करण्याची एक पध्दती आहे'' या पध्दतीच्या वापराव्दारे ॲड.रावसाहेब शिंदे यांचे साहित्य त्यातील विचार, साहित्यनिर्मितीवरील व्यक्तिमत्वाचा प्रभाव यांचा शोध घेऊन त्यांच्या शैक्षणिक योगदान निश्चितीचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी मुलाखत हे तंत्र वापरले आहे.

**३.३दस्तऐवज विश्लेषण पद्धती :—**

लिखित सामग्रीतून सूचना तथ्य संकलनासाठी या पद्धतीचा वापर केला जातो. या संशोधन पद्धतीचा उद्देश प्राप्त सामग्री दस्तऐवज, पुस्तके, वर्तमान पत्रे किंवा अन्यलिखित सामग्रीचे गुणात्मक विश्लेषण करणे हा असतो.

“Content Analysis is a research technique for the objective, systematic & quantitative descriptive of the manifest content of communication” (Ahuja 2001)

course in a systematic & quantitative fashion” (Ahuja 2001)

“Content or document analysis should serve a useful purpose in yielding information helpful in evaluating or explaining social or educational practices (Best 2006)

**३.३..१दस्तऐवज विश्लेषण पद्धतीचा इतिहास :—**

सामाजिक संशोधनात आशय विश्लेषणाच्या विकासाला पत्रकारांपासून प्रेरणा मिळाली आहे. १९२६ मध्ये सर्वप्रथम मेल्कोम विल्ली यांनी आशय विश्लेषणाचा उपयोग आपल्या वृत्तपत्राच्या अध्ययनाच्या माध्यमातून केला. त्यानंतर १९३० मध्ये वुडलॅड यांनी Foreign News in American Meaning News Papers या आपल्या अध्ययनात आशय विश्लेषणाचा उपयोग केला. त्यांनी अमेरिकेत दैनिकांमधून परराष्ट्रीय बातम्यांना किती जागा देण्यात येते याचे विश्लेषण केले. मनोविश्लेषण पद्धतीचा उपयोग करून घेतलेल्या अभिलिखित मुलाखतीच्या शास्त्रीय अध्ययनात हेशैल्ड लॉसवेल यांनी १९३७ मध्ये अशा विश्लेषणाचा उपयोग केला. त्यामुळे सामाजिक संशोधनातील एक मंत्र म्हणून आशय विश्लेषणास विशेष महत्त्व प्राप्त झाले. संगीत, शिक्षण, साहित्य, रेडिओ, कार्यक्रम, वृत्तपत्रे इत्यादींच्या अध्ययनात आशय विश्लेषणाचा उपयोग केला जातो. (आगलावे प्रदिप २०००, संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे, विद्यार प्रकाशन, नागपूर २०००)

**३.३.२ दस्तऐवज विश्लेषण पद्धतीचे वैशिष्टये :—**

१. आशयाचे विश्लेषण करणे हा हेतू महत्त्वाचा असतो. विश्लेषण गुणात्मक व संख्यात्मक असते.
२. विश्लेषण हे लिखित सर्व साहित्याचे केले जाते.
३. लिखित साहित्यातूनच व्यक्तीचे वर्णन, हेतू, विचार व कार्याबाबत अनुमान काढले जाते.
४. साहित्यामार्फत विचारांच्या वैशिष्टयाबाबत पद्धतशीरपणे वस्तुनिष्टपणे अनुमान काढले जाते.
५. विश्लेषण हे वस्तुनिष्ठ असून.वास्तविकतेवर लक्ष केंद्रीत केले जाते.
६. सामान्यीकरण मांडता येईल अशी सामान्य वर्णनात्मक माहिती असते. (कऱ्हाडे २००७)

प्रस्तुत संशोधनात अ‍ॅड्. रावसाहेब शिंदे यांचे शैक्षणिक व

सामाजिक विचार समजून घेण्यासाठी दस्तऐवज विश्लेषण पद्धतीचा वापर केलेला आहे.दस्तऐवज विश्लेषण पद्धतीचे पृथक्करण पद्धती असेही स्वरूप असते. या पृथक्करण पद्धतीबद्दल डॉ. दु.का. संत आपल्या 'संशोधन पद्धती, प्रक्रिया व अंतरंग' या ग्रंथात लिहितात की, 'विविध पद्धतींना पायाभूत असणारी, संशोधनात प्रमाणभूत मानली जाणारी, शास्त्रीयदृष्टीशी एकरूप झालेली पद्धती म्हणजे पुथक्करण पद्धती होय. संशोधनाचा पाया पृथक्करण होय. संशोधन म्हणजे हया पृथक्करण पद्धतीच्या अवलंबाचे मूर्त स्वरूप आहे. हे पृथक्करण विविध प्रकारचे असते. ते योजण्यात संशोधकाच्या विविध गुणांची कसोटी लागते. अवलोकन, चिकित्सकता, सावधानता, ऐतिहासिकता, वस्तुनिष्ठता इ. सर्व गुणांनी संस्कारीत झालेली पृथक्करणात्मक पद्धती हेच संशोधनाचे मूलाधार स्वरूपी हत्यार आहे. ते आत्मसात करून घेण्याचा व सदैव तयार ठेवण्याचा प्रयत्न करणे हे संशोधनातले भूज सूत्र होय. (संत, दु.का. १९८८, संशोधन पद्धती, प्रक्रिया व अंतरंग, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे — ३०, १९८८)

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे विचारात घेता प्रस्तुत संशोधन हे 'दस्तऐवज विश्लेषण' या प्रकारचे संशोधन आहे.या दस्तऐवज विश्लेषण पद्धतीचे वाङ्.मयीन आशय विश्लेषण पद्धती असे स्वरूप आहे. वाङ्.मयामध्ये विशिष्ट आशय असतो आणि वाङ्.मयाचे विश्लेषण म्हणजेच या वाङ्.मयीन आशयाचे विश्लेषण होय. म्हणून आशय विश्लेषण पद्धती ही वाङ्.मय विश्लेषण पद्धतीला लागू होते. या आशय विश्लेषण पद्धतीचा संशोधकाने एक तंत्र म्हणून अवलंब केला आहे.

**३.४ ॲड्. शिंदे यांचे शैक्षणिक विचार याविषयीचे निकष :—**

प्रस्तुत संशोधनासाठी लागणाऱ्या सामग्रीचे दोन प्रमुख स्त्रोत आहेत. पहिला आणि प्रमुख स्त्रोत म्हणजे ॲड्. शिंदे यांचे वाङ्.मय, दुसरा स्त्रोत म्हणजे ॲड्. शिंदे यांची प्रत्यख मुलाखत. ॲड्. शिंदे यांच्या साहित्याचा शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यास करावयाचा

म्हणजे नेमके काय करावयाचे किंवा केले पाहिजे ते जाणून घेण्यासाठी या संशोधनाचे मार्गदर्शक, शिक्षणतज्ज्ञ, समीक्षक ॲड्. शिंदे यांचे याबाबतीतील विचार किंवा मते अजमावली या सर्वांशी संशोधनाचे प्रत्यक्ष भेटून मुलाखत घेतली. ही मुलाखत मुक्त स्वरूपाची होती व यामध्ये विचारलेले प्रश्न पुढील स्वरूपाचे होते.

१. ॲड्. शिंदे यांचे शैक्षणिक विचार यांचा अभ्यास करताना नेमक्या कोणत्या गोष्टी लक्षात घ्यायला पाहिजेत असे आपल्याला वाटते?

२. प्रस्तुत संशोधनाच्या दृष्टिने उपयुक्त होईल अशी आणखी काही कोणती माहिती व सूचना आपणास कराव्याशा वाटतात?

सदर मुलाखतीसाठी संशोधकाने १४ व्यक्तींशी संपर्क साधला. त्यापैकी १० व्यक्तींनी वरील प्रश्नांना अनुसरून मुलाखत दिली ते प्रतिसादक पुढीलप्रमाणे —

**प्रतिसादाचा सारांश**

**तक्ता क्रमांक ३.१**

| प्रतिसादक | प्रतिसादाचा सारांश |
|---|---|
| १ | शैक्षणिक विचार म्हणजे शिक्षण, शिक्षणाची कार्ये, शिक्षणाची उद्‌दिष्टे, समाज, समाज परिवर्तन समाजीकरण इ. विषयीचे विचार |
| २ | ॲड्. शिंदे यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान, शिक्षक, विद्यार्थी, शिक्षणप्रक्रिया, व्यक्तिमत्त्वविकास, शैक्षणिक समाजशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र याविषयीचे विचार म्हणजे शैक्षणिक व सामाजिक विचार होय. |
| ३ | शिक्षण, शिक्षक, विद्यार्थी, अध्ययन– अध्यापन प्रक्रिया, अभ्यासक्रम, शिस्त, शाळा, समाज, समूह, सामाजिक शिस्त, सामाजिक परिवर्तन, सामाजिक गतीशिलता, जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरणाचे समाजावरील परिणाम याविषयीचे विचार. |
| ४ | शिक्षण, शिक्षणाची कार्ये, ध्येये, उद्‌दिष्टे, शिक्षक, अभ्यासक्रम, शाळा, शासन, समाज, सामाजिक आंतरक्रिया, व्यक्तिमत्त्व, व्यक्तिभेद, अध्ययन– अध्यापन, मूल्ये याविषयीचे विचार. |

| | |
|---|---|
| ५ | शैक्षणिक तत्त्वज्ञान, शैक्षणिक समाजशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र या विचारांची सद्यस्थितीतील उपयुक्तता याविषयीचे विचार. |
| ६ | शिक्षण, शिक्षणाची कार्ये, शिक्षक, शिक्षकाचे कर्तव्य, शाळा, अभ्यासक्रम, शालेय शिस्त, शासकीय धोरणे, स्त्री शिक्षण, वंचितांचे शिक्षण, लोकसंख्या शिक्षण, पर्यावरण शिक्षण, शिक्षणाचा समाजावरील प्रभाव, विविध शिक्षणतज्ज्ञांबद्दलचे मत याविषयीचे विचार म्हणजे शैक्षणिक व सामाजिक विचार होय. |
| ७ | ॲड्. शिंदे यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान, शैक्षणिक समाजशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र, मूल्ये व त्यांची सद्यस्थितीतील उपयुक्तता अभ्यासणे. |
| ८ | शिक्षण, शिक्षणाची कार्ये, शिक्षक, विद्यार्थी, शाळा, संस्थाचालक, पालक, समाज, शिक्षणाचा समाजावरील प्रभाव, समाज, समूह संपर्क माध्यमे, सामाजिक आंतरक्रिया, जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरणाचे परिणाम याविषयीचे विचार. |
| ९ | शिक्षण, शिक्षणाची कार्ये, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास, वाढ व विकास, व्यक्तीभेद, अनुवंश व परिस्थिती, शाळा, संस्थाचालक, शासकीय धोरणे, समाज, समाज परिवर्तन, स्त्री शिक्षण, वंचितांचे शिक्षण याविषयीचे विचार. |
| १० | शैक्षणिक तत्त्वज्ञान, शैक्षणिक समाजशास्त्र, शिक्षणातील नवीन विचारप्रवाह, शैक्षणिक मानसशास्त्र, मूल्ये, गाभाघटक व त्यांची सध्याच्या काळातील उपयुक्तता याविषयीचे विचार म्हणजे शैक्षणिक व सामाजिक विचार होय. |

या सर्व प्रतिसादकांच्या प्रतिसादावरून संशोधकाने मार्गदर्शकाशी चर्चा करून ॲड्. रावसाहेब शिंदे यांचे शैक्षणिक व सामाजिक विचार अभ्यासण्यासाठीचे निकष निश्चित केले ते पुढीलप्रमाणे.

## ३.५ ॲड्. शिंदे यांच्या शैक्षणिक विचार यांचा अभ्यास करतांना तज्ज्ञांच्या मुलाखतीमधून निश्चित करण्यात आलेले निकष .

१. ॲड्. शिंदे यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान विषयक विचार

२. ॲड्. शिंदे यांचे शैक्षणिक मानसशास्त्र विषयक विचार

३. ॲड्. शिंदे यांच्या विचारांची सद्यस्थितीतील उपयुक्तता.

**३.५.१ शैक्षणिक तत्वज्ञानविषयक शोधकार्याचे स्वरूप**

शिक्षण ही तत्वज्ञानाची क्रियात्मक वाजू तर तत्वज्ञान हे शिक्षणाचे अधिष्ठान आहे. यादृष्टीने शिक्षणाची तात्विक ध्येये कोणती? कोणकोणत्या मूल्यातून शिक्षणाचे तत्वज्ञान दृष्टीस पडते याचा शोध घेतला पाहिजे. ती मूल्ये ॲड.रावसाहेब शिंदे यांच्या वाड्:मयातून कशी प्रतिविंवित झाली आहेज याचा शोध घेणे म्हणजे ॲड.रावसाहेब शिंदे यांच्या वाड्:मयाचा शैक्षणिकदृष्टया तात्विक शोध घेणे. उत्कृष्ठ शिक्षक हा उत्कृष्ठ तत्ववेत्ता असतो. त्यादृष्टीने ॲड.रावसाहेब शिंदे यांनी आपल्या वाड्:मयात उत्कृष्ठ तत्ववेत्त्याची भूमिका कोठे कोठे घेतली आहे? तेथे त्यांनी कोणते शैक्षणिक तत्वज्ञान मांडले आहे? त्या स्थळांचा शोध घेणे व त्यांचे अर्थनिर्वचन करणे हा शैक्षणिक दृष्टया ॲड.रावसाहेब शिंदे यांच्या वाड्:मयाचा शैक्षणिक शोध होय.

**३.५.२ॲड.रावसाहेब शिंदे यांच्या वाड्मयातील शैक्षणिक तत्वज्ञानाच्या दृष्टीने अभ्यासाचे निकष**

१ शिक्षण प्रक्रियेचा अर्थ

२. शिक्षणाची उद्दिष्टे

३. शिक्षणाची कार्ये

४. शिक्षणाचे प्रकार

५. शिक्षणविषयक ध्येयांची सद्यस्थितीतील आवश्यकता

६. शिक्षणाच्या विविध पैलूंना लेखकाने केलेला स्पर्श — सांस्कृतिक शिक्षण, धर्म आणि शिक्षण, शिस्त व स्वातंत्र, आदर्शवाद, निसर्गवाद, कार्यवाद, वास्तववाद आणि शिक्षण, मानवी मूल्ये, जीवन कौशल्याचे शिक्षण

७. शैक्षणिक विचारवंतांचे तत्वज्ञान

८. आजच्या शिक्षणाची स्थिती

९. शिक्षकाचे गुणविशेष

१०. शिक्षकाची भूमिका

११. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाचा शैक्षणिक तत्वज्ञानाच्या

**दृष्टीकोनातून घडून आलेला परिणाम.**

**३.५.३ शैक्षणिक मानसशास्त्र विषयक शोधकार्याचे स्वरूप**

'मानसशास्त्र' हे वर्तनाचे शास्त्र आहे तर जन्मतः व्यक्तीत असणाऱ्या सुप्त क्षमतांचा विकास घडवून विचार, अविष्कार क्रियाशीलता यांनी समृध्द असे व्यक्तिमत्व घडविणाऱ्या शिक्षण प्रक्रियेच्या केंद्रस्थानी शैक्षणिक मानसशास्त्र असते. मानसशास्त्रीयदृष्टया काही वृत्ती व प्रवृत्तीचे पोषण अगत्यपूर्वक झाल्यास कुमार—युवकांचे मन सदृढ व निकोप होवू शकते.

यादृष्टीने ॲड.रावसाहेब शिंदे यांच्या वाङ्‌मयाचे मानसिक विकास, भावनिक विकास, मानसिक आरोग्य यादृष्टीने जे विचार आढळतात त्या विचारांचे मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून परिक्षण करावे लागले. शैक्षणिक मानसशास्त्रातील वाढ व विकास, अध्ययन प्रक्रिया, बुध्दिमत्ता, सर्जनशीलता व्यक्तिमत्व, व्यक्तिभेद अध्ययन अकार्यक्षमता, सामाजिक मानसशास्त्र व भारतीय मानसशास्त्र या अभ्यास घटकांना पूरक असणारे किंवा त्यांच्या संदर्भातील समस्या मांडणारे कोणकोणते विचार व अनुभव ॲड.रावसाहेब शिंदे यांच्या वाङ्मयातून नकळत किंवा जाणीवपूर्वक व्यक्तझालेले आहेत. जागतिकीकरण, उदारीकरणाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेऊन म्हणजेच शैक्षणिक मानसशास्त्राच्या दृष्टीकोनातून ॲड.रावसाहेब शिंदे यांच्या वाङ्मयाचा अभ्यास केला म्हणजेच शैक्षणिक मानसशास्त्राच्या दृष्टीकोनातून ॲड्. शिंदेयांच्या वाङ्मयाचा अभ्यास केला आहे.

**३.५.४ ॲड.रावसाहेब शिंदे यांच्या वाङ्मयातील शैक्षणिक मानसशास्त्राच्या दृष्टीने अभ्यासाचे निकष**

१. शैक्षणिक मानसशास्त्र — बालकाचे (विद्यार्थ्याची) वाढ व

विकास

२. अध्ययन प्रक्रिया, अध्यापनाचे मानसशास्त्र

३. बुध्दिमत्ता, सर्जनशीलता, व्यक्तिमत्व, व्यक्तिभेद

४. सामाजिक मानसशास्त्र

५. भारतीय मानसशास्त्र

६. जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरणाच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक मानसशास्त्राशी संबंधित निर्माण झालेल्या समस्या.

**३.६ गुणात्मक माहिती संकलन साधने व तंत्रे :—**

**३.६.१ प्राथमिक व दुय्यम स्त्रोताद्वारे माहिती संकलन :**

ॲड्. शिंदे यांच्या वाङ्.मयाचा शैक्षणिक अभ्यास करताना संशोधनासाठी विविध प्रकारच्या सामग्रीचा वापर करण्यात आला. त्यामध्ये प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत कोणते आहेत ते पुढीलप्रमाणे विचारात घेतले.ॲड. शिंदे यांनी शब्दांकीत केलेले त्यांचे आत्मचरित्र, त्यांची पुस्तके, वर्तमानपत्रे, नियतकालीके, यामधून केलेले लेखन, भाषणे, चर्चासत्र, व्याख्याने यामध्ये मांडलेले विचार, रयत शिक्षण संस्था, स्वातंत्र्य चळवळीतील कार्य या स्त्रोताव्दारे गुणात्मक माहितीचे संकलन संशोधकानेकेले आहे.

ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या शैक्षणिक विचार व कार्याच्या अभ्यासातील माहिती स्त्रोत पुढीलप्रमाणे

**प्रवाह आकृती क्र ३.२**




**प्रवाह आकृती क ३.३**



### ३.६.२ ॲड. रावसाहेब शिंदे यांची प्रत्यक्ष मुलाखत

उद्दिष्ट क्र. १ ते ५ च्या संदर्भातील माहिती प्राप्त करण्यासाठी संशोधकाने ॲड्. रावसाहेब शिंदे यांची मुक्त मुलाखत घेतली. या मुलाखतीतील मुक्त प्रश्नांच्या उत्तरानुसार शैक्षणिक तत्त्वज्ञान, शैक्षणिक समाजशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र, मूल्ये विषयक विचारांचे घटकनिहाय विश्लेषण केले आहे. ॲड्. रावसाहेब शिंदे हे व्यावसायिक शिक्षणतज्ज्ञ नाहीत. आजच्या शैक्षणिक वास्तवाचे अवलोकन, अनुभव आणि मनन—चिंतन यातून त्यांचे शिक्षणविषयक चिंतन आकाराला आलेले आहे.

श्रीरामपूर येथील 'महादेव मळा' हे ॲड्. रावसाहेब पांडुरंग शिंदे यांचे निवासस्थान आहे. येथेच संशोधकाने ॲड्. रावसाहेब शिंदे यांची मुक्त व प्रकट मुलाखत घेतली. ही मुलाखत मुख्यत: ॲड्. शिंदे यांचे विचार व कार्य यानुसार घेण्यात आली. या मुलाखतीमध्ये संशोधकाने पुढील घटकांना अनुसरून प्रश्नावली तयार केली व त्यानुसार मुलाखत घेण्यात आली.

**मुलाखत मुद्दे :**

१. शैक्षणिक तत्वज्ञान विषयक विचार
२. शैक्षणिक मानसशास्त्र विषयक विचार
३. विचार व कार्याची सद्यस्थितीतील उपयुक्तता.

### ३.६.३ प्रतिसादकांची निवड

ॲड.रावसाहेब शिंदे यांच्या वाङ्मयाचे तज्ञ समीक्षक व अभ्यासक यांची संशोधन कार्यासंदर्भात प्रतिसादक म्हणून निवड योग्य पध्दतीने व्हावी याकरिता संशोधकाने पुढील मार्गानी प्रयत्न केले.

संशोधक स्वत: रयत शिक्षण संस्थेमध्ये प्राध्यापक म्हणून काम करत असल्यामुळे संशोधकाला अनेक कार्यक्रमांच्यानिमित्ताने

ॲड. शिंदे यांची भाषणे ऐकण्याचा योग आला. ॲड.शिंदे यांचा सहवास मिळाला.ॲड. शिंदे यांच्याशी चर्चा करण्याची संधी मिळाली. या अनौपचारिक भेटीतून ॲड. शिंदे यांच्या साहित्याचा अभ्यास करणारी, त्यांच्या विचारांनी प्रेरित झालेली अनेक माणसे भेटली. यातूनच संशोधकाने मार्गदर्शकांशी चर्चा करून ५ प्रतिसादकांची निवड केली. हे सर्व प्रतिसादक ॲड. शिंदे यांचे निकटवर्तीय आहेत. त्यांच्या साहित्याचे, विचारांचे अभ्यासक आहेत. अनेक वर्षापासून ते ॲड शिंदे यांच्या सहवासात आहेत. निवड केलेल्या प्रतिसादकांनी ॲड.रावसाहेब शिंदे यांचे वाङ्मय वाचले असून त्यांची व्याख्यानेही ऐकली आहेत. ॲड.शिंदे यांच्याशी या प्रतिसादकांचा अनेकवेळा प्रत्यक्ष संबंध आला असून सर्व प्रतिसादक शिक्षणक्षेत्रातील अध्यापन कार्य व साहित्यनिर्मिती क्षेत्रात नावाजलेले आहेत.

**३.६.४ निवड झालेल्या प्रतिसादकांच्या साचेबंद मुलाखती –**

''या मुलाखतीचे कार्य संपूर्णपणे पूर्व योजनेनुसार रचनाबद्ध असते. अशा मुलाखतीत ठरावीक साच्यांचे प्रश्न असतात. मुलाखत घेणारा प्रतिसादकांना ठरावीक पूर्वनियोजित प्रश्न विचारतो व त्यांच्या उत्तरांची नोंद करीत असतो.

ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या साहित्याचा अभ्यास व त्यांची मुलाखत याचा उपयोग करून संशोधकाने तज्ज्ञ समिक्षकांच्या मुलाखतीची प्रश्नसूची तयार केली. या ५ मुलाखत प्रतिसादकांना (परिशिष्ट–क) प्रश्नसूची तयार करून अवलोकनार्थ दिल्या सर्व प्रतिसादकांना प्रत्यक्ष संपर्क साधून संरचित प्रश्नांची उत्तरे मिळविली त्याचबरोबर मुक्त प्रश्नांच्या संदर्भातील त्यांच्या उत्तरांचे व मुलाखतींचे ध्वनीमुदंण करून संकलन केले.

या संशोधनकार्यात सहेतूक नमुना निवड (Purposive

Sampling)प्रकाराचा वापर केला आहे. अॅड रावसाहेब शिंदे यांच्या साहित्याचा,लेखांचा, भाषणांचा ज्यांनी अभ्यास केलेला आहे व अॅड. शिंदे यांच्याशी ज्यांचा वेगवेगळया पातळीवर संबंध आलेला आहे यांची संशोधकाने अभ्यास करून निवड केलेली आहे. संशोध ाकाने ज्या प्रतिसादकांची निवड केली त्या सर्वच प्रतिसादकांनी संशोधनाची माहिती देण्यासाठी आनंदाने होकार दिला.या मुलाखतीमध ये संशोधकाने पुढील घटकांना अनुसरून प्रश्नावली तयार केली व त्यानुसार मुलाखत घेण्यात आली.

**मुलाखत मुद्दे :**

१ शैक्षणिक तत्वज्ञान विषयक विचार

२ शैक्षणिक मानसशास्त्र विषयक विचार

३ विचार व कार्याची सद्यस्थितीतील उपयुक्तता.

**३.७ गुणात्मक माहितीचे विश्लेषण :—**

प्रस्तुत संशोधनासाठी ‘वाङ्.मय विश्लेषण ही संशोधन पद्धती वापरली आहे त्यासाठी आवश्यक असलेल्या माहिती संकलनासाठी व विश्लेषणासाठी आवश्यक असलेले तक्ते/कोष्टके हे संशोधन साधन म्हणून उपयोगात आणले आहे. त्यासाठी संशोधकाने स्वयंनिर्मित कोष्टके/तक्ते तयार केली आहेत.

(कोष्टकांचा नमुना परिशिष्ट अमध्ये आहे)

ही कोष्टके पुढीलप्रमाणे —

१. अॅड्. शिंदे यांच्या साहित्याचे वाचन करताना निरीक्षण केलेल्या नोंदी करण्यासाठीचा तक्ता.

२. शैक्षणिक तत्त्वज्ञानाविषयक विचारांचा तक्ता.

३. शैक्षणिक मानसशास्त्र विषयक विचारांचा तक्ता

४. विचार व कार्याची सद्यस्थितीतील उपयुक्तता कोष्टके.

संपूर्ण संशोधनात अॅड्. शिंदे यांच्या साहित्यातील चरित्रात्मक

लेखन/वैचारिक लेखन/आत्मकथन/पत्रव्यवहार/लेख/यामधील विविध आशय शैक्षणिक तत्त्वज्ञान, शैक्षणिक समाजशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र, १० मूल्ये यांच्या अनुषंगाने नोंद करण्यासाठी आणि त्यांचे संख्यात्मक विवरण करण्यासाठी वर उल्लेखित विविध प्रकारची तक्ते/कोष्टके तयार करण्यात आली. संशोधनातील विश्लेषण करण्यासाठी आणि निष्कर्ष काढण्यासाठी या कोष्टकांमध्ये माहिती भरण्यासाठी आशय विश्लेषण या संशोधन तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

**३.८ समारोप**

संशोधन कार्यातील माहितीचे संकलन झाल्यानंतर माहितीचे अर्थनिर्वचन व विश्लेषण करण्यापूर्वी ॲड्. रावसाहेब शिंदे यांच्या विचारांची शैक्षणिक तत्त्वज्ञान, शै. समाजशास्त्र, शै. मानसशास्त्र व मूल्यांच्या मुद्‌दयांनुसार मांडणी केली. ही मांडणी करताना वर्णनात्मक संशोधन पद्धती अंतर्गत दस्तऐवज विश्लेषण पद्धतीचा उपयोग केला.

या संशोधनाचा प्रत्यक्ष कार्यवाहीचा तपशील पुढीलप्रमाणे

१. ॲड्. शिंदे यांच्या वाङ्.मयातील शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा संदर्भातील घटकांचा शोध.
२. ॲड्. शिंदे यांच्या वाङ्.मयातील शैक्षणिक मानसशास्त्र संदर्भातील घटकांचा शोध.
३. ॲड्. शिंदे यांच्या साहित्याचे अभ्यासक यांच्या मुलाखतीतील विचार शोध.
४. ॲड्. रावसाहेब शिंदे यांच्या मुलाखतीतील विचारशोध.
५. प्राप्त माहितीच्या विश्लेषणाच्या आधारे ॲड्. शिंदे यांच्या शैक्षणिक विचारांची सद्य:स्थितीतील उपयुक्तता.
६. निष्कर्ष, फलश्रुती व शिफारशी.

## प्रवाह आकृती क्र ३.४




❑❑❑

**04**

# ॲड्. रावसाहेब शिंदे यांच्या वाड्.मयाचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

**४.० प्रास्ताविक :—**

साहित्यिक ॲड्. रावसाहेब शिंदे यांनी आपले विद्यार्थी आणि सहकारी, भोवतीचा समाज, राजकारण यातील आचार विचारांचा, घडामोडींचा सुक्ष्मतेने आणि संवेदनेने अभ्यास केला आहे. भावी आयुष्य समृद्ध आणि संवेदनशील होण्याची सुरूवात शालेय वयापासून होते आणि याच वयात ललितकलांचा आणि संस्काराचा स्पर्श झाला की विद्यार्थ्यांची जीवनाची उर्मी अधिक सकारात्मक होते. या जाणीवेतून, या चिंतनातून ॲड्. शिंदे यांचे लेखन झाले आहे.संशोधकाने संशोधन कार्यासाठी 'ॲड्. रावसाहेब शिंदे यांचे शैक्षणिक — एक अभ्यास'हा जो विषय निवडलेला आहे. त्याच्या अनुषंगाने संशोधनाची जी उद्‌दिष्टे निश्चित केलेली आहेत. त्यानुसार ॲड्. शिंदे यांच्या वाड्.मयाचे विश्लेषण करण्याचे कार्य सर्वप्रथम हाती घेऊन या प्रकरणात मांडलेले आहे. हे एका अर्थाने संशोधनातील सत्यशोधन आहे. त्यामागील पार्श्वभूमी आणि कारण मिमांसा पुढीलप्रमाणे सांगता येईल.

''संशोधन ही सत्यशोधनाची प्रक्रिया आहे. ती केवळ बौद्धिक कसरत नसून एक वृत्ती आहे. जिज्ञासा व सत्य निष्ठा हे केवळ विशिष्ट अभ्यासापुरतीच रीत होऊ शकते. संशोधनवृत्ती बाणलेली असली म्हणजे दैनंदिन व्यवहारातील जटील प्रश्नांवरही खूप बारकाईने व नि:पक्षपातीपणे विचार केला जाऊ शकतो. नीरक्षीरविवेकवृत्ती विकसित होण्याची आज नितांत गरज आहे. असा विवेक ग्रंथाच्या वाचनातून व चिंतनातून विकसित झाल्यास

आजच्या अनेक सामाजिक, धार्मिक, राजनैतिक व राष्ट्रीय समस्यांचे निराकरण होण्यास किंवा त्यांची प्रखरता कमी होण्यास मदत होईल व त्यातून एकसंघ असा भारतीय समाज निर्माण होण्याचा मार्ग सुकर होईल असे वाटते.

''वैज्ञानिक व सामाजिक शास्त्रानंतर संशोधनाचे तिसरे क्षेत्र म्हणजे साहित्य, कला व वाड्.मयाचे क्षेत्र होय. साहित्य व समीक्षा याबाबत संशोधकाला पुरेसे ज्ञान असले पाहिजे यात स्वतंत्रपणे विषय निवडून त्यावर अभ्यास करून आपले स्वत:चे मत येथे मांडायचे असते. त्यासाठी पुढे आलेल्या पुराव्याची मांडणी करता आली पाहिजे. आपल्याला सापडलेले तथ्य साधार मांडता आले पाहिजे''

साहित्यातून निष्पन्न होणारे तथ्य शोधण्यासाठी म्हणजेच एका अर्थाने विशिष्ट दृष्टिकोन किंवा निकष यांचे संदर्भात साहित्याचे विश्लेषण करावे लागते. प्रस्तुत संशोधन कार्यातून ॲड्. शिंदे यांच्या वाड्.मयातून शैक्षणिक योगदानाचा शोध घेतला आहे.कोणत्याही साहित्याचा शैक्षणिक शोध खालील दोन प्रकारच्या विश्लेषणाद्वारे घेतला जात असतो.

**४.०.१ आशयाचा शोध :—**

साहित्यातील आशयाचा शोध घेताना त्या वाड्.मयातील निदर्शनास येणारे प्रसाद, माधुर्य इत्यादी गुण, लेखकाची सुबोध भाषाशैली, विविध रसांचा उत्कर्ष यांचा शोध घ्यावा लागतो.

**४.०.२ अभिव्यक्तीचा शोध :—**

यामध्ये लेखनातून घडणारे लेखकाच्या अभिवृत्तीचे आणि व्यक्तिमत्त्वाचे दर्शन यावर लक्ष केंद्रित करून जीवनविषयक सिद्धांताचा औचित्य भंग झालेला नाही याची पडताळणी करावी लागते.

ॲड्. शिंदे यांचे वाड्.मय हे जीवन आणि शिक्षणाच्या विविध अंगांना स्पर्श करणारे बहुआयामी, विचारप्रवर्तक, पथदर्शक

साहित्य आहे. त्यातून त्यांनी वर्तमान युगातील सामाजिक, शैक्षणिक समस्यांचे केवळ विश्लेषणच केलेले नाही तर त्यावरील उपायही सुचविले आहेत. हे उत्तम साहित्य शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यासले जाणे ही समाजाची आणि काळाची गरज होती व याच हेतूने हे संशोधन कार्य हाती घेतले आहे.

**४.१ ॲड्. रावसाहेब शिंदे यांच्या वाड्.मयातील शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा विचारशोध :—**

ॲड्. शिंदे यांच्या वाड्.मयाची शैक्षणिक तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने चिकित्सा करताना खालील निकष डोळयासमोर ठेवले आहेत.

१. शिक्षणाच्या प्रक्रियेसंबंधी लेखकाला अभिप्रेत असलेला अर्थ कोणता?

२. शिक्षणाची व्याप्ती, कार्य, शिक्षणाचे प्रकार यासंदर्भात लेखकाने कोणते विचार मांडले आहेत?

३. शिक्षणाच्या ध्येयांतर्गत विविध कालखंडातील बदलेलेल्या ध्येयांचे स्वरूप, व्यक्तिनिष्ठ, समाजनिष्ठ, राष्ट्रीय व आधुनिक शिक्षणाच्या ध्येयांबाबत लेखकाने घेतलेली भूमिका कोणती?

४. शिक्षणाच्या (आदर्शवाद, निसर्गवाद, कार्यवाद, वास्तववाद) विविध पैलूंना लेखकाने लेखनाद्वारे कशाप्रकारे स्पर्श केला आहे.

५. लेखकाने कोणकोणत्या शैक्षणिक विचारवंतांच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला आहे.

६. आजच्या शिक्षणासंदर्भात शिक्षकांची स्थिती, शिक्षकांचे गुण, उदयोन्मुख समाजातील शिक्षकाची भूमिका याकडे पाहण्याचा लेखकाचा दृष्टिकोण कसा आहे?

**४.१.१ अभ्यासक्षेत्र घटक : शिक्षण प्रक्रियेचा अर्थ :—**

म.बा.कुंडले यांच्या मतेशिक्षण ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. तसेच ती अखंडपणे चालणारी स्वयंस्फूर्त प्रक्रिया आहे. मानव हा समाजशील प्राणी आहे. मानवाला समाजशील बनविण्याचे काम शिक्षण करते. व्यक्तीचा सर्वांगीणविकास शिक्षणातूनच होतो.

या सर्वाविषयीचे विचार ॲड्. शिंदे यांच्या साहित्यातून व्यक्त होतात.

### कोष्टक क्र ४.१.१
### शैक्षणिक तत्त्वज्ञान — शिक्षणाचा अर्थ

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| 'भावलेल्या प्रस्तावना' लोकनेते शरदराव पवार—व्यक्ती व कार्य | आपण माणसे इतिहास वाचतो, फार तर अभ्यासू शकतो, तसेच आज घडणाऱ्या घटना उद्या इतिहास ठरतात. त्याही पाहतो. मात्र क्वचितच एखादा महामेरू असा असतो की, तो इतिहास घडविण्याच्या वाटेने चालतो. | विद्यार्थ्यांच्या समोर चांगले आदर्श असतील तर विद्यार्थी चांगलेच अनुकरण करतील. |
| चरित्र आणि चारित्र्य | ज्ञानार्जनाची भूक तयार करणे व ती भागविणे हेच शिक्षणाचे कार्य. | ज्ञानार्जनाची भूक तयार करणे व ती भागविणे हेच शिक्षणाचे कार्य. |
| भावलेल्या प्रस्तावना' लोकनेते शरदराव पवार—व्यक्ती व कार्य | बालपणापासून तो तरूणाईपर्यंत विद्यार्थी या नात्याने ते केवळ अभ्यासक्रमाच्या पुस्तकात गुंतून पडले नाहीत. शाळेतील चार भिंतींनी बंदिस्त असलेल्या वर्गातील खोलीपेक्षा त्यांनी बिनभिंतीच्या उघडया शाळेतल्या शिक्षणाचा अधिक लाभ घेतला. ''बिनभिंतीची उघडी शाळा लाखो तिथे गुरू। तयासि दोस्ती आपण करू'' | पुस्तकी ज्ञान तर हवेच परंतु त्याचबरोबर व्यावहारिक ज्ञान असणे ही काळाची गरज आहे. |
| विचारवेध | ''कार्य हेच शिक्षण'' | ''कार्य हेच शिक्षण'' |
| 'भावलेल्या प्रस्तावना' 'आठवणीतले दिवस' | 'आत्मशोध' ही संकल्पना भारतीय संस्कृतीत आणि तत्त्वज्ञानाच्या युगात प्राचीन युगापासून आहे. आत्मचरित्र या आधुनिक साहित्यप्रकारात आत्मशोधाची संकल्पना आहे. | आत्मचरित्र लिखाण व्यक्तीला आत्मशोध घेण्यास प्रवृत्त करते. |
| 'भावलेल्या प्रस्तावना' 'आठवणीतले दिवस' | चारित्र्यहीन शिक्षण, तत्त्वहीन राजकारण प्रामाणिकपणाशिवाय व्यापार, श्रमाविना संपत्ती, माणुसकीविना शास्त्र, विवेकहीन सुखोपयोग, त्यागाशिवाय भक्ती | माणसाच्या जीवनातील ही सात सामाजिक पापे आहे. |
| विचारवेध | ''देतो तो देव'' | शिक्षणातून माणसाला दुसऱ्याला |

### ४.१.२ अभ्यासक्षेत्र घटक : शिक्षणाची उद्दिष्टे (व्याप्ती)शिक्षणाची कार्ये :—

आहेर हिरा यांच्या मते माणूस समाजशील प्राणी आहे. त्यादृष्टिने शिक्षणातून घडून येणारा व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास म्हणजे एका अर्थाने सामाजिक विकास मानला जातो. शिक्षणाची ज्ञानदान, व्यक्तिविकास, सहप्रवृत्तींना विधायक वळण, उदरनिर्वाहासाठी सक्षम बनविणे, कौशल्यांचा विकास करणे, चारित्र्य गुणांचा विकास करणेही कार्ये असून लेखकाने त्यासंदर्भात आपल्या लेखनातून विविध शैक्षणिक उपक्रमही सुचविले आहेत.

**कोष्टक क्र ४.१.२**

**शिक्षणाचे महत्त्व, कार्य**

| पुस्तकाचे नाव | लेखाकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| 'भावलेल्या प्रस्तावना' | पुस्तके संपली तर माणसे संपतात हे जाणण्याइतकी विचारशक्तीच आता विकलांग झालेली आहे. | वाचनामुळेच माणसाला वैचारिक परिपक्वता येते. |
| 'भावलेल्या प्रस्तावना' | सामूहिक परिणामाद्वारे चांगला सार्वजनिक बदल घडविणाऱ्या त्या त्या क्षेत्रातील आदर्श व्यक्ती म्हणजेच नेतृत्त्व. संपत्तीची निर्मिती प्रगती. विकास आणि सुसंस्कृती हा अशा नेतृत्वाच्या विचाराचा गाभा असतो. | नेतृत्त्वगुणांचा विकास शिक्षणातून होणे अपेक्षित आहे. |
| विचारवेध | चांगल्याला चांगल म्हणण्याची दानत समाजात रूजलीच पाहिजे. समाजाच्या मानसिक जडणघडणीसाठी ते आवश्यक आहे शेतीच्या मशागतीसारखीच माणसाच्या मनाचीही मशागत करावी लागते. | (मूल्यशिक्षण) शिक्षणातून मनाची मशागत व्हायला हवी. प्रज्वलित मते शिक्षणातून घडावीत. |
| 'भावलेल्या प्रस्तावना' | शाळा सुटली की, ते लगेच जनावरे चारायला घेऊन जायचे. तसेच इतर शेतीकामेही त्याकाळात विद्यार्थी करीत. आजच्या शिक्षण पद्धतीने विद्यार्थ्याला कामापासून दूर नेले आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांनी विद्यार्थ्यांना खाडी फोडायला लावली. तथापि आता श्रमसंस्काराची पाटी पुसली गेली आहे. | प्रत्येक काम हे श्रेष्ठ असते आणिwork is worshipहा संस्कार शिक्षणातून मुलांवर व्हायला हवा. |
| विचारवेध | ध्येयामुळे माणसांच्या अंगी सहस्त्र हत्तींचे बळ येते आणि अशा बळांच्या जोरावर मनात प्रज्वलित झालेल्या ध्येयवादाच्या ज्योतीमुळे माणूस वाटेल ते पराक्रम करू शकतो. Urge for learning & thirst of knowlege | शिक्षणातून माणसामध्ये ध्येयवाद निर्माण होणे गरजेचे आहे. |

**४.१.३ अभ्यासक्षेत्र घटक : शिक्षणाचे प्रकार :—**

आहेर हिरा यांच्या मते शिक्षण देण्याच्या हेतूने स्थापन केलेल्या संस्थांमधून दिले जाणारे ''औपचारिक शिक्षण'' आंतरक्रिया व अनुभवातून मिळणारे 'सहजशिक्षण' तर प्रसारमाध्यमांद्वारे दिले जाणारे अनौपचारिक शिक्षण हे शिक्षणाचे प्रकार आहेत. लेखकाने हे तीनही प्रकार आपल्या वाङ्.मयात मांडले आहेत.

**४.१.३.१ सहज शिक्षण :—**

सहज शिक्षणाचा सर्वप्रथम मानवी जीवनाशी संबंध येत असतो. हे शिक्षण घेणाऱ्यालाही त्याची जाणीव नसते. त्याचप्रमाणे लेखक स्वत:च्या बालपणीच्या आठवणीतून मिळालेले 'सहज शिक्षण व त्याची उपयुक्तता' सांगतात.

**कोष्टक क्र ४.१.३.१**

**सहज शिक्षण**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
| --- | --- | --- |
| 'भावलेल्या प्रस्तावना' 'आठवणीतले दिवस' | आयुष्यात यश किंवा अपयश महत्त्वाचे नाही, पण आपण जे जे केले त्याचा दर्जा कोणता आणि आपण जे करावयास घेतले, त्यात आपले सर्वस्व आपण ओतले किंवा नाही हीच गोष्ट अखेरीस महत्त्वाची असते. | सहज शिक्षणाद्वारे प्राप्त होणारे ज्ञान चिरकाल टिकते. |
| 'भावलेल्या प्रस्तावना' 'मालोजीराव मोगल' | माणसे वाचण्याच्या शिक्षणाची जणू ही एक शाळाच होती. | पुस्तके वाचून औपचारिक शिक्षण मिळते परंतु माणसे वाचून जीवन शिक्षण मिळते. |
| 'भावलेल्या प्रस्तावना' 'मालोजीराव मोगल' | पदव्या नसलेली माणसेसुद्धा समाज आणि देश यांच्या हितासाठी किती कार्य करू शकतात याचे मालोजीकाका मोगल हे एक उदाहरणच आहे. | सहज शिक्षणातून मिळणारे ज्ञान अधिक वास्तव, व्यावहारिक व समाजउपयोगी असते. |

**४.१.३.२ औपचारिक शिक्षण :—**विशिष्ठ हेतू समोर ठेवून जाणीवपूर्वक एखादया यंत्रणेमार्फत नियोजनबद्ध जे शिक्षण दिले

जाते, असे शाळा, महाविद्यालयातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणविषयी अॅड्. शिंदे यांनी आपली मते व्यक्त केलेली आहेत.

**कोष्टक क ४.१.३.२**

**औपचारिक शिक्षण**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| 'भावलेल्या प्रस्तावना' पान — ११३ | शिक्षणाचे सदृढ प्रकृतीचा, कुशाग्र बुद्धीचा व निर्मळ मनाचा माणूस घडावा, सर्वांगीण विकास व्हावा, मानवता जपली जावी, नैतिक मूल्ये पाळली जावीत शिक्षण हे सेवेसाठी असावे. | शिक्षणातून शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकास झालेले, परिपक्व बालक तयार व्हायला हवे. |
| 'भावलेल्या प्रस्तावना' कृषी क्रांतीचे योगिराज | औपचारिक शिक्षणाने जस जसा माणूस प्रगल्भ होत जात आहे तस तशी ही विचारसरणी सिमेंट क्रांक्रीटसारखी भक्कमच होत राहिली आहे की काय असे वाटल्यावाचनू राहत नाही. | औपचारिक शिक्षणातून माणसाला शिक्षण मिळते पण निसर्ग, जीवन याकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टि मिळत नाही. |
| 'भावलेल्या प्रस्तावना' 'हडपसरपर्व' | अज्ञान, दारिद्रय यांच्या चिखलात रूतून पडलेल्या मुला—मुलींची कमळे शिक्षणातून फुलविण्याचे काम पतंगरावांनी केले. | बहुजन समाजातील मुलांना औपचारिक शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी कितीतरी समाज पुरूषांनी काम केले. |
| 'भावलेल्या प्रस्तावना' 'हडपसरपर्व' | पतंगराव कदमांनी शेकडो विद्यार्थ्यांसाठी आपल्या विश्वविद्यालयालाच थेट ग्रामीण भागात प्रवास करायला लावला ही एक अचंबित करण्याजोगीच बाब आहे. | औपचारिक शिक्षणाची केंद्रे, उदा. विद्यापीठ, महाविद्यालये यांनी शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठीही शिक्षणाची सोय उपलब्ध करायला हवी. |

**४.१.३.३ अनौपचारिक शिक्षण:**—वृत्तपत्रे, दूरदर्शन, आकाशवाणी, चित्रपट व साहित्य या प्रसारमाध्यमांद्वारे अप्रत्यक्षपणे हे शिक्षण देण्याचे कार्य घडते. हे अनौपचारिक शिक्षण समाजाला कसे उपयुक्त आहे याची चर्चा लेखकाने केलेली आहे.

**कोष्टक क्र ४.१.३.३**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| 'भावलेल्या प्रस्तावना' पान — २० | पदव्यांचे औपचारिक पुस्तकी शिक्षण ते घेऊ शकलेले नाहीत. मात्र बिनभिंतीच्या शाळेतल्या शिक्षणाचा व्यासंग इतका विलक्षण आहे की अनेक पदवीवाल्यांनीही त्यांच्या शहाणपणापुढे नतमस्तक व्हावे. | बिनभिंतीच्या शाळेतून माणसाला खऱ्या अर्थाने शहाणपण, सुज्ञपणा, विवेकपणा येतो. औपचारिक शिक्षणातून तो येईलच असे नाही. |
| 'भावलेल्या प्रस्तावना' पान — १२५ | औपचारिक शिक्षणाची संधी भाऊंना मिळाली नाही पण भाऊंनी सडकेच्या शाळेत आणि दुनियेच्या विद्यापीठात भरपूर शिक्षण घेतले. | दैनंदिन व व्यावहारिक जीवनातून मिळणारे ज्ञान हे पुस्तकी ज्ञानापेक्षा सरस, कायमस्वरूपी टिकाऊ असते. |

**४.१.४ शिक्षण विषयक ध्येयांचे प्रकार व सद्य:स्थितीतील आवश्यकता :—**

ॲड्. शिंदे यांच्या वाड्.मयातून शिक्षणविषयक ध्येयाचा जो विचार आलेला आहे तो प्रामुख्याने ध्येयवादी व्यक्तिंच्या जीवनगौरवपर लेखांतून शोधावा लागलेला आहे.

**४.१.४.१ व्यक्तिनिष्ठ ध्येये**:—या संकल्पनेनुसार व्यक्तिच्या सुप्तावस्थेतील समतोल विकास साधला जाणे अपेक्षित असते. व्यक्तिनिष्ठ ध्येये साध्य करणे म्हणजे एका अर्थाने स्वत:चे आयुष्य बांधणे असे लोक मानतात.

**कोष्टक क्र ४.१.४.१**

**व्यक्तिनिष्ठ ध्येये**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| विचारवेध | शिक्षणातून संवेदनशील विचार करणारे, सामाजिक भान असलेले सर्जनशील मन घडविले जावे. आजच्या शिक्षणातून हे अपेक्षित आहे. | शिक्षणातून संवेदनशील विचार करणारे, सामाजिक भान असलेले सर्जनशील मन घडविले जावे. आजच्या शिक्षणातून हे अपेक्षित आहे. |

| | | |
|---|---|---|
| 'भावलेल्या प्रस्तावना' | आपले शिक्षण हे रवींद्रनाथांच्या शांतिनिकेतनप्रमाणे आदंनदायी शिक्षण बनले पाहिजे. आनंददायी शिक्षणामुळेच शाळेतील गळतीचे व स्थगनचे प्रश्न कमी होतील. | आपले शिक्षण हे रवींद्रनाथांच्या शांतिनिकेतनप्रमाणे आदंनदायी शिक्षण बनले पाहिजे. आनंददायी शिक्षणामुळेच शाळेतील गळतीचे व स्थगनचे प्रश्न कमी होतील. |
| प्रश्न आहे मूल्यांचा | शिक्षणाने माणसाला स्वत्वाची जाणीव येते. योग्ययोग्यतेचा विवेक येतो असे जागृत आत्मभान असलेली माणसेच जीवनाचा प्रवाह बदलू शकतात. जीवन संस्कारीत आणि विकसित करण्याचे शिक्षण हे एक साधन आहे. | शिक्षणाने माणसाला स्वत्वाची जाणीव येते. योग्ययोग्यतेचा विवेक येतो असे जागृत आत्मभान असलेली माणसेच जीवनाचा प्रवाह बदलू शकतात. जीवन संस्कारीत आणि विकसित करण्याचे शिक्षण हे एक साधन आहे. |

### ४.१.४.२ **समाजनिष्ठ ध्येये :—**

म.बा.कुंडले यांच्या मतेसमाजात भावनिक ऐक्य निर्माण करणे, समाजाची परंपरा, इतिहास रूढी यांचे रक्षण करणे, समाज जागृती, समाज उन्नती, राष्ट्रहित व राष्ट्रीय अस्मितेचे जतन करणे ही सर्व कार्ये शिक्षणाच्या माध्यमातून घडणे अपेक्षित असते. ही कार्ये म्हणजे व्यापक अर्थाने समाजनिष्ठ ध्येयेच मानली जातात. ॲड्. शिंदे यांनी आपल्या वाड्.मयाचा केंद्रबिंदू 'समाज' हाच ठेऊन लेखन केलेले असल्याने त्यांची भूमिका लेखकास महत्त्वाची वाटते.

**कोष्टक क्र ४.१.४.२**

**समाजनिष्ठ ध्येये**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| ध्यासपर्व | सामाजिक भान असलेला व सामाजिक बांधिलकी जपणारा माणूस आपल्या शिक्षणातून तयार व्हायला पाहिजे. | सामाजिक भान असलेला व सामाजिक बांधिलकी जपणारा माणूस आपल्या शिक्षणातून तयार व्हायला पाहिजे. |

| | | |
|---|---|---|
| 'भावलेल्या प्रस्तावना' | शिक्षणातून स्त्रिया, दलित, आदिवासी, भटके विमुक्त, इतर गरीब श्रमजीवी यांची अज्ञान व गरीबीच्या अंध:कारातून सुटका व्हावी. | शिक्षणातून स्त्रिया, दलित, आदिवासी, भटके विमुक्त, इतर गरीब श्रमजीवी यांची अज्ञान व गरीबीच्या अंध:कारातून सुटका व्हावी. |
| विचारवेध | सर्वांना सामावणारे शिक्षण स्वरूपाने बहुविध असले पाहिजे. त्यामुळे भारताच्या आर्थिक आणि औद्योगिक कायापालटासाठी आवश्यक असे प्रशिक्षित मनुष्यबळ सातत्याने पुरविणे आपल्या शिक्षणव्यवस्थेला शक्य होईल. उच्च शिक्षणाच्या या समावेशक संकल्पनेमुळे सामाजिक न्याय आणि समता यांच्या दिशेने समाजपरिवर्तनाला गती देणे शक्य होईल. | सर्वांना सामावणारे शिक्षण स्वरूपाने बहुविध असले पाहिजे. त्यामुळे भारताच्या आर्थिक आणि औद्योगिक कायापालटासाठी आवश्यक असे प्रशिक्षित मनुष्यबळ सातत्याने पुरविणे आपल्या शिक्षणव्यवस्थेला शक्य होईल. उच्च शिक्षणाच्या या समावेशक संकल्पनेमुळे सामाजिक न्याय आणि समता यांच्या दिशेने समाजपरिवर्तनाला गती देणे शक्य होईल. |

**४.१.४.३ राष्ट्रीय ध्येये:—**

म.बा.कुंडले यांच्या मतेदेशाची उत्पादनक्षमता वाढ व स्वयंपूर्णता, लोकशाहीचे संरक्षण व संवर्धन, सामाजिक व राष्ट्रीय एकता, मूल्यांची जोपासना या सर्वांचा उल्लेख राष्ट्रीय ध्येये म्हणून केला जातो. आपल्या देशाला भविष्यकाळात जागतिक महासत्ता बनायचे असेल तर शिक्षणातून राष्ट्रीय ध्येये साध्य करण्याचे नियोजन सर्वप्रथम करावे लागेल. या नियोजनाचे दिशादर्शन ॲड्. शिंदे यांच्या वाङ्.मयातून केलेले आहे असे निर्दशनास येते.

**कोष्टक क्र ४.१.४.३**

**राष्ट्रीय ध्येये**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| विचारवेध | राष्ट्रप्रेम, श्रमप्रतिष्ठा, स्त्री –पुरूष समानता, आरोग्य, स्वच्छता, पर्यावरणाविषयी प्रेम, संवेदनशीलता या मूल्यांची रूजवणूक करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. | राष्ट्रप्रेम, श्रमप्रतिष्ठा, स्त्री –पुरूष समानता, आरोग्य, स्वच्छता, पर्यावरणाविषयी प्रेम, संवेदनशीलता या मूल्यांची रूजवणूक करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. |
| 'भावलेल्या प्रस्तावना' | शिक्षण हे राष्ट्रबांधणीचे शिक्षण हवे. राष्ट्राची बांधणी, विकास हा राज्यसभा अथवा लोकसभा यातून होत नसतो, तो होतो घराघरातून आणि शाळा–कॉलेजांमधून. त्याचा अर्थ येथे होणारे सुसंस्कार, त्यातून विकसित होणारे चारित्र्य, त्यातून घडणारे आदर्श देशप्रेमी नागरिक. त्यासाठी आपल्याला आवश्यकता आहे चारित्र्यशील, तपस्वी आणि सात्विक शिक्षकांची. | शिक्षण हे राष्ट्रबांधणीचे शिक्षण हवे. राष्ट्राची बांधणी, विकास हा राज्यसभा अथवा लोकसभा यातून होत नसतो, तो होतो घराघरातून आणि शाळा–कॉलेजांमधून. त्याचा अर्थ येथे होणारे सुसंस्कार, त्यातून विकसित होणारे चारित्र्य, त्यातून घडणारे आदर्श देशप्रेमी नागरिक. त्यासाठी आपल्याला आवश्यकता आहे चारित्र्यशील, तपस्वी आणि सात्विक शिक्षकांची. |
| ध्यासपर्व | चारित्र्याच्या अरिष्टात आपला देश सापडला आहे. या भोवऱ्यातून बाहेर पडण्यासाठी जे सामर्थ्य पाहिजे ते शिक्षणातूनच निर्माण होऊ शकेल आणि यासाठी वैचारिक परिवर्तनाची गरज आहे. | चारित्र्याच्या अरिष्टात आपला देश सापडला आहे. या भोवऱ्यातून बाहेर पडण्यासाठी जे सामर्थ्य पाहिजे ते शिक्षणातूनच निर्माण होऊ शकेल आणि यासाठी वैचारिक परिवर्तनाची गरज आहे. |

**४.१.५शिक्षणाचे विविध पैलू :—**

**४.१.५.१ सांस्कृतिक शिक्षण :—**

म.बा.कुंडले यांच्या मतेसांस्कृतिकशिक्षणाने जीवनातील कर्तव्ये कार्यक्षमतेने आणि उदारबुद्धिने पार पाडण्याची क्षमता येते. सांस्कृतिक शिक्षण फुरसदीच्या क्षणांना आनंदात रूपांतरीत करत असते. आजच्या

शिक्षणात शालेय वयातच सांस्कृतिक शिक्षणाची जाणीव विद्यार्थ्यांना झाली पाहिजे.

### कोष्टक क्र ४.१.५.१
### सांस्कृतिक शिक्षण

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| भावलेली माणसं | शिक्षण हे सुसंस्कृत जीवनाचे साधन आहे. शिक्षणाने विचारशक्तीची जोपासना केली पाहिजे. | शिक्षण हे सुसंस्कृत जीवनाचे साधन आहे. शिक्षणाने विचारशक्तीची जोपासना केली पाहिजे. |
| चरित्र आणि चारित्र्य | उदात्त विचाराने वागणारी चांगली माणसे तयार करणे हेच खरे शिक्षणाचे व्यक्तिगत आणि राष्ट्रीय ध्येय असले पाहिजे. | उदात्त विचाराने वागणारी चांगली माणसे तयार करणे हेच खरे शिक्षणाचे व्यक्तिगत आणि राष्ट्रीय ध्येय असले पाहिजे. |
| प्रश्न आहे मूल्यांचा | अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या पायावर डोळे विस्फारित व्हावेत असे उद्योग उभे राहत आहेत. शेतीक्षेत्रही त्याला अपवाद नाही. हे ज्ञान कवेत घेण्याची क्षमता असणारे नवे विश्वामित्र आमच्या शिक्षणातून घडले पाहिजे. ही आमची नितांत गरज आहे. त्याशिवाय आमच्या देशाला उज्ज्वल भविष्य नाही. नव्या स्पर्धेच्या जगात यशस्वी होण्यासाठी आमच्या ज्ञानाची, शिक्षणाची क्षितिजे आणि कक्षा आम्ही उंचावल्याच पाहिजेत. | अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या पायावर डोळे विस्फारित व्हावेत असे उद्योग उभे राहत आहेत. शेतीक्षेत्रही त्याला अपवाद नाही. हे ज्ञान कवेत घेण्याची क्षमता असणारे नवे विश्वामित्र आमच्या शिक्षणातून घडले पाहिजे. ही आमची नितांत गरज आहे. त्याशिवाय आमच्या देशाला उज्ज्वल भविष्य नाही. नव्या स्पर्धेच्या जगात यशस्वी होण्यासाठी आमच्या ज्ञानाची, शिक्षणाची क्षितिजे आणि कक्षा आम्ही उंचावल्याच पाहिजेत. |

प्रश्न आहे मूल्यांचा

### ४.१.५.२ व्यावसायिक शिक्षण :—

उपयुक्ततेच्या जाणीवेतून व उदरनिर्वाहाच्या आवश्यकतेतून जरी व्यावसायिक शिक्षणाचा उदय आणि विकास झाला असला तरी त्या अभ्यासक्रमाला सांस्कृतिक मूल्यांची जोड दयावी असा लेखकाचा कटाक्ष आहे. आज व्यावसायिक शिक्षणाला सर्वत्र मागणी असून ठिकठिकाणी व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था उभ्याझालेल्या आहेत. मागणी तसा पुरवठा या व्यापारी तत्वानुसार केवळ व्यक्तिगत आर्थिक उन्नतीचे शिक्षण देताना सामाजिक दृष्टीकोन डावलला जात आहे याची खंत लेखक व्यक्त करतात.व्यावसायिक शिक्षण व सांस्कृतिक शिक्षणाच्या समन्वयातून ज्ञान विज्ञानासहित शिक्षणातून कार्यक्षम, सुसंस्कृत व परीपूर्ण मानव तयार होईल यावर लेखकाची श्रध्दा आहे. लेखकाने नुसत्या व्यावसायिक शिक्षणाचा पुरस्कार आपल्या साहित्यात केल्याचे आढळून येत नाही. मात्र 'Work is worship' ही भावना दिसून येते.

**कोष्टक क्र ४.१.५.२**

**व्यावसायिक शिक्षण**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| भावलेली माणसं | सर्वांना सामावणारे शिक्षण स्वरूपाने बहुविध असले पाहिजे. त्यामुळे भारताच्या आर्थिक आणि औद्योगिक कायापालटासाठी आवश्यक असे प्रशिक्षित मनुष्यबळ सातत्याने पुरविणे आपल्या शिक्षणव्यवस्थेला शक्य होईल. उच्च शिक्षणाच्या या समावेशक संकल्पनेमुळे सामाजिक न्याय आणि समता यांच्या दिशेने समाजपरिवर्तनाला गती देणे शक्य होईल. | सर्वांना सामावणारे शिक्षण स्वरूपाने बहुविध असले पाहिजे. त्यामुळे भारताच्या आर्थिक आणि औद्योगिक कायापालटासाठी आवश्यक असे प्रशिक्षित मनुष्यबळ सातत्याने पुरविणे आपल्या शिक्षणव्यवस्थेला शक्य होईल. उच्च शिक्षणाच्या या समावेशक संकल्पनेमुळे सामाजिक न्याय आणि समता यांच्या दिशेने समाजपरिवर्तनाला गती देणे शक्य होईल. |

| | | |
|---|---|---|
| चरित्र आणि चारित्र्य | शिक्षण म्हणजे फक्त नोकरी हा विचार आजच्या शिक्षणातून दूर व्हावा. कौशल्यनिर्मिती हेच शिक्षणाचे उद्दिष्ट असायला हवे. | शिक्षण म्हणजे फक्त नोकरी हा विचार आजच्या शिक्षणातून दूर व्हावा. कौशल्यनिर्मिती हेच शिक्षणाचे उद्दिष्ट असायला हवे. |
| ध्यासपर्व | देशातील तरूण विद्यार्थी देशाचे वैज्ञानिक भवितव्य घडवित असतात. त्यासाठी या तरूणांना शिक्षणाच्या विविध भौतिक सुविधा, इमारती, प्रयोगशाळा उपलब्ध होणे हे उद्दिष्ट शिक्षणाचेआहे. | देशातील तरूण विद्यार्थी देशाचे वैज्ञानिक भवितव्य घडवित असतात. त्यासाठी या तरूणांना शिक्षणाच्या विविध भौतिक सुविधा, इमारती, प्रयोगशाळा उपलब्ध होणे हे उद्दिष्ट शिक्षणाचेआहे. |

### ४.१.५.३ चारित्र्य संवर्धनासाठी शिक्षण :—

म.बा.कुंडले यांच्या मतेशिक्षणाचे महत्वाचे उदिद्ष्ट 'चारित्र्यवान माणसाची निर्मिती करणे' हे आहे सद्गुण व सदाचारासंदर्भात उदात्त व स्थिरवृती रूजवत, योग्य अस्मिता निर्माण करून, तसेच विचार करण्यास व्यक्तीला प्रवृत्त करणे ही चारित्र्य निर्मितीची प्रक्रिया आहे. देशाचे भविष्य चारित्र्यवान नागरिकावर अवलंबून आहे. सार्वजनिक जीवनातील साधन शूचिता, विश्वासूवृत्ती, भ्रष्टाचाराचा तिरस्कार या सदगुणांचा अवलंब समाजाने आणि समाजातील नेतृत्वाने जाणीवपूर्वक केला तर हा देश निश्चितपणे जागतिक महासत्ता बनू शकतो असे प्रतिपादन करून चारित्र्यसंवर्धनाचा पुरस्कार ॲड्. शिंदे यांनी आपल्या लेखनात केला आहे.

**कोष्टक क्र ४.१.५.३**

**चारित्र्य संवर्धनासाठी शिक्षण**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| भावलेली माणसं | विद्यार्थ्यांमध्ये देशाबद्दल प्रेम, समाजाबद्दल बांधिलकीची भावना, शिक्षकांमध्ये भरभरून देण्याची वृत्ती निर्माण करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असायला हवे. | विद्यार्थ्यांमध्ये देशाबद्दल प्रेम, समाजाबद्दल बांधिलकीची भावना, शिक्षकांमध्ये भरभरून देण्याची वृत्ती निर्माण करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असायला हवे. |

| | | |
|---|---|---|
| चरित्र आणि चारित्र्य | शिक्षणातून श्रमसंस्कृतीचा विकास व्हायला पाहिजे. श्रमाशिवाय समाजातील चारित्र्याचा विकास होऊ शकत नाही. श्रमशिक्षण हेच चारित्र्याचे, शीलाचे, समानतेचे शिक्षण आहे. | शिक्षणातून श्रमसंस्कृतीचा विकास व्हायला पाहिजे. श्रमाशिवाय समाजातील चारित्र्याचा विकास होऊ शकत नाही. श्रमशिक्षण हेच चारित्र्याचे, शीलाचे, समानतेचे शिक्षण आहे. |
| चरित्र आणि चारित्र्य | कोणत्याही देशाचे भवितव्य, हे त्या देशातील चारित्र्यशील, नीतिमान आणि कर्तव्यनिष्ठ अशा नागरिकांवर अवलंबून असते. अशा नागरिकांशिवाय देशाची प्रगती होऊच शकत नाही आणि असे नागरिक शिक्षणातून मिळणाऱ्या संस्कारातूनच निर्माण होऊ शकतात असे संस्कार करणारे शिक्षण हवे आहे. | कोणत्याही देशाचे भवितव्य, हे त्या देशातील चारित्र्यशील, नीतिमान आणि कर्तव्यनिष्ठ अशा नागरिकांवर अवलंबून असते. अशा नागरिकांशिवाय देशाची प्रगती होऊच शकत नाही आणि असे नागरिक शिक्षणातून मिळणाऱ्या संस्कारातूनच निर्माण होऊ शकतात असे संस्कार करणारे शिक्षण हवे आहे. |
| ध्यासपर्व | प्रगतीसाठी ज्ञान पाहिजे, ज्ञानार्जनासाठी नियोजन पाहिजे, नियोजनासाठी विचार पाहिजे, विचारामागे प्रेरणा पाहिजे, प्रेरणेसाठी ध्येयवाद पाहिजे, ध्येयवादाला नैतिकतेचे अधिष्ठान पाहिजे असे नैतिक अधिष्ठान चारित्र्यशील शिक्षणातूनच निर्माण होते. | प्रगतीसाठी ज्ञान पाहिजे, ज्ञानार्जनासाठी नियोजन पाहिजे, नियोजनासाठी विचार पाहिजे, विचारामागे प्रेरणा पाहिजे, प्रेरणेसाठी ध्येयवाद पाहिजे, ध्येयवादाला नैतिकतेचे अधिष्ठान पाहिजे असे नैतिक अधिष्ठान चारित्र्यशील शिक्षणातूनच निर्माण होते. |

### ४.१.५.४ धर्म आणि शिक्षण :—

धार्मिक शिक्षणाची आवश्यकता मान्य करून आपल्या देशाने धर्मनिरपेक्ष शिक्षणास महत्त्व दिलेले आहे. सर्व धर्मातील समानतत्त्वे विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविणे म्हणजे धर्म शिक्षण हेच महात्मा गांधीजींचे तत्त्वज्ञान लेखकाने स्वीकारून त्या संदर्भात उपयुक्त सूचना केल्या आहेत.

**कोष्टक क्र ४.१.५.४**

**धर्म आणि शिक्षण**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| भावलेली माणसं | समाजातील जाती—जातीतील भेद, स्त्री—पुरूष भेद, गरीब—श्रीमंत भेद शिक्षणामुळेच दूर होऊ शकतो. | समाजातील जाती—जातीतील भेद, स्त्री—पुरूष भेद, गरीब—श्रीमंत भेद शिक्षणामुळेच दूर होऊ शकतो. |
| चरित्र आणि चारित्र्य | धार्मिक शिक्षणाला वगळून शालेय शिक्षण यशस्वी ठरणार नाही. तसेच धार्मिक श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांची वस्तुस्थिती शिक्षणातून प्रगट व्हावी असे मत लेखक व्यक्त करतात. | धार्मिक शिक्षणाला वगळून शालेय शिक्षण यशस्वी ठरणार नाही. तसेच धार्मिक श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांची वस्तुस्थिती शिक्षणातून प्रगट व्हावी. |

**४.१.५.५ आदर्शवाद आणि शिक्षण :—**

अरविंद दुनाखे यांच्या मतेआदर्शवादाच्या तत्त्वानुसार एकूण आत्मस्वरूपी ओळख, विश्वांतर्गत सत्याचा शोध घेणे व त्या सत्यज्ञानाच्या प्रकाशात शुद्ध, सात्विक, चारित्र्य संपन्न व दैवी जीवन जगणे हे मानवी जीवनाचे ध्येय मानले आहे. या ध्येयानुसार मानवी संस्कृतीचा विकास करावयाचा असेल तर शिक्षणाला आदर्शवादाची बैठक देऊन जीवनाचा स्तर उंचावावा लागेल. आपल्या प्राचीन परंपरांमध्ये आदर्श जीवन कसे जगावे याची उत्तम उदाहरणे दिलेली आहेत. जुन्या विचारातील जे चांगले आहे ते मानवाला भविष्यकाळाची शिदोरी म्हणून बरोबर घेवून जावे लागणार आहे असे मत लेखकाच्या विविध लेखातून व्यक्त होते. आधुनिक काळात आदर्शवादाची असणारी आवश्यकता लेखकाने विविध लेखातून प्रतिपादन केली आहे.

**कोष्टक क्र ४.१.५.५**

**शिक्षणातील आदर्शवाद**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| भावलेल्या प्रस्तावना 'आठवणीतले दिवस' | ग्रामीण भागातील सर्वसामान्य देखील आता वाचन, लेखन संस्कृतीमध्ये मोलाची भर घालीत आहेत. वास्तवावर आधारीत लेखन हे नेहमीच प्रभावी ठरते. | सत्य आणि वास्तव लेखन समाजासमोर यायला हवे. |
| भावलेल्या प्रस्तावना 'आठवणीतले दिवस' | कार्याविन वांझोटया कल्पना विलासातील लिखानाचा बाजार झाला. काम करणाऱ्यांचे लिखानच झाले नाही. ही एक शोकांतिकाच म्हणावी लगेल. | जे, जे चांगले आदर्श आहे ते, ते कार्य सर्वासमोर यायला हवे. |
| भावलेल्या प्रस्तावना 'आठवणीतले दिवस' | समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, राजकारण या सर्व क्षेत्रात या मानवी मूल्यांची जपवणूक ही मानवी मूल्य संवर्धनासाठी आवश्यक ठरतात. | जीवनातील प्रत्येक क्षेत्रात मूल्य शिक्षणाची नितांत गरज आहे. |
| भावलेल्या प्रस्तावना 'प्रसन्नतेचा पारिजात' | जो दुसऱ्यांसाठी जगतो त्याचे जगणे अमरात्वचेच असते. | जो दुसऱ्यांसाठी जगतो त्याचे जगणे अमरात्वचेच असते. |
| ध्यासपर्व | ज्ञान वर्धिष्णू असते. ज्ञानाच्या नवनवीन प्रवाहाशी सतत संपर्क ठेवावा लागतो. त्यामुळे ज्ञानात भर पडत असते. त्यासाठी ज्ञानसाधना करावी लागते. | साधनेशिवाय ज्ञान मिळत नाही ज्ञानाशिवाय मनुष्याला शहाणपण येत नाही. |
| भावलेली माणसं | I am not a man of wisdom but I am a lover of lovers of wisdom. | I am not a man of wisdom but I am a lover of lovers of wisdom. |
| प्रश्न आहे मूल्यांचा | जन्माला येणे, जगणे व लयाला जाणे हा सृष्टीनियम आहे, त्यात आत्मभान ठेवणे हे सर्वात महत्त्वाचे. | शिक्षणातून आत्मभान असणारा नागरिक घडविणे गरजेचे आहे. |

## ४.१.५.६ निसर्गवाद आणि शिक्षण :—

अरविंद दुनाखे यांच्या मतेकोणत्याही पुस्तकी, कृत्रिम, गतिशून्य, निर्जिव व साचेबंद शिक्षणपद्धती विरूद्ध घडून आलेली क्रांती म्हणजे निसर्गवाद होय. त्याची मूलभूत सूत्रे म्हणजे निसर्गाकडे परत जा व कृत्रिमता हटाव ही आहेत. त्याचा संबंध आपल्याला निसर्गवादाशी जोडता येतो. निसर्गवादामध्ये ज्या भौतिक पर्यावरणाला प्राध्यान्य दिले जाते तेच खरे नैसर्गिक पर्यावरण मानले जाते. आपल्या देशात निसर्गवादाचे पुरस्कर्ते म्हणून रविंद्रनाथ टागोरांना अग्रक्रम दिला जातो.आधुनिक काळात निसर्गवादाची असणारी

आवश्यकता ॲड्. शिंदे यांनी विविध लेखातून प्रतिपादन केली आहे.

## कोष्टक क्र ४.१.५.६
## निसर्गवाद आणि शिक्षण

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| भावलेली माणसं | जो देश मातीला जपू शकत नाही, तो देश टिकू शकत नाही या डॉ कार्व्हर यांच्या विचाराचा आमच्या शिक्षणाने गांर्भीयाने विचार करायला हवा. आमच्या शिक्षणातून विद्यार्थ्यांला निसर्गावर प्रेम करायला शिकविणे गरजेचे आहे. धरणीमातेचे वस्त्रहरण, प्रदुषणाचा राक्षस थांबविणे, थोपविणे शिक्षणातूनच शक्य आहे. वर्गातील व्याख्यानापेक्षा शेतातील कृती जास्त महत्त्वाची आहे | ॲड्. शिंदे यांच्या मते जो देश मातीला जपू शकत नाही, तो देश टिकू शकत नाही या डॉ कार्व्हर यांच्या विचाराचा आमच्या शिक्षणाने गांर्भीयाने विचार करायला हवा. आमच्या शिक्षणातून विद्यार्थ्यांला निसर्गावर प्रेम करायला शिकविणे गरजेचे आहे. धरणीमातेचे वस्त्रहरण, प्रदुषणाचा राक्षस थांबविणे, थोपविणे शिक्षणातूनच शक्य आहे. वर्गातील व्याख्यानापेक्षा शेतातील कृती जास्त महत्त्वाची आहे. |
| चरित्र आणि चारित्र्य | 'खरे शिक्षण' हे विद्यार्थी घडविण्याचे शिक्षण असते. शिक्षणात श्रमसंस्कृतीची जोपासना केली तर गोरगरीबांना शिक्षण घेता येऊ शकेल. सर्वांसाठी शिक्षण, सर्वांगीण शिक्षण हा उपक्रम यशस्वीरित्या राबविता येऊ शकेल. केवळ सफेद कॉलरचे पुस्तकी पंडीत निर्माण करणे, तसेच बेकारांचे लोंढे निर्माण करणे ही आजच्या शिक्षणाची दिशा बदलता येईल. विद्यार्थ्यांचे मातीशी नाते राहील आणि मायभूमीशी शिक्षणाची नाळ जोडता येईल. त्याचबरोबर सर्व तऱ्हेच्या ज्ञानाच्या क्षेत्रात उच्चशिक्षित होऊन विद्यार्थी विश्वनागरीक | ॲड्. शिंदे यांच्या मते 'खरे शिक्षण' हे विद्यार्थी घडविण्याचे शिक्षण असते. शिक्षणात श्रमसंस्कृतीची जोपासना केली तर गोरगरीबांना शिक्षण घेता येऊ शकेल. सर्वांसाठी शिक्षण, सर्वांगीण शिक्षण हा उपक्रम यशस्वीरित्या राबविता येऊ शकेल. केवळ सफेद कॉलरचे पुस्तकी पंडीत निर्माण करणे, तसेच बेकारांचे लोंढे निर्माण करणे ही आजच्या शिक्षणाची दिशा बदलता येईल. विद्यार्थ्यांचे मातीशी नाते राहील आणि मायभूमीशी |

### ४.१.५.७ कार्यवाद आणि शिक्षण :—

अरविंद दुनाखे यांच्या मते कार्यवादी विचारसरणीनुसार शिक्षण ही जीवनाची तयारी नसून ते जीवनच आहे असे मानले जाते. शिक्षणाची सुरूवात व्यक्तिगत गरजांपासून होऊन त्याला सामाजिक परिमाण लाभणे अपेक्षित आहे.

**कोष्टक क्र ४.१.५.७**

**कार्यवाद आणि शिक्षण**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| भावलेली माणसं | शिक्षण म्हणजे फक्त नोकरी हा विचार आजच्या शिक्षणातून दूर व्हावा. कौशल्यनिर्मिती हेच शिक्षणाचे उद्दिष्ट असायला हवे. | ॲड्. शिंदे यांच्या मते शिक्षण म्हणजे फक्त नोकरी हा विचार आजच्या शिक्षणातून दूर व्हावा. कौशल्यनिर्मिती हेच शिक्षणाचे उद्दिष्ट असायला हवे. |
| विचारवेध | विद्यापीठातील शिक्षण हे केवळ पुस्तकी न राहता त्याची व्यवहाराशी सांगड घालण्याची नितांत गरज आहे. | ॲड्. शिंदे यांच्या मते विद्यापीठातील शिक्षण हे केवळ पुस्तकी न राहता त्याची व्यवहाराशी सांगड घालण्याची नितांत गरज आहे. |

### ४.१.५.८ वास्तववाद आणि शिक्षण :—

अरविंद दुनाखे यांच्या मतेवास्तववादी शिक्षणात वास्तव जीवनात केलेला विचार आणि व्यावहारिक जीवनात निर्माण झालेल्या विविध प्रकारच्या समस्यांना व गरजांना दिलेले प्राधान्य या महत्त्वाच्या गोष्टी आहेत. वास्तववादी विचार अनुभवावर विश्वास ठेवतो हे सत्य असले तरी ज्या गोष्टींचा अनुभव नाही अशा संदिग्ध भूमिकेमुळे लेखकाने अल्पप्रमाणातच वास्तववादी दृष्टिकोनावर साहित्यातून कटाक्ष टाकला आहे. मरणाचे स्मरण असावे, वृद्धावस्था अपरिहार्य आहे, कलावंताचे मूल्य पैशामध्ये केले जाते, भावनांचें, मार्केटिंग

होत आहे, विद्यार्थ्यांनी वास्तववादी स्वप्ने पाहवीत हे विषय मांडलेले आहेत.

### कोष्टक क्र ४.१.५.८
### वास्तववाद आणि शिक्षण

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| भावलेली माणसं | ग्रामीण महिला, आदिवासी बांधव हे खूपच मागासलेल्या अवस्थेत आहेत. तरूणांपैकी फार मोठी संख्या बेकार आहे. शहरात झोपडपट्टया, फूटपाथवर राहणारी मोठी लोकसंख्या आहे. शिवाय नागरीवस्तीला भेडसावणाऱ्या हवा, पाणी, प्रदुषणापासून तर आरोग्यापर्यंतच्या समस्या, रस्ते, वाहतूक, शिस्त आणि कायदा सुव्यवस्था यांच्या समस्या आ वासून उभ्या आहेत. सगळया क्षेत्राला लाचलुचपतीने ग्रासले आहे. भ्रष्टाचार वाढविणारा वर्ग हा तर अत्यंत सुशिक्षित व शिकलेला आहे. बहुतेकांना पदव्यांची शेपटे चिकटलेली आहेत. अशा तऱ्हेची भ्रष्ट माणसे देशाला शक्तीशाली आणि सामर्थ्यवान बनवू शकतील काय? | ॲड्. शिंदे यांच्या मते ग्रामीण महिला, आदिवासी बांधव हे खूपच मागासलेल्या अवस्थेत आहेत. तरूणांपैकी फार मोठी संख्या बेकार आहे. शहरात झोपडपट्टया, फूटपाथवर राहणारी मोठी लोकसंख्या आहे. शिवाय नागरीवस्तीला भेडसावणाऱ्या हवा, पाणी, प्रदुषणापासून तर आरोग्यापर्यंतच्या समस्या, रस्ते, वाहतूक, शिस्त आणि कायदा सुव्यवस्था यांच्या समस्या आ वासून उभ्या आहेत. सगळया क्षेत्राला लाचलुचपतीने ग्रासले आहे. भ्रष्टाचार वाढविणारा वर्ग हा तर अत्यंत सुशिक्षित व शिकलेला आहे. बहुतेकांना पदव्यांची शेपटे चिकटलेली आहेत. अशा तऱ्हेची भ्रष्ट माणसे देशाला शक्तीशाली आणि सामर्थ्यवान बनवू शकतील काय? |
| विचारवेध | बहुसंख्य लोकांना निरक्षर ठेवणारी आणि धनदांडग्यांना भरभरून माप टाकणारी व्यवस्था असे स्वरूप शिक्षण व्यवस्थेला आलेले आहे. शिक्षणाचा आपण अपेक्षित असा प्रसार विस्तार करू शकलो नाही आणि आवश्यक अशी गुणवत्ता टिकवू शकलो नाही, असे वाटावे अशी आजची शैक्षणिक परिस्थिती आहे. | ॲड्. शिंदे यांच्या मते बहुसंख्य लोकांना निरक्षर ठेवणारी आणि धनदांडग्यांना भरभरून माप टाकणारी व्यवस्था असे स्वरूप शिक्षण व्यवस्थेला आलेले आहे. शिक्षणाचा आपण अपेक्षित असा प्रसार विस्तार करू शकलो नाही आणि आवश्यक अशी गुणवत्ता टिकवू शकलो नाही, असे वाटावे अशी आजची शैक्षणिक परिस्थिती आहे. |

**४.१.६ आजच्या शिक्षणाची स्थिती : स्वरूप व अपेक्षा :—**

म.बा.कुंडले यांच्या मतेकोणत्याही काळात व देशात शिक्षणप्रणालीचे स्वरूप ठरविताना तत्कालीन जीवनाच्या गरजा, प्रचलित आदर्श, मूल्ये विचारात घ्यावी लागतात. शिक्षण प्रक्रियेत व्यक्तिला निसर्गप्राप्त शिक्षणावर अवलंबून राहता येत नाही तर अनेक गोष्टी त्याला प्रयत्नपूर्वक शिकाव्या लागतात. त्यासाठी मार्गदर्शन करणे हे शिक्षकाचे कार्य असते.

**कोष्टक क्र ४.१.६**

**आजच्या शिक्षणाची स्थिती**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार |
|---|---|
| विचारवेध पान ४५ | आपल्या शिक्षणाचा भारतीय संस्कृतीवर आधारित असलेला पायाच हल्लीच्या शिक्षण पद्धतीतून पोखरून काढण्यात आलेला आहे. शिक्षणाला बेगडी स्वरूप आलेले आहे.आजच्या शिक्षणात विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास नाही. खेळणे, बागडणे, व्यायाम, व्यासंग आणि निसर्गाशी मैत्री या सर्व बाबी शिक्षणातून पूर्ण पुसल्या आहे. फक्त मार्कासाठी शिक्षण असे दृश्य दिसते. मुलांनी शर्यतीच्या घोडयासारखे या शर्यतीत दमछाक व्हायचे आणि ही शर्यत जिंकायची कशासाठी तर फक्त पैसे मिळविण्यासाठी. शिक्षणातील ज्ञानावस्था निघून गेलेली आहे. ही व्यवस्था धनालाच सर्वस्व मानू लागली आहे. पैशाने सर्व काही विकत घेता येते. विद्यापीठेही पदव्या देण्याच्या टाकसाळी झालेल्या आहेत. मात्र जीवनाला पैशाची आवश्यकता नाही, असा विपरीत अर्थ यावरून काढू नये. |
| भावलेली माणसं पान ४५ | 'सार्वत्रिक शिक्षण' हा आपल्याकडचा शिक्षणासंबंधीचा शब्दप्रयोग आता 'चोपडा ढबू' झाला आहे. आम जनतेचे शिक्षण चीनमध्ये चालले होते. ते सर्वांना साक्षर करण्याचे शिक्षण होते. इमारती तर सोडाच पण साधन सामग्रीचा बाऊ तेथे नव्हता आणि तथाकथित स्केलचे अवडंबर माजवणारे 'आयोग' ही नव्हते. बाजारू शिक्षक नव्हते. होता तो सर्व सेवाभाव. |

**४.१.७शिक्षकाचे गुणविशेष :—**

विद्यार्थ्यांच्या सुप्त क्षमतांना चालना देण्याची शिक्षकांवर जबाबदारी असते. शिक्षकांमध्ये बुद्धिमत्ता, कल्पकता, योजकता, उपक्रमशीलता प्रायोगिक दृष्टी व नेतृत्व या गुणांची नितांत

आवश्यकता असते. ॲड्. शिंदेयांनीयासंदर्भात सविस्तर विवेचन केले आहे.

## कोष्टक क्र ४.१.७

## शिक्षकाचे गुणविशेष

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| भावलेल्या प्रस्तावना 'हडपसरपर्व' | शिक्षक म्हणजे पुस्तकी ज्ञानाचे ओझे वाहणारा दलाल नव्हे. | शिक्षक म्हणजे पुस्तकी ज्ञानाचे ओझे वाहणारा दलाल नव्हे. |
| भावलेल्या प्रस्तावना 'मुकादम तात्यांची स्मरणगाथा' | त्यावेळचे शिक्षक अर्थार्जनाकडे अजिबात न पाहता केवळ ध्येयाने प्रेरित होऊन काम करायचे खस्ता खायचे. गैरसोयी सोसायचे. | शिक्षक हा ध्येयवेडा असावा. ध्येयाने प्रेरित शिक्षकच विद्यार्थी घडवू शकतो. |
| भावलेल्या प्रस्तावना 'मुकादम तात्यांची स्मरणगाथा' | शिक्षण क्षेत्रात सानेगुरूजी असावेत ही देशवासियांची अपेक्षा, तथापि दर्शन होते ते फक्त नानेगुरूजींचे | शिक्षकाने फक्त पगारापुरते काम न करता, जीव ओतून काम करावे. |
| 'गोष्ट दगड धोंडयाची' | अंत:करणातील माणुसकीचे या शिक्षकांनी धोंडिबाला दर्शन दिले. | समाजासाठी आणि सामाजिक बांधिलकी या जाणिवा शिक्षकांनी जोपासणे गरजेचे आहे. |
| 'गोष्ट दगड धोंडयाची' | पदवीमुळे पद मिळते परंतु पद सांभाळणे व त्याची प्रतिष्ठा वाढवणे सर्वश्री त्या व्यक्तीच्या हातात असते. शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्यांनाही विद्यार्थी हाच आपला देव आहे असे समजून अहर्निष शिकवावे. आपल्या पेशाशी प्रतारणा करणे महापाप आहे. | शिक्षकांनी विद्यार्थी हाच देव मानून प्रामाणिकपणे अध्यापन करावे. |
| 'गोष्ट दगड धोंडयाची' | मनुष्याच्या संपूर्ण आयुष्यात सुमारे १५–१६ राष्ट्राध्यक्ष येऊन जातात. तथापि खरा उत्कृष्ट शिक्षक मात्र माणसाच्या आयुष्यात एकदाच येऊन जातो. | उत्कृष्ट शिक्षक परिसासारखा असतो. |

### ४.१.८ उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षकाची भूमिका :—

अरविंद दुनाखे यांच्या मते सदयपरिस्थितीतील पुस्तकी शिक्षणाला प्रत्यक्ष अनुभवांचा आधार नसतो. शिक्षणाचा आणि जीवनाचा संबंध यात नसल्याने हे शिक्षण परिक्षोपयोगी आहे. त्यामुळे परंपरागत शिक्षण पद्धतीत अमुलाग्र बदल घडवून आणून आदर्श व स्वावलंबी नागरिक बनविण्याची जबाबदारी शिक्षकाला पार पाडावी लागणार आहे. या संदर्भात शिक्षकाची कर्तव्ये कोणती आहेत? याचे सविस्तर विवेचन लेखकाने केले आहे. विशेषत: महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी यांच्या आंतरक्रियेचा लेखक गांभीर्याने विचार करतात. आज विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही, शिक्षक केवळ अभ्यासक्रम संपवण्याची कसरत करतात, शिकूनही बेरोजगार असलेले तरूण विद्यार्थ्यांसमोर चुकीची उदाहरणे ठेवतात असे अनेक विषय आत्मियतने लेखकाने मांडलेले आहेत. परिपूर्ण व विशेष गुणांनी युक्त असलेले शिक्षकच आजच्या विद्यार्थ्याला विघातकतेकडून विधायकतेकडे वळवू शकतील अशी लेखकाची श्रद्धा आहे.

**कोष्टक क्र ४.१.८**

**शिक्षकाची भूमिका**

| पुस्तकाचे नाव | लेखाकाचे विचार |
|---|---|
| विचारवेधपान ३५ | शिक्षक विद्यार्थ्याला घडवितो, पण शिक्षकाला कोण घडवणार? शिक्षकांना सुद्धा प्रशिक्षण देऊन त्यांच्यातून चांगला शिक्षक घडविला पाहिजे त्यासाठी सेवापूर्व व सेवांतर्गत प्रशिक्षण दर्जेदार पद्धधतीने देणे गरजेचे आहे. |
| भावलेली माणसं पान ४० | शिक्षकांनी कितीही प्रशिक्षणे दिली. तरी त्यामध्ये फारसा बदल न दिसण्याचे कारण म्हणजे शिक्षकाने मला स्वत:ला बदलायचे आहे हे ठरविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना सतत नवीन दिले पाहिजे असा ध्यास असणारा शिक्षकच स्वत: घडत असतो. |
| भावलेली माणसं पान ५५ | शिक्षकांना विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक पालकत्व स्वीकारावे लागते. उत्कृष्ट शिक्षक विद्यार्थ्यांना शाळेला आणि समाजाला आकार देताना नकळतपणे स्वत:लाही आकार देत असतो.शिक्षकाचे कर्तव्य हे एकप्रकारे सतीचे वाण आहे. चारित्र्य, नीतीमत्ता, ध्येयवाद, कर्तव्यनिष्ठा, त्याग हे शब्द हल्लीच्या प्रचलित शिक्षण व्यवस्थेला भावणारे नसल्याचे दिसून येते. शिक्षकांनी चारित्र्यशील असायला पाहिजे. निर्व्यसनी असायला पाहिजे. कर्तव्यदक्ष असायला पाहिजे. आपल्या कार्यावर त्यांची नितांत श्रद्धा आणि निष्ठा असायला पाहिजे. अतोनात परिश्रम घेण्याची तर त्यांची तयारी पाहिजेच पण त्याशिवाय प्रसंगी त्याग करण्याची देखील मानसिकता त्याने जोपासली पाहिजे आणि एकप्रकारे आदर्शवत असे आपले व्यक्तिमत्त्व विकसित केले पाहिजे. |

| | |
|---|---|
| विचारवेध पान ४७ | शिक्षक हा समाजातला आदर्श घटक असल्याशिवाय खऱ्या अर्थाने तो शिक्षणासंबंधी आपले कर्तव्य पार पाडूच शकणार नाही. कदाचित धडे शिकविण्याचे काम तो करू शकेल. वेळेवर शाळेत जाणे, वेळापत्रकानुसार पाठयपुस्तकातून धडे शिकविणे आणि शाळेच्या तांत्रिक नियमाप्रमाणे वागणे यात तो काटेकोरही असू शकेल पण याचा अर्थ तो खऱ्या अर्थाने मुलांना शिकवू शकतो आणि खऱ्या अर्थाने तो 'शिक्षक' आहे असे म्हणता येणार नाही."An average teacher instructs, a good teacher guides, a great teacher inspires." |
| चरित्र आणि चारित्र्य पान ६७ | शिक्षकांजवळ प्रेरणा देण्यासाठी तशी ज्ञानसाधना पाहिजे तो देणारा पाहिजे आणि विद्यार्थीही घेणारे पाहिजेत असा शिक्षक 'खरा शिक्षक' असतो. |
| चरित्र आणि चारित्र्य पान १५ | 'खरे शिक्षण' हे विद्यार्थी घडविण्याचे शिक्षण असते. शिक्षक हा शिल्पकार असतो आणि तो शिल्पातून विद्यार्थ्याची मूर्ती आकाराला आणतो.उत्कृष्ट शिक्षकाला प्रत्येक विद्यार्थ्यात एक देखणे शिल्प दिसते. त्यात एक राजहंस राजहंसी दिसते. तो कोणत्याच विद्यार्थ्यांना 'ढ' ठरवित नाही. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये एक आगळेवेगळे अव्यक्त व्यक्तिमत्त्व अस्तित्वात असते. शिक्षकाने ते फक्त मुक्त करायला मदत करावयाची असते. अशा शिक्षकाच्या मदतीचा हात विद्यार्थ्यापर्यंत पोहचला की त्या विद्यार्थ्यातून एक विकसित असे सुरेख व्यक्तित्व आविष्कारीत होते आणि हेच खरे शिक्षकाचे काम असते. |
| चरित्र आणि चारित्र्यपान ३५ | शिक्षकाचे ध्येय हे खरे राष्ट्रबांधणीचे ध्येय असते. राष्ट्राची बांधणी ही देशाच्या आदर्श आणि देशप्रेमी नागरिकांच्यावर अवलंबून असते. आपल्या विद्यार्थ्यांमधून असे देशप्रेमी नागरिक घडविणे हे शिक्षकाचे काम असते. |
| भावलेली माणसं पान १२४ | शिक्षकांनी समाजाविषयीचा कृतज्ञभाव जागविला आणि थोर शिक्षकापासून प्रेरणा घेण्याचा मनापासून प्रयत्न केला तर त्यांच्यातूनही 'उत्कृष्ट शिक्षक' तयार होऊ शकतात. अनेकात तसे सामर्थ्य आहे.शिक्षकांचे विद्यार्थ्यांवर प्रेम नसणे हा शिक्षणातला सर्वात मोठा अडथळा. |
| भावलेली माणसं १३५ | धनवृद्धीपेक्षा ज्ञानवृद्धीला शिरोधार्य मानणारे शिक्षक नाणे गुरूजी नाहीत, तर सानेगुरूजी आहे. |

## ४.१.९जागतिकीकरण, आधुनिकीकरण, उदारीकरणाचे शैक्षणिक तत्त्वज्ञानावरील परिणाम :—

### कोष्टक क्र ४.१.९

### शैक्षणिक तत्त्वज्ञानावरील परिणाम

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार |
|---|---|
| शिक्षण आणि समाज<br>पान ३५ | जागतिकीकरणामुळे संपूर्ण जग ही बाजारपेठ बनली असल्याने प्रत्येक गोष्टीला नैतिकच दृष्टीने नव्हे तर विक्री किंमतीच्यादृष्टीने महत्त्व दिले आहे. आधुनिकीकरण म्हणजे सामाजिक व्यवहारात बुद्धिवादी दृष्टिकोन आणणे किंवा भौतिक प्रगतीचा जीवनात उपयोग करणे. उदारीकरण म्हणजे व्यापार आणि उद्योग व्यवसायावरील अनावश्यक नियंत्रणे कमी करण्याची प्रक्रिया आपल्या देशातील समाजावर जागतिकीकरण, आधुनिकीकरण, उदारीकरण यांचा बरावाईट परिणाम झालेला दिसून येतो. मात्र या धोरणांच्या स्विकृतीमुळे कमावले कमी आणि गमावले जास्तच हे विदारक सत्य लेखकाने अनेक लेखातून मांडले आहे. अध्यात्मिक संस्कृतीचा पाया यामुळे डळमळीत झाला असून सर्व समाज चंगळवाद आणि उपभोगता यांच्या आहारी गेल्याची लेखकाने खंत व्यक्त केली आहे. |
| शिक्षण आणि समाज<br>पान ३५ | जागतिकीकरणाच्या रेट्याला सामोरे जावेच लागणार आहे. या प्रक्रियेत बऱ्याच क्षेत्रात स्पर्धेला तोंड दयावे लागणार आहे. अनिष्ट स्थिती बदलण्यासाठी आपल्या देशाला मोठी लढाई लढावी लागणार आहे. त्यासाठी सर्वसामान्यांना इंग्रजी भाषा, माहिती तंत्रज्ञान व तंत्रज्ञानाच्या अन्य शाखा या संबंधीच्या शिक्षणाची संधी देऊन समर्थ बनविण्याची गरज आहे. |
| चरित्र आणि चारित्र्यपान ४४ | जागतिकीकरणाला सामोरे जाताना सर्वात महत्त्वाचे म्हणजे चारित्र्य आणि शील जोपासणारे शिक्षक आम्हाला हवे आहे. चारित्र्यविना शिक्षण हे गांधीजींनी सामाजिक पाप मानले आहे. नीतिमान समाज शिक्षणातून निर्माण झाला पाहिजे. नीतिमान शिक्षक, नीतिमान शिक्षणतज्ज्ञ, विद्यार्थी हाच २१ व्या शतकाच्या आव्हानाला सामोरे जाणारी आमची शक्तीस्थाने आहेत. अशा शक्तीस्थानांवर आरूढझालेले आमचे शिक्षणक्षेत्र<br>आत्मविश्वासाने जागतिकीकरणाला सामोरे जाऊ शकेल. |
| चरित्र आणि चारित्र्यपान ४५ | जागतिकीकरणाला सामोरे जाताना आपणाकडे काय साधनसामग्री आहे, ती कशी आहे, ती कितपत उपयोगी ठरणार आहे या संबंधीची जाणीव आपल्या |

## ४.२अॅड्. शिंदे यांच्या वाङ्.मयातील शैक्षणिक मानसशास्त्राचा विचार शोध :—

वा.ना.दांडेकर यांच्या मते मानवी वर्तनात आंतरिक व बाहय वर्तनाचा समावेश होतो. बालक जन्माला आल्यानंतर त्याच्या

कुटुंबातील इतर व्यक्तिंशी संपर्क येतो. मोठेपणी कुटुंब, बाहेरच्या व्यक्तिंशी म्हणजेच समाजाशी त्याचा संपर्क येतो. या सहवासात तो अनेक बऱ्या—वाईट गोष्टी आत्मसात करतो. या काळातील मानवाच्या सर्व प्रकारच्या शारीरिक, मानसिक क्रिया प्रतिक्रियात्मक वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे मानसशास्त्र होय. विविध विचारवंत शिक्षणातील सुधारणेसाठी शैक्षणिक मानसशास्त्राचा आध ाार घेतात. आपल्या वाङ्.मयातून ॲड्. शिंदे यांनी शैक्षणिक मानसशास्त्रातील खालील घटकांना स्पर्श केलेला आहे.

**४.२.१ शैक्षणिक मानसशास्त्र, अर्थ, स्वरूप, संकल्पना :—**

**कोष्टक क्र ४.२.१**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| भावलेल्या प्रस्तावना | मानवी समाजाच्या संस्कृती संवर्धनासाठी माणसाच्या मनामधले प्रेम, आशा आणि कृतज्ञभाव हे तीन घटक अतिशय आवश्यक असतात. | मानवी मनाचा विकास झाला तरच मानवी वर्तन सुधारेल. प्रेम, आशा, कृतज्ञभाव या तीन गोष्टींनीच मानवी वर्तनाचा विकास होईल. |
| विचारवेध | बालकांच्या वर्तनाला योग्य वळण लहान वयातच लागू शकते. त्यासाठी शाळा आणि कुटुंब यांचे पालकत्वच महत्त्वाचे | जबाबदार पालकत्वातूनच उदयाची सक्षम पिढी आपल्याला घडविता येईल. त्यासाठी पालकांनी आपल्या मुलांना समजून घ्यायला हवे. |
| चरित्र आणि चारित्र्य | माणसे कोणत्या परिस्थितीत काय वर्तन करतील हे सांगता येत नाही. | मानवी वर्तनाचा अभ्यास केल्यानंतरच विशिष्ट परिस्थितीतील वर्तनाचे मूल्यमापन करता येते. |

**अर्थनिर्वचन :—**

मनात असलेल्या विचारांचे दृश्य स्वरूप म्हणजे वर्तन होय. वर्तन सुधारण्यासाठी विचार सुधारावे लागतील. मनाची मशागत करावी लागेल. आपल्या मुलांना चांगले आदर्श कोण हे पटवून दयावे लागेल. चांगल्या विचारांचे महत्त्व समजावून सांगावे लागेल. जबाबदार पालकत्वाची भूमिका योग्य प्रकारे निभावली तर निश्चितच चांगला, सकारात्मक वर्तन बदल मुलांमध्ये दिसून येईल.

### ४.२.२ बालकाची वाढ व विकास :—

ह.ना.जगताप यांच्या मतेअनुवंश आणि परिस्थिती यांच्यातील भिन्नतेमुळे बालकाच्या विशिष्ट शारीरिक व मानसिक परिपक्वतेवर विकास अवलंबून असतो. विकास प्रक्रियेतील अडथळयांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अध्ययन व अध्यापनात जाणवतो. ॲड्. शिंदे यांनी अध्यापनाचे प्रयोगशील कार्य केलेले असल्याने यासंदर्भातील स्वानुभव येथे शब्दरूप घेऊन प्रगटताना दिसतात.

**बालकाची वाढ व विकास :—**

**कोष्टक क्र ४.२.२**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| चरित्र आणि चारित्र्य | ध्येयवाद, आत्मविश्वास, स्वावलंबी वृत्ती या गुणांनी विद्यार्थ्यांचा विकास होतो. | विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठी ध्येयवाद, आत्मविश्वास व स्वावलंबी वृत्तीची आवश्यकता असते. |
| विचारवेध | मुलांच्या वाढीमध्ये आईची भूमिका ही महत्त्वाची असते. | आईकडून होणारे संस्कार मुलांना घडवितात. |
| भावलेली माणसं | बालपणी निसर्गाच्या सान्निध्यातच आम्ही वाढलो, त्यामुळे संघर्ष करण्याची क्षमता वाढली. | जीवनातील विविध प्रसंगांना सामोरे जातांना करावे लागणाऱ्या संघर्षातूनच व्यक्तिमत्त्व घडते. |
| शिक्षण आणि समाज | समाजाचा प्रभाव हा मुलांच्या वाढीवर होत असतो. | समाजातील रूढी, परंपरा, संस्कृती यांचा सुद्धा मुलांच्या विकासामध्ये सहभाग असतो. |

अर्थनिर्वचन :—बालकांच्या निकोप शारीरिक, मानसिक, बौद्धिक व भावनिक विकासासाठी शिक्षणाला व संस्काराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. लहान वयातील योग्य संस्कार आणि सवयी संपूर्ण आयुष्यभर उमटतात. यासाठी शिक्षक आणि पालक यांची मुलांच्या वाढीतील भूमिका महत्त्वाची आहे.

### ४.२.३ अध्ययन प्रक्रिया :—

वा.ना.दांडेकर यांच्या मते अध्ययन म्हणजे व्यक्तीने

सभोवतालच्या परिस्थितीला अनुसरून स्वत:च्या वर्तनात घडवून आणलेले टिकावू स्वरूपाचे बदल होण्याची प्रक्रिया होय अशी सर्वसामान्य व्याख्या अध्ययन प्रक्रियेसंदर्भात सांगीतली जाते. अध्ययन ही जीवनातील मुलभूत प्रक्रिया व प्रगतीचे साधन आहे. अध्ययनामध्ये अभिरूची, अवधान, मर्मदृष्टी, विचारशक्ती, चिकित्सकवृत्ती अशा विविध मानसिक प्रक्रियांचा समावेश होतो. अध्ययनावर परिणाम करणाऱ्या घटकांमध्ये अध्ययनकर्त्याचे वय, पक्वता, मन:स्थिती, लिंग, प्रगतीचे ज्ञान, प्रेरणा, प्रशंसा व निंदा, पारितोषिक व शिक्षा, थकवा, अवधान व अभिरूची शरीर रसायने याअंतर्गत घटकांचा तर सामाजिक व आर्थिक दर्जा, पूर्वानुभव, पाठयविषयाची अर्थपूर्णता, अध्ययन पद्धती या बाहय घटकांचा समावेश होतो. यासंदर्भात आपल्या वाड्.मयातून ॲड्. शिंदे यांनी अध्ययन प्रक्रियेची यशस्विता साध्य करण्यासाठी अनेक उपाय सुचविले आहेत.

**कोष्टक क्र ४.२.३**

**अध्ययन प्रक्रिया**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| शिक्षण आणि समाज | 'तुला राजाबाई टॉवर जिंकायचाय' अशी अध्ययनाची प्रेरणा कर्मवीरांनी निर्माण केली. | अध्ययन परिणामकारक होण्यासाठी प्रेरणा महत्त्वाची आहे. |
| चरित्र आणि चारित्र्य | 'समाजातील माणसांचा अभ्यास' सामाजिक भान वाढविते. | पुस्तकांचा अभ्यास म्हणजेच अध्ययन नव्हे. समाजात उघडया कानांनी डोळ्यांनी फिरलो तरी अनेक गोष्टी शिकायला मिळतात. |
| भावलेली माणसं | योग्य वेळी योग्य गोष्टींचा अभ्यास समाजाला यशोशिखरावर नेतो. | विद्यार्थीदशा अध्ययनासाठी आहे.या वयात अध्ययनच केले पाहिजे. |
| ध्यासपर्व | माझ्या शिकण्यामध्ये शिक्षकांच्या परिश्रमाचा मोठा सहभाग आहे. | शिक्षकांचे तळमळीचे शिकविणे मुलांच्या शिकण्यावर परिणाम करते. |

अर्थनिर्वचन :—अध्ययन म्हणजे सकारात्मक वर्तनबदल. हा वर्तनबदल होण्यासाठी शिक्षकांचे परिणामकारक अध्ययन, समाजातील परंपरा, रूढी, संस्कृती, कुटुंबातील सदस्य यांची मदत होते. अध्ययानाच्या प्रेरणा जितक्या प्रभावी तितके अध्ययन परिणामकारक.

**४.२.४ अध्यापनाचे मानसशास्त्र :—**

ह.ना.जगताप यांच्या मतेअध्यापन हे मूलत: औपचारिक व कृत्रिम स्वरूपाचे शिक्षक वर्तन आहे. अन्य व्यक्तिमध्ये अध्ययन घडवून आणण्याच्या हेतूने केलेली कृती म्हणजे अध्यापन असे या वर्तनाबाबत म्हटले जाते. अध्यापनात शिक्षक, विद्यार्थी, विषय आंतरक्रिया या चारही घटकांना महत्त्व आहे. अध्यापन प्रक्रियेशी अध्यापन परिणामकारकता, अध्ययन अनुभव, अध्यापन कार्य, अध्यापन क्षमता, अध्यापन वैशिष्टये या बाबी निगडीत असतात. ॲड्. शिंदे यांच्यासारख्या प्रयोगशील विचारवंत प्राध्यापकाने या संदर्भात केलेले लेखन हे शिक्षण क्षेत्राच्या दृष्टिने अमूल्य योगदान आहे.

**कोष्टक क्र ४.२.४**

**अध्यापनाचे मानसशास्त्र**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| ध्यासपर्व | मला भेटलेले सर्व शिक्षक मातारूपी शिक्षक होते. त्यांच्या शिकविण्यामुळे मी घडलो. | शिक्षकाच्या अध्यापनातील मायेचा आणि प्रेमाचा ओलावा विद्यार्थी घडवितो. |
| प्रश्न आहे मूल्यांचा | शिक्षकाचे विद्यार्थ्यावर प्रेम नसणे हा शिक्षणातील सर्वात मोठा अडथळा | शिक्षकाचे विद्यार्थ्यावर प्रेम नसणे हा शिक्षणातील सर्वात मोठा अडथळा |
| विचारवेध | शिक्षकाचे चारित्र्य, निर्व्यसनीपणा अध्यापनावर परिणाम करतो. | चारित्र्यवान, निर्व्यसनी शिक्षकाची मुले निर्व्यसनी चारित्र्यवान घडतात. |
| भावलेल्या प्रस्तावना | सर्वसाधारण शिक्षक सांगतो, चांगला शिक्षक मार्गदर्शन करतो. उत्कृष्ट शिक्षक प्रेरणा देतो. | सर्वसाधारण शिक्षक सांगतो, चांगला शिक्षक मार्गदर्शन करतो. उत्कृष्ट शिक्षक प्रेरणा देतो. |
| शिक्षण आणि समाज | ज्ञान, विज्ञान तंत्रज्ञानाची सांगड शिक्षकाने अध्यापनात घालावी. | शिक्षकाच्या अध्यापनात ज्ञान, विज्ञान तंत्रज्ञान यांचा त्रिवेणी संगम हवा. |

**अर्थनिर्वचन :—**शिक्षकाचे कर्तव्य हे एक सतीचे वाण आहे. शिक्षकाची आपल्या अध्यापनावर नितांत श्रद्धा, निष्ठा, प्रेम पाहिजे. अध्यापनासाठी अतोनात श्रम करण्याची तयारी पाहिजे. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान यांचा मेळ साधून शिक्षक उत्कृष्ट अध्यापन करू शकतो, यासाठी शिक्षकाजवळ उत्तम चारित्र्य असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**४.२.५ बुद्धिमत्ता :—**

वा.ना.दांडेकर यांच्या मते विशिष्ट उद्दिष्ट प्राप्तीसाठी अथवा अभिनव परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी उपजत प्रवृत्तीमध्ये पूर्वानुभवाच्या आधारे, प्राप्त परिस्थितीनुसार बदल घडवून आणण्यासाठीच्या अध्ययनक्षमतेमध्ये जे अमूर्त विचारसूत्र आढळते त्यास बृद्धिमत्ता म्हटले जाते. ॲड्. शिंदे यांनी आपल्या वाड्. मयातून बुद्धिमत्तेच्या संदर्भात अपवादात्मक स्वरूपातच निर्देश केलेला आढळतो. कदाचित बृद्धिमत्तेपेक्षा ही सामाजिक गुणवत्ता आणि नितीमत्ता यांना त्यांनी प्राधान्य जाणीवपूर्वक दिलेले दिसून येते.

**कोष्टक क्र ४.२.५**

**बुद्धिमत्ता, अनुवंश, परिस्थिती**

| पुस्तकाचे नाव | लेखाकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| भावलेल्या प्रस्तावना | सत्ता आणि मत्ता यांच्या गढूळ प्रवाहाने समाजपुरूषाची विवेकबुद्धी विकलांग झालेली आहे. | बुद्धिमत्तेला विवेकाचे अधिष्ठान नसेल तर तीच बुद्धिमत्ता समाजासाठी विष बनते. |
| भावलेली माणसं | बुद्धी हे मानवाला निसर्गाने दिलेले अमोघ शास्त्र आहे. बुद्धीच्या जोरावर त्याने ज्ञान आत्मसात केले. | बुद्धी हे मानवाला निसर्गाने दिलेले अमोघ शास्त्र आहे. बुद्धीच्या जोरावर त्याने ज्ञान आत्मसात केले. |
| चरित्र आणि चारित्र्य | शिक्षणातून माणसाला मानसिक व बौद्धिक सामर्थ्य निर्माण झाले पाहिजे. | शिक्षणातून माणसाला मानसिक व बौद्धिक सामर्थ्य निर्माण झाले पाहिजे. |
| प्रश्न आहे मूल्यांचा | प्रत्येक मुलाला मिळालेली बुद्धिमत्ता वेगळी असू शकते. एखादयाकडे लेखाक होण्याची एखादयाकडे शास्त्रज्ञ होण्याची बुद्धिमत्ता असते. | बुद्धिमत्ताचे प्रकार असतात याची जाणीव शिक्षकाला असावी. |
| ध्यासपर्व | बुद्धिचा वापर समाजासाठी करणारे देवदूत कमी होत आहेत. | बुद्धी ही समाजाच्या कल्याणासाठी वापरण्याचे शिक्षण शाळेशाळेतून देणे गरजेचे आहे. |

**अर्थनिर्वचन :—**बुद्धी हे मानवाला निसर्गाने दिलेले अमोघ शस्त्र आहे. बुद्धीच्या जोरावर त्याने ज्ञान आत्मसात केले. ज्ञान हाच चिरकाल प्रगतीचा पाया आहे. परंतु ज्ञानाचा वापर समाजाच्या कल्याणासाठी, प्रगतीसाठी केला पाहिजे. दहशतवादी, बलात्कारी, नक्षलवादी, दरोडेखोर, भ्रष्टाचारी, दंगेखोर सुद्धा प्रचंड बुद्धीमान असतात. परंतु बुद्धीचा वापर ते समाजाला त्रास देण्यासाठी करतात. यासाठी बुद्धीमत्तेला विवेकाचे कोंदण हवे. बुद्धीमत्तेला विचाराचा पाया हवा. शाळा आणि महाविद्यालयातून विविध प्रकारची बुद्धीमत्ता लाभलेल्या विद्यार्थ्यांना आपण बुद्धीचा समाजाच्या कल्याणासाठी उपयोग करण्याचे शिक्षण देऊयात.

### ४.२.६ व्यक्तिमत्त्व व व्यक्तिमत्त्व विकास :—

वा.ना.दांडेकर यांच्या मते व्यक्तिमत्त्व म्हणजे व्यक्तिचे ठळकपणे वेगळेपण दर्शविणाऱ्या, बोधात्मक, भावात्मक, क्रियात्मक व शारीरिक वैशिष्टयांचे एकात्म संघटन होय. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची लक्षणे लक्षात घेऊन शिक्षकाने विद्यार्थ्यांना सुरक्षितता लाभेल. त्यांची गरज पूर्ती होईल अशी शारीरिक भावनिक आणि बौद्धिक उपक्रमांची आखणी केल्यास त्याचा निश्चितपणे विद्यार्थ्यांना फायदा होतो. मात्र असे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षकांबरोबर पालकांची देखील आहे. त्याची जाणीव ॲड्. शिंदे यांनी सातत्याने करून दिलेली आहे.

**कोष्टक क्र ४.२.६**

**व्यक्तिमत्त्व व व्यक्तिमत्त्व विकास**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| पत्रसंवाद खंड – १ | स्वत:तील क्षमता ओळखून त्यांचा विकास म्हणजे खऱ्या अर्थाने व्यक्तिमत्त्व विकास होय. | स्वत:तील क्षमता ओळखून त्यांचा विकास म्हणजे खऱ्या अर्थाने व्यक्तिमत्त्व विकास होय. |
| ध्यासपर्व | भूमिगत जीवन, स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग, चळवळी, लढे यांच्यामुळे माझे जीवन खऱ्या अर्थाने समृद्ध झाले. | आयुष्यातील विविध प्रसंग, समस्या, अडचणी यांना दिलेल्या सकारात्मक प्रतिसादातूनच व्यक्तिमत्त्व आकाराला येते. |

| | | |
|---|---|---|
| चरित्र आणि चारित्र्य | व्यक्तिकडे थोडासा व्यासंग कमी असला तरी चालेल पण चारित्र्य आणि नीतिमत्ता महत्वाची. | चारित्र्य आणि नीतिमत्ता हे आदर्श व्यक्तिमत्त्वाचे लक्षणे आहेत. |
| शिक्षण आणि समाज | विविध, साहित्यिक, विचारवंतांचा सहवास समाजकारीणी लेखक, कवी यांच्या बरोबरीची मैत्री यामुळे माझे शिक्षणप्रेमी, समाजसेवक व्यक्तिमत्त्व आकाराला आले. | व्यक्ती कोणाच्या सहवासात राहते त्यातून व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आकाराला येते. |
| विचारवेध | वाचनामुळे व्यक्तीची विचार करण्याची क्षमता विकसित होते. | शिक्षणातून मुलाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. |
| भावलेल्या प्रस्तावना | कर्मवीरांनी शिक्षणातून बहुजन समाजातील मुलांमध्ये क्रांतिकारक बदल घडून आणला. | समाजपुरूषाचे व्यक्तिमत्त्व शिक्षणातूनच आकाराला येते. |

अर्थनिर्वचन :—व्यक्तिच्या, व्यक्तिमत्त्वाचा विकास त्याला मिळालेले शिक्षण त्याच्या सहवासातील माणसे, कुटुंब, समाज यातून होतो. व्यक्तीच्या जीवनात आलेले प्रसंग, समस्या, अडचणी यांना ती व्यक्ती कशाप्रकारचा प्रतिसाद देते यावरूनही व्यक्तिमत्त्व आकाराला येते. यासाठी शाळा आणि शिक्षक यांनी मुलांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणे, प्रकल्प राबविणे आवश्यक आहे.

**४.२.७ सामाजिक मानसशास्त्र :—**

वा.ना.दांडेकर यांच्या मते व्यक्तिवर्तनाचा सामाजिक संदर्भामध्ये केलेला अभ्यास सामाजिक मानसशास्त्रात येतो. सामाजिक मानसशास्त्राच्या अभ्यासात सामाजिक वर्तनाचे निरीक्षण, नियंत्रण, मार्गदर्शन व भविष्यकथन अभिप्रेत असते. सामाजिक वर्तनातील दोषांचा अभ्यास करून त्यावर उपाय सुचविणे हे कार्य ही सामाजिक मानसशास्त्र करते.लेखकाच्या मते आईबाप होणे ही नैसर्गिक प्रक्रिया आहे पण पालक होणे ही मात्र फार मोठी जबाबदारी आहे. मुलांना आपल्याला सन्मान दयावा असे जर पालकांना वाटत असेल तर त्यांनी मुल म्हणजे मोठया माणसांची छोटी प्रतिकृती नाही हे कायमच लक्षात ठेवावे. मुलांच्या भविष्यासाठी त्यांच्यावर आपल्या इच्छेप्रमाणे वागण्याची जी सुप्त भावना पालकात असते. त्यामुळे मुले मानसिकदृष्टया आणि पर्यायाने सामाजिकदृष्टया अक्षम राहतात. पालकांनी घरात वागतांना व बोलतांना काळजीपूर्वक वर्तन करावे.

मुले ही अनुकरणशील असल्याने त्याचा अनिष्ट परिणाम बालकांच्या मनोवृत्तीवर होत असतो. मानवी जीवनात समाजातील चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही प्रकारच्या प्रवृत्तीचे अनुकरण बालकांकडून केले जात असते. मानवी जीवनात इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा लेखक स्वतंत्र या गोष्टीला सर्वोच्च प्राधान्य देतात. समाजाला आज सर्वप्रकारच्या व्यावसायिकांची गरज आहे. केवळ जास्त पैसा मिळतो म्हणून बालकांचे मत त्याची क्षमता विचारात न घेता व्यावसायिक शिक्षणात त्याला जबरदस्तीला ओढले जाते. या गोष्टीला लेखकाचा विरोध आहे.योग्य प्रकारचे सामाजिक स्वरूपाचे अनुभव बालकाला मिळाल्यास त्याला समाजाबद्दल आत्मियता निर्माण होते. अन्यथा समाजाच्याबद्दल तिरस्कार आणि अनास्था निर्माण होण्याचा धोका असतो. ॲड्. शिंदे यांनीही आपल्या वाङ्. मयातील काही लेखांमधून सामाजिक मानसशास्त्राचेच कार्य घडून आणलेले आहे. अनेक प्रकारच्या सामाजिक, व्यक्तिगत प्रश्नांवर गांभीर्याने विचार करून लेखकाने योग्य अशाप्रकारचे उपायही सांगितलेले आहे. या सर्व कार्यामागे सामाजिक आणि सामुदायिक मनोभावना ही स्वच्छ आणि पवित्र असावी असा लेखकाचा ध्यास आहे.

**कोष्टक क्र ४.२.७**

**सामाजिक मानसशास्त्र**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| शिक्षण आणि समाज | देशाला चारित्र्यवान आणि कौशल्य असलेल्या नागरीकांची गरज आहे. | समाज घडतो तो चारित्र्यवान, नीतिवान आणि कार्यकारी नागरीकांमुळे. |
| प्रश्न आहे मूल्यांचा | पूर्वीच्या समाजातील दुसऱ्याला देण्याची मानसिकता आजच्या समजातून दुर्मिळ होवू लागली आहे. | शिक्षणातून समाजामध्ये दुसऱ्याला देण्याची, त्यागाची जोपासना व्हायला हवी. |

| | | |
|---|---|---|
| ध्यासपर्व | देतो तो देव। राखतो तो राक्षस | शिक्षणातून समाजाची दातृत्त्ववृत्ती वाढवायला हवी. |
| प्रश्न आहे मूल्यांचा | सध्या समाजात 'जिकडे घुगऱ्या तिकडे उदो उदो' वृत्ती वाढत आहे. | जिकडे फायदा आणि स्वार्थ आहे तिकडे पळण्याची मानसिकता समाजातील ढासळत्या मूल्यांचे लक्षण आहे. |
| प्रश्न आहे मूल्यांचा | जे चांगले आहे त्यांच्या पाठीमागे समाजाने उभेच राहिले पाहिजे. | जे चांगले आहे त्यांच्या पाठीमागे समाजाने उभेच राहिले पाहिजे. |
| शिक्षण आणि समाज | शिक्षणातून समाजाची उपक्रमशीलता वाढविली तरच समाज परिवर्तनाला चालना मिळेल. | शिक्षणातून समाजाची उपक्रमशीलता वाढविली तरच समाज परिवर्तनाला चालना मिळेल. |

अर्थनिर्वचन :—समाजातील बहुसंख्य लोक कशाप्रकारचा विचार आणि वर्तन करतात त्यावर समाजाचा विकास अवलंबून असतो. स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय समाजात परिस्थिती गरीब होती. पण मनाची, त्यागाची श्रीमंती होती, आताच्या समाजाला भौतिक समृद्धी आली पण त्यागाचा दुष्काळ आहे. जिकडे स्वार्थ आणि फायदा आहे तिकडेच सगळयांची गर्दी ही वृत्ती वाढत आहे. समाजाला स्वत:चे चांगले व्हावे असे वाटत असेल,तर समाजातील जे जे चांगले आहे त्यांच्या पाठीमागे समाजाने उभे राहिला हवे. समाजाच्या उपक्रमशीलतेला आवाहन करूनच समाज परिवर्तन घडू शकेल.

**४.२.८ जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरणाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या शैक्षणिक मानसशास्त्रासंदर्भातील समस्या :—**

बदलत्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक व शैक्षणिक परिस्थितीचा समाजमनावर विशेषत: विद्यार्थी मनावर होत असलेला इष्ट—अनिष्ट परिणाम हा चिंता व चिंतनाचा विषय आहे. स्पर्धेच्या युगात, वाढलेल्या अपेक्षा, मानसिक आरोग्याचा अभाव, मनोविकृतीतील वाढ, ताण—तणाव व विद्यार्थी आत्महत्येचे वाढते प्रमाण या सर्व बाबी लेखकाला अस्वस्थ करतात. या सर्व समस्यांच्या मुळापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करताना ते उपायही सांगतात.

**कोष्टक क्र ४.२.८**

**शैक्षणिक मानसशास्त्रासंदर्भातील समस्या**

| पुस्तकाचे नाव | लेखकाचे विचार | संशोधक अभिप्राय |
|---|---|---|
| शिक्षण आणि समाज | समाजाची संवेदनशीलताच गोठली आहे की काय? | दिवसेंदिवस समाजाला सामाजिक समस्यांचे काहीच वाटेनासे झाले आहे. |
| प्रश्न आहे मूल्यांचा | कमीत कमी काम, जास्तीत जास्त दाम आणि सगळा आराम अशी धारणा समाजाची होवू लागली आहे. | प्रत्येकाला कमीत कमी कष्टात जास्तीत जास्त पैसा हवा आहे. |
| प्रश्न आहे मूल्यांचा | चंगळवाद, भोगवाद, ऐषआरामी वृत्ती, वाढती व्यसने यामुळे आमची तरूण पिढी बिघडत आहे | पाश्चात्यांच्या अंधानुकरणामुळे आमच्या तरूण मुलांमध्ये चंगळवाद, भोगवाद, व्यसनाधिनता वाढली आहे. |
| प्रश्न आहे मूल्यांचा | लोभी वृत्तीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास, शेतीचे नुकसान, व्यक्तीचे नुकसान वाढत आहे. | जो देश शेती, माती व पर्यावरण सांभाळू शकत नाही तो देश टिकू शकत नाही. |
| भावलेल्या प्रस्तावना | बालकामगार, गवत खावून जगणारे आदिवासी, अज्ञान, दारिद्रय, भ्रष्टाचार यांच्याबद्दल कुणाला काहीच वाटेनासे झाले आहे. | बालकामगार, गवत खावून जगणारे आदिवासी, अज्ञान, दारिद्रय, भ्रष्टाचार यांच्याबद्दल कुणाला काहीच वाटेनासे झाले आहे. |

**अर्थनिर्वचन** :—जागतिकीकरणाच्या रेटयाला सामोरे जाताना आपल्या समाजात अनेक विकृती मूळ धरू लागल्या आहेत. लोभी वृत्ती, पैशाचा अति हव्यास यामुळे आम्ही पर्यावरणाचा समतोल बिघडवत आहोत. वाढते प्रदुषण, कमी होणारे पाणी, शेतीच्या समस्या वाढत आहे. आमच्या तरूणांमधील चंगळवादीवृत्ती व्यसनाधिनता वाढत आहे. अजूनही समाजातील अनेक घटक उदा. आदिवासी, कष्टकरी, स्त्रिया शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून दूर आहेत.

जागतिकीकरणामुळे अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होत आहेत. आपण नेहमीच याची दखल घेवून आतापासूनच उपाययोजना राबवायला हव्यात. तरच हा विनाश आपल्याला वेळीच रोखता येईल.

**४.३ ॲड्. शिंदे यांच्या साहित्याचे अभ्यासक यांच्या मुक्त व**

**संरचित मुलाखतीद्वारे प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :—**

**४.३.१ शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा विचार शोध :—**

**४.३.१.१ शिक्षणाचा अर्थ**

**कोष्टक क्र ४.३.१.१**

| अभ्यासक | शिक्षणाचा अर्थ | संदर्भ |
|---|---|---|
| १ | ज्ञानप्राप्तीचे साधन म्हणजे शिक्षण | शिक्षण आणि समाज |
| २ | माणूस घडविणारे शिक्षण हेच खरे शिक्षण होय | शिक्षण आणि समाज |
| ३ | माणसाला सुसंस्कृत जे बनविते ते खरे शिक्षण | प्रश्न आहे मूल्यांचा |
| ४ | माणसाच्या विचारशक्तीची जोपासना करते ते शिक्षण | प्रश्न आहे मूल्यांचा |
| ५ | समाज परिवर्तन व समाज नियंत्रण घडवून आणते ते शिक्षण होय | शिक्षण आणि समाज |

अर्थनिर्वचन :—कोणत्याही देशाचे भवितव्य, हे त्या देशातील चारित्र्यशील, नीतीमान आणि कर्तव्यनिष्ठ अशा नागरिकांवर अवलंबून असते. अशा नागरिकांशिवाय देशाची प्रगती होऊच शकत नाही असे नागरिक शिक्षणातून मिळणाऱ्या संस्कारातूनच निर्माण होऊ शकतात. चांगली उदात्त विचारांची माणसे निर्माण करणे म्हणजे शिक्षण होय.

**४.३.१.२ शिक्षणाचे कार्य**

**कोष्टक क्र ४.३.१.२**

| अभ्यासक | शिक्षणाचेकार्य | संदर्भ |
|---|---|---|
| १ | चारित्र्यवान नागरिक निर्माण करणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. | शिक्षण आणि समाज |
| २ | शिक्षणातून ज्ञानप्राप्ती होते. ज्ञानप्राप्तीतून वैज्ञानिक जाणिवा आणि शोध यांचा रस्ता सापडतो | शिक्षण आणि समाज |
| ३ | श्रमसंस्कृती रूजविणे, जोपासना करणे | चरित्र आणि चारित्र्य |
| ४ | उदात्त विचाराने वागणारी चांगली माणसे तयार करणे | विचारवेध |
| ५ | शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये एक तरी कौशल्य यायला पाहिजे सामाजिक भान यायला पाहिजे. | प्रश्न आहे मूल्यांचा |

**अर्थनिर्वचन :—**

सर्व प्रगतीच्या मुळाशी ज्ञान हेच असते. ज्ञान प्राप्तीसाठी शिक्षण हेच प्रभावी साधन आहे. शिक्षणातून ज्ञान साधना करता येते. ज्ञानसाधनेतूनच वैज्ञानिक जाणीवा आणि शोध यांचा रस्ता

सापडतो. गुणवत्ताप्रधान शिक्षण व्यवस्थेतून विज्ञाननिष्ठांची आणि समाजनिष्ठांची जोपासना होऊ शकते शिक्षणातून प्रेरणा आणि सामाजिक बांधिलकीची कर्तव्य भावना निर्माण व्हायला हवी. शिक्षणातून श्रमसंस्कृतीची जोपासना व्हावी. चारित्र्यवान, नीतीवान व ज्ञानवान विद्यार्थी शिक्षणातून घडावेत.

### ४.३.१.३ शिक्षणाचे पैलू

**कोष्टक क्र ४.३.१.३**

| अभ्यासक | शिक्षणाचे पैलू | संदर्भ |
|---|---|---|
| १ | चारित्र्य आणि शील जोपासणारे शिक्षण आम्हाला हवे | शिक्षण आणि समाज |
| २ | वसुधैव कुटुम्बकम ची भावना शिक्षणातून यावी | भावलेल्या प्रस्तावना |
| ३ | राष्ट्राचा विकास त्या देशातील लोकांच्या चारित्र्यावर अवलंबून असतो. | विचारवेध |
| ४ | भारतीय समाज सांस्कृतिक अध.पतनाकडे वेगाने वाटचाल करीत आहेत. | चरित्र आणि चारित्र्य |
| ५ | माणसाच्या विकासात मूल्यशिक्षण आणि लोकशाही शिक्षण महत्त्वाचे आहे | विचारवेध |

अर्थनिर्वचन :—

कोणत्याही देशाचे भवितव्य हे त्या देशातील चारित्र्यशील नीतीमान आणि कर्तव्यनिष्ठ नागरिकांवर अवलंबून असते. चारित्र्यहीन शिक्षण हे एक सामाजिक पाप आहे. भारतीय समाजाचे सांस्कृतिक अध.पतन वेगाने होत आहे. जंगलामधले वन्य जीवन नक्कीच कमी होत आहे. परंतु शहरामधले वन्य जीवन वाढत आहे. लोकशाही मूल्यांचा ऱ्हास थांबवायचा असेल तर मूल्यशिक्षण कुटुंब व शाळेतून बिंबविणे काळाची गरज आहे.

### ४.३.१.४ शिक्षणाची उद्दिष्टे

**कोष्टक क्र ४.३.१.४**

| अभ्यासक | शिक्षणाची व्यक्तिगत, सामाजिक राष्ट्रीय उद्दिष्टे | संदर्भ |
|---|---|---|
| १ | नितीवान व चारित्र्यवान विद्यार्थी शिक्षणातून घडावा | ध्यासपर्व |
| २ | डोके आणि हात यांची फारकत हल्लीच्या शिक्षणाने केली आहे | विचारवेध |
| ३ | भारतातील राजकारण, लोकशाही, समाजव्यवस्था हे शापित झालेले आहेत. | चरित्र आणि चारित्र्य |
| ४ | व्यक्ती विकास, समाज विकास आणि राष्ट्र विकास हा त्या देशातील नागरिकांचे चारित्र्य कसे आहे यावर ठरतो. | ध्यासपर्व |
| ५ | मानवी समाजातील विकृती मूल्यशिक्षणच थांबवू शकते | भावलेल्या प्रस्तावना |

**अर्थनिर्वचन :—**

संपत्तीपेक्षा, संस्कृतीला, भोगापेक्षा योगाला, अभिमानापेक्षा इमानाला, अहंकारापेक्षा कर्तव्यबुद्धीला महत्त्व देणारी चारित्र्यवान माणसेच समाज घडवितात. माणसाच्या व्यक्तिमत्त्व विकासात संस्कारांना अनन्यसाधारण महत्त्व आहे, त्यासाठी आशा, प्रेम आणि कृतज्ञता हे संस्कार पायाभूत आहेत. मानवी समाजाला अनेक विकृतींनी ग्रासले आहे. हे पाहता मानवजात घसरणीकडे जात आहे की, काय असे वाटल्यावाचून राहत नाही. त्यासाठी शिक्षणाची, श्रमावर आधारीत मूल्यमापनाची आवश्यकता आहे. शिक्षणाचा आणि श्रमाचा काहीही संबंध राहिलेला नाही. ज्या देशातील शिकलेले विद्वान शारीरिक श्रमाला कमी लेखतात. तो देश अवनतीच्या मार्गाने चाललेला आहे असे समजावे.

## ४.३.१.५ शैक्षणिक विचारवंत

### कोष्टक क्र ४.३.१.५

| अभ्यासक | विविध शैक्षणिक विचारवंत यांच्याविषयीचे विचार | संदर्भ |
|---|---|---|
| १ | कर्मवीर भाऊराव पाटील, म. फुले यांचे विचार मांडले आहेत. | शिक्षण आणि समाज |
| २ | छ. शाहू महाराज, सानेगुरूजी यांचे विचार मांडले आहेत. | प्रश्न आहे मूल्यांचा |
| ३ | म. गांधी, रविंद्रनाथ टागोर यांचे विचार मांडले आहेत. | चरित्र आणि चारित्र्य |
| ४ | कर्मवीर, गाडगेबाबा यांचे विचार मांडले आहेत. | भावलेल्या प्रस्तावना |
| ५ | म. फुले, छ. शाहू महाराज यांचे विचार मांडले आहेत. | विचारवेध |

| कर्मवीर | महात्मा फुले | सानेगुरूजी |
|---|---|---|
| कर्मवीर दररोज भल्या पहाटे हातात कंदिल व काठी घेऊन आपल्या विद्यार्थ्यांना उठवून अभ्यासाला लावीत. गरीबाच्या घरातील लहानगा गुणी विद्यार्थी आढळल्यास त्याची पुढील शिक्षणाची सोय व्हावी म्हणून पायीच मैलोनमैल त्याला खांदयावर घेऊन, आपल्या वसतिगृहात नेऊन त्याची पुढील शिक्षणाची सोय करीत म. फुलेंपासून प्रेरणा घेऊन पत्नी लक्ष्मीबाईसह उभे जीवन समर्पित केले. शिक्षण क्षेत्रात क्रांती केली. इतिहास घडविला. आमचे शिक्षक कर्मवीरांची प्रेरणा आणि सामाजिक बांधिलकीची कर्तव्य भावना जागती ठेवण्यास समर्थ ठरणार आहेत का हा प्रश्न आजच्या शिक्षण क्षेत्रापुढे आहे. | मती, नीती, गती आणि वित्त गेले. त्यामुळे शुद्र खचले इतके अनर्थ एका अविदयेने केले असे जोतिबांनी सांगितले व समाजप्रबोधनाची क्रांतिकारक चळवळ सुरू केली. शिक्षक कसा असावा हे सांगताना शिक्षकाला सर्व शेतीकाम अवगत असले पाहिजे असे जोतिबांनी सांगितले | गुणी पण गरीब विद्यार्थ्यांची उपासमार पाहून सानेगुरूजींनी आपले खानावळीतले एक वेळचे जेवण, स्वत:चे पोट मारून त्या विद्यार्थ्यांना देण्याची सोय केली. त्या विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद होऊ दिले नाही. गुरूजींनी देशासाठी तुरूंगवासही भोगला. सानेगुरूजी हे संवेदनशील, विद्यार्थ्यांवर भरभरून प्रेम करणारे कृतिशील शिक्षक होते. |

| म. गांधी | शाहू महाराज | गाडगेबाबा |
|---|---|---|
| चरित्र्यहीन शिक्षण एक सामाजिक पाप गांधीजींनी मानले शिक्षणातून चरित्र्यवान माणसे तयार व्हावीत मूलोदयोगी शिक्षणातून गांधीजींनी श्रम व शिक्षणाला महत्त्व दिले. | जोतिबांपासून शाहू महाराजांनी प्रेरणा घेतली त्यांची सगळी वागण्याची दिशा ही समाजाला शिकविण्यासाठी होती. समाजाच्या उत्थापनासाठी आणि उद्धारासाठी होती. | प्रबोधनाची धगधगती मशाल विझली. सर्वसामान्यांपासून तो भल्या भल्यांपर्यंत सर्वांनीच जीवन कसे जगावे याचे पाठ देणारे चालत बोलते विद्यापीठ संपले जीवनाचा आणि देवाचा खरा अर्थ काय हे सांगणारा तत्वज्ञानी हरपला. |

**अर्थनिर्वचन** :—राष्ट्रपिता म. गांधी, तसेच सत्यशोधक समाजाची स्थापना करणारे म. फुले यांच्यापासून प्रेरणा घेऊन छ. शाहू महाराज आणि कर्मवीर यांनी बहुजन समाजासाठी काम केले. सानेगुरूजी, गाडगेबाबा यांनी सुद्धा समाज सुधारावा, संस्कृतीचे रक्षण व्हावे, अज्ञान अंध:श्रद्धा दूर व्हाव्यात यासाठी संपूर्ण जीवन समर्पित केले. या सर्व शैक्षणिक विचारवंतांनी समाजाच्या उद्धारासाठी स्वत:च्या कुटुंबाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. संपूर्ण समाज हेच आपले कुटुंब आहे अशी या प्रत्येकाची भावना होती. शिक्षणातूनच समाज परिवर्तन होऊ शकते. याबद्दल प्रत्येकाला विश्वास आणि खात्री होती, त्यामुळेच या सर्वांनी समाजशिक्षणाला प्राधान्य दिले. त्याकाळात बहुजनांना शिक्षणाचे दरवाजे बंद होते. ग्रामीण समाज निरक्षर होता. अज्ञान आणि दारिद्रयाने तो गांजलेला होता. अनिष्ठ रूढी परंपरा तसेच अंध:श्रद्धा यांचा त्याच्यावर मोठा पगडा होता. धर्ममार्तंडांनी आणि दांभिक पंडितांनी समाजाला कर्मकांडाच्या जोखडात गुंतविले होते. या जोखडातून समाजाची मुक्तता फक्त विचार आणि शिक्षणाने होऊ शकते. यावर विश्वास ठेवून वरील सर्व लोकांनी काम केले.

### ४.३.१.६ विद्यार्थ्यांबद्दलचे विचार :—

**कोष्टक क्र ४.३.१.६**

| अभ्यासक | ॲड्. शिंदे यांचे विद्यार्थ्यांबद्दलचे विचार | संदर्भ |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनि स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष दयावे. | शिक्षण आणि समाज |
| २ | विद्यार्थी हा चारित्र्यवान असावा. | प्रश्न आहे मूल्यांचा |
| ३ | आजचा विद्यार्थी श्रमापासून दूर चाललेला आहे. | चरित्र आणि चारित्र्य |
| ४ | ध्येयवादाने प्रेरित झालेला तरूणच राष्ट्र घडवू शकेल. | भावलेल्या प्रस्तावना |
| ५ | विद्यार्थ्यांनी हुंडा घेऊ नये. | विचारवेध |

अर्थनिर्वचन :—देशापुढे आरोग्याची व पर्यावरणाची फार मोठी समस्या आहे. पिण्याचे पाणी, खाण्याचे अन्न आणि हवा स्वच्छ पाहिजे. ही जाणीव आजच्या शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये यायला पाहिजे. विद्यार्थ्याला एक तरी कला अवगत असावी. विद्यार्थ्यांनी श्रमदान करावे. शेतीकामाशी श्रमदानाचा अधिकाधिक संबंध असावा. शाळेचा परिसर विद्यार्थ्यांनी स्वच्छ ठेवावा. स्त्री—पुरूष समानता, वैज्ञानिक दृष्टिकोन, संवेदनशीलता, राष्ट्रभक्ती यासारख्या मूल्यांची रूजवणूक प्राथमिक शिक्षणातून, कुटुंबातून व्हायला हवी. शरीराची, मनाची व परिसराची स्वच्छता कशी करावी याचे शिक्षण विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे.

### ४.३.१.७ अभ्यासक्रमाविषयी विचार :—

**कोष्टक क्र ४.३.१.७**

| अभ्यासक | ॲड्. शिंदे यांचे अभ्यासक्रमविषयक विचार | संदर्भ |
|---|---|---|
| १ | आहारशास्त्राचा समावेश अभ्यासक्रमात असावा. | शिक्षण आणि समाज |
| २ | लोकसंख्या शिक्षणाची जाणीव अभ्यासक्रमातून मुलांना करून देणे काळाची गरज आहे. | प्रश्न आहे मूल्यांचा |
| ३ | शरीरशास्त्राची माहिती आमच्या प्राथमिक, माध्यमिक शिक्षणातून मिळत नाही. | चरित्र आणि चारित्र्य |
| ४ | अभ्यासक्रमात श्रमशिक्षण असावे. | भावलेल्या प्रस्तावना |
| ५ | चारित्र्य, मूल्य, संस्कार यांचे मूल्यमापन आपल्या अभ्यासक्रमातून होत नाही. | विचारवेध |

अर्थनिर्वचन :—एकविसाव्या शतकात आपल्याला झेप घ्यावयाची आहे. तंत्रज्ञान आकाशाइतक्या उंचीवर भराऱ्या मारत आहे. शेती आणि औद्योगिक क्रांतीनंतर आता संगणक क्रांती झेपावत आहे. हे ज्ञान कवेत घेण्याची क्षमता असणारे नवे विश्वमित्र आमच्या शिक्षणातून आम्हाला घडवायचे आहेत. त्यासाठी आमचा अभ्यासक्रम परिपूर्ण

असला पाहिजे. शरीर मन, बृद्धी, आरोग्य यांना पुष्ट करणारा आमचा अभ्यासक्रम चारित्र्यवान विद्यार्थी घडवील आणि हेच विद्यार्थी आमच्या राष्ट्राला उज्वल बनवतील.

## ४.३.१.८ शिक्षकाविषयी विचार :—

**कोष्टक क्र ४.३.१.८**

| अभ्यासक | अॅड्. शिंदे यांचे शिक्षकांविषयीचे विचार | संदर्भ |
|---|---|---|
| १ | शिक्षक—प्राध्यापकांतच प्रथम चारित्र्याची जोपासना व्हायला पाहिजे, तरच ती विद्यार्थ्यात होणार. | शिक्षण आणि समाज |
| २ | नव्या शतकाला साजेशी अद्ययावत ज्ञानसाधनांची भरपूर सामग्री आमच्या शिक्षक प्राध्यापकांजवळ पाहिजे. | प्रश्न आहे मूल्यांचा |
| ३ | सानेगुरूजींची प्रेरणा, त्याग आमचे शिक्षक, प्राध्यापक ध्यानी घेतील काय? | चरित्र आणि चारित्र्य |
| ४ | शिक्षक व प्राध्यापकांवर आज विचारवंतांची भूमिका पार पाडण्याची नैतिक जबाबदारी आहे. | भावलेल्या प्रस्तावना |
| ५ | विद्यार्थ्याला प्रेरणा देतो तो खरा शिक्षक. | विचारवेध |

अर्थनिर्वचन :—

१. शिक्षण हे जर सुसंस्कृत जीवनाचे साधन असेल तर शिक्षणाने विचारशक्तीची जोपासना केली पाहिजे. शिकविणे म्हणजे विचार करायला शिकविणे. शिकविण्याची क्षमता आणि प्रेरणा आपल्यामध्ये आहे का हे शिक्षक व प्राध्यापकांनी स्वत:च प्रथम पाहावयाचे आहे. शिक्षकांचा हक्क व मागण्यांचा विचार करताना पितेज कमेमतअम ंदक जीमद कमेपतमहे तत्त्व शिक्षकांना व प्राध्यापकांना मान्य व्हावे शिक्षक — प्राध्यापकातच प्रथम चारित्र्याची जोपासना व्हायला पाहिजे, तरच ती विद्यार्थ्यांत होणार.

२. शिक्षक — प्राध्यापकांनी आत्मपरिक्षण करणे गरजेचे आहे. यात त्यांच्या वर्तनाचा समावेश व्हायला हवा. आपल्या चारित्र्याचे व नीतिमत्तेचे धडे विद्यार्थी पाठयपुस्तकातून नव्हे तर आपल्या शिक्षकांच्या वागण्या—बोलण्यातून घेत असतात याचे भान शिक्षकांना असले पाहिजे.

३. एकविसाव्या शतकाला सामोरे जाताना आमची शिक्षण व्यवस्था सामर्थ्यवान बनविणे गरजेचे आहे. या सामर्थ्याचे गमक म्हणजे आमच्या शिक्षक — प्राध्यापकांची अद्ययावत शैक्षणिक

गुणवत्ता. समर्पित भावना, प्रेरणाशक्ती, सामाजिक बांधिलकीची जाण आणि विद्यार्थ्यांविषयीचे प्रेम.

**४.३.१.९ जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाचे शैक्षणिक तत्त्वज्ञानावरील परिणाम :—**

**कोष्टक क्र ४.५.१.९**

| अभ्यासक | जागतिकीकरण व शैक्षणिक तत्त्वज्ञान | संदर्भ |
|---|---|---|
| १ | एकविसाव्या शतकाला सामोरे जाताना, अवती भोवतीचे जग कसे आहे कुठे आहे याची जाणीव हवी. | शिक्षण आणि समाज |
| २ | संगणक ही २१ व्या शतकाची नांदी होय. आमच्या प्रत्येक विद्यार्थ्याला, शिक्षकाला संगणक यायला हवा. | प्रश्न आहे मूल्यांचा |
| ३ | नव्या परिस्थितीत ज्ञानाचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन आपली शिक्षणव्यवस्था विकसित व्हायला हवी. | चरित्र आणि चारित्र्य |
| ४ | जागतिकीकरणाच्या रेटयाला सामोरे जावेच लागणार आहे. बऱ्याच क्षेत्रात स्पर्धेला तोंड दयावे लागणार आहे. | भावलेल्या प्रस्तावना |
| ५ | जागतिकीकरणाच्या स्पर्धेत टिकतील असे शिक्षक, शिक्षण विद्यार्थी, विद्यापीठे आपल्याला बनवावे लागतील. | विचारवेध |

अर्थनिर्वचन :—सर्वात जास्त संख्येने शाळेबाहेर मुले असणारा आणि सर्वात जास्त प्रौढ निरक्षर असणारा देश अशी आजही जगात आपल्या देशाची प्रतिमा आहे. किमान मुलभूत शिक्षण नसलेली फार मोठी लोकसंख्या भारतात आजही असावी हे या देशाचे दुर्दैवच म्हणायचे. ही अनिष्ट स्थिती बदलण्यासाठी आपल्या देशाला मोठी लढाई लढावी लागणार आहे.

**४.४ शैक्षणिक मानसशास्त्र विषयक विचारांचा शोध :—**

अॅड्. शिंदे यांनी त्यांच्या साहित्यातून शै. मानसशास्त्रातील बालकाची वाढ व विकास, मन, अनुवंश व परिस्थितीचा व्यक्तिमत्त्वावर होणारा परिणाम, बुद्धिमत्ता, सर्जनशीलता, या सर्व घटकांना स्थान दिलेले आहे. त्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे

**४.४.१ शैक्षणिक मानसशास्त्र अर्थ, स्वरूप, संकल्पना याविषयीचे विचार :—**

**कोष्टक क्र ४.४.१**

| अभ्यासक | शैक्षणिक मानसशास्त्र बालकाची वाढ व विकास याविषयीचे विचार | संदर्भ/आधार |
|---|---|---|
| १ | शिक्षणाने एकप्रकारचे मानसिक व बौद्धिक सामर्थ्य निर्माण झाले पाहिजे. | शिक्षण व समाज |
| २ | शाळा आणि कुटुंब यातूनच बालकावर चांगले संस्कार होतात. | प्रश्न आहे मूल्यांचा |
| ३ | श्रमाचे संस्कार आपल्या मुलांच्या वाढ व विकास म्हणजे मन व शरीरासाठी आवश्यक आहेत. | चरित्र आणि चारित्र्य |
| ४ | मानवी समाजाच्या संवर्धनासाठी माणसाच्या मनाचा विकास महत्त्वाचा आहे. | भावलेल्या प्रस्तावना |
| ५ | चांगले मन घडविणे हे शिक्षणक्षेत्रापुढील मोठे आव्हाण आहे. | विचारवेध |

अर्थनिर्वचन :—ॲड्. शिंदे आपलया साहित्यातून, वाङ्‌मयातून विचार मांडतात तो आंतरिक परिवर्तनाचा माणसाचे मन बदलण्याचा. त्यांच्या मते संवेदनशील, जागृत आणि आत्मभान असलेले मन कसे घडवावे याचा विचार अध्यापक—प्राध्यापकांनी केला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मनाचा अभ्यास शिक्षकांनी करावा. इतरांच्या सुख—दुःखाशी एकरूप होणारे आणि आपले काम चोख बजावणारे मन घडविणे हे शिक्षणक्षेत्रापुढील खरे आव्हान आहे. त्यासाठी आपले शिक्षण मूल्यगर्भ बनले पाहिजे. शिक्षक, पालक आणि शिक्षण व्यवस्था या सर्वांनी मिळून बालकाच्या वाढ व विकासाकडे जाणीवपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे. निरोगी शरीरातच निरोगी मन राहू शकते. यासाठी शाळा आणि कुटुंब यांनी हातात हात घालून एकत्र येवून निकोप पिढी घडविण्यासाठी प्रयत्न करावेत.

## ४.४.२ अध्ययन—अध्यापन याविषयीचे विचार :—

### कोष्टक क्र ४.४.२

| अभ्यासक | ॲड्. शिंदे यांचे अध्ययन—अध्यापनविषयक विचार | संदर्भ/आधार |
|---|---|---|
| १ | शिकविणे म्हणजे विचार करायला शिकविणे. | शिक्षण व समाज |
| २ | एक तास वर्गात घ्यावयाचा असल्यास दोन तास त्याच्या तयारीसाठी लागतात. | प्रश्न आहे मूल्यांचा |
| ३ | आमच्या शिक्षकांनी नवीन तंत्रे, पद्धती, शिकून विद्यार्थ्यांसाठी त्याचा वापर करावा. | चरित्र आणि चारित्र्य |
| ४ | सानेगुरूजींप्रमाणे शिक्षकांना विद्यार्थ्यांवर भरभरून देण्याची प्रेरणा निर्माण व्हावी. | भावलेल्या प्रस्तावना |
| ५ | शिक्षक हा आजन्म विद्यार्थी असतो त्याचे भान जो जपतो तोच ज्ञानवान बनू शकतो. | विचारवेध |

अर्थनिर्वचन :—ॲड्. शिंदे यांना शिक्षकांकडून प्रचंड अपेक्षा आहेत. त्यांच्या मते अध्ययन—अध्यापन प्रक्रिया ही पूर्णपणे शिक्षकांवरच अवलंबून आहे. विद्यार्थी घडतो तो केवळ आणि केवळ च्रांगल्या शिक्षकांमुळेच. शिक्षणातून सुजाण, सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक तयार व्हावा ही प्राथमिक गरज आहे. त्यासाठी आमच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकताना आनंद कसा वाटेल अशा अध्यापन पद्धती, तंत्रे यांचा वापर करावा. सानेगुरूजींप्रमाणे आनंददायी शिक्षण बनवावे. शिक्षकांनी समर्पित भावनेने काम करावे. चारित्र्यवान शिक्षकच चारित्र्यवान विद्यार्थी घडवू शकतो.

### ४.४.३ व्यक्तिमत्त्व व व्यक्तीभेद याविषयीचे विचार :—

**कोष्टक क्र ४.४.३**

| अभ्यासक | ॲड्. शिंदे यांचे व्यक्तिमत्त्व व व्यक्तीभेदाविषयीचे विचार | संदर्भ/आधार |
|---|---|---|
| १ | कर्मवीरांचे व्यक्तिमत्त्व पाहून मी स्तिमित झालो. कितीतरी पैलू या व्यक्तिमत्त्वाला होते. | शिक्षण व समाज |
| २ | भाऊसाहेबांचे व्यक्तिमत्त्व घडले ते परिस्थीतीतून | चरित्र आणि चारित्र्य |
| ३ | शिक्षकाने वर्गात शिकवितांना प्रत्येक मुलाच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करावा. | प्रश्न आहे मूल्यांचा |
| ४ | आमच्या जडणघडणीत आमचे शिक्षक, त्यावेळची सामाजिक परिस्थिती कारणीभूत ठरली. | भावलेल्या प्रस्तावना |
| ५ | माणसाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे त्याने परिस्थितीला समस्यांना दिलेले उत्तर. | विचारवेध |

अर्थनिर्वचन :—ॲड्. शिंदे यांनी १९४२ ची चळवळ, कम्युनिष्ट चळवळ, विद्यार्थी मोर्चे यामध्ये सहभाग घेतला. त्यानंतर वकिली करतांना अनेक सामाजिक प्रसंग, प्रश्न यांना सामोरे जावे लागले. रयत शिक्षण संस्थेचे काम करताना अनेक अनुभव आले. त्यातून त्यांचे अष्टावधानी, व्यासंगी व्यक्तिमत्त्व आकाराला आले. त्यांच्या मते, माणसाचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या सहवासातील माणसे, त्याला मिळालेली परिस्थिती, त्या परिस्थितीवर मात करण्यासाठी त्याने केलेला संघर्ष यांच्यावर अवलंबून असते. शाळेने आणि कुटुंबाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करताना त्यांना संघर्ष करायला शिकविले पाहिजे. श्रमाचे संस्कार,

सामाजिक भान, सामाजिक बांधिलकी, यांची रूजवणूक त्यांच्या व्यक्तिमत्त्वात केली पाहिजे. जात—पात, श्रीमंत—गरीब, उच्च—नीच असा कोणताही भेद विद्यार्थ्यांमध्ये न करता, उत्तम व्यक्तिमत्त्वाचे विद्यार्थी आजच्या शिक्षणातून घडावेत अशी अपेक्षा आहे.

### ४.४.४ बुद्धिमत्ता व सर्जनशीलता याविषयीचे विचार :—

**कोष्टक क्र ४.४.४**

| अभ्यासक | बुद्धिमत्ता व सर्जनशीलता याविषयीचे विचार | संदर्भ/आधार |
|---|---|---|
| १ | बुद्धी हे मानवाला निसर्गाने दिलेले अमोल शस्त्र आहे. | शिक्षण व समाज |
| २ | बिल गेट्सने हे सर्व केले ते आपल्या शिक्षणाच्या, बुद्धीच्या आणि कल्पना शक्तीच्या जोरावर | प्रश्न आहे मूल्यांचा |
| ३ | बुद्धीला नैतिकतचे अधिष्ठान पाहिजे. | चरित्र आणि चारित्र्य |
| ४ | सत्ता आणि मत्ता यांच्या गढूळ प्रवाहाने समाजपुरूषाची विवेकबुद्धी विकलांग झालेली आहे. | भावलेल्या प्रस्तावना |
| ५ | जमिनीत निघणाऱ्या दगडगोटयांचा या बंधाऱ्यासाठी आणि रस्त्यांच्या भरावासाठी मोठया कल्पकतेने उपयोग केला आहे. | विचारवेध |

**अर्थनिर्वचन** :—बुद्धी हे मानवाला निसर्गाने दिलेले अमोघ शस्त्र आहे. बुद्धीच्या आधरे त्याने ज्ञान आत्मसात केले. ज्ञान हाच चिरकाल प्रगतीचा पाया आहे. या ज्ञानाच्या आधारेच मानव मुक्तीसाठी अविरत वाटचाल करीत आला. ज्ञानप्राप्तीसाठी शिक्षण हेच प्रभावी साधन आहे. शिक्षणातूनच ज्ञान साधना करता येते. ज्ञानसाधनेतूनच बुद्धीचा आणि सर्जनशीलतेचा विकास होतो. ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रातील वैज्ञानिक विचारवंत, लेखक, कलाकार, यांच्या बुद्धीमत्तेला सर्जनशीलतेची जोड मिळावी ती ज्ञानसाधनेमुळेच.

### ४.४.५ अनुवंश आणि परिस्थिती याविषयीचे विचार :—

**कोष्टक क्र ४.४.५**

| अभ्यासक | अनुवंश आणि परिस्थिती याविषयीचे विचार | संदर्भ/आधार |
|---|---|---|
| १ | माणूस कोठे जन्माला आला यापेक्षा तो कुठे मेला याला महत्त्व आहे. | शिक्षण व समाज |
| २ | ग्रामीण भागातील मुलांना संधी मिळाली तर ते संधीचे सोने करतात. | प्रश्न आहे मूल्यांचा |
| ३ | परिस्थितीच माणसाला घडविते. | चरित्र आणि चारित्र्य |
| ४ | ज्या देशात प्राथमिक शिक्षण, आरोग्य या सुविधा गोरगरीबांना नाही त्या देशाला भवितव्य नाही. | भावलेल्या प्रस्तावना |
| ५ | चिखलातून कमळे उगावीत तसेच कर्मवीरांनी बहुजन समाजातील मुलांना घडविले. | विचारवेध |

अर्थनिर्वचन :—ॲड्. शिंदे यांच्या मते माणूस घडतो तो पूर्णपणे परिस्थितीतूनच. जीवनात येणारे विविध प्रसंग, समस्या अडचणी यांच्यातूनच माणूस घडतो. अनुवंशापेक्षा माणसाला मिळणारी परिस्थितीच त्याचे भवितव्य ठरविते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी चिखलातून कमळे उगवावीत त्याप्रमाणे बहुजन, दलित, गरीब समाजात जन्माला आलेली मुले घडविली. 'तुला राजाबाई टॉवर जिंकायचाय' अशी प्रेरणा आणि जिद्द दिली. त्यामुळेच या मुलांनी महाराष्ट्रात इतिहास घडविला. जन्माला येणारे प्रत्येकमूल हे गुणवान असते. त्याला घडविण्याची जबाबदारी ही त्याचे पालक, शाळा आणि समाज यांची आहे.

### ४.४.६ जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाचे शैक्षणिक मानसशास्त्रावरील परिणाम

**कोष्टक क्र ४.७.६**

| अभ्यासक | जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाचे शै. मानसशास्त्रावरील परिणाम | संदर्भ |
|---|---|---|
| १ | परीक्षेचा अतिरिक्त ताण विद्यार्थ्यांवर आहे. | शिक्षण व समाज |
| २ | नैराश्य, ताण—तणाव यामुळे आत्महत्या वाढल्या आहेत. | चरित्र आणि चारित्र्य |
| ३ | जागतिकीकरणामुळे समाजात जीवघेणी स्पर्धा सुरू झाली आहे. | प्रश्न आहे मूल्यांचा |
| ४ | पूर्वीच्या समाजात एकत्र कुटुंबपद्धतीमुळे मन मोकळे करण्याच्या जागा उपलब्ध असायच्या. | भावलेल्या प्रस्तावना |
| ५ | माणसामाणसातील विसंवाद, संवादाचा अभाव यामुळे गैरसमज, तणाव, नैराश्य वाढले आहे. | विचारवेध |

अर्थनिर्वचन :—जागतिकीकरणामुळे प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा निर्माण झाली आहे. या स्पर्धेत टिकण्यासाठी प्रत्येकजण धावतो आहे. यातूनच मानसिक समस्या उदा. नैराश्य, ताण—तणाव, चिडचिडेपणा निर्माण होत आहेत. शिक्षणक्षेत्रही याला अपवाद नाही. आमचे शिक्षक, विद्यार्थी यांची संघर्ष करण्याची क्षमता, संयम कमी होत चालला आहे. शुल्लक कारणावरून विद्यार्थी आत्महत्या करीत आहेत. कमी श्रमात अधिक दाम या प्रवृत्तीमुळे संघर्ष तयार होत आहेत. कुटुंबातील प्रेम, जिव्हाळा, विश्वास, सुसंवाद, आपुलकी आटत चालली आहे. त्यामुळे तरूण पिढीचे शारीरिक व मानसिक स्वास्थ बिघडत चालले आहे. या सगळया परिवर्तनाला सामोरे

जाताना मूल्यशिक्षण, चांगल्या आदर्शाचे समाजात प्रबलीकरण केले तरच आपण मानसिक स्वस्थ समाज निर्माण करू शकू.

**४.४.७ ॲड्. शिंदे यांच्या विचारांची सद्यस्थितीतील उपयुक्तता :**

ॲड्. शिंदे यांचे शैक्षणिक योगदान हे सद्यस्थितीत विद्यार्थी, शिक्षक, शाळा, महाविद्यालय, शिक्षण संस्थाचालक, पालक, प्रशासक यांच्यासाठी उपयुक्त आहे.

**कोष्टक क्र ४.५.१**

| अभ्यासक | जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाचे शै. मानसशास्त्रावरील परिणाम | संदर्भ |
|---|---|---|
| १ | ॲड्. शिंदे यांच्या वाड्.मयातून त्यांचे जीवन संघर्ष, स्वातंत्र्यपूर्व चळवळ, स्वातंत्र्योत्तर चळवळ, भूमिगत जीवन शैक्षणिक व सामाजिक कार्य यांचे प्रेरक दर्शन घडत असल्याने विद्यार्थ्यांना हे वाड्.मय वाचण्यास प्रवृत्त करून त्यांच्यावर मूल्यांचे शिक्षण बिंबविता येतील. | शिक्षण व समाज |
| २ | ॲड्. शिंदे हे फक्त पुस्तकी पंडीत नाही. व्यापक सहनुभूती आणि सर्वांगीण निरीक्षण यातून स्फुरलेला विचार ते मांडतात. त्यांच्या भाषणाप्रमाणे त्यांचे लेखनही भावोत्कटतने ओथंबलेले असते. श्रोत्याला वाचकाला अंतर्मुख करणे, उत्तेजित करणे, क्रियाप्रवण करणे हेच त्यांचे इप्सित असते. प्रेरकता आणि प्रोत्साहकता हा त्यांच्या विचारांचा गुण आहे. त्यांचे लिखाण वाचकाला विचार करायला प्रवृत्त करते. | चरित्र आणि चारित्र्य |
| ३ | ॲड्. शिंदे यांनी त्यांच्या संपूर्ण वाड्.मयात मूल्यांना अतिशय महत्त्व दिलेले आहे. मूल्यांशिवाय समाज परिवर्तन नाही यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. त्यांचे शैक्षणिक विचार विद्यार्थी, शिक्षक, पालक, मुख्याध्यापक, ग्रंथपाल, सामाजिक कार्यकर्ते, शैक्षणिक प्रशासन अधिकारी, संस्थाचालक, अभ्यासक्रमनिर्मिती तज्ज्ञ या सर्वांना उपयुक्त आहेत. | प्रश्न आहे मूल्यांचा ध्यासपर्व; |
| ४ | ॲड्. शिंदे यांचा पिंड वेगवेगळ्या विचारधारांनी संस्कारीत झालेला आहे. अनेक सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था यांचे कार्य त्यांच्या लिखाणातून समाजापुढे आणले आहे. समाजाची उपक्रमशीलता वाढविण्यासाठी ॲड्. शिंदे यांचे वैचारिक लेखन उपयुक्त आहे. | भावलेल्या प्रस्तावना |
| ५ | ॲड्. शिंदे यांनी शिक्षणक्षेत्रातील अनेक समस्या त्यांच्या लेखणातून मांडल्या आहेत, परंतु फक्त प्रश्न मांडून ते थांबले नाहीत तर त्यावरील उपायांची चर्चाही त्यांनी केली आहे. शिक्षक, पालक, संस्थाचालक व प्रशासक यांच्यासाठी हे विचार मार्गदर्शक व दिशादर्शक आहेत.<br>ॲड्. शिंदे हे कार्यवादी व आदर्शवादी आहेत. स्वातंत्र्यसैनिक, सामाजिक भान असलेला वकील, समाजसेवक, शिक्षणतज्ज्ञ, शेतकरी, गो—पालक अशा अनेक भूमिका एकाच आयुष्यात त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. जीवनात निराश झालेल्या व्यक्तीला, अपयशाने खचलेल्या माणसाला उभारी देणारे, प्रेरणा देणारे त्यांचे लेखन आहे. | विचारवेध |

## ४.५ ॲड्. रावसाहेब शिंदे यांच्या मुक्त व प्रकट मुलाखतीतील विचारांचे विश्लेषण :

उद्दिष्ट क्र. १ ते ५ च्या संदर्भातील माहिती प्राप्त करण्यासाठी संशोधकाने ॲड्. रावसाहेब शिंदे यांची मुक्त मुलाखत घेतली. या मुलाखतीतील मुक्त प्रश्नांच्या उत्तरानुसार शैक्षणिक तत्त्वज्ञान, शैक्षणिक समाजशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र, मूल्ये विषयक विचारांचे घटकनिहाय विश्लेषण केले आहे.ॲड्. रावसाहेब शिंदे हे व्यावसायिक शिक्षणतज्ज्ञ नाहीत. आजच्या शैक्षणिक वास्तवाचे अवलोकन, अनुभव आणि मनन—चिंतन यातून त्यांचे शिक्षणविषयक चिंतन आकाराला आलेले आहे.

श्रीरामपूर येथील 'महादेव मळा' हे ॲड्. रावसाहेब पांडुरंग शिंदे यांचे निवासस्थान आहे. येथेच संशोधकाने ॲड्. रावसाहेब शिंदे यांची मुक्त व प्रकट मुलाखत घेतली. ही मुलाखत मुख्यत: ॲड्. शिंदे यांचे विचार व कार्य यानुसार घेण्यात आली. या मुलाखतीमध्ये संशोधकाने पुढील घटकांना अनुसरून प्रश्नावली तयार केली व त्यानुसार मुलाखत घेण्यात आली.

**मुलाखत मुद्दे :**

१ शैक्षणिक तत्वज्ञान विषयक विचार

२ शैक्षणिक मानसशास्त्र विषयक विचार

३ विचार व कार्याची सद्यस्थितीतील उपयुक्तता.

### ४.५.१ ॲड्. रावसाहेब शिंदे यांचे शैक्षणिक तत्वज्ञान विषयक विचार :—

#### ४.५.१.१ शिक्षणविषयक संकल्पना (शिक्षणाचा अर्थ) शिक्षणाचे महत्त्व, कार्य, उद्दिष्टे याविषयीचे विचार.

१ ज्ञान प्राप्तीसाठी शिक्षण हेच प्रभावी साधन आहे. शिक्षणातूनच ज्ञान साधना करता येते. ज्ञान साधनेतूनच वैज्ञानिक जाणिवा आणि शोध यांचा रस्ता सापडतो. ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात नेत्रदीपक शोध लावणारे आणि प्रगती करणारे शास्त्रज्ञ शिक्षणाच्या सहाय्यानेच त्यांचे कार्य करू शकले. देशातील मुलांना

लहानपणापासून शिक्षणाची उत्तम तऱ्हेची संधी मिळणे आणि पुढे क्रमाक्रमाने विद्यापीठ पातळीपर्यंत असे उत्तम शिक्षण मिळणे यासाठी अत्यावश्यक आहे. गुणवत्ताप्रधान शिक्षण व्यवस्थेतून विज्ञाननिष्ठांची आणि समाजनिष्ठांची जोपासना होऊ शकते.

२ शिक्षण म्हणजे चांगला उदात्त वृत्तीचा माणूस घडविणे.

३ कोणत्याही देशाचे भवितव्य, हे त्या देशातील चारित्र्यशील, नीतिमान आणि कर्तव्यनिष्ठ अशा नागरिकांवर अवलंबून असते. अशा नागरिकांशिवाय देशाची प्रगती होऊच शकत नाही आणि असे नागरिक शिक्षणातून मिळणाऱ्या संस्कारातूनच निर्माण होऊ शकतात असे संस्कार करणारे शिक्षण हवे आहे.

४ शिक्षणाने माणसाला स्वत्वाची जाणीव येते. योग्ययोग्यतेचा विवेक येतो असे जागृत आत्मभान असलेली माणसेच जीवनाचा प्रवाह बदलू शकतात. जीवन संस्कारीत आणि विकसित करण्याचे शिक्षण हे एक साधन आहे.

५ शिक्षण हे सुसंस्कृत जीवनाचे साधन आहे. शिक्षणाने विचारशक्तीची जोपासना केली पाहिजे.

६ अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या पायावर डोळे विस्फारित व्हावेत असे उद्योग उभे राहत आहेत. शेतीक्षेत्रही त्याला अपवाद नाही. हे ज्ञान कवेत घेण्याची क्षमता असणारे नवे विश्वमित्र आमच्या शिक्षणातून घडले पाहिजे. ही आमची नितांत गरज आहे. त्याशिवाय आमच्या देशाला उज्ज्वल भविष्य नाही. नव्या स्पर्धेच्या जगात यशस्वी होण्यासाठी आमच्या ज्ञानाची, शिक्षणाची क्षितिजे आणि कक्षा आम्ही उंचावल्याच पाहिजेत.

७ प्रगतीसाठी ज्ञान पाहिजे, ज्ञानार्जनासाठी नियोजन पाहिजे, नियोजनासाठी विचार पाहिजे, विचारामागे प्रेरणा पाहिजे, प्रेरणेसाठी ध्येयवाद पाहिजे, ध्येयवादाला नैतिकतेचे अधिष्ठान पाहिजे असे नैतिक अधिष्ठान चारित्र्यशील शिक्षणातूनच निर्माण होते.

८ शिक्षणातून समाजाची उपक्रमशीलता जागविली गेली पाहिजे. शिक्षण आणि समाज या परस्परपूरक बाबी आहेत. शिक्षणातून

समाज घडतो. समाजाने चांगल्या शिक्षणाच्या सोयीसुविधा दिल्या पाहिजेत. समाज हा ज्ञानदानामुळे उभा राहतो आणि समाजाच्या पाठबळावरच शिक्षणसंस्थाचालतात.

९ आपले शिक्षण हे रवींद्रनाथांच्या शांतिनिकेतनप्रमाणे आदंनदायी शिक्षण बनले पाहिजे. आनंददायी शिक्षणामुळेच शाळेतील गळतीचे व स्थगनचे प्रश्न कमी होतील.

१० शिक्षणातून स्त्रिया, दलित, आदिवासी, भटके विमुक्त, इतर गरीब श्रमजीवी यांची अज्ञान व गरीबीच्या अंध:कारातून सुटका व्हावी.

११ समाजातील जाती—जातीतील भेद, स्त्री—पुरूष भेद, गरीब—श्रीमंत भेद शिक्षणामुळेच दूर होऊ शकतो.

१२ विद्यार्थ्यांमध्ये देशाबद्दल प्रेम, समाजाबद्दल बांधिलकीची भावना, शिक्षकांमध्ये भरभरून देण्याची वृत्ती निर्माण करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असायला हवे.

१३ शिक्षणातून श्रमसंस्कृतीचा विकास व्हायला पाहिजे. श्रमाशिवाय समाजातील चारित्र्याचा विकास होऊ शकत नाही. श्रमशिक्षण हेच चारित्र्याचे, शीलाचे, समानतेचे शिक्षण आहे.

१४ शिक्षण म्हणजे फक्त नोकरी हा विचार आजच्या शिक्षणातून दूर व्हावा. कौशल्यनिर्मिती हेच शिक्षणाचे उद्दिष्ट असायला हवे.

१५ शिक्षणातून ज्ञानेश्वरांनी सांगितलेली विश्वबंधुत्वाची भावना निर्माण झाली पाहिजे. शाळेशाळेमधून त्यासाठीचे उपक्रम, राबविले पाहिजेत.

१६ जो देश मातीला जपू शकत नाही, तो देश टिकू शकत नाही या डॉ कार्व्हर यांच्या विचाराचा आमच्या शिक्षणाने गांर्भीयाने विचार करायला हवा. आमच्या शिक्षणातून विद्यार्थ्यांला निसर्गावर प्रेम करायला शिकविणे गरजेचे आहे. धरणीमातेचे वस्त्रहरण, प्रदुषणाचा राक्षस थांबविणे, थोपविणे शिक्षणातूनच शक्य आहे. वर्गातील व्याख्यानापेक्षा शेतातील कृती जास्त महत्त्वाची आहे.

१७ शिक्षणातून संवेदनशील विचार करणारे, सामाजिक भान असलेले सर्जनशील मन घडविले जावे. आजच्या शिक्षणातून हे अपेक्षित आहे.

१८ शिक्षण हे समाज परिवर्तनाचे, समाज नियंत्रणाचे प्रभावी साधन आहे. पण शिक्षणच प्रभावीपणे राबविले जाणे अपेक्षित आहे. उदयाचा भारत घडविणे हे शिक्षणाचेच कार्य आहे.

१९ सर्वांना सामावणारे शिक्षण स्वरूपाने बहुविध असले पाहिजे. त्यामुळे भारताच्या आर्थिक आणि औद्योगिक कायापालटासाठी आवश्यक असे प्रशिक्षित मनुष्यबळ सातत्याने पुरविणे आपल्या शिक्षणव्यवस्थेला शक्य होईल. उच्च शिक्षणाच्या या समावेशक संकल्पनेमुळे सामाजिक न्याय आणि समता यांच्या दिशेने समाजपरिवर्तनाला गती देणे शक्य होईल.

२० विद्यापीठातील शिक्षण हे केवळ पुस्तकी न राहता त्याची व्यवहाराशी सांगड घालण्याची नितांत गरज आहे.

२१ महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याची उज्ज्वल परंपरा महाराष्ट्राला लाभल्याने बऱ्याच शिक्षण संस्था महाराष्ट्रात शिक्षणाचे काम करीत आहेत. आता ज्ञान विज्ञानाच्या विस्तारीत क्षितिजांना गवसणी घालण्याचे काम या संस्था आणि शिक्षणक्षेत्र यांनी करावे. वंचितांना शिक्षणाची व गुणवत्ताधारक होण्याची संधी उपलब्ध करून देऊन प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचा पाया गुणवत्ताभिमुख व अधिक बळकट करणे हे उद्दिष्ट ठेवावे. विद्यापीठात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आध ीचा शैक्षणिक दर्जा ठिसूळ राहणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

२२ दलित, वंचित सामान्यजन यांच्या जवळ श्रमशक्तीची श्रीमंती आहे. ही श्रीमंती हेच देशाचे वैभव आहे. देशाची अमोल संपत्ती आहे. या संपत्तीच्या बळावर गरीब माणूस इंग्रजी भाषेचेही शिक्षण घेऊ शकतो आणि उच्च विद्याविभूषित होऊन माहिती

तंत्रज्ञान व्यवस्थापन यासह ज्ञानाच्या सर्वच क्षेत्रात उंच भराऱ्या मारू शकतो. शिक्षणातला पैशाचा बाजार थांबविला पाहिजे. श्रमाच्या मोबदल्यात शिक्षण दिले पाहिजे. समर्पित भावनेने सामाजिक बांधिलकीने, सेवाभावी आणि त्यागी वृत्तीने बहुजनांना शिक्षण देण्याची प्रेरणा प्रभावी करायला पाहिजे.

२३ किमान मुलभूत शिक्षण नसलेली फार मोठी लोकसंख्या भारतात आजही असावी हे या देशाचे दुदैवच आहे.

**४.५.१.२ शिक्षणाची ध्येये याबाबतचे विचार :—**

१ उदात्त विचाराने वागणारी चांगली माणसे तयार करणे हेच खरे शिक्षणाचे व्यक्तिगत आणि राष्ट्रीय ध्येय असले पाहिजे.

२ व्यक्तिला ज्ञानभिलाषी, स्वावलंबी, चारित्र्यसंपन्न बनविणे, सर्वधर्मसमभावाची भावना रूजविणे.

३ सामाजिक भान असलेला व सामाजिक बांधिलकी जपणारा माणूस आपल्या शिक्षणातून तयार व्हायला पाहिजे.

४ शिक्षणातून व्यक्तीच्या किमान मुलभूत गरजांची पूर्तता व्हायला पाहिजे.

५ म. गांधींनी 'चारित्र्यविना शिक्षण' सामाजिक पाप मानले आहे. आमच्या शिक्षणातून चारित्र्यवान, शीलवान, नीतीवान नागरीक तयार झाले पाहिजे.

६ कर्म ज्ञानमय आणि ज्ञान कर्ममय बनविणे शिक्षणाचे ध्येय आहे. शिकलेले पंडित श्रमाला मूल्य देत नाहीत. शिक्षणातून श्रमाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे.

७ शिक्षण हे केवळ पुस्तकी न राहता व्यवहाराशी त्यांची सांगड घातली गेली पाहिजे. सर्वसामान्य माणसांपर्यंत शिक्षणातील बदल, प्रवाह पोहचले पाहिजे तरच शिक्षणातून आदर्श नागरीक व आदर्श समाज घडू शकेल.

८ राष्ट्रप्रेम, श्रमप्रतिष्ठा, स्त्री —पुरूष समानता, आरोग्य, स्वच्छता, पर्यावरणाविषयी प्रेम, संवेदनशीलता या मूल्यांची रूजवणूक करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे.

**४.५.१.३ शिक्षण व्यवस्थेतील समस्या, प्रश्न, उपाय याविषयीचे विचार.:—**

१ बालमजुरीचा प्रश्न :— 'शिक्षण हक्क' कायदा येऊनही भारतातील शहरांमध्ये कित्येक काही मुले बालमजूर व बालकामगार म्हणून काम करत आहेत. बालमजुरी किंवा बालकांनी भिक मागणे या सगळयांना गुन्हेगारीच्या सदरात समाविष्ट करून समाज शासन मोकळे होते. तथापि त्या कशामुळे उद्‌भवतात याच्या उगमाचा शोध घेऊन त्यावर काम केले तर आपल्याला उत्तर सापडेल.

२ गरीबी — शाळा आणि शिक्षण यापासून समाजातील अजूनही खुप मुले दूर आहेत ती प्रामुख्याने दारिद्रयामुळेच. स्वातंत्र्यानंतरच्या ६० वर्षाच्या काळात अजूनही आपण ३० कोटी लोकांच्या अन्न, वस्त्र, निवारा या किमान गरजा पूर्ण करू शकलेलो नाही. आरोग्य आणि शिक्षण हे तर खूप लांब आहे. अडचण आहे ती आर्थिक आणि मानसिक सबलतेची.

३ भ्रष्टाचार—शिक्षणक्षेत्र हे पवित्र क्षेत्र मानले जात होते, परंतु आता शिक्षण क्षेत्रातही शासनात सहभागी असलेले राजकीय पुढारी अशा धंदयात पुढे झाले असून शिक्षण आणि शासन या दोन्ही क्षेत्रात शिक्षणाच्या नावाने भ्रष्टाचाराला गती देण्याचे काम शासन करीत आहे.

४ पूर्वी ज्ञानदान हा व्यवसाय नव्हता. ती सेवा होती त्यामुळे पूर्वीच्या ऋषींचा, शिक्षकांचा राजसत्तेवरही प्रभाव आणि अंकुश होता. शिक्षकांमध्ये लाचारी नव्हती, पगार नव्हता. आजचे शिक्षण हे कणा नसलेले, लाचार शिक्षण झाले आहे. मूल्यांची घसरण, पैशाला आलेले महत्त्व, ढोंगीपणा यामुळे शिक्षणक्षेत्र ढवळून निघाले आहे.

५ ग्रामीण महिला, आदिवासी बांधव हे खूपच मागासलेल्या अवस्थेत आहेत. तरूणांपैकी फार मोठी संख्या बेकार आहे. शहरात झोपडपट्‌टया, फूटपाथवर राहणारी मोठी लोकसंख्या

आहे. शिवाय नागरीवस्तीला भेडसावणाऱ्या हवा, पाणी, प्रदुषणापासून तर आरोग्यापर्यंतच्या समस्या, रस्ते, वाहतूक, शिस्त आणि कायदा सुव्यवस्था यांच्या समस्या आ वासून उभ्या आहेत. सगळया क्षेत्राला लाचलुचपतीने ग्रासले आहे. भ्रष्टाचार वाढविणारा वर्ग हा तर अत्यंत सुशिक्षित व शिकलेला आहे. बहुतेकांना पदव्यांची शेपटे चिकटलेली आहेत. अशा तऱ्हेची भ्रष्ट माणसे देशाला शक्तीशाली आणि सामर्थ्यवान बनवू शकतील काय?

६ बहुसंख्य लोकांना निरक्षर ठेवणारी आणि धनदांडग्यांना भरभरून माप टाकणारी व्यवस्था असे स्वरूप शिक्षण व्यवस्थेला आलेले आहे. शिक्षणाचा आपण अपेक्षित असा प्रसारविस्तार करू शकलो नाही आणि आवश्यक अशी गुणवत्ता टिकवू शकलो नाही, असे वाटावे अशी आजची शैक्षणिक परिस्थिती आहे.

७ संगणकीय जादूच्या जगात निरक्षर, निर्बल, दुर्बल घटक यांचे स्थान काय? शिक्षणापासून वंचित असणाऱ्या या घटकांना माहिती तंत्रज्ञानाचा काय उपयोग? संगणकाचा काय उपयोग ते करू शकणार? अक्षरज्ञानच त्यांना नाही तर मग ते इंग्रजी भाषा कशी अवगत करू शकणार? उच्च वर्णाला आणि उच्चवर्गीयांनाच फक्त याचा फायदा मिळणार ना? वंचितांना अविदयेच्या स्थितीतून बाहेर न काढल्यास त्यांची दुर्दशा आहे तशीच राहणार. त्यांना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून योग्य त्या सुविधाही उपलब्ध ा करून देणे गरजेचे आहे.

८ ग्रामीण आणि गोरगरीब अशा बहुजन समाजातील मुले शाळेत जरी आली, तरी महाविद्यालयात पदवीपर्यंत आणि पद्व्युत्तर शिक्षण किती घेऊ शकतात? याची माहिती पाहिली तर त्यात गळतीच्या प्रमाणाला मर्यादा नाही. शिकून तरी काय करायचे हा प्रश्न गरीबांच्या मनात घर करून राहतो. शिकून बेकारीच पदरात पडते. त्यामुळे शिक्षणाबद्दल अनास्था तयार होते.

९ शाळेत जाताना मुलाच्या पाठीवरील दप्तराचे ओझे इतके जड

असते की अक्षरशः त्या ओझ्याखाली दबून जातात. दप्तराच्या ओझ्याविना शाळा यासंबंधीची चर्चा, घोषणा अनेकवेळा झाल्या तथापि त्यांचा काहीही उपयोग झालेला नाही. मनाला धक्का देणारी बाब म्हणजे या शिक्षकांच्या मनाला याबाबत टोचणी का लागत नाही. लहानग्याची कीव का येत नाही. शिक्षक आणि शाळा इतक्या हृदयशून्य का झाल्या आहेत?

१० गृहपाठ हा एक मुलांना सदैव भेडसावणारा एक प्रकारचा राक्षस असल्याची बहुतेक मुलांची मन:स्थिती सदैव जाणवते. तो पुरा न करता आल्यामुळे शिक्षक काय शिक्षा करतील याविषयीचा भितीचा गोळा मुलांच्या पोटात उठलेला असतो. आपले शिक्षण आनंददायी शिक्षण केव्हा बनेल?

११ मुलांना शाळा म्हणजे एक प्रकारचा कोंडवाडाच वाटतो. कधी शाळा सुटल्यावर किंवा शाळेला सुट्टी आहे असे ऐकल्यावर मुलांना मनापासून आनंद होणे हे या शिक्षणपद्धतीचे मोठे अपयश आहे.

१२ शिक्षणाची संख्यात्मक वाढ होऊनही आम्ही समानतेचा मंत्र घेऊ शकलो नाही. शिक्षणाने आम्ही तथाकथित 'साहेब' होतो. शिक्षणाने समाजात 'पांढरपेशी' वृत्ती जोपासली जात आहे. White Collar Jobsokys मोठया संख्येने वाढत आहेत. हे सर्व 'साहेब' श्रम करणाऱ्याला कनिष्ठ लेखतात. शिक्षणातून श्रमालाच कमी लेखण्याची वृत्ती जोपासली जात आहे. ऑफिसाकडे, नोकरीकडे लोंढेच्या लोंढे पळतात. शेतात काम करायला मात्र माणसे मिळत नाहीत.

१३ मानवी समाज जी विकासाची वाट चालत आला, त्या विचार प्रवर्तनाने जगातल्या ज्या क्रांत्या झाल्या किंवा मानवी जातीत क्रांतीकारक स्थित्यंतरे घडून आलीत ती सर्व वैचारीक प्रेरणेने व वैचारिक जागृतीने. माणसाच्या वैचारिक जागृतीला आणि प्रेरणेला फार मोठे स्थान मानवी जीवनात आहे. यापासूनच माणसात ध्येयवादाची जोपासना होते आणि महान कार्य करण्यास

माणसाला हत्तीचे बळ मिळते. म्हणून विचार जागृतीला मानवी जीवनात अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

१४ शिक्षणासंबंधीचे कोणतेही संस्कार नसतांना अथवा घराण्यात तशी लक्षणीय परंपरा नसताना शिक्षणविषयीची एवढी ओढ कशी काय निर्माण होऊ शकली हा एक संशोधनाचाच विषय आहे. परिस्थितीच माणसाला घडवत असते. बिकट परिस्थिती हा एक उत्तम शिक्षकच असतो.

१५ मानवाला आपण पुढे का जाऊ शकत नाही, अधिक काही तरी व्हायलाच पाहिजे या जाणिवेतून, बंधनातून मुक्त होण्याची प्रेरणा मिळते. स्वत:च्या पुनरूत्थानासाठी स्वत:च लढले पाहिजे. आपल्याला दडपून टाकणाऱ्या शक्तींना नमविले पाहिजे. अशी जिद्द मनात निर्माण होते. परिस्थितीनुरूप अशी जिद्द म्हणजेच शिक्षणाची प्रेरणा असते.

१६ “Full many flowers are born to blush unseen and waste its frongrance in the desert air” अनेक फुले अशी जन्माला येतात की त्यांचा पत्ताच जगाला लागत नाही त्यांचा सुवास रानमाळावर अथवा वाळवंटात तसाच वाऱ्यावर विरून जातो. ग्रामीण भागातील मुलांचे जीवन शिक्षणाविना आणि संधीविना असेच कोमेजून जाते. त्याचाही जगाला पत्ता लागत नाही. उत्कृष्ट शिक्षकांच्या भेटीमूळे अशा विद्यार्थ्यांचे जीवन उजळून निघते.

१७ अतिशय जुजबी पगार असूनही समर्पित भावनेने कार्यरत होणारे शिक्षकांचे एक दैदिप्यमान विश्‍व, हल्लीच्या जगात नाहीसे का व्हावे? विदयेच्या क्षेत्रातही कमी पैसा मिळत असतांना शिक्षकाची, शिक्षणाबाबतची निष्ठा आणि भरघोस पैशाच्या पगाराच्या शैल्या मिळून देखील आपल्या कामासंबंधी अनास्था हे सगळेच आपल्याला बुचकळयात टाकणारे आहे. म्हटले तर हा संशोधनाचाच एक गंभीर विषय.

Life is not a schedule of defeats

But it is a parade of wonders.

माणसाचे आयुष्य हे पराभवांचे परिशिष्ट नसून तो एक आश्चर्याचा खजिना आहे.

१८ समाजाची उपक्रमशीलता मारून टाकायची आणि आपणही हात आखडते घ्यायचे या शासकीय धोरणामुळे महाराष्ट्रापुरते तरी शैक्षणिक धोरण दिशाहीन झालेले आहे. सर्वसामान्य गोरगरीब जनतेला आता शासन वाली राहिलेले नाही. शासनाने त्याबाबत कर्तव्यपूर्तीची अंगावरची वस्त्रे बिनदिक्कतपणे फेकून दिली आहेत.

१९ शिक्षण फुकट मिळाले की, त्याची किंमत कमी होते. विद्यार्थी आळशी होतात. पालक बेफिकीर होतात. मुलांना फुकट सवलती मिळण्याची सवय लागते. त्यामुळे स्वावलंबी शिक्षणाचे कंबरडे मोडते.

२० आयोगामागून आयोग नेमले जात आहे. या आयोगाचे काम एकच, पांढऱ्या फितीच्या अनुत्पादक घटकांवर पैशाचा पाऊस पाडायचा, करता येइल तेवढी उधळण करायची, कष्ट करणारा उत्पादक शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण गरीब किती हलाखीत आहे याची जाणीव या महाभागांच्या गावीही नसते.

**४.५.१.४ शिक्षकाविषयीचे विचार :—**

१ शिक्षकाचे कर्तव्य हे एकप्रकारे सतीचे वाण आहे. चारित्र्य, नीतीमत्ता प्रचलित शिक्षण व्यवस्थेला भावणारे नसल्याचे दिसून येते. शिक्षकांनी चारित्र्यशील असायला पाहिजे. निर्व्यसनी असायला पाहिजे. कर्तव्यदक्ष असायला पाहिजे. आपल्या कार्यावर त्यांची नितांत श्रद्धा आणि निष्ठा असायला पाहिजे. अतोनात परिश्रम घेण्याची तर त्यांची तयारी पाहिजेच. पण त्याशिवाय प्रसंगी त्याग करण्याची देखील मानसिकता त्याने जोपासली पाहिजे आणि एकप्रकारे आदर्शवत असे आपले व्यक्तिमत्त्व विकसित केले पाहिजे.

२ शिक्षक हा शिल्पकार असतो आणि तो शिल्पातून विद्यार्थ्यांची

मूर्ती आकाराला आणतो. उत्कृष्ट शिक्षकाला प्रत्येक विद्यार्थ्यात एक देखणे शिल्प दिसते. त्यात एक राजहंस —राजहंसी दिसते. तो कोणत्याचा विद्यार्थ्यांना ‘ढ’ ठरवित नाही.

३ प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये आगळेवेगळे अव्यक्त व्यक्तिमत्त्व अस्तित्वात असते. शिक्षकाने ते फक्त मुक्त करायला मदत करावयाची असते. अशा शिक्षकाच्या मदतीचा हात विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला की त्या विद्यार्थ्यातून एक विकसित असे सुरेख व्यक्तिमत्त्व अविष्कारीत होते आणि हेच खरे शिक्षकाचे काम असते.

४ शिक्षकाचे ध्येय हे राष्ट्रबांधणीचे ध्येय असते. राष्ट्राची बांधणी ही देशाच्या आदर्श आणि देशप्रेमी नागरिकांच्यावर अवलंबून असते. आपल्या विद्यार्थ्यांमधून असे देशप्रेमी नागरीक घडविणे हे शिक्षकाचे काम असते.

५ आजच्या शिक्षकांना वेतनाच्या रूपाने समाज भरभरून देत आहे. हयासंबंधी जाणीव ठेवून शिक्षकांनी समाजाविषयीचा कृतज्ञभाव जागविला पाहिजे. आजच्या शिक्षकांनी टॉलस्टॉय, रवींद्रनाथ टागोर, म. गांधी, जे. पी. नाईक, म. फुले, कर्मवीर या थोर शिक्षकांपासून प्रेरणा घेण्याचा मनापासून प्रयत्न केला तर त्यांच्यातूनही ‘उत्कृष्ट शिक्षक’ तयार होतील.

६ शिक्षकाचे विद्यार्थ्यांवर प्रेम नसणे हा शिक्षणातला सर्वात मोठा अडथळा आहे.

७ शिक्षक—प्राध्यापक यांच्या संघटना कर्तव्याबाबत ‘ब्र’ ही काढत नाहीत, मात्र हक्कासाठी समाजाला वेठीला धरतात. अशी चुकीची दबावतंत्रे शिक्षणपद्धतीला विकलांग करून टाकीत आहेत. एकेकाळी गरीबी हा विद्वान लोकांचा बाणा होता. जितका विद्वान तितका निरपेक्ष. विद्वान तेव्हा बाजारभावात सापडले नव्हते. जास्तीतजास्त सेवा, कमीतकमी दक्षिणा ही वृत्ती होती. पण आजवर विद्वानांची विद्या लिलावत निघाली आहे.

८ देशाच्या आणि समाजाच्या वैचारिक परिवर्तनाची भूक विचारवंतच भागवू शकतील. या विचारवंतांना देखील चारित्र्य आणि नीती यांची भक्कम बैठक पाहिजे. शिक्षक आणि प्राध्यापक यांच्यावरच विचारवंतांची भूमिका पार पाडण्याची जबाबदारी आहे.

९ शिक्षणाची आवड या निकषावरच शिक्षकांची निवड व्हायला पाहिजे. शिक्षक हे शिक्षण, शिकविणे, व्यासंग, विद्यार्थीप्रियता या विषयाच्या ओढीने आणि आवडीने या क्षेत्रात आलेले असतात की केवळ चरित्रार्थाचे एक साधन म्हणून त्यांनी नोकरी पत्करलेली असते? शिक्षण क्षेत्रातला हा अतिशय मुलभूत स्वरूपाचा मुद्‌दा आहे.

१० जो शिक्षक विद्यार्थ्यांला विषयाची ओळख करून देतो, त्याला विषयाची गोडी लावतो आणि स्वतंत्रपणे तो विषय समजावून घेण्यासाठी विद्यार्थ्यांला प्रेरित करतो. तोच खरा शिक्षक होय.

११ मुलांना शिकविणाऱ्या शिक्षकांनी मातेची भूमिका बजावयास पाहिजे. शिक्षक आपल्याला शिकवितात असे मुलाला कधीही वाटता कामा नये. उलट मातारूपी शिक्षकाने केवळ त्यांना मार्गदर्शन करावे.

१२ भारताला जर शक्तीशाली आणि सामर्थ्यवान राष्ट्र बनवायचे असेल तर शिक्षण हेच प्रभावी साधन आहे. त्यासाठी आपली शिक्षणव्यवस्था उत्कृष्ट असायला पाहिजे. हे उत्तरदायित्व फक्त शिक्षकच पार पाडू शकतात.

१३ प्राध्यापकांच्या कामाच्या तासांची मोजदाद करतांना एक तास वर्गात घ्यावयाचा असल्यास दोन तास तयारी करण्यासाठी लागतात, असे सुत्र गृहित धरून त्यांच्या कामाच्या तासिकांची संख्या ठरविली आहे. वास्तवात तयारीसाठी प्राध्यापक मनोभावे किती वेळ देतात? जादा कामाच्या प्रस्तावाला प्राध्यापकांच्या संघटनेने विरोध केला, दीर्घकालीन संप घडवून आणला, पण याच संघटना प्राध्यापकांची पाठाची तयारी किती, व्यासंग आणि कर्तव्यदक्षता किती? हे पाहत नाहीत. इतकेच नाही तर

प्राध्यापकांच्या कामाचे परिक्षण व्हावे यालाही विरोध केला जातो. शिक्षक—प्राध्यापक जर खरोखर कर्तव्यतप्तर आणि व्यासंगी असतील तर खाजगी शिकवण्या व खाजगी वर्ग यांचा बाजार एवढा भरभराटीला का यावा? आपले कर्तव्य पार पाडतांना आपल्या विद्यार्थ्यांनी उदयाचे जबाबदार नागरीक व्हावे या विचाराने प्रेरित होवून किती शिक्षक—प्राध्यापक काम करतात? या संबंधातील आपल्या कर्तव्याबाबत शिक्षक—प्राध यापकांनी आत्मपरीक्षण करणे जरूर आहे.

१४ An average teacher instructs, a good teacher guides, a great teacher inspire. सर्वसाधारण शिक्षक नुसतेच सांगतो अथवा हुकूम करतो, चांगला शिक्षक मार्गदर्शन करतो मात्र थोर शिक्षक प्रेरणा देतो. शिक्षकाजवळ प्रेरणा देण्यासाठी तशी ज्ञानसाधना पाहिजे. तो देणारा पाहिजे. तोच 'खरा शिक्षक' संत श्रवइे

**४.५.१.५शाळा, संस्थाचालक, शालेय अभ्यासक्रम,शालेय शिस्त याबाबतचे विचार :—**

१ समाजात जिवंतपणा यावा, चैतन्य यावे आणि त्याची प्रगती व्हावी म्हणून सर्व नैतिक मूल्यांचे महत्त्व ओळखता येण्याजोगी परिस्थिती आपणास निर्माण करावयाची आहे. ही परिस्थिती निर्माण करण्याची भूमिका शाळा, संस्थाचालक यांना पार पाडावयाची आहे.

२ देशाला आणि समाजाला देण्याची प्रेरणा विद्यार्थ्याच्यामध्ये निर्माण व्हायलाच पाहिजे. शिक्षक—प्राध्यापक, शाळा आणि संस्थाचालक यांच्यावर हे उत्तरदायित्व आहे हे आव्हान त्यांनी स्विकारलेच पाहिजे. ही व्यावसायिकतेची नाही तर निष्ठेची बाब आहे. समर्पित भावनेने काम करण्याची जाणीव जोपासलीच पाहिजे.

३ अनेक शिक्षणसंस्था, शाळा आणि त्यांचे चालक, व्यवस्थापन कसे आहे? तेथील गटबाजी, भ्रष्टाचार, सत्तास्पर्धा इ. गैरप्रकार

वाढत आहेत. नीतीमत्ता आणि गुणवत्ता याबाबत शिक्षणसंस्थांची विश्वासर्हता देखील ठिसूळ झाल्याचे दिसून येते. बऱ्याच ठिकाणी वैयक्तिक स्वार्थ व राजकीय हेतूसाठी संस्थेला राबविण्याची प्रवृत्ती चालकांत दिसून येते ठराविक व्यक्तीचे अथवा गटाचे हितसंबंध जपण्यासाठी संस्था वेठीला धरल्या जातात. निकोप शिक्षण संस्था ही आजच्या काळाची नितांत गरज आहे.

४ कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारख्या त्यागी आणि चारित्र्यशील संस्था चालाकांच्या प्रेरणांमुळे शाळा आणि शिक्षकही उत्कृष्ट तयार होतात.

५ राष्ट्रांची खरी जडण—घडण होते ती घरात आणि शाळेमध्ये. देशावर प्रेम करणारे चारित्र्यशील नागरीक शाळेतूनच तयार होतात.

६ आपल्या देशापुढे आरोग्य, पर्यावरण, लोकसंख्या याची फार मोठी समस्या आहे. याबाबत विद्यार्थ्यांत अभ्यासपूर्वक जाण मुळीच निर्माण केली जात नाही. अभ्यासक्रमात या सर्व बाबींचा समावेश असायला हवे.

७ आपला अभ्यासक्रम हा कृतियुक्त व श्रमामूल्यावर आधारीत असला पाहिजे. श्रमाचा आणि शिक्षणाचा संबंध दिवसेंदिवस कमी होत आहे. शिकलेला माणूस श्रम करायला तयार होत नाही. काम करणारा माणूस शाळेत जात नाही. शाळेतून राबविला जाणारा अभ्यासक्रम श्रमाधिष्ठित असायला हवा. श्रमावर विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करायला हवे.

८ आजच्या अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होत नाही, खेळणे, बागडणे, व्यायाम, व्यासंग आणि निर्सगाशी मैत्री या सर्व बाबी शिक्षणातून पूर्ण पुसल्या गेल्या आहेत. फक्त मार्कांसाठी शिक्षण अशी अवस्था आहे. मुलांनी शर्यतीतल्या घोडयासारखे या शर्यतीत दमछाक होईपर्यंत ध ाावायचे, कशासाठी तर मार्कांसाठी आणि पैशासाठी. शिक्षणातली

ज्ञानावस्था निघून गेलेली आहे. विद्यापीठेही पदव्या देण्याच्या टाकसाळी झालेल्या आहेत. आपल्या शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे म्हणजे बेकारांचे कारखाने बनले आहेत.

९ शिक्षणसंस्था व संस्थाचालक यांनी अतिशय गांभीर्याने आत्मपरिक्षण केले पाहिजे. शिक्षणाने समाज सामर्थ्यशाली कसा बनू शकेल. या दिशेने पावले टाकली पाहिजेत. शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या तरूण तरूणींच्या फौजा शेतमळे, डोंगरराने, कारखाने उद्योग, दुग्धव्यवसाय व इतर शेती व्यवसायाशी निगडीत असे पुरक उद्योग पर्यावरण जागृती इ. सर्व ठिकाणी समाजाच्या विकासासाठी कामाला लागल्या पाहिजेत. शिक्षणातून विद्यार्थ्यांना समाजाच्या विकासासाठी कार्यरत होण्याची प्रेरणा मिळायला हवी.

१० पदवीमुळे पद मिळते परंतु पद सांभाळणे व त्याची प्रतिष्ठा वाढवणे सर्वश्री त्या व्यक्तीच्या हातात असते. शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्यांनाही विद्यार्थी हाच आपला देव आहे, असे समजून अहर्निष शिकवावे. आपल्या पेशाशी प्रतारणा करणे म्हणजे महापाप आहे.

**४.५.१.६जागतिकीकरण आणि शिक्षण याबाबतचे विचार :—**

१ आधुनिकीकरणाच्या आणि एकविसाव्या शतकांच्या आव्हानांच्या आपल्या शिक्षणव्यवस्थेला गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. सर्वात जास्त संख्येने मुले शाळेबाहेर असणारा आणि सर्वात जास्त प्रौढ, निरक्षर असणारा देश ही आपली प्रतिमा बदलावी लागणार आहे. २१ व्या शतकाचे आपल्याला ते आव्हान आहे.

२ नव्या ज्ञानविज्ञानाच्या विस्तारीत क्षितिजांना कवेत घेण्याइतकी आपली शिक्षणव्यवस्था व्यापक व समावेशक झाली पाहिजे. दारिद्रयाशी सामना लोकांना ज्ञानसंपन्न करूनच करावा लागतो. अफाट निरक्षर लोक आणि प्रगत ज्ञान व तंत्रज्ञान यांची सांगड घालण्याचे आव्हान आपल्यापुढे आहे.

३ जागतिकीकरणाच्या रेटयाला सामोरे जावेच लागणार आहे. या प्रक्रियेत बऱ्याच क्षेत्रात स्पर्धेला तोंड दयावे लागणार आहे. अनिष्ट स्थिती बदलण्यासाठी आपल्या देशाला मोठी लढाई लढावी लागणार आहे. त्यासाठी सर्वसामान्यांना इंग्रजी भाषा, माहिती तंत्रज्ञान व तंत्रज्ञानाच्या अन्य शाखा या संबंधीच्या शिक्षणाची संधी देऊन समर्थ बनविण्याची गरज आहे.

४ जागतिकीकरणाला सामोरे जाताना सर्वात महत्त्वाचे म्हणजे चारित्र्य आणि शील जोपासणारे शिक्षक आम्हाला हवे आहे. चारित्र्यविना शिक्षण हे गांधीजींनी सामाजिक पाप मानले आहे. नीतिमान समाज शिक्षणातून निर्माण झाला पाहिजे. नीतिमान शिक्षक, नीतिमान शिक्षणतज्ज्ञ, विद्यार्थी हाच २१ व्या शतकाच्या आव्हानाला सामोरे जाणारी आमची शक्तीस्थाने आहेत. अशा शक्तीस्थानांवर आरूढझालेले आमचे शिक्षणक्षेत्र आत्मविश्वासाने जागतिकीकरणाला सामोरे जाऊ शकेल.

५ जागतिकीकरणाला सामोरे जाताना आपणाकडे काय साधनसामग्री आहे, ती कशी आहे, ती कितपत उपयोगी ठरणार आहे या संबंधीची जाणीव आपल्या शिक्षणसंस्थांना, शिक्षकांना असणे जरूर आहे.

**४.५.२ ॲड्. शिंदे यांचे शैक्षणिक मानसशास्त्र विषयक विचार:—**

ॲड्. शिंदे हे पुस्तकी पंडीत नाहीत. समाजात उत्पन्न होणाऱ्या लहानमोठया कंपनांनी त्यांचे संवेदनशील मन अस्वस्थ होते. उपेक्षितांच्या कल्याणाच्या काळजीने आलेली आत्मियता त्यांच्या विचारात आहे. शिक्षणातूनच चांगली मने आकाराला येऊ शकतात आणि त्यातूनच समाज परिवर्तन होऊ शकते. याबद्दल त्यांना विश्वास आहे. उदयाचा शक्तीशाली भारत आमच्या शाळा आणि शिक्षक घडवू शकतात असे त्यांना वाटते. देशात, परदेशात केलेला डोळस प्रवास, अनेक व्यक्ती, ज्यामध्ये विचारवंत, लेखक, साहित्यिक, राजकारणी, समाजसेवक, संस्थाचालक, शिक्षणतज्ज्ञ यांच्याशी आलेला

संपर्क यातून त्यांच्या विचाराची बैठक तयार झालेली आहे. त्यांच्या विचारात प्रेरकता आणि प्रोत्साहकता आहे. शैक्षणिक मानसशास्त्र विषयक त्यांचे विचार मार्गदर्शक आहेत.

**४.५.२.१ बालकांचे मानसशास्त्र, वाढवविकास याविषयीचे विचारः—**

१ ॲड्. शिंदे यांच्या मते बालकांचे मानसशास्त्र शिक्षकाने समजून घेणे ही शिक्षक प्रक्रियेतील मुलभूत बाब आहे. शिकविणाऱ्यापेक्षा शिकणारा महत्त्वाचा आहे. आजची शिक्षणपद्धती बालककेंद्रीत शिक्षणपद्धती आहे. त्यामुळे मुलांचे मानसशास्त्र समजून घेवून जो शिक्षक अध्यापन करील तोच यशस्वी शिक्षक होवू शकतो.

२ लहान मुलांचे मन म्हणजे टिपकागद असतो. लहान वयात होणारे संस्कार चिरकाल टिकतात. शाळेत, कुटुंबात शिक्षक आणि पालक यांनी मुलांसमोर बोलतांना, वागतांना अतिशय जबाबदारीने वर्तन केले पाहिजे. मुले ही अनुकरणप्रिय असतात. त्यामुळे त्यांच्या मनावर अघात होतील, धक्का बसेल अशा बाबी शाळेने, कुटुंबाने कटाक्षाने टाळायला हव्यात. तरच सुरवंटाचे फुलपाखरात रूपांतर होईल.

३ मन, बुद्धी आणि शरीर यांचा विकास म्हणजे शिक्षण अशी व्याख्या. म. गांधीजींनी केली आहे. याठिकाणी त्यांनी अगोदर मनाला महत्त्व दिले आहे. मनाचा विकास झाल्याशिवाय बुद्धी आणि शरीराच्या विकासाचा विचार होऊ शकत नाही. त्यामुळे आमचे शिक्षक, पालक यांनी मन म्हणजे काय? मनाच्या विकासासाठी नेमके काय करावे? काय करू नये याचा विचार करायला हवा.

४ शिक्षणातून चारित्र्यवान, बलवान, नीतिवान माणूस तयार झाला पाहिजे. बालकाची निकोप वाढ आणि विकास झाला तरच ती उदयाचा समाज घडविणार आहेत. यासाठी आमच्या शिक्षणाने शालेय वयात मुलांच्या शरीराच्या वाढीसाठी, मन आणि बुद्धीच्या विकासासाठी विविध स्पर्धा, उपक्रम यांचे आयोजन,

नियोजन केले पाहिजे.

५ शिक्षण हे मातृभाषेतूनच दिले गेले पाहिजे. मातृभाषेतून शिकायला मिळालेल्या मुलांच्या संकल्पना स्पष्ट असतात. त्यांच्या विकासातील वेग इतर मुलांच्या तुलनेत अधिक असलेला दिसून येतो. मातृभाषेतील शिक्षण मुलांच्या वाढीवर आणि विकासावर परिणाम करते.

६ माणसानेमीपणा, अहंभाव, अहंकार आणि स्वत:विषयीच्या श्रेष्ठत्वाचा विचार सोडल्याशिवाय समानतेचे शील जोपासले जाणे शक्य नाही. विनम्रतेची आणि लीनतेची भावना आत्मसात केल्याशिवाय मुक्ती नाही. मी माझी गणना शून्यवतच करून घेणे आवश्यक आहे. माझ्यामधल्या 'मी' ला विसरणे जरूरीचे आहे. आमच्या मुलांना वाढवितांना याचा जरूर विचार करावा लागेल.

७ कर्मवीरांनी बहुजन समाजातील मुलांच्या विकासासाठी श्रम हेच साधन मानले. वर्गाची स्वच्छता, घंटा देणे, जमीन सपाट करणे, इमारत बांधकाम करणे, विटा पाडणे, शेतीची कामे करणे, शेतीमाल बाजारात विकणे, झाडलोट करणे, स्वयंपाक करणे, संडास, मुताऱ्या साफ करणे यासारख्या कामातूनच मुलांचा विकास होतो. यावर कर्मवीरांचा विश्वास होता. रयत शिक्षण संस्था या श्रमसंस्कृतीवर उभी आहे.

८ मुलांवर मूल्यसंस्कार करतांना आपण स्वच्छता, नीटनेटकेपणा या मूल्यांवर भर देतो. बाहयस्वच्छतेबरोबर मनाच्या स्वच्छतेचाही यामध्ये विचार व्हायला हवा. शिक्षणातून मनाची स्वच्छता करणारे उपक्रम राबविले जावेत, त्यातून ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना अपेक्षित असलेली प्रज्वलित मने घडतील की जी उदयाचा भारत घडवतील.

९ गांधीजींनी मानसशास्त्र या विषयाच्या औपचारिक अभ्यास केलेला नव्हता, परंतु मुलांना वाढवितांना विनाकारण शिक्षेचा

वापर, धाकधपटशा त्यांना मान्य नव्हता. मुलांना मारहाण करणे, त्यांना मनाला लागेल असे बोलणे यामुळे मुलांच्या वाढीवर विकृत परिणाम होऊ शकतो.

**४.५.२.२ अध्ययन, अध्यापन याविषयीचे विचार :—**

१ 'खरे शिक्षण' हे विद्यार्थी घडविण्याचे शिक्षण असते. शिक्षकांना विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक पालकत्व स्वीकारावे लागते. उत्कृष्ट शिक्षक विद्यार्थ्यांना, शाळेला आणि समाजाला आकार देतांना नकळतपणे स्वत:लाही आकार देत असतो.

२ जो शिक्षक उघडया डोळयांनी जग पाहतो. व्यासंगाची पराकाष्टा करतो, तोच शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट अध्यापन करू शकतो.

३ कर्मवीर, म. गांधी, विनोबा भावे यांना फक्त वर्गातील अध यापन करणारा शिक्षक अपेक्षित नव्हता. जीवन शिक्षण देणारा शिक्षक त्यांना हवा होता. शिक्षक हा देणारा असावा आणि शिक्षणप्रक्रियेतून त्याने समाजाला भरभरून द्यावे.

४ विद्यार्थ्यांचे खरे अध्ययन घडते ते कामातून आणि अनुभवातून. कृतीशिवाय घेतलेले शिक्षण निरर्थक आहे. विद्यार्थ्यांचे अध्ययन परिणामकारक घडविण्यासाठी त्याला कृतीची जोड अपरिहार्य आहे.

५ आजच्या शिक्षणातून श्रमाला हद्दपार करण्यात आलेले आहे. शिकलेल्या माणसाला कष्टाचे काम रूचत नाही आणि कष्ट करणाऱ्यांचा शिक्षणाशी संबंध नाही अशी अवस्था आहे. विद्यार्थ्यामध्ये मूल्ये हरवत चाललेली आहे. अशी ओरड आम्ही करतो. परंतु श्रमशिक्षण हेच मूल्यसंवर्धनासाठी उत्तम पर्याय आहे.

६ ''शिक्षकाचे विद्यार्थ्यांवर प्रेम नसणे हा शिक्षणातला सर्वात मोठा अडथळा आहे'' आमचा शिक्षक हा मातारूपी शिक्षक पाहिजे. असा मातारूपी शिक्षकच विद्यार्थ्याला विविध तंत्रांचा

वापर करून शिकवू शकतो.

७ आजचा विद्यार्थी तंत्रज्ञान युगातील विद्यार्थी आहे. तंत्रज्ञान शिक्षकाची जागा घेऊ शकत नाही, परंतु शिक्षकाने तंत्रज्ञानाची कास धरणे काळाची गरज आहे. अध्ययन—अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर केलाच पाहिले.

८ भारतातील ग्रामीण भागात मोठया प्रमाणात शाळा आहे. या शाळेत शिकणारा आमचा ग्रामीण भागातील विद्यार्थी, गरीब, वंचित, बहुजन समाजातील आहे. त्याला काळाच्या बरोबरीने आणण्यासाठी संगणक ज्ञान, तंत्रज्ञान याचा अध्ययन, अध्यापनातील वापर अनिवार्य आहे. तरच आमची ही मुले शहरी भागातील मुलांबरोबर टिकू शकतील त्यासाठी शिक्षक, शासन, संस्थाचालक यांना बरोबरीने काम करावे लागेल.

९ परिणामकारक अध्ययनात प्रेरणा महत्त्वाची आहे. कर्मवीर भाऊरावांनी बहुजन समाजातील चुणचुणीत मुलांना शिकण्याची प्रेरणा दिली त्यातूनच इतिहास घडला. शिक्षकाने वर्गात शिकवितांना एखादा मुद्दा कमी शिकविला तरी चालेल पण मुलांमध्ये शिकण्याची प्रेरणा, संघर्षाची जिदद् निर्माण केलीच पाहिजे.

१० शिक्षकाचे निष्कलंक चारित्र्य ही बाब शिक्षकप्रक्रियेतील सर्वात महत्त्वाची आहे. निष्कलंक चारित्र्य असलेला, व्यवसायावर निष्ठा असलेला शिक्षकच देशप्रेमाने ओतप्रोत भरलेले विद्यार्थी घडवू शकतो.

### ४.५.२.३ बुद्धिमत्ता सर्जनशीलता याविषयीचे विचार :—

१ वर्गामध्ये मार्क मिळविणे म्हणजेच बुद्धिमत्ता नव्हे, स्वयंपाक उत्कृष्ट करता येणे, शेतीमाल पिकविणे, बाजार करता येणे यासारख्या बाबीसुद्धा बुद्धिमत्तेमध्ये येतात. मार्कवंत आणि गुणवंत या दोन्ही बाबींचा समन्वय बुद्धिमत्तेने साधता यायला हवा.

२ बुद्धिमत्तेचा वापर समाजासाठी करता येणे हीच खरी सर्जनशीलता आहे. पैशाच्या श्रीमंतीपेक्षा बुद्धिच्या श्रीमंतीची आपल्याला आवश्यकता आहे.

३ बुद्धिमत्तेच्या जोरावर मानवाने अंतराळात कधीच झेप घेतली आहे. ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान यामुळे घरबसल्या माणसाला सर्व गोष्टी मिळू लागल्या आहेत. बुद्धिमत्तेला कल्पकतेची जोड दिल्याने, बील गेटस् सारखा सामान्य माणूस वयाच्या ४२ व्या वर्षीच जगातला सर्वात श्रीमंत माणूस बनला आहे. सर्व प्रकारच्या तांत्रिक प्रगतीमुळे सर्व देशांच्या सीमारेषा पुसट होवून जग जवळ येत आहे.

४ शिक्षणक्षेत्रातील जीवघेणी स्पर्धा ही फक्त मार्कांसाठी आहे. ज्याचे पाठांतर जास्त त्याची बुद्धिमत्ता जास्त असा सरळ अर्थ हुशारीचा आहे. परंतु येणारे युग हे बोलक्या पोपटाचे नसून, विचार करून नाविण्यपूर्ण कृती करणाऱ्यांचे आहे. आमच्या शिक्षणपद्धतीतून वेगळया पद्धतीने विचार करणारे विद्यार्थी आपल्याला घडवायचे आहे.

५ जीवनात येणाऱ्या समस्यांना, अडचणींना, संकटांना जो यशस्वीपणे सामोरे जातो, त्याच्याशी संघर्ष करून मार्ग काढतो तोच खरा बुद्धिमान होय.

**४.५.२.४ व्यक्तिमत्त्व विकास, व्यक्तीभेद, अनुवंश आणि परिस्थिती याविषयीचे विचार :—**

१ Adversity is the best teacher. बिकट परिस्थिती हा एक उत्तम शिक्षकच असतो. ही परिस्थितीच माणसाला घडवित असते. या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठीचे व्यक्ती ज्या मार्गाचा अवलंब करते त्यातून व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आकाराला येते.

२ माणूस हा विचार करणारा प्राणी आहे. फक्त माणसाला आपण पुढे का जावू शकत नाही. अधिक काहीतरी व्हायलाच पाहिजे या जाणिवेतून, बंधनातून मुक्त होण्याची प्रेरणा मिळते. स्वत:च्या पुनरूत्थानासाठी स्वत:च लढले पाहिजे. आपल्याला दडपून टाकणाऱ्या शक्तींना नमविले पाहिजे अशी जिद्द मनात निर्माण होते. त्यातूनच माणसाचे व्यक्तिमत्त्व आकाराला येते.

३ “Full many flowers are born to blush wnseen and waste its

fragrance in the desert air" अनेक फुले अशी जन्माला येतात की, त्यांचा पत्ताच जगाला लागत नाही. त्यांचा सुवास रानमाळावर तसाच वाऱ्यावर विझून जातो. ग्रामीण भागातील मुलांचे जीवन शिक्षणाविना आणि संधीविना असेच कोमेजून जाते. त्याचाही जगाला पत्ता लागत नाही. उत्कृष्ट शिक्षक भेटले तर मुलांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार येतो.

४ माणसाच्या व्यक्तिमत्त्व विकासात संस्कारांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यासाठी आशा, प्रेम आणि कृतज्ञता हे संस्कार पायाभूत आहेत.

५ शहरात जन्माला येणारी मुले निसर्गाचा मनसोक्त आनंद लुटू शकत नाही. इमारतीच्या कबुतरखान्यात सदैव बंदिस्त असलेली आणि शाळा, कॉलेजात गेल्यावर तिथल्या सिमेंट कॉंक्रेटच्या जंगलात बंदिस्त झालेली असतात. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होत नाही.

६ दुर्दम्य अशावाद, व्यासंग, परिश्रम आणि चिकाटी या सर्व गुणांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार येतो.

७ उत्कृष्ट शिक्षक विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देतो. प्रत्येक विद्यार्थ्यात शिक्षकाला एक देखणे शिल्प दिसते. त्या दगडातून तो उत्तम शिल्पाची घडवणूक करतो. म्हणून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात शाळा आणि शिक्षक यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**४.५.२.५ जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाचे शैक्षणिक मानसशास्त्रावरील परिणाम याबद्दलचे विचार :—**

१ २१ वे शतक हे ज्ञानाचे, विज्ञानाचे आणि तंत्राज्ञानाचे युग आहे या युगाशी जो जुळवून घेईल तोच टिकेल परंतु तंत्रज्ञानाशी जुळवून घेतांना अनेकांच्या मनात भिती आहे. 'मला हे जमेल का?' या प्रश्नाच्या भितीतून न्यनगंड, भय, नैराश्य, वैफल्य यासारखे मानसिक विकार वाढू लागले आहेत.

२ झटपट श्रीमंती, कमी श्रमात अधिक दाम या गोष्टींनी आमची तरूण पिढी लवकर बळी पडते आहे. पैशाच्या अतिहव्यासामुळे

मानवी संबंधांना, भावभावनांना शून्य किंमत उरलेली आहे. माणसा—माणसांतील प्रेमाचा, मायेचा ओलावा, जिव्हाळा दिवसेंदिवस आटत चालला आहे.

३ तरूण पिढी पाश्चात्यांचे अंधानुकरणामध्ये व्यस्त आहे. जे जे मूल्यहीन आहे. त्याचेच आकर्षण वाढले आहे. तरूणांप्रमाणे तरूणींमधील वाढती व्यसनाधीनता चिंताजनक आहे. स्वैराचाराला सीमा नाही, त्याचे विघातक परिणाम आमच्या कुटुंबव्यवस्थेवर होत आहे. मानसिक शांतता, समाधान, आनंदी वृत्ती लोप पावल्या आहे. मानवी मूल्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे. या गोष्टींचा वेळीच पालक आणि शिक्षक यांनी गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

४ आमच्या शिक्षणातून तयार होणाऱ्या विद्यार्थ्यांचे शरीर आणि मन इतके मजबूत आणि कणखर असावे की कोणत्याही बाहय शक्तींशी ते टक्कर घेवू शकेल. आज आम्हाला अशा शिक्षणाची आणि शिक्षकांची आवश्यकता आहे.

**४.५.३ ॲड्. शिंदे यांचे विचारांची सद्यस्थितीतील उपयुक्तता :—**

१ ॲड्. शिंदे हे स्वातंत्र्यसैनिक आहेत. देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक चळवळीमध्ये त्यांनी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहभाग घेतलेला आहे. संघर्ष केलेला आहे. देशाचे सार्वभौमत्व, लोकशाही, सामाजिक विषमता, राष्ट्रभक्ती याविषयीचे त्यांचे विचार, राजकारणी, समाजकारणी, विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, अभ्यासक यांना मार्गदर्शक आणि दिशादर्शक आहेत.

२ ॲड्. शिंदे हे निष्णांत कायदेपंडित आहेत. अनेक सहकारी संस्था, कंपन्या, सोसायटया, शिक्षणसंस्था यांचे ते कायदे संल्लागार आहेत. विविध कायदे, त्यातील त्रुटी, पळवाटा, सुधारणा याविषयी त्यांनी केलेल्या सूचना कायदयाचे अभ्यासक, वकील, न्यायाधीश यांच्यासाठी मौलिक आहेत.

३ ॲड्. शिंदे यांनी उत्तम शेती केलेली आहे. शेतीतील अर्थकारण,

पिके, सेंद्रिय शेती, पाण्याचे महत्त्व, रासायनिक शेतीचे परिणाम याविषयीचा त्यांचा अभ्यास सखोल आहे. शेतीविषयीचे त्यांचे विचार आमचे शेतकरी, कृषीविद्यापीठे, कृषीतज्ज्ञ, शासन यांच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

४ ॲड्. शिंदे यांनी श्री. मणिभाई देसाई यांचेसमवेत 'दुग्धउत्पादनासंदर्भात' काम केलेले आहे. उत्तम प्रतीच्या गाई, त्यांची काळजी, चारा—व्यवस्थापन, दुधाचा बाजार याविषयीचे त्यांचे विचार दूध उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शक आणि दिशादर्शक आहेत.

५ ॲड्. शिंदे हे व्यावसायिक शिक्षणतज्ज्ञ नाहीत. परंतु शिक्षणाबद्दल त्यांच्या मनात अतिशय प्रेम आणि कळवळ आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा मिळालेला सहवास आणि गेल्या ५० वर्षात रयत शिक्षण संस्थेत केलेले काम यामुळे शिक्षणाविषयीचा त्यांचा व्यासंग प्रचंड आहे. शिक्षण आणि समाज याविषयीचे त्यांचे विचार, शिफारसी, सूचना या शासन, शिक्षणसंस्थाचालक यांच्यासाठी मौलिक आणि महत्त्वाचे आहेत.

६ रयत शिक्षण संस्थेमध्ये काम करतांना ॲड्. शिंदे यांनी अनेक दिशादर्शक आणि पथदर्शक प्रकल्प, उपक्रम राबविले.
उदा. ऑनलाईन शिक्षक भरती, विद्यार्थ्यांसाठी संगणक शिक्षण, रयत विज्ञान परिषद, शिक्षक शिष्यवृत्ती, उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, विद्यार्थ्यांसाठी कमवा व शिका योजनेअंतर्गत टाटा बी.पी.ओ. सेंटरमध्ये काम करण्याची संधी यासारखे अनेक उपक्रम शिक्षणसंस्थांना, शासनाला मार्गदर्शक आणि उपयुक्त आहे.

७ अनेक सामाजिक चळवळीमध्ये ॲड्. शिंदे यांचा सहभाग आहे. समाजप्रबोधक, सामाजिक परिवर्तन, सामाजिक बांधिलकी, सामाजिक भान याविषयीचे त्यांचे विचार समाजातील प्रत्येक घटकालाच विचार करण्यास प्रवृत्त करणारे, वर्तनबदलास चालना देणारे आहे.

❑❑❑

**05**

# सारांश, निष्कर्ष व शिफारशी

**५.० प्रास्ताविक :—**

या प्रकरणामध्ये ॲड्. रावसाहेब शिंदे यांच्या साहित्यातील शैक्षणिक व सामाजिक विचार यांचा अभ्यास करताना कोणत्या उद्दिष्टांना सामोरे ठेवून अभ्यास केला? संशोधन कार्य करताना कोणती संशोधन पद्धती वापरली? व उपलब्ध झालेल्या माहितीच्या विश्लेषणातून कोणकोणते निष्कर्ष मिळाले व याविषयाच्या अनुरोधाने आणखी कोणकोणत्या दिशेने संशोधन करता येईल हे सर्व नमूद केलेले आहे.

**५.१ सारांश :— प्रकरण १(पान ३६—४२)**

**५.२ संशोधनाचेनिष्कर्ष**

**उद्दिष्टक्रमांक १ चे निष्कर्ष**

**५.२.१ ॲड्. रावसाहेब शिंदे यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञानाविषयक विचार.**

(प्र. ४, कोष्टक क्र ४.१.१ ते को. क्र ४.१.९ व कोष्टक क्र ४.५.१.१ ते को. क्र ४.५.१.९ अनुसार)

**५.२.१.१ शिक्षणविषयक संकल्पना (शिक्षणाचा अर्थ) शिक्षणाचे महत्त्व याविषयीचे विचार.**

१. ज्ञान प्राप्तीसाठी शिक्षण हेच प्रभावी साधन आहे. शिक्षणातूनच ज्ञान साधना करता येते. ज्ञानसाधनेतूनच वैज्ञानिक जाणिवा आणि शोध यांचा रस्ता सापडतो. ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात नेत्रदीपक शोध लावणारे आणि प्रगती करणारे शास्त्रज्ञ शिक्षणाच्या सहाय्यानेच त्यांचे कार्य करू शकले. देशातील मुलांना लहानपणापासून शिक्षणाची उत्तम तऱ्हेची संधी मिळणे आणि

पुढे क्रमाक्रमाने विद्यापीठ पातळीपर्यंत असे उत्तम शिक्षण मिळणे यासाठी अत्यावश्यक आहे. गुणवत्ताप्रधान शिक्षण व्यवस्थेतून विज्ञाननिष्ठांची आणि समाजनिष्ठांची जोपासना होऊ शकते.

२ शिक्षण म्हणजे चांगला उदात्त वृत्तीचा माणूस घडविणे.

३ कोणत्याही देशाचे भवितव्य, हे त्या देशातील चारित्र्यशील, नीतिमान आणि कर्तव्यनिष्ठ अशा नागरिकांवर अवलंबून असते. अशा नागरिकांशिवाय देशाची प्रगती होऊच शकत नाही आणि असे नागरिक शिक्षणातून मिळणाऱ्या संस्कारातूनच निर्माण होऊ शकतात असे संस्कार करणारे शिक्षण हवे आहे.

४ शिक्षणाने माणसाला स्वत्वाची जाणीव येते. योग्ययोग्यतेचा विवेक येतो असे जागृत आत्मभान असलेली माणसेच जीवनाचा प्रवाह बदलू शकतात. जीवन संस्कारीत आणि विकसित करण्याचे शिक्षण हे एक साधन आहे.

५ शिक्षण हे सुसंस्कृत जीवनाचे साधन आहे. शिक्षणाने विचारशक्तीची जोपासना केली पाहिजे.

६ अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या पायावर डोळे विस्फारित व्हावेत असे उद्योग उभे राहत आहेत. शेतीक्षेत्रही त्याला अपवाद नाही. हे ज्ञान कवेत घेण्याची क्षमता असणारे नवे विश्वामित्र आमच्या शिक्षणातून घडले पाहिजे. ही आमची नितांत गरज आहे. त्याशिवाय आमच्या देशाला उज्ज्वल भविष्य नाही. नव्या स्पर्धेच्या जगात यशस्वी होण्यासाठी आमच्या ज्ञानाची, शिक्षणाची क्षितिजे आणि कक्षा आम्ही उंचावल्याच पाहिजेत.

७ प्रगतीसाठी ज्ञान पाहिजे, ज्ञानार्जनासाठी नियोजन पाहिजे, नियोजनासाठी विचार पाहिजे, विचारामागे प्रेरणा पाहिजे, प्रेरणेसाठी ध्येयवाद पाहिजे, ध्येयवादाला नैतिकतेचे अधिष्ठान पाहिजे असे नैतिक अधिष्ठान चारित्र्यशील शिक्षणातूनच निर्माण होते.

८ शिक्षणातून समाजाची उपक्रमशीलता जागविली गेली पाहिजे. शिक्षण आणि समाज या परस्परपूरक बाबी आहेत. शिक्षणातून

समाज घडतो. समाजाने चांगल्या शिक्षणाच्या सोयीसुविधा दिल्या पाहिजेत. समाज हा ज्ञानदानामुळे उभा राहतो आणि समाजाच्या पाठबळावरच शिक्षणसंस्था चालतात.

९ आपले शिक्षण हे रवींद्रनाथांच्या शांतिनिकेतनप्रमाणे आदंनदायी शिक्षण बनले पाहिजे.
आनंददायी शिक्षणामुळेच शाळेतील गळतीचे व स्थगनाचे प्रश्न कमी होतील.

१० शिक्षणातून स्त्रिया, दलित, आदिवासी, भटके विमुक्त, इतर गरीब श्रमजीवी यांची अज्ञान व गरीबीच्या अंध:कारातून सुटका व्हावी.

११ समाजातील, जाती—जातीतील भेद, स्त्री—पुरूष भेद, गरीब—श्रीमंत भेद शिक्षणामुळेच दूर होऊ शकतो.

१२ विद्यार्थ्यांमध्ये देशाबद्दल प्रेम, समाजाबद्दल बांधिलकीची भावना, शिक्षकांमध्ये भरभरून देण्याची वृत्ती निर्माण करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असायला हवे.

१३ शिक्षणातून श्रमसंस्कृतीचा विकास व्हायला पाहिजे. श्रमाशिवाय समाजातील चारित्र्याचा विकास होऊ शकत नाही. श्रमशिक्षण हेच चारित्र्याचे, शीलाचे, समानतेचे शिक्षण आहे.

१४ शिक्षण म्हणजे फक्त नोकरी हा विचार आजच्या शिक्षणातून दूर व्हावा. कौशल्यनिर्मिती हेच शिक्षणाचे उद्दिष्ट असायला हवे.

१५ शिक्षणातून ज्ञानेश्वरांनी सांगीतलेली विश्वबंधुत्वाची भावना निर्माण झाली पाहिजे. शाळेशाळेमधून त्यासाठीचे उपक्रम राबविले पाहिजेत.

१६ जो देश मातीला जपू शकत नाही, तो देश टिकू शकत नाही या डॉ कार्व्हर यांच्या विचाराचा आमच्या शिक्षणाने गांर्भीयाने विचार करायला हवा. आमच्या शिक्षणातून विद्यार्थ्यांला निसर्गावर प्रेम करायला शिकविणे गरजेचे आहे. धरणीमातेचे वस्त्रहरण,

प्रदुषणाचा राक्षस थांबविणे, थोपविणे शिक्षणातूनच शक्य आहे. वर्गातील व्याख्यानापेक्षा शेतातील कृती जास्त महत्त्वाची आहे.

१७ शिक्षणातून संवेदनशील विचार करणारे, सामाजिक भान असलेले सर्जनशील मन घडविले जावे. आजच्या शिक्षणातून हे अपेक्षित आहे.

१८ शिक्षण हे समाज परिवर्तनाचे, समाज नियंत्रणाचे प्रभावी साधन आहे. पण शिक्षणच प्रभावीपणे राबविले जाणे अपेक्षित आहे. उदयाचा भारत घडविणे हे शिक्षणाचेच कार्य आहे.

१९ सर्वांना सामावणारे शिक्षण स्वरूपाने बहुविध असले पाहिजे. त्यामुळे भारताच्या आर्थिक आणि औद्योगिक कायापालटासाठी आवश्यक असे प्रशिक्षित मनुष्यबळ सातत्याने पुरविणे आपल्या शिक्षणव्यवस्थेला शक्य होईल. उच्च शिक्षणाच्या या समावेशक संकल्पनेमुळे सामाजिक न्याय आणि समता यांच्या दिशेने समाजपरिवर्तनाला गती देणे शक्य होईल.

२० विद्यापीठातील शिक्षण हे केवळ पुस्तकी न राहता त्याची व्यवहाराशी सांगड घालण्याची नितांत गरज आहे.

२१ देशातील तरूण विद्यार्थी देशाचे वैज्ञानिक भवितव्य घडवित असतात. त्यासाठी या तरूणांना शिक्षणाच्या विविध भौतिक सुविधा, इमारती, प्रयोगशाळा उपलब्ध होणे हे उद्दिष्ट शिक्षणाचेआहे.

२२ महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याची उज्ज्वल परंपरा महाराष्ट्राला लाभल्याने बऱ्याच शिक्षण संस्था महाराष्ट्रात समाजसेवीवृत्तीने शिक्षणाचे काम करीत आहेत. आता ज्ञान विज्ञानाच्या विस्तारीत क्षितिजांना गवसणी घालण्याचे काम या संस्था आणि शिक्षणक्षेत्र यांनी करावे. वंचितांना शिक्षणाची व गुणवत्ताधारक होण्याची संधी उपलब्ध करून देऊन प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचा पाया गुणवत्ताभिमुख व अधिक बळकट करणे हे उद्दिष्ट ठेवावे. विद्यापीठात प्रवेश

घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आधीचा शैक्षणिक दर्जा ठिसूळ राहणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

२३ दलित, वंचित सामान्यजन यांच्या जवळ श्रमशक्तीची श्रीमंती आहे. ही श्रीमंती हेच देशाचे वैभव आहे. देशाची अमोल संपत्ती आहे. या संपत्तीच्या बळावर गरीब माणूस इंग्रजी भाषेचेही शिक्षण घेऊ शकतो आणि उच्च विद्याविभूषित होऊन माहिती तंत्रज्ञान व्यवस्थापन यासह ज्ञानाच्या सर्वच क्षेत्रात उंच भराऱ्या मारू शकतो. शिक्षणातला पैशाचा बाजार थांबविला पाहिजे. श्रमाच्या मोबदल्यात शिक्षण दिले पाहिजे. समर्पित भावनेने सामाजिक बांधिलकीने, सेवाभावी आणि त्यागी वृत्तीने बहुजनांना शिक्षण देण्याची प्रेरणा प्रभावी करायला पाहिजे.

२४ किमान मुलभूत शिक्षण नसलेली फार मोठी लोकसंख्या भारतात आजही असावी हे या देशाचे दुदैवच आहे.

२५ शिक्षण हे राष्ट्रबांधणीचे शिक्षण हवे. राष्ट्राची बांधणी विकास हा राज्यसभा अथवा लोकसभा यातून होत नसतो, तो होतो घराघरातून आणि शाळा—कॉलेजांमधून. त्याचा अर्थ येथे होणारे सुसंस्कार, त्यातून विकसित होणारे चारित्र्य, त्यातून घडणारे आदर्श देशप्रेमी नागरिक. त्यासाठी आपल्याला आवश्यकता आहे चारित्र्यशील, तपस्वी आणि सात्विक शिक्षकांची.

२६ 'खरे शिक्षण' हे विद्यार्थी घडविण्याचे शिक्षण असते. शिक्षणात श्रमसंस्कृतीची जोपासना केली तर गोरगरीबांना शिक्षण घेता येऊ शकेल. सर्वांसाठी शिक्षण, सर्वांगीण शिक्षण हा उपक्रम यशस्वीरित्या राबविता येऊ शकेल. केवळ सफेद कॉलरचे पुस्तकी पंडीत निर्माण करणे, तसेच बेकारांचे लोंढे निर्माण करणे ही आजच्या शिक्षणाची दिशा बदलता येईल. विद्यार्थ्यांचे मातीशी नाते राहील आणि मायभूमीशी शिक्षणाची नाळ जोडता येईल. त्याचबरोबर सर्व तऱ्हेच्या ज्ञानाच्या क्षेत्रात उच्चशिक्षित होऊन विद्यार्थी विश्वनागरीक म्हणून वावरू शकेल.

२७ चारित्र्याच्या अरिष्टात आपला देश सापडला आहे. या भोवऱ्यातून बाहेर पडण्यासाठी जे सामर्थ्य पाहिजे ते शिक्षणातूनच निर्माण होऊ शकेल आणि यासाठी वैचारिक परिवर्तनाची गरज आहे.

**५.२.१.२शिक्षणाची ध्येये याबाबतचे विचार :—**

१ उदात्त विचाराने वागणारी चांगली माणसे तयार करणे हेच खरे शिक्षणाचे व्यक्तिगत आणि राष्ट्रीय ध्येय असले पाहिजे.

२ व्यक्तिला ज्ञानाभिलाषी, स्वावलंबी, चारित्र्यसंपन्न बनविणे, सर्वधर्मसमभावाची भावना रूजविणे.

३ सामाजिक भान असलेला व सामाजिक बांधिलकी जपणारा माणूस आपल्या शिक्षणातून तयार व्हायला पाहिजे.

४ शिक्षणातून व्यक्तीच्या किमान मुलभूत गरजांची पूर्तता व्हायला पाहिजे.

५ म. गांधींनी 'चारित्र्यविना शिक्षण' सामाजिक पाप मानले आहे. आमच्या शिक्षणातून चारित्र्यवान, शीलवान, नीतीवान नागरीक तयार झाले पाहिजे.

६ कर्म ज्ञानमय आणि ज्ञान कर्ममय बनविणे शिक्षणाचे ध्येय आहे. शिकलेले पंडित श्रमाला मूल्य देत नाहीत. शिक्षणातून श्रमाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे.

७ शिक्षण हे केवळ पुस्तकी न राहता व्यवहाराशी त्यांची सांगड घातली गेली पाहिजे. सर्वसामान्य माणसांपर्यंत शिक्षणातील बदल, प्रवाह पोहचले पाहिजे तरच शिक्षणातून आदर्श नागरीक व आदर्श समाज घडू शकेल.

८ राष्ट्रप्रेम, श्रमप्रतिष्ठा, स्त्री—पुरूष समानता, आरोग्य, स्वच्छता, पर्यावरणाविषयी प्रेम, संवेदनशीलता या मूल्यांची रूजवणूक करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे.

**५.२.१.३शिक्षणाचे प्रकार याविषयीचे विचार :—**

सहज शिक्षण—सहज शिक्षणातून मिळणारे ज्ञान अधिक वास्तव, व्यावहारिक व समाजउपयोगी असते.सहज शिक्षणाद्वारे प्राप्त होणारे ज्ञान चिरकाल टिकते.

औपचारिक शिक्षण—औपचारिक शिक्षणातून माणसाला शिक्षण मिळते पण निसर्ग, जीवन याकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टि मिळत नाही.औपचारिक शिक्षणाची केंद्रे, उदा. विद्यापीठ, महाविद्यालये यांनी शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठीही शिक्षणाची सोय उपलब्ध करायला हवी.

अनौपचारिक शिक्षण—बिनभिंतीच्या शाळेतून माणसाला खऱ्या अर्थाने शहाणपण, सुज्ञपणा, विवेकपणा येतो. औपचारिक शिक्षणातून तो येईलच असे नाही.दैनंदिन व व्यावहारिक जीवनातून मिळणारे ज्ञान हे पुस्तकी ज्ञानापेक्षा सरस, कायस्वरूपी टिकाऊ असते.

**५.२.१.४ शिक्षण विषयक ध्येयांचे प्रकार व सद्य:स्थितीतील आवश्यकतायाविषयीचे विचार :—**

व्यक्तिनिष्ठ ध्येय—शिक्षणातून संवेदनशील विचार करणारे, सामाजिक भान असलेले सर्जनशील मन घडविले जावे. आजच्या शिक्षणातून हे अपेक्षित आहे. शिक्षणाने माणसाला स्वत्वाची जाणीव येते. योग्ययोग्यतेचा विवेक येतो असे जागृत आत्मभान असलेली माणसेच जीवनाचा प्रवाह बदलू शकतात. जीवन संस्कारित आणि विकसित करण्याचे शिक्षण हे एक साधन आहे.

समाजनिष्ठ ध्येये—सर्वांना सामावणारे शिक्षण स्वरूपाने बहुविध असले पाहिजे. त्यामुळे भारताच्या आर्थिक आणि औद्योगिक कायापालटासाठी आवश्यक असे प्रशिक्षित मनुष्यबळ सातत्याने पुरविणे आपल्या शिक्षणव्यवस्थेला शक्य होईल. उच्च शिक्षणाच्या या समावेशक संकल्पनेमुळे सामाजिक न्याय आणि समता यांच्या दिशेने समाजपरिवर्तनाला गती देणे शक्य होईल.

राष्ट्रीय ध्येये—शिक्षण हे राष्ट्रबांधणीचे शिक्षण हवे. राष्ट्राची बांधणी विकास हा राज्यसभा अथवा लोकसभा यातून होत नसतो, तो होतो घराघरातून आणि शाळा—कॉलेजांमधून. त्याचा अर्थ येथे होणारे सुसंस्कार, त्यातून विकसित होणारे चारित्र्य, त्यातून घडणारे आदर्श देशप्रेमी नागरिक. त्यासाठी आपल्याला आवश्यकता आहे

चारित्र्यशील, तपस्वी आणि सात्विक शिक्षकांची.चारित्र्याच्या अरिष्टात आपला देश सापडला आहे. या भोवऱ्यातून बाहेर पडण्यासाठी जे सामर्थ्य पाहिजे ते शिक्षणातूनच निर्माण होऊ शकेल आणि यासाठी वैचारिक परिवर्तनाची गरज आहे.

**५.२.१.५ शिक्षणाचे विविध पैलू याविषयीचे विचार :—**

सांस्कृतिक शिक्षण—भारतीय संस्कृती ही वैविध्याने नटलेली आहे. अनेक सण—उत्सव आपण उत्साहाने साजरे करतो. निसर्गाचे पूजन आणि पर्यावरणाचे रक्षण असा संदेश अनेक उत्सवातून आपल्याला मिळतो. परंतु आता या उत्सवाला वेगळे स्वरूप आलेले आहे. सण, उत्सव साजरे करण्यापाठीमागची भावना लोप पावली आहे आणि त्याला दिखाऊपणा प्राप्त झाला आहे.

व्यावसायिक शिक्षण—सर्वांना सामावणारे शिक्षण स्वरूपाने बहुविध असले पाहिजे. त्यामुळे भारताच्या आर्थिक आणि औद्योगिक कायापालटासाठी आवश्यक असे प्रशिक्षित मनुष्यबळ सातत्याने पुरविणे आपल्या शिक्षणव्यवस्थेला शक्य होईल. उच्च शिक्षणाच्या या समावेशक संकल्पनेमुळे सामाजिक न्याय आणि समता यांच्या दिशेने समाजपरिवर्तनाला गती देणे शक्य होईल.शिक्षण म्हणजे फक्त नोकरी हा विचार आजच्या शिक्षणातून दूर व्हावा. कौशल्यनिर्मिती हेच शिक्षणाचे उद्दिष्ट असायला हवे.

चारित्र्य संवर्धनासाठी शिक्षण—कोणत्याही देशाचे भवितव्य, हे त्या देशातील चारित्र्यशील, नीतिमान आणि कर्तव्यनिष्ठ अशा नागरिकांवर अवलंबून असते. अशा नागरिकांशिवाय देशाची प्रगती होऊच शकत नाही आणि असे नागरिक शिक्षणातून मिळणाऱ्या संस्कारातूनच निर्माण होऊ शकतात असे संस्कार करणारे शिक्षण हवे आहे.प्रगतीसाठी ज्ञान पाहिजे, ज्ञानार्जनासाठी नियोजन पाहिजे, नियोजनासाठी विचार पाहिजे, विचारामागे प्रेरणा पाहिजे, प्रेरणेसाठी ध्येयवाद पाहिजे, ध्येयवादाला नैतिकतेचे अधिष्ठान पाहिजे असे नैतिक अधिष्ठान चारित्र्यशील शिक्षणातूनच निर्माण होते.

धर्म आणि शिक्षण—धार्मिक शिक्षणाला वगळून शालेय शिक्षण यशस्वी ठरणार नाही. तसेच धार्मिक श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांची वस्तुस्थिती शिक्षणातून प्रगट व्हावी.समाजातील जाती—जातीतील भेद, स्त्री—पुरूष भेद, गरीब—श्रीमंत भेद शिक्षणामुळेच दूर होऊ शकतो.

आदर्शवाद आणि शिक्षण—जे जे चांगले आदर्श आहे ते ते कार्य सर्वांसमोर यायला हवे.जीवनातील प्रत्येक क्षेत्रात मूल्यशिक्षणाची नितांत गरज आहे.साधनेशिवाय ज्ञान मिळत नाही ज्ञानाशिवाय मनुष्याला शहाणपण येत नाही.

निसर्गवाद आणि शिक्षण—'' जो देश मातीला जपू शकत नाही, तो देश टिकू शकत नाही '' या डॉ कार्व्हर यांच्या विचाराचा आमच्या शिक्षणाने गांर्भीयाने विचार करायला हवा. आमच्या शिक्षणातून विद्यार्थ्यांला निसर्गावर प्रेम करायला शिकविणे गरजेचे आहे. धरणीमातेचे वस्त्रहरण, प्रदुषणाचा राक्षस थांबविणे, थोपविणे शिक्षणातूनच शक्य आहे. वर्गातील व्याख्यानापेक्षा शेतातील कृती जास्त महत्त्वाची आहे.

कार्यवाद आणि शिक्षण—शिक्षण म्हणजे फक्त नोकरी हा विचार आजच्या शिक्षणातून दूर व्हावा. कौशल्यनिर्मिती हेच शिक्षणाचे उद्दिष्ट असायला हवे.विद्यापीठातील शिक्षण हे केवळ पुस्तकी न राहता त्याची व्यवहाराशी सांगड घालण्याची नितांत गरज आहे.

वास्तववाद आणि शिक्षण—ॲड्. शिंदे यांच्या मते बहुसंख्य लोकांना निरक्षर ठेवणारी आणि धनदांडग्यांना भरभरून माप टाकणारी व्यवस्था असे स्वरूप शिक्षण व्यवस्थेला आलेले आहे. शिक्षणाचा आपण अपेक्षित असा प्रसार, विस्तार करू शकलो नाही आणि आवश्यक अशी गुणवत्ता टिकवू शकलो नाही, असे वाटावे अशी आजची शैक्षणिक परिस्थिती आहे.

संगणकीय जादूच्या जगात निरक्षर, निर्बल, दुर्बल घटक यांचे स्थान काय? शिक्षणापासून वंचित असणाऱ्या या घटकांना माहिती तंत्रज्ञानाचा काय उपयोग? संगणकाचा काय उपयोग ते करू

शकणार? अक्षरज्ञानच त्यांना नाही तर मग ते इंग्रजी भाषा कशी अवगत करू शकणार? उच्च वर्णाला आणि उच्चवर्गीयांनाच फक्त याचा फायदा मिळणार ना? वंचितांना अविदयेच्या या स्थितीतून बाहेर न काढल्यास त्यांची दुर्दशा आहे तशीच राहणार. त्यांना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून योग्य त्या सुविधाही उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

**५.२.१.६ शिक्षण व्यवस्थेतील समस्या, प्रश्न, उपाय याविषयीचे विचार :—**

१ बालमजुरीचा प्रश्न :— 'शिक्षण हक्क' कायदा येऊनही भारतातील शहरांमध्ये कित्येक कोटी मुले बालमजूर व बालकामगार म्हणून काम करत आहेत. बालमजुरी किंवा बालकांनी भिक मागणे या सगळयांना गुन्हेगारीच्या सदरात समाविष्ट करून समाज शासन मोकळे होते. तथापि त्या कशामुळे उद्भवतात याच्या उगमाचा शोध घेऊन त्यावर काम केले तर आपल्याला उत्तर सापडेल.

२ गरीबी — शाळा आणि शिक्षण यापासून समाजातील अजूनही खुप मुले दूर आहेत ती प्रामुख्याने दारिद्रयामुळेच स्वातंत्र्यानंतरच्या ६० वर्षाच्या काळात अजूनही आपण ३० कोटी लोकांच्या अन्न, वस्त्र, निवारा या किमान गरजा पूर्ण करू शकलेलो नाही. आरोग्य आणि शिक्षण हे तर खूप लांब आहे. अडचण आहे ती आर्थिक आणि मानसिक सबलतेची.

३ भ्रष्टाचार—शिक्षणक्षेत्र हे पवित्र क्षेत्र मानले जात होते. परंतु आता शिक्षण क्षेत्रातही शासनात सहभागी असलेले राजकीय पुढारी अशा धंदयात पुढे झाले असून शिक्षण आणि शासन या दोन्ही क्षेत्रात शिक्षणाच्या नावाने भ्रष्टाचाराला गती देण्याचे काम शासन करीत आहे.

४ पूर्वी ज्ञानदान हा व्यवसाय नव्हता. ती सेवा होती त्यामुळे पूर्वीच्या ऋषींचा, शिक्षकांचा राजसत्तेवरही प्रभाव आणि अंकुश होता. शिक्षकांमध्ये लाचारी नव्हती, पगार नव्हता. आजचे

शिक्षण हे कणा नसलेले, लाचार शिक्षण झाले आहे. मूल्यांची घसरण, पैशाला आलेले महत्त्व, ढोंगीपणा यामुळे शिक्षणक्षेत्र ढवळून निघाले आहे.

५ ग्रामीण महिला, आदिवासी बांधव हे खूपच मागासलेल्या अवस्थेत आहेत. सुशिक्षीत तरूणांपैकी फार मोठी संख्या बेकार आहे. शहरात झोपडपट्टया, फूटपाथवर राहणारी मोठी लोकसंख्या आहे. शिवाय नागरीवस्तीला भेडसावणाऱ्या हवा, पाणी, प्रदुषणापासून तर आरोग्यापर्यंतच्या समस्या, रस्ते, वाहतूक, शिस्त आणि कायदा सुव्यवस्था यांच्या समस्या आ वासून उभ्या आहेत. सगळया क्षेत्राला लाचलुचपतीने ग्रासले आहे. भ्रष्टाचार वाढविणारा वर्ग हा तर अत्यंत सुशिक्षित व शिकलेला आहे. बहुतेकांना पदव्यांची शेपटे चिकटलेली आहेत. अशा तऱ्हेची भ्रष्ट माणसे देशाला शक्तीशाली आणि सामर्थ्यवान बनवू शकतील काय?

६ बहुसंख्य लोकांना निरक्षर ठेवणारी आणि धनदांडग्यांना भरभरून माप टाकणारी व्यवस्था असे स्वरूप शिक्षण व्यवस्थेला आलेले आहे. शिक्षणाचा आपण अपेक्षित असा प्रसारविस्तार करू शकलो नाही आणि आवश्यक अशी गुणवत्ताटिकवू शकलो नाही, असे वाटावे अशी आजची शैक्षणिक परिस्थिती आहे.

७ संगणकीय जादूच्या जगात निरक्षर, निर्बल, दुर्बल घटक यांचे स्थान काय? शिक्षणापासून वंचित असणाऱ्या या घटकांना माहिती तंत्रज्ञानाचा काय उपयोग? संगणकाचा काय उपयोग ते करू शकणार? अक्षरज्ञानच त्यांना नाही तर मग ते इंग्रजी भाषा कशी अवगत करू शकणार? उच्च वर्णाला आणि उच्चवर्गीयांनाच फक्त याचा फायदा मिळणार ना? वंचितांना अविदयेच्या स्थितीतून बाहेर न काढल्यास त्यांची दुर्दशा आहे तशीच राहणार. त्यांना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून योग्य त्या सुविधाही उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

८ ग्रामीण आणि गोरगरीब अशा बहुजन समाजातील मुले शाळेत जरी आली, तरी महाविद्यालयात पदवीपर्यंत आणि पद्व्युत्तर शिक्षण किती घेऊ शकतात? याची माहिती पाहिली तर त्यात गळतीच्या प्रमाणाला मर्यादा नाही. शिकून तरी काय करायचे हा प्रश्न गरीबांच्या मनात घर करून राहतो. शिकून बेकारीच पदरात पडते. त्यामुळे शिक्षणाबद्दल अनास्था तयार होते.

९ शाळेत जाताना मुलाच्या पाठीवरील दप्ताराचे ओझे इतके जड असते की अक्षरशः त्या ओझ्याखाली दबून जातात. दप्ताराच्या ओझ्याविना शाळा यासंबंधीची चर्चा, घोषणा अनेकवेळा झाल्या तथापि त्यांचा काहीही उपयोग झालेला नाही. मनाला धक्का देणारी बाब म्हणजे या शिक्षकांच्या मनाला याबाबत टोचणी का लागत नाही. लहानग्याची कीव का येत नाही. शिक्षक आणि शाळा इतक्या हृदयशून्य का झाल्या आहेत?

१० गृहपाठ हा एक मुलांना सदैव भेडसावणारा एक प्रकारचा राक्षस असल्याची बहुतेक मुलांची मनःस्थिती सदैव जाणवते. तो पुरा न करता आल्यामुळे शिक्षक काय शिक्षा करतील याविषयीचा भितीचा गोळा मुलांच्या पोटात उठलेला असतो. आपले शिक्षण आनंददायी शिक्षण केव्हा बनेल?

११ मुलांना शाळा म्हणजे एक प्रकारचा कोंडवाडाच वाटतो. कध ी शाळा सुटल्यावर किंवा शाळेला सुट्टी आहे असे ऐकल्यावर मुलांना मनापासून आनंद होणे हे या शिक्षणपद्धतीचे मोठे अपयश आहे.

१२ शिक्षणाची संख्यात्मक वाढ होऊनही आम्ही समानतेचा मंत्र घेऊ शकलो नाही. शिक्षणाने आम्ही तथाकथित 'साहेब' होतो. शिक्षणाने समाजात 'पांढरपेशी' वृत्ती जोपासली जात आहे.ीपजम ब्वससंत श्रवइेवाले मोठया संख्येने वाढत आहेत. हे सर्व 'साहेब' श्रम करणाऱ्याला कनिष्ठ लेखतात. शिक्षणातून श्रमालाच कमी लेखण्याची वृत्ती जोपासली जात आहे.

ऑफिसाकडे नोकरीकडे लोंढेच्या लोंढे पळतात. शेतात काम करायला मात्र माणसे मिळत नाहीत.

**५.२.१.७ शिक्षकाविषयीचे विचार :—**

१ शिक्षकाचे कर्तव्य हे एकप्रकारे सतीचे वाण आहे. चारित्र्य, नीतीमत्ता प्रचलित शिक्षण व्यवस्थेला भावणारे नसल्याचे दिसून येते. शिक्षकांनी चारित्र्यशील असायला पाहिजे. निर्व्यसनी असायला पाहिजे. कर्तव्यदक्ष असायला पाहिजे. आपल्या कार्यावर त्यांची नितांत श्रद्धा आणि निष्ठा असायला पाहिजे. अतोनात परिश्रम घेण्याची तर त्यांची तयारी पाहिजेच. पण त्याशिवाय प्रसंगी त्याग करण्याची देखील मानसिकता त्याने जोपासली पाहिजे आणि एकप्रकारे आदर्शवत असे आपले व्यक्तिमत्त्व विकसित केले पाहिजे.

२ शिक्षक हा शिल्पकार असतो आणि तो शिल्पातून विद्यार्थ्यांची मूर्ती आकाराला आणतो. उत्कृष्ट शिक्षकाला प्रत्येक विद्यार्थ्यात एक देखणे शिल्प दिसते. त्यात एक राजहंस —राजहंसी दिसते. तो कोणत्याचा विद्यार्थ्यांना 'ढ' ठरवित नाही.

३ प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये आगळेवेगळे अव्यक्त व्यक्तिमत्त्व अस्तित्वात असते. शिक्षकाने ते फक्त मुक्त करायला मदत करावयाची असते. अशा शिक्षकाच्या मदतीचा हात विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला की त्या विद्यार्थ्यातून एक विकसित असे सुरेख व्यक्तिमत्त्व अविष्कारीत होते आणि हेच खरे शिक्षकाचे काम असते.

४ शिक्षकाचे ध्येय हे राष्ट्रबांधणीचे ध्येय असते. राष्ट्राची बांधणी ही देशाच्या आदर्श आणि देशप्रेमी नागरिकांच्यावर अवलंबून असते. आपल्या विद्यार्थ्यांमधून असे देशप्रेमी नागरिक घडविणे हे शिक्षकाचे काम असते.

५ आजच्या शिक्षकांना वेतनाच्या रूपाने समाज भरभरून देत आहे. हयासंबंधी जाणीव ठेवून शिक्षकांनी समाजाविषयीचा कृतज्ञभाव जागविला पाहिजे. आजच्या शिक्षकांनी टॉलस्टॉय,

रवींद्रनाथ टागोर, म. गांधी, जे. पी. नाईक, म. फुले, कर्मवीर या थोर शिक्षकांपासून प्रेरणा घेण्याचा मनापासून प्रयत्न केला तर त्यांच्यातूनही 'उत्कृष्ट शिक्षक' तयार होतील.

६ शिक्षकाचे विद्यार्थ्यांवर प्रेम नसणे हा शिक्षणातला सर्वात मोठा अडथळा आहे.

७ शिक्षक—प्राध्यापक यांच्या संघटना कर्तव्याबाबत 'ब्र' ही काढत नाहीत, मात्र फक्त हक्कासाठी समाजाला वेठीला धरतात. अशी चुकीची दबावतंत्रे शिक्षणपद्धतीला विकलांग करून टाकीत आहेत. एकेकाळी गरीबी हा विद्‌वान लोकांचा बाणा होता. जितका विद्‌वान तितका निरपेक्ष. विद्‌वान तेव्हा बाजारभावात सापडले नव्हते. जास्तीतजास्त सेवा, कमीतकमी दक्षिणा ही वृत्ती होती. पण आजवर विद्‌वानांची विद्या लिलावत निघाली आहे.

८ देशाच्या आणि समाजाच्या वैचारिक परिवर्तनाची भूक विचारवंतच भागवू शकतील. या विचारवंतांना देखील चारित्र्य आणि नीती यांची भक्कम बैठक पाहिजे. शिक्षक आणि प्राध्यापक यांच्यावरच विचारवंतांची भूमिका पार पाडण्याची जबाबदारी आहे.

९ शिक्षणाची आवड या निकषावरच शिक्षकांची निवड व्हायला पाहिजे. शिक्षक हे शिक्षण, शिकविणे, व्यासंग, विद्यार्थीप्रियता या विषयाच्या ओढीने आणि आवडीने या क्षेत्रात आलेले असतात की केवळ चरितार्थाचे एक साधन म्हणून त्यांनी नोकरी पत्करलेली असते? शिक्षण क्षेत्रातला हा अतिशय मुलभूत स्वरूपाचा मुद्‌दा आहे.

१० जो शिक्षक विद्यार्थ्याला विषयाची ओळख करून देतो, त्याला विषयाची गोडी लावतो आणि स्वतंत्रपणे तो विषय समजावून घेण्यासाठी विद्यार्थ्याला प्रेरित करतो. तोच खरा शिक्षक होय.

११ मुलांना शिकविणाऱ्या शिक्षकांनी मातेची भूमिका बजावयास पाहिजे. शिक्षक आपल्याला शिकवितात असे मुलाला कध

ाही वाटता कामा नये. उलट मातारूपी शिक्षकाने केवळ त्यांना मार्गदर्शन करावे.

१२ भारताला जर शक्तीशाली आणि सामर्थ्यवान राष्ट्र बनवायचे असेल तर शिक्षण हेच प्रभावी साधन आहे. त्यासाठी आपली शिक्षणव्यवस्था उत्कृष्ट असायला पाहिजे. हे उत्तरदायित्व फक्त शिक्षकच पार पाडू शकतात.

१३ प्राध्यापकांच्या कामाच्या तासांची मोजदाद करतांना एक तास वर्गात घ्यावयाचा असल्यास दोन तास तयारी करण्यासाठी लागतात, असे सुत्र गृहित धरून त्यांच्या कामाच्या तासिकांची संख्या ठरविली आहे. वास्तवात तयारीसाठी प्राध्यापक मनोभावे किती वेळ देतात? जादा कामाच्या प्रस्तावाला प्राध्यापकांच्या संघटनेने विरोध केला, दीर्घकालीन संप घडवून आणला, पण याच संघटना प्राध्यापकांची पाठाची तयारी किती, व्यासंग आणि कर्तव्यदक्षता किती? हे पाहत नाहीत. इतकेच नाही तर प्राध्यापकांच्या कामाचे परिक्षण व्हावे यालाही विरोध केला जातो. शिक्षक—प्राध्यापक जर खरोखर कर्तव्यतप्तर आणि व्यासंगी असतील तर खाजगी शिकवण्या व खाजगी वर्ग यांचा बाजार एवढा भरभराटीला का यावा? आपले कर्तव्य पार पाडतांना आपल्या विद्यार्थ्यांनी उदयाचे जबाबदार नागरीक व्हावे या विचाराने प्रेरित होवून किती शिक्षक—प्राध्यापक काम करतात? या संबंधातील आपल्या कर्तव्याबाबत शिक्षक—प्राध्यापकांनी आत्मपरीक्षण करणे जरूर आहे.

१४ ाद ंअमतंहम जमंबीमत पदेजतनबजेए ं हववक जमंबीमत हनपकमेए ं हतमंज जमंबीमत पदेचपतमसर्वसाधारण शिक्षक नुसतेच सांगतो अथवा हुकूम करतो, चांगला शिक्षक मार्गदर्शन करतो मात्र थोर शिक्षक प्रेरणा देतो. शिक्षकाजवळ प्रेरणा देण्यासाठी तशी ज्ञानसाधना पाहिजे. तो देणारा पाहिजे. तोच ‘खरा शिक्षक’ होय.

**५.२.१.८ शाळा, संस्थाचालक, याबाबतचे विचार :—**

१ समाजात जिवंतपणा यावा, चैतन्य यावे आणि त्याची प्रगती व्हावी म्हणून सर्व नैतिक मूल्यांचे महत्त्व ओळखता येण्याजोगी परिस्थिती आपणास निर्माण करावयाची आहे. ही परिस्थिती निर्माण करण्याची भूमिका शाळा, संस्थाचालक यांना पार पाडावयाची आहे.

२ देशाला आणि समाजाला देण्याची प्रेरणा विद्यार्थ्याच्यामध्ये निर्माण व्हायलाच पाहिजे. शिक्षक—प्राध्यापक, शाळा आणि संस्थाचालक यांच्यावर हे उत्तरदायित्व आहे हे आव्हान त्यांनी स्विकारलेच पाहिजे. ही व्यावसायिकतेची नाही तर निष्ठेची बाब आहे. समर्पित भावनेने काम करण्याची जाणीव जोपासलीच पाहिजे.

३ अनेक शिक्षणसंस्था, शाळा आणि त्यांचे व्यवस्थापन कसे आहे? तेथील गटबाजी, भ्रष्टाचार, सत्तास्पर्धा इ. गैरप्रकार वाढत आहेत. नीतीमत्ता आणि गुणवत्ता याबाबत शिक्षणसंस्थांची विश्वासर्हता देखील ठिसूळ झाल्याचे दिसून येते. बऱ्याच ठिकाणी वैयक्तिक स्वार्थ व राजकीय हेतूसाठी संस्थेला राबविण्याची प्रवृत्ती चालकांत दिसून येते ठराविक व्यक्तीचे अथवा गटाचे हितसंबंध जपण्यासाठी संस्था वेठीला धरल्या जातात. निकोप शिक्षण संस्था ही आजच्या काळाची नितांत गरज आहे.

४ कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारख्या त्यागी आणि चारित्र्यशील संस्था चालकांच्या प्रेरणांमुळे शाळा आणि शिक्षकही उत्कृष्ट तयार होतात.

५ राष्ट्रांची खरी जडण—घडण होते ती घरात आणि शाळेमध्ये. देशावर प्रेम करणारे चारित्र्यशील नागरीक शाळेतूनच तयार होतात.

६ शिक्षणसंस्था व संस्थाचालक यांनी अतिशय गांभीर्याने आत्मपरिक्षण केले पाहिजे. शिक्षणाने समाज सामर्थ्यशाली कसा बनू शकेल. या दिशेने पावले टाकली पाहिजेत. शिक्षण

घेऊन बाहेर पडणाऱ्या तरूण तरूणींच्या फौजा शेतमळे, डोंगरराने, कारखाने उद्योग, दुग्धव्यवसाय व इतर शेती व्यवसायाशी निगडीत असे पुरक उद्योग, पर्यावरण जागृती इ. सर्व ठिकाणी समाजाच्या विकासासाठी कामाला लागल्या पाहिजेत. शिक्षणातून विद्यार्थ्यांना समाजाच्या विकासासाठी कार्यरत होण्याची प्रेरणा मिळायला हवी.

७ पदवीमुळे पद मिळते परंतु पद सांभाळणे व त्याची प्रतिष्ठा वाढवणे सर्वश्री त्या व्यक्तीच्या हातात असते. शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्यांनाही विद्यार्थी हाच आपला देव आहे, असे समजून अहर्निष शिकवावे. आपल्या पेशाशी प्रत्तारणा करणे म्हणजे महापाप आहे.

**५.२.१.९ शालेय अभ्यासक्रम,शालेय शिस्त याबाबतचे विचार:**

१. आपल्या देशापुढे आरोग्य, पर्यावरण, लोकसंख्या याची फार मोठी समस्या आहे. याबाबत विद्यार्थ्यांत अभ्यासपूर्वक जाण मुळीच निर्माण केली जात नाही. अभ्यासक्रमात या सर्व बाबींचा समावेश असायला हवा.

२. आपला अभ्यासक्रम हा कृतियुक्त व श्रमामूल्यावर आधारीत असला पाहिजे. श्रमाचा आणि शिक्षणाचा संबंध दिवसेंदिवस कमी होत आहे. शिकलेला माणूस श्रम करायला तयार होत नाही. काम करणारा माणूस शाळेत जात नाही. शाळेतून राबविला जाणारा अभ्यासक्रम श्रमाधिष्ठित असायला हवा. श्रमावर विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करायला हवे.

३. आजच्या अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होत नाही, खेळणे, बागडणे, व्यायाम, व्यासंग आणि निर्सगाशी मैत्री या सर्व बाबी शिक्षणातून पूर्ण पुसल्या गेल्या आहेत. फक्त मार्कासाठी शिक्षण अशी अवस्था आहे. मुलांनी शर्यतीतल्या घोडयासारखे या शर्यतीत दमछाक होईपर्यंत ध ाावायचे कशासाठी तर मार्कासाठी आणि पैशासाठी शिक्षणातली ज्ञानावस्था निघून गेलेली आहे. विद्यापीठेही पदव्या देण्याच्या

टाकसाळी झालेल्या आहेत. आपल्या शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे म्हणजे बेकारांचे कारखाने बनले आहेत.

**५.२.१.९ जागतिकीकरण आणि शिक्षण याबाबतचे विचार :—**

१ आधुनिकीकरणाच्या आणि एकविसाव्या शतकांच्या आव्हानांचा आपल्या शिक्षणव्यवस्थेला गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. सर्वात जास्त संख्येने मुले शाळेबाहेर असणारा आणि सर्वात जास्त प्रौढ, निरक्षर असणारा देश ही आपली प्रतिमा बदलावी लागणार आहे. २१ व्या शतकाचे आपल्याला ते आव्हान आहे.

२ नव्या ज्ञानविज्ञानाच्या विस्तारीत क्षितिजांना कवेत घेण्याइतकी आपली शिक्षणव्यवस्था व्यापक व समावेशक झाली पाहिजे. दारिद्र्याशी सामना लोकांना ज्ञानसंपन्न करूनच करावा लागतो. अफाट निरक्षर लोक आणि प्रगत ज्ञान व तंत्रज्ञान यांची सांगड घालण्याचे आव्हान आपल्यापुढे आहे.

३ जागतिकीकरणाच्या रेटयाला सामोरे जावेच लागणार आहे. या प्रक्रियेत बऱ्याच क्षेत्रात स्पर्धेला तोंड दयावे लागणार आहे. अनिष्ट स्थिती बदलण्यासाठी आपल्या देशाला मोठी लढाई लढावी लागणार आहे. त्यासाठी सर्वसामान्यांना इंग्रजी भाषा, माहिती तंत्रज्ञान व तंत्रज्ञानाच्या अन्य शाखा या संबंधीच्या शिक्षणाची संधी देऊन समर्थ बनविण्याची गरज आहे.

४ जागतिकीकरणाला सामोरे जाताना सर्वात महत्त्वाचे म्हणजे चारित्र्य आणि शील जोपासणारे शिक्षण आम्हाला हवे आहे. चारित्र्यविना शिक्षण हे गांधीजींनी सामाजिक पाप मानले आहे. नीतिमान समाज शिक्षणातून निर्माण झाला पाहिजे. नीतिमान शिक्षक, नीतिमान शिक्षणतज्ज्ञ, विद्यार्थी हाच २१ व्या शतकाच्या आव्हानाला सामोरे जाणारी आमची शक्तीस्थाने आहेत. अशा शक्तीस्थानांवर आरूढझालेले आमचे शिक्षणक्षेत्र आत्मविश्वासाने जागतिकीकरणाला सामोरे जाऊ शकेल.

५ जागतिकीकरणाला सामोरे जाताना आपणाकडे काय साधनसामग्री आहे, ती कशी आहे, ती कितपत उपयोगी ठरणार आहे या संबंधीची जाणीव आपल्या शिक्षणसंस्थांना, शिक्षकांना असणे जरूर आहे.

**उद्दिष्ट क्रमांक २चे निष्कर्ष**

**५.२.२ ॲड्. रावसाहेब शिंदे यांचे शैक्षणिक मानसशास्त्रविषयक विचार.**

**(प्रकरण ४, को. क्र ४.३.१ ते को.क्र ४.३.८ व को. क्र ४.७.१ते को. क्र ४.७.६ अनुसार)**

**५.२.२.१ बालकांचे मानसशास्त्र, वाढ व विकास याविषयीच्या विचाराबाबतचे निष्कर्ष:—**

१ ॲड्. शिंदे यांच्या मते बालकांचे मानसशास्त्र शिक्षकाने समजून घेणे ही शिक्षक प्रक्रियेतील मुलभूत बाब आहे. शिकविणाऱ्यापेक्षा शिकणारा महत्त्वाचा आहे. आजची शिक्षणपद्धती बालककेंद्रीत शिक्षणपद्धती आहे. त्यामुळे मुलांचे मानसशास्त्र समजून घेवून जो शिक्षक अध्यापन करील तोच यशस्वी शिक्षक होवू शकतो.

२ लहान मुलांचे मन म्हणजे टिपकागद असतो. लहान वयात होणारे संस्कार चिरकाल टिकतात. शाळेत, कुटुंबात शिक्षक आणि पालक यांनी मुलांसमोर बोलतांना, वागतांना अतिशय जबाबदारीने वर्तन केले पाहिजे. मुले ही अनुकरणप्रिय असतात. त्यामुळे त्यांच्या मनावर आघात होतील, धक्का बसेल अशा बाबी शाळेने, कुटुंबाने कटाक्षाने टाळायला हव्यात. तरच सुरवंटाचे फुलपाखरात रूपांतर होईल.

३ मन, बुद्धी आणि शरीर यांचा विकास म्हणजे शिक्षण अशी व्याख्या. म. गांधीजींनी केली आहे. याठिकाणी त्यांनी अगोदर मनाला महत्त्व दिले आहे. मनाचा विकास झाल्याशिवाय बुद्धी आणि शरीराच्या विकासाचा विचार होऊ शकत नाही. त्यामुळे आमचे शिक्षक, पालक यांनी मन म्हणजे काय?

मनाच्या विकासासाठी नेमके काय करावे? काय करू नये याचा विचार करावयाला हवा.

४ शिक्षणातून चारित्र्यवान, बलवान, नीतिवान माणूस तयार झाला पाहिजे. बालकाचा निकोप वाढ आणि विकास झाला तरच ते उदयाचा समाज घडविणार आहेत. यासाठी आमच्या शिक्षणाने शालेय वयात मुलांच्या शरीराच्या वाढीसाठी, मन आणि बुद्धीच्या विकासासाठी विविध स्पर्धा, उपक्रम यांचे आयोजन, नियोजन केले पाहिजे.

५ शिक्षण हे मातृभाषेतूनच दिले गेले पाहिजे. मातृभाषेतून शिकायला मिळालेल्या मुलांच्या संकल्पना स्पष्ट असतात. त्यांच्या विकासातील वेग इतर मुलांच्या तुलनेत अधिक असलेला दिसून येतो. मातृभाषेतील शिक्षण मुलांच्या वाढीवर आणि विकासावर परिणाम करते.

६ माणसाने मीपणा, अहंभाव, अहंकार आणि स्वत:विषयीच्या श्रेष्ठत्वाचा विचार सोडल्याशिवाय समानतेचे शील जोपासले जाणे शक्य नाही. विनम्रतेची आणि लीनतेची भावना आत्मसात केल्याशिवाय मुक्ती नाही. मी माझी गणना शून्यवतच करून घेणे आवश्यक आहे. माझ्यामधल्या 'मी' ला विसरणे जरूरीचे आहे. आमच्या मुलांना वाढवितांना याचा जरूर विचार करावा लागेल.

७ कर्मवीरांनी बहुजन समाजातील मुलांचा विकासासाठी श्रम हेच साधन मानले. वर्गाची स्वच्छता, घंटा देणे, जमीन सपाट करणे, इमारत बांधकाम करणे, विटा पाडणे, शेतीची कामे करणे, शेतीमाल बाजारात विकणे, झाडलोट करणे, स्वयंपाक करणे, संडास, मुताऱ्या साफ करणे यासारख्या कामातूनच मुलांचा विकास होतो. यावर कर्मवीरांचा विश्वास होता. रयत शिक्षण संस्था या श्रमसंस्कृतीवर उभी आहे.

८ मुलांवर मूल्यसंस्कार करतांना आपण स्वच्छता, नीटनेटकेपणा या मूल्यावर भर देतो. बाहयस्वच्छतेबरोबर मनाच्या स्वच्छतेचाही

यामध्ये विचार व्हायला हवा. शिक्षणातून मनाची स्वच्छता करणारे उपक्रम राबविले जावेत, त्यातून ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना अपेक्षित असलेली प्रज्वलित मने घडतील की जी उदयाचा भारत घडवतील.

९ गांधीजींनी मानसशास्त्र या विषयाच्या औपचारिक अभ्यास केलेला नव्हता, परंतु मुलांना वाढवितांना विनाकारण शिक्षेचा वापर, धाकधपटशा त्यांना मान्य नव्हता. मुलांना मारहाण करणे, त्यांना मनाला लागेल असे बोलणे यामुळे मुलांच्या वाढीवर विकृत परिणाम होऊ शकतो.

**५.२.२.२ अध्ययन, अध्यापन याविषयीच्या विचाराबाबतचे निष्कर्षः—**

१ 'खरे शिक्षण' हे विद्यार्थी घडविण्याचे शिक्षण असते. शिक्षकांना विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक पालकत्व स्वीकारावे लागते. उत्कृष्ट शिक्षक विद्यार्थ्यांना, शाळेला आणि समाजाला आकार देतांना नकळतपणे स्वत:लाही आकार देत असतो.

२ जो शिक्षक उघडया डोळयांनी जग पाहतो. व्यासंगाची पराकाष्टा करतो, तोच शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट अध्यापन करू शकतो.

३ कर्मवीर, म. गांधी, विनोबा भावे यांना फक्त वर्गातील अध यापन करणारा शिक्षक अपेक्षित नव्हता. जीवन शिक्षण देणारा शिक्षक त्यांना हवा होता. शिक्षक हा देणारा असावा आणि शिक्षणप्रक्रियेतून त्याने भरभरून विद्यार्थी तयार करावेत.

४ विद्यार्थ्यांचे खरे अध्ययन घडते ते कामातून आणि अनुभवातून. कृतीशिवाय घेतलेले शिक्षण निरर्थक आहे. विद्यार्थ्यांचे अध ययन परिणामकारक घडविण्यासाठी त्याला कृतीची जोड अपरिहार्य आहे.

५ आजच्या शिक्षणातून श्रमाला हद्दपार करण्यात आलेले आहे. शिकलेल्या माणसाला कष्टाचे काम रूचत नाही आणि कष्ट करणाऱ्यांचा शिक्षणाशी संबंध नाही अशी अवस्था आहे. विद्यार्थ्यामध्ये मूल्ये हरवत चाललेली आहे. अशी ओरड

आम्ही करतो. परंतु श्रमशिक्षण हेच मूल्यसंवर्धनासाठी उत्तम पर्याय आहे.

६ ''शिक्षकाचे विद्यार्थ्यांवर प्रेम नसणे हा शिक्षणातला सर्वात मोठा अडथळा आहे'' आमचा शिक्षक हा मातारूपी शिक्षक पाहिजे. असा मातारूपी शिक्षकच विद्यार्थ्याला विविध तंत्रांचा वापर करून शिकवू शकतो.

७ आजचा विद्यार्थी तंत्रज्ञान युगातील विद्यार्थी आहे. तंत्रज्ञान शिक्षकाची जागा घेऊ शकत नाही, परंतु शिक्षकाने तंत्रज्ञानाची कास धरणे काळाची गरज आहे. अध्ययन—अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर केलाच पाहिजे.

८ भारतातील ग्रामीण भागात मोठया प्रमाणात शाळा आहे. या शाळेत शिकणारा आमचा ग्रामीण भागातील विद्यार्थी, गरीब, वंचित, बहुजन समाजातील आहे. त्याला काळाच्या बरोबरीने आणण्यासाठी संगणक ज्ञान, तंत्रज्ञान याचा अध्ययन, अध यपनातील वापर अनिवार्य आहे. तरच आमची ही मुले शहरी भागातील मुलांबरोबर टिकू शकतील त्यासाठी शिक्षक, शासन, संस्थाचालक यांना बरोबरीने काम करावे लागेल.

९ परिणामकारक अध्ययनात प्रेरणा महत्त्वाची आहे. कर्मवीर भाऊरावांनी बहुजन समाजातील चुणचुणीत मुलांना शिकण्याची प्रेरणा दिली त्यातूनच इतिहास घडला. शिक्षकाने वर्गात शिकवितांना एखादा मुद्दा कमी शिकविला तरी चालेल पण मुलांमध्ये शिकण्याची प्रेरणा, संघर्षाची जिदद् निर्माण केलीच पाहिजे.

१० शिक्षकाचे निष्कलंक चारित्र्य ही बाब शिक्षकप्रक्रियेतील सर्वात महत्त्वाची आहे. निष्कलंक चारित्र्य असलेला, व्यवसायावर निष्ठा असलेला शिक्षकच देशप्रेमाने ओतप्रोत भरलेले विद्यार्थी घडवू शकतो.

**५.२.२.३ बुद्धिमत्ता व सर्जनशीलता याविषयीच्या विचाराबाबतचे निष्कर्षः—**

१ वर्गामध्ये मार्क मिळविणे म्हणजेच बुद्धिमत्ता नव्हे, स्वयंपाक उत्कृष्ट करता येणे, शेतीमाल पिकविणे, बाजार करता येणे यासारख्या बाबीसुद्धा बुद्धिमत्तेमध्ये येतात. मार्कवंत आणि गुणवंत या दोन्ही बाबींचा समन्वय बुद्धिमत्तेने साधता यायला हवा.

२ बुद्धिमत्तेचा वापर समाजासाठी करता येणे हीच खरी सर्जनशीलता आहे. पैशाच्या श्रीमंतीपेक्षा बुद्धिच्या श्रीमंतीची आपल्याला आवश्यकता आहे.

३ बुद्धिमत्तेच्या जोरावर मानवाने अंतराळात कधीच झेप घेतली आहे. ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान यामुळे घरबसल्या माणसाला सर्व गोष्टी मिळू लागल्या आहेत. बुद्धिमत्तेला कल्पकतेची जोड दिल्याने, बील गेटस् सारखा सामान्य माणूस वयाच्या ४२ व्या वर्षीच जगातला सर्वात श्रीमंत माणूस बनला आहे. सर्व प्रकारच्या तांत्रिक प्रगतीमुळे सर्व देशांच्या सीमारेषा पुसट होवून जग जवळ येत आहे.

४ शिक्षणक्षेत्रातील जीवघेणी स्पर्धा ही फक्त मार्कांसाठी आहे. ज्याचे पाठांतर जास्त त्याची बुद्धिमत्ता जास्त असा सरळ अर्थ हुशारीचा आहे. परंतु येणारे युग हे बोलक्या पोपटाचे नसून, विचार करून नाविण्यपूर्ण कृती करणाऱ्यांचे आहे. आमच्या शिक्षणपद्धतीतून वेगळया पद्धतीने विचार करणारे विद्यार्थी आपल्याला घडवायचे आहे.

५ जीवनात येणाऱ्या समस्यांना, अडचणींना, संकटांना जो यशस्वीपणे सामोरे जातो, त्याच्याशी संघर्ष करून मार्ग काढतो तोच खरा बुद्धिमान होय.

### ५.२.२.४ व्यक्तिमत्त्वविकास, व्यक्तीभेद, अनुवंश आणि परिस्थिती याविषयीच्या विचाराबाबतचे निष्कर्षः—

१ Adversity is the best teacher. बिकट परिस्थिती हा एक उत्तम शिक्षकच असतो. ही परिस्थितीच माणसाला घडवित असते. या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठीचे व्यक्ती ज्या

मार्गाचा अवलंब करते त्यातून व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आकाराला येते.

२ माणूस हा विचार करणारा प्राणी आहे. फक्त माणसाला आपण पुढे का जावू शकत नाही. अधिक काहीतरी व्हायलाच पाहिजे या जाणिवेतून, बंधनातून मुक्त होण्याची प्रेरणा मिळते. स्वत:च्या पुनरूत्थानासाठी स्वत:च लढले पाहिजे. आपल्याला दडपून टाकणाऱ्या शक्तींना नमविले पाहिजे अशी जिद्द मनात निर्माण होते. त्यातूनच माणसाचे व्यक्तिमत्त्व आकाराला येते.

३ “Full many flowers are born to blush unseen and waste its fragrance in the desert air” अनेक फुले अशी जन्माला येतात की, त्यांचा पत्ताच जगाला लागत नाही. त्यांचा सुहास रानमाळावर तसाच वाऱ्यावर विझून जातो. ग्रामीण भागातील मुलांचे जीवन शिक्षणाविना आणि संधीविना असेच कोमेजून जाते. त्याचाही जगाला पत्ता लागत नाही. उत्कृष्ट शिक्षक भेटले तर मुलांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार येतो.

४ माणसाच्या व्यक्तिमत्त्व विकासात संस्कारांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यासाठी आशा, प्रेम आणि कृतज्ञता हे संस्कार पायाभूत आहेत.

५ शहरात जन्माला येणारी मुले निसर्गाचा मनसोक्त आनंद लुटू शकत नाही. इमारतीच्या कबुतरखान्यात सदैव बंदिस्त असलेली आणि शाळा, कॉलेजात गेल्यावर तिथल्या सिमेंट कॉक्रेटच्या जंगलात बंदिस्त झालेली असतात. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होत नाही.

६ दुर्दम्य अशावाद, व्यासंग, परिश्रम आणि चिकाटी या सर्व गुणांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार येतो.

७ उत्कृष्ट शिक्षक विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देतो. प्रत्येक विद्यार्थ्यात शिक्षकाला एक देखणे शिल्प दिसते. त्या दगडातून तो उत्तम शिल्पाची घडवणूक करतो. म्हणून

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात शाळा आणि शिक्षक यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**५.२.२.५जागतिकीकरण व शै. मानसशास्त्रविषयक समस्या याविषयीच्या विचाराबाबतचे निष्कर्ष**

१ २१ वे शतक हे ज्ञानाचे, विज्ञानाचे आणि तंत्रज्ञानाचे युग आहे या युगाशी जो जुळवून घेईल तोच टिकेल परंतु तंत्रज्ञानाशी जुळवून घेतांना अनेकांच्या मनात भिती आहे. 'मला हे जमेल का?' या प्रश्नाच्या भितीतून न्यूनगंड, भय, नैराश्य, वैफल्य यासारखे मानसिक विकार वाढू लागले आहेत.

२ झटपट श्रीमंती, कमी श्रमात अधिक दाम या गोष्टींनी आमची तरूण पिढी लवकर बळी पडते आहे. पैशाच्या अतिहव्यासामुळे मानवी संबंधाना, भावभावनांना शून्य किंमत उरलेली आहे. माणसा—माणसातील प्रेमाचा, मायेचा ओलावा, जिव्हाळा दिवसेंदिवस आटत चालला आहे.

३ तरूण पिढी पाश्चात्यांचे अंधानुकरणामध्ये व्यस्त आहे. जे जे मूल्यहीन आहे. त्याचेच आकर्षण वाढले आहे. तरूणांप्रमाणे तरूणींमधील वाढती व्यसनाधीनता चिंताजनक आहे. स्वैराचाराला सीमा नाही, त्याचे विघातक परिणाम आमच्या कुटुंबव्यवस्थेवर होत आहे. मानसिक शांतता, समाधान, आनंदी वृत्ती लोप पावल्या आहे. मानवी मूल्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे. या गोष्टींचा वेळीच पालक आणि शिक्षक यांनी गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

४ आमच्या शिक्षणातून तयार होणाऱ्या विद्यार्थ्यांचे शरीर आणि मन इतके मजबूत आणि कणखर असावे की कोणत्याही बाहय शक्तींशी ते टक्कर घेवू शकेल. आज आम्हाला अशा शिक्षणाची आणि शिक्षकांची आवश्यकता आहे.

**५.५ पुढील संशोधनासाठी विषय :—**

१. ॲड्. रावसाहेब शिंदे यांचे रयत शिक्षण संस्थेतील योगदान — एक अभ्यास.

२. ॲड्. रावसाहेब शिंदे यांच्या पत्रातून व्यक्त होणाऱ्या मूल्यविषयक विचारांचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वावरील परिणामांचा अभ्यास.

३. स्वातंत्र्यसैनिकांचे शैक्षणिक चळवळीतील योगदान — एक अभ्यास.

४. कम्युनिष्टांचे शैक्षणिक चळवळीतील योगदान — एक अभ्यास.

**उद्दिष्ट क्रमांक ३चे निष्कर्ष**

**५.२.३ ॲड्. शिंदे यांच्याविचारांची सद्यस्थितीतील उपयुक्तता बाबतचे निष्कर्षः—**

**(प्रकरण ४, कोष्टक क्र ४.११.१ अनुसार)**

१ ॲड्. शिंदे हे स्वातंत्र्यसैनिक आहेत. देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक चळवळीमध्ये त्यांनी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहभाग घेतलेला आहे. संघर्ष केलेला आहे. देशाचे सार्वभौमत्व, लोकशाही, सामाजिक विषमता, राष्ट्रभक्ती याविषयीचे त्यांचे विचार, राजकारणी, समाजकारणी, विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, अभ्यासक यांना मार्गदर्शक आणि दिशादर्शक आहेत.

२ ॲड्. शिंदे हे निष्णांत कायदेपंडित आहेत. अनेक सहकारी संस्था, कंपन्या, सोसायटया, शिक्षणसंस्था यांचे ते कायदे संल्लागार आहेत. विविध कायदे, त्यातील त्रुटी, पळवाटा, सुधारणा याविषयी त्यांनी केलेल्या सूचना कायदयाचे अभ्यासक, वकील, न्यायाधीश यांच्यासाठी मौलिक आहेत.

३ ॲड्. शिंदे यांनी उत्तम शेती केलेली आहे. शेतीतील अर्थकारण, पिके, सेंद्रिय शेती, पाण्याचे महत्त्व, रासायनिक शेतीचे परिणाम याविषयीचा त्यांचा अभ्यास सखोल आहे. शेतीविषयीचे त्यांचे विचार आमचे शेतकरी, कृषीविद्यापीठे, कृषीतज्ज्ञ, शासन यांच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

४ ॲड्. शिंदे यांनी श्री. मणिभाई देसाई यांचेसमवेत ‘दुग्ध उत्पादनासंदर्भात’ काम केलेले आहे. उत्तम प्रतीच्या गाई, त्यांची काळजी, चारा—व्यवस्थापन, दुधाचा बाजार याविषयीचे

त्यांचे विचार दूधउत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शक आणि दिशादर्शक आहेत.

५ ॲड्. शिंदे हे व्यावसायिक शिक्षणतज्ज्ञ नाहीत. परंतु शिक्षणाबद्दल त्यांच्या मनात अतिशय प्रेम आणि कळवळ आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा मिळालेला सहवास आणि गेल्या ५० वर्षात रयत शिक्षण संस्थेत केलेले काम यामुळे शिक्षणविषयीचा त्यांचा व्यासंग प्रचंड आहे. शिक्षण आणि समाज याविषयीचे त्यांचे विचार, शिफारसी, सूचना या शासन, शिक्षणसंस्थाचालक यांच्यासाठी मौलिक आणि महत्त्वाचे आहेत.

६ रयत शिक्षण संस्थेमध्ये काम करतांना ॲड्. शिंदे यांनी अनेक दिशादर्शक आणि पथदर्शक प्रकल्प, उपक्रम राबविले. उदा. ऑनलाईन शिक्षक भरती, विद्यार्थ्यांसाठी संगणक शिक्षण, रयत विज्ञान परिषद, शिक्षक शिष्यवृत्ती, उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, विद्यार्थ्यांसाठी कमवा व शिका योजनेअंतर्गत टाटा बी.पी.ओ. सेंटरमध्ये काम करण्याची संधी यासारखे अनेक उपक्रम शिक्षणसंस्थांना, शासनाला मार्गदर्शक आणि उपयुक्त आहे.

७ अनेक सामाजिक चळवळीमध्ये ॲड्. शिंदे यांचा सहभाग आहे. समाजप्रबोधक, सामाजिक परिवर्तन, सामाजिक बांधिलकी, सामाजिकभान याविषयीचे त्यांचे विचार समाजातील प्रत्येक घटकालाच विचार करण्यास प्रवृत्त करणारे, वर्तनबदलास चालना देणारे आहेत. ॲड्. शिंदे यांचे शैक्षणिक योगदान हे सद्यस्थितीत विद्यार्थी, शिक्षक, शाळा, महाविद्यालय, शिक्षण संस्थाचालक, पालक, प्रशासक यांच्यासाठी उपयुक्त आहे.

८ ॲड्. शिंदे यांच्या वाङ्.मयातून त्यांचे जीवन संघर्ष, स्वातंत्र्यपूर्व चळवळ, स्वातंत्र्योत्तर चळवळ, भूमिगत जीवन शैक्षणिक व सामाजिक कार्य यांचे प्रेरक दर्शन घडत असल्याने विद्यार्थ्यांना हे वाङ्.मय वाचण्यास प्रवृत्त करून त्यांच्यावर मूल्यांचे शिक्षण

बिंबविता येतील.

९ ॲड्. शिंदे हे फक्त पुस्तकी पंडीत नाही. व्यापक सहानुभूती आणि सर्वांगीण निरीक्षण यातून स्फुरलेला विचार ते प्रबोधकाच्या उपायाने मांडतात. त्याच्या भाषणाप्रमाणे त्यांचे लेखनही भावोत्कटतने ओथंबलेले असते. श्रोत्याला, वाचकाला अंतर्मुख करणे, उत्तेजित करणे, क्रियाप्रवण करणे हेच त्यांचे इप्सित असते. प्रेरकता आणि प्रोत्साहकता हा त्यांच्या विचारांचा गुण आहे. त्यांचे लिखाण वाचकाला विचार करायला प्रवृत्त करते.

१० ॲड्. शिंदे यांनी त्यांच्या संपूर्ण वाड्.मयात मूल्यांना अतिशय महत्त्व दिलेले आहे. मूल्यांशिवाय समाज परिवर्तन नाही यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. त्यांचे शैक्षणिक विचार विद्यार्थी, शिक्षक, पालक, मुख्याध्यापक, ग्रंथपाल, सामाजिक कार्यकर्ते, शैक्षणिक प्रशासन अधिकारी, संस्थाचालक, अभ्यासक्रमनिर्मिती तज्ज्ञ या सर्वांना उपयुक्त आहेत.

११ ॲड्. शिंदे यांचा पिंड वेगवेगळया विचारधारांनी संस्कारित झालेला आहे. अनेक सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था यांचे कार्य त्यांच्या लिखाणातून समाजापुढे आणले आहे. समाजाची उपक्रमशीलता वाढविण्यासाठी ॲड्. शिंदे यांचे वैचारिक लेखन उपयुक्त आहे.

१२ ॲड्. शिंदे यांनी शिक्षणक्षेत्रातील अनेक समस्या त्यांच्या लेखणातून मांडल्या आहेत, परंतु फक्त प्रश्न मांडून ते थांबले नाहीत तर त्यावरील उपायांची चर्चाही त्यांनी केली आहे. शिक्षक, पालक, संस्थाचालक व प्रशासक यांच्यासाठी हे विचार मार्गदर्शक व दिशादर्शक आहेत.

१३ ॲड्. शिंदे हे कार्यवादी व आदर्शवादी आहेत. स्वातंत्र्यसैनिक, सामाजिक भान असलेला वकील, समाजसेवक, शिक्षणतज्ज्ञ, शेतकरी, गो—पालक अशा अनेक भूमिका एकाच आयुष्यात त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. जीवनात निराश झालेल्या व्यक्तीला, अपयशाने खचलेल्या माणसाला उभारी

देणारे, प्रेरणा देणारे त्यांचे लेखण आहे.

**५.३ निष्कर्षाची चर्चा**

पूर्वी झालेल्या संशोधनाचे निष्कर्ष व सदर संशोधनातील निष्कर्ष यांची फक्त तुलना करणे, इतका मर्यादित अर्थ या चर्चेचा नाही. इतर सर्व व्यक्तीप्रमाणे ॲड्. रावसाहेब शिंदे यांनी मांडलेले विचार व त्यांचे स्वरूप समजावून घेण्यासाठी निष्कर्षाची चर्चा केलेली आहे. तसेच ॲड्. रावसाहेब शिंदे यांच्या साहित्यातून व्यक्त होणारे शैक्षणिक व सामाजिक विचार इतरांनी मांडलेल्या विचारांप्रमाणे कसे आहेत, शिवाय ॲड्. रावसाहेब शिंदे यांचे विचार इतरांपेक्षा नेमके कसे वेगळे आहे हे पाहण्यासाठी निष्कर्षाची चर्चा केलेली आहे.

१. प्रभुणे रामकृष्ण (१९९०) : साने गुरूजींच्या वाङ्.मयाचा शैक्षणिक दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास, यात श्री प्रभुणे यांनी सानेगुरूजींच्या वाङ्.मयाचे शैक्षणिक तत्त्वज्ञान, शैक्षणिक समाजशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र व मूल्ये यांच्याआधारे विश्लेषण केले आहे. सानेगुरूजींचे वाङ्.मय नैतिक शिक्षणासाठी उपयुक्त आहे.

ॲड्. रावसाहेब शिंदे यांनीही त्यांच्या वाङ्.मयामध्ये शैक्षणिक तत्त्वज्ञान, शैक्षणिक समाजशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र, १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील १० मूल्ये, याविषयीचे विचार मांडलेले आहेत. ॲड्. शिंदे यांची प्रत्यक्ष मुलाखत हे सदर संशोधनाचे वेगळेपण आहे. ॲड्. शिंदे यांचे विचार सद्यस्थितीत शाळा, शिक्षक, विद्यार्थी, संस्थाचालक यांच्या विकासासाठी उपयुक्त आहेत. मूल्यशिक्षणावर ॲड्. शिंदे यांचा भर आहे. मूल्यशिक्षणातूनच अपेक्षित बदल होवू शकतो असे त्यांना वाटते.

२. गोगटे रमण (१९९१) : समर्थ रामदासांचा शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा चिकित्सक अभ्यास. यात समर्थ रामदासांनी शिक्षण, शिक्षणाची ध्येये, शिक्षक, अध्यापन पद्धती, विद्यार्थी, विद्यार्थी

शिस्त, अध्ययन, गुरू शिष्य संबंध, स्त्री शिक्षण याविषयीचे विचार मांडले आहेत. शिक्षणातूनच समाज परिवर्तन होवू शकते यावर समर्थ रामदासांना विश्वास आहे. श्रमप्रतिष्ठा, शारीरिक बलोपासना, श्रमशक्ती यावर समर्थ रामदासांचा भर आहे.

ॲड्. रावसाहेब शिंदे यांनीही आपल्या विचारातून श्रमशिक्षणाला अतिशय महत्त्व दिलेले आहे. श्रमाला महत्त्व देणारा समाजच विकासाची फळे चाखू शकतो असे त्यांना वाटते. आणि म्हणून आपल्या शाळा, महाविद्यालये, शिक्षक विद्यार्थी यांनी शिक्षणातून श्रममूल्य जोपासले पाहिजे असे ते सुचवितात.

३. राईरीकर अपर्णा (२००३) कै. गुरूवर्य विष्णू गोविंद उर्फ अण्णासाहेब विजापूरकर यांचे शैक्षणिक कार्य व शैक्षणिक विचार यांचा चिकित्सक अभ्यास, यात शिक्षणतज्ज्ञ व शिक्षण संस्थेचे प्रशासक अण्णासाहेब विजापूरकर यांचे शैक्षणिक व प्रशासकीय विचार मांडलेले आहेत. शैक्षणिक व्यवस्थापन समस्या व उपाय याविषयीचे विजापूरकर यांचे विचार संशोधनाचा गाभा आहे.

ॲड्. रावसाहेब शिंदे हे रयत शिक्षण संस्था सातारा या डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या संस्थेत जनरल बॉडी सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, व्हा. चेअरमन, चेअरमन या पदावर कार्यरत होते. प्रशासनाचा त्यांचा अनुभव दांडगा होता. याशिवाय अनेक साखर कारखाने, पतपेढया, सहकारी संस्था, यांचे ते कायदेशीर सल्लागार होते. प्रशासन, सरकार, राजकारण यातील घसरती मूल्ये पाहून ते अतिशय अस्वस्थ होते. आपल्या लेखनीच्या माध्यमातून शासनाच्या अनेक चुकीच्या धोरणांवर आपले परखड विचार त्यांनी व्यक्त केले आहेत.

४. पवार चंदन (२०१०) महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक विचार व योगदान आणि आजच्या

शिक्षणासाठी त्याची उपयुक्तता तपासणे. यात म. फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणाविषयीचे विचार आणि सत्यशोधक समाजाची स्थापना व महत्त्व सांगितले आहेत. फुले दाम्पत्याचे शिक्षणाविषयीचे धोरण, तळमळ, प्रयत्न यामुळे समाज शहाणा होण्यास मदत झाली.

ॲड्. रावसाहेब शिंदे यांनी आपल्या साहित्यांच्या व भाषणाच्या माध्यमातून शैक्षणिक व सामाजिक विचार समाजापर्यंत पोहचविले. मूल्यआधारीत शिक्षणच समाज उभे करू शकते असे ॲड्. शिंदे यांना वाटते त्यासाठी मूल्यांचा जागर व्हायला हवा, शिक्षकाने ही जबाबदारी उचलायला हवी असे ॲड्. शिंदे यांचे मत आहे.

५. कांबळे गीता (२०११) शांताबाई दाणी यांच्या कार्याचा अभ्यास करणे यात शांताबाई दाणीयांनी दलितांच्या शिक्षणासाठी केलेला संघर्ष, उभारलेले लढे, स्थापन केलेल्या शाळा, बालवाडया, शिक्षण संस्था यांचा अभ्यास आहे. शांताबाई यांनी, समानतेसाठी शिक्षण, व्यावसायिक व नैतिक शिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास यावर भर दिला. स्त्री शिक्षण, प्रौढ शिक्षण, निरंतर शिक्षण यासाठी विशेष प्रयत्न केले.

ॲड्. रावसाहेब शिंदे यांनी सुद्धा स्त्री शिक्षणाचा, वंचितांच्या शिक्षणाचा, आदीवासींच्या शिक्षणाचा पुरस्कार केला आहे. समाजातील मोठया संख्येने भाग असणाऱ्या स्त्रिया, दलित, वंचित, आदीवासी यांच्या विकासाशिवाय आपण विकसित राष्ट्राची स्वप्ने पाहू शकत नाही असे ॲड्. शिंदे यांचे स्पष्ट मत आहे. शासनाच्या चुकीच्या धोरणाने शिक्षणाची अवस्था आणखीनच बिकट झाली आहे. त्यासाठी समाजानेच पुढाकार घेऊन बदल घडविले पाहिजेत असेही ते सुचवितात.

६. चव्हाण राजेंद्र (२०१२), ॲड्. शिंदे यांच्या वाङ्मयाचे शैक्षणिक योगदान, यात ॲड्. शिंदे यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान, शैक्षणिक समाजशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र याविषयीचे विचार

मांडलेले आहेत. साहित्यिक अ‍ॅड्. शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्टये, त्यांच्या विचारांची सद्यस्थितीतील उपयुक्तता विषद केली आहे.

अ‍ॅड्. रावसाहेब शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाची स्वांतत्र्यसैनिक, ज्येष्ठ विचारवंत, उत्तम शेतकरी, अभ्यासू कायदेतज्ज्ञ, मूल्यनिष्ठ, वक्तशीरपणा, यासारखी वैशिष्टये आहे. अ‍ॅड्. शिंदे यांचे शैक्षणिक व सामाजिक विचार कालसुसंगत, व्यवहार्य, शासन आणि समाज दोहोंसाठी मार्गदर्शक आहेत.

**५.४ शिफारशी :—**

१. अ‍ॅड्. शिंदे व त्यांच्याचप्रमाणे वैचारिक व संस्कारक्षमलेखन करणाऱ्या साहित्यिकांचे साहित्य शालेय स्तरावर पुरवणी वाचन म्हणून आणि सुधारित दोन वर्षाच्या डी.टी.एड., बी.एड., एम.एड, च्या अभ्यासक्रमात संदर्भ पुस्तके म्हणून समाविष्ट करावे.

२. अ‍ॅड्. शिंदे यांनी श्रमाला अनन्यसाधारण महत्त्व दिलेले आहे. सर्व स्तरावरील अभ्यासक्रमामध्ये श्रमशिक्षणाला स्थान देण्यात यावे.

३. अ‍ॅड्. शिंदे यांच्या मते शिक्षक हा शिक्षणाचा आत्मा आहे. शिक्षकांनी अ‍ॅड्. शिंदे यांच्या वाङ्.मयातून व्यक्त झालेल्या शैक्षणिक तत्त्वज्ञान, शैक्षणिक समाजशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र संदर्भातील समस्या समजावून घेऊन विद्यार्थ्यांच्या क्षमता व कल पाहून आपल्या अध्यापनात नाविण्य व उपक्रमशीलता आणण्याचा प्रयत्न करावा.

४. सेंद्रीय शेती, पर्यावरण शिक्षण, यांचा समावेश शालेय स्तरापासून तर पदवीपर्यतच्या अभ्यासक्रमात असावा.

५. संस्थाचालकांनी आपले शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी यांना प्रेरणा, प्रोत्साहन दयावे. आपले चारित्र्य निष्कलंक ठेवावे.

६. शासनाने धोरणे ठरवितांना गरीबांवर अन्याय होणार नाही व पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी घ्यावी.

समाजातील सर्व स्तरातील लोकांना उपयोगी पडेल असे धोरण असावे.

७. विद्यार्थ्यांनी चारित्र्य, आरोग्य आणि अभ्यास यांची जोपासना करावी.

८. समाजामध्ये जे जे चांगले आहे त्याच्या पाठीमागे समाजातील सर्व घटकांनी उभे राहावे. पाठींबा दयावा जे अन्यायकारक आहे, समाजाला अहितकारक आहे. त्याचा कडाडून विरोध समाजाने करावा. समाजातील उपक्रमशीलता जागविली जाणे महत्त्वाचे आहे.

९. विद्यार्थ्यांवर मूल्यांचे संस्कार होण्यासाठी महाविद्यालये, शाळा यांनी व्याख्याने, प्रदर्शने, चित्रपट, उपक्रमांचे आयोजन करावे.

१०. पालकांनी मुलांना मार्कवंत नाही तर गुणवंत म्हणून घडविण्यासाठी प्रयत्न करावे.

**५.५ पुढील संशोधनासाठी विषय :—**

१. ॲड्. रावसाहेब शिंदे यांचे रयत शिक्षण संस्थेतील योगदान — एक अभ्यास.

२. ॲड्. रावसाहेब शिंदे यांच्या पत्रातून व्यक्त होणाऱ्या मूल्यविषयक विचारांचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वावरील परिणामांचा अभ्यास.

३. स्वातंत्र्यसैनिकांचे शैक्षणिक चळवळीतील योगदान — एक अभ्यास.

४. कम्युनिष्टांचे शैक्षणिक चळवळीतील योगदान — एक अभ्यास.

❑❑❑

# संदर्भ सूची

## संदर्भ पुस्तके

### मराठी


१ अकोलकर, ग. वि (१९७३). शैक्षणिक समाजशास्त्रण पुणे: श्रीविद्या प्रकाशन.

२ आहेर, हिरा. (१९९५). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक. नागपूर: विद्या प्रकाशन.

३ उपाध्येबाबुराव. (२००८). प्रेरणापव. पुणे:अमेय प्रकाशन.

४ कसबेकर विजय. (१९८९). राजकीय तत्वप्रणाली सिदंधात आणि व्यवहार. पुणे:अमेय प्रकाशन.

५ कुंडले, म. ब. (१९८६). शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्रण पुणे: श्रीविद्या प्रकाशन.

६ कुलकर्णी, के. वि. (१९८५). शैक्षणिक व मानसशास्त्रण पुणे: श्रीविद्या प्रकाशन.

७ के. के. जाधवण (२०११). नवीन काळाचे शिक्षण — तत्त्वज्ञानण पुणे: श्रीविद्या प्रकाशन.कऱ्हाडे, बी.एम. (२००७). शास्त्रीय संशोधन पध्दती : नागपूर : पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, पृष्ठ. ५५३.

८ गागरे. एस. बी. (२००६).प्रतिध्यास. श्रीरामपूर : अमित प्रकाशन.

९ गागरे. एस. बी. (२००८). पत्रप्रेरणा . श्रीरामपूर : अमित प्रकाशन.

१० जगताप. ह. ना. (२००९). शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्रण पुणे: अनमोल प्रकाशन.

११ ढोणे एकनाथ. (२००८).पत्रसंवाद.पुणे:अमेय प्रकाशन.

१२ दांडेकर. वा. ना. (२००७). शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र पुणे : श्रीविद्या प्रकाशन.

१३ दुनाखे. (२००४). शैक्षणिक तत्त्वज्ञानण औरंगाबाद :विदया बुक्स

१४ मंचरकर.र.बा. (२००८).ध्येयासक्त.पुणे:अमेय प्रकाशन.

१५ मुळे, रा.श.आणि उमाठे वि.तु. (१९९८). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे औरंगाबाद पिदया बुक्स, (तुतीय आवृत्ती) पृष्ठ क्र. १०७.

१६ शारदा शेवतेकर. (२००४). विकासाचे व अध्ययनाचे मानसशास्त्र नागपूर: विद्या प्रकाशन

१७ सुकळे सुकदेव. (२००९).आमचे दैवत आणि आम्ही.पुणे:अमेय प्रकाशन.

१८ शिंदे रावसाहेब.(१९८९). षष्ठयब्दी पूर्ती गौरविका.पुणे:अमेय प्रकाशन.

१९ शिंदे रावसाहेब. (२००२).चरित्र आणि चारि्त्र्य;चारित्र्यांचा संग्रह.पुणे:अमेय प्रकाशन.

२० शिंदे रावसाहेब. (२००१).शिक्षण आणि समाज;वैचारिक लेखसंग्रह.पुणे:अमेय प्रकाशन.

२१ शिंदे रावसाहेब. (२००५).ध्यासपर्व;आत्मकथन.पुणे:अमेय प्रकाशन.

२२ शिंदे रावसाहेब. (२००७).भावलेली माणसं;व्यक्तिचित्रांचा संग्रह. पुणे:अमेय प्रकाशन.

२३ शिंदे रावसाहेब. (२००९).प्रश्न आहे मूल्यांचा;वैचारिक लेख. पुणे:अमेय प्रकाशन.

२४ शिंदे रावसाहेब. (२०११).संवादपर्व;पत्रव्यवहार खंड १.पुणे:अमेय प्रकाशन.

२५ शिंदे रावसाहेब. (२०११).संवादपर्व; पत्रव्यवहार खंड २. पुणे:अमेय प्रकाशन.

२६ शिंदे रावसाहेब. (२०११).संवादपर्व; पत्रव्यवहार खंड ३. पुणे:अमेय प्रकाशन.

२७ शिंदे रावसाहेब. (२०११).संवादपर्व; पत्रव्यवहार खंड ४. पुणे:अमेय प्रकाशन.

२८ शिंदे रावसाहेब. (२०११).संवादपर्व; पत्रव्यवहार खंड ५. पुणे:अमेय प्रकाशन.

२९ शिंदे रावसाहेब. (२००९). भावलेल्या प्रस्तावना.पुणे:अमेय प्रकाशन.

३० शिंदे रावसाहेब. (२००९). विचारवेध.पुणे:अमेय प्रकाशन.

३१ झिनेबाबुराव. (२०१०).अमृतकुंभ (२०१०).

**English**

1 Best, J. W., Khan. J. V. (2006) Research in Education, New Delhi, Pearson Education.

2 Chandra S. S., Sharma R. K. (1997) Research in Education, New Delhi, Altantic Publication.

3 Chaxles, C. M., Mextiex, C. A. (2002) Introduction to Educational Research, Custom Publication.

4 Kothari, C. R. (1997) Research Methodology Methods & Techniques, Wishwa Publication.

5 Patton, M. Q. (2001) Qualitative Research and Evaluation Mehtods, Sage Publication.

**Journals**

1 Gupta Purnima, Nandini Durgesh (May-June 2006) University News, Education of the Disabled A Case Study.

2 Jaiswal, Viajy, Kumar, Ajay (July-Aug. 2010) University News, Students perception of quality Higher Education – A Case Study.

3 Pande Rekha (May 2006) Journal of Indian Education, Muslim Women & Girls Education – A Case study from Hydrabad.

4 Sani, R.B.L. (May 2009) Journal of Indian Education, Flexi Schools in Bangalore – A case study.

**पीएच्.डी. स्तरावरील संशोधने**

१ आबणे, रामदास दशरथ. २००४ लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील शिक्षण विचारांचा चिकित्सक अभ्यास : पुणे पिदयापीठ, पुणे.

२ गोगटे, रमन वासुदेव १९९१. समर्थ रामदासांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा चिकित्सक अभ्यास : शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर.

३ गागरे,शं.बा. २०००. पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या शैक्षणिक विचारांचा समाजावर झालेल्या प्रभावांचा अभ्यास : पुणे विदयापीठ, पुणे.

४ कांबळे ,गीता. २०११. शांताबाई दाणी यांच्या कार्याचा अभ्यास करणे :पुणे विदयापीठ, पुणे

५ चव्हाण राजेंद्र : प्रवीण दवणे यांच्या वाड्.मयाचे शैक्षणिक योगदान, २०१२, पुणे विद्यापीठ.

६ प्रभुणे, रामकृष्ण गोविंद. १९९० साने गुरूजींच्यार वाड्मयाचा शैक्षणिक दृष्टीकोनातून चिकित्सक अभ्यास : शिवाजी विदयापीठ,कोल्हापूर.

७ पंडीतराव, वसंधा वासुदेव २००५. संत कबीराच्या दोहया मधून प्रतिबिंबीत होणाऱ्या मूल्याधिष्ठित अनौपचारिक शिक्षणाचा अभ्यास : पुणे विदयापीठ,पुणे

८ मगर, दादासाहेब पांडुरंग. २००५. संत तुकारामांच्या अभंगातील अनौपचारिक मुल्यशिक्षणाचा अभ्यास : पुणे विदयापीठ,पुणे

९ राईरीकर, अपर्णा देवीदास २००३. गोविंद उर्फ आण्णासाहेब विजापूरकर यांचे शैक्षणिक कार्य व शैक्षणिक विचार यांचा चिकित्सक अभ्यास : पुणे विदयापीठ,पुणे

१० पवार, चंदन किसन. २०१० महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक विचार व योगदान आणि आजच्या शिक्षणसाठी त्याची उपयुक्तता तपासणे.

११ पालकर सुनंदा शाम —''एकल विद्यालय'' अनौपचारिक शिक्षणाची विशेष शाळा — एक अभ्यास, पुणे विद्यापीठ, जून २०११

१२ वाजे विद्या पांडुरंग —''प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था अभ्यास'' पुणे विद्यापीठ, (२०१२)

१३ वाळुंज अविनाश हरिश्चंद्र — महात्मा फुले शिक्षण हमी योजना, पुणे विद्यापीठ, २०१५

**Web Sites**

1) http://www.casestudymethod
2) http://www.casestudyresearches
3) http://www.educationalresearch.com
4) http://www.samplingmethod.com
5) http://www.toolsofdatacollection

❑❑❑



# लेखक परिचय

**प्रा.डॉ. अमितकुमार शंकरराव गागरे**
सहायक प्राध्यापक
आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन ,सातारा

| | | |
|---|---|---|
| शैक्षणिक पात्रता | — | M.A, M.Ed, M.Phil, Ph.d ,SET,NET |
| लेखन | — | सुक्ष्म अध्यापन, शैक्षणिक मुल्यमापन, आशययुक्त अध्यापन पध्दती, अध्यापन प्रतिमाने,इ. विषयांवर लेख प्रसिध्द. |
| व्याख्यान | — | शिक्षण प्रशिक्षण ,शै.मानसशास्त्र, शिक्षणातील नविन विचारप्रवाह.इ. विषयावर व्याख्याने शोधनिंबध वाचन |
| विशेष | — | बॅकॉक थायलंड येथे आंतरराष्ट्रीय चर्चासत्र सहभाग व शोधनिबंध वाचन सहभाग |
| सहभाग | — | चित्रदुर्ग ,कर्नाटक येथे आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग |
| उल्लेखनीय | — | पुणे विद्यापीठ M.Ed परीक्षेत गुणवत्ता यादीत चौथा क्रमांक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार , बॅकॉक थायलंड येथे प्राप्त. |
| आयोजन | — | विविध विषयांवरील आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्र, कार्यशाळा यांचे यशस्वी आयोजन. |